# श्री वेंकटेश विजय

वेदव्यासांनी भविष्योत्तर पुराणात वेंकटगिरीचा महिमा सांगितला आहे. या कलियुगात जे कोणी त्यांची भक्ती करतात, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

प्रस्तावना

वेदव्यासांनी भविष्योत्तर पुराणात वेंकटगिरीचा महिमा सांगितला आहे. या कलियुगात जे कोणी त्यांची भक्ती करतात, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

# Contents


अध्याय १ ला ........ 3

अध्याय २ रा ........ 8

अध्याय ३ रा ........ 13

अध्याय ४ था ........ 18

अध्याय ५ वा ........ 25

अध्याय ६ वा ........ 36

अध्याय ७ वा ........ 47

अध्याय ८ वा ........ 58

अध्याय ९ वा ........ 65

अध्याय १० वा ........ 75

अध्याय ११ वा ........ 84

अध्याय १२ वा ........ 91

## अध्याय १ ला

*या 'व्यंकटेश विजय' ग्रंथाची सुरवात करताना लेखकाने प्रथमतः गणपती, सरस्वती, कुलदेवता, सदगुरु वेदव्यास इत्यादि थोर पुरुषांना वंदन करून नंतर सरस्वतीचे स्तवन केले आहे. ही कथा वेदव्यासांनी भविष्योत्तर पुराणामध्ये सांगितली आहे. ती संस्कृतमध्ये असल्याने ती सामान्य लोकांकरिता म्हणून मी प्राकृत भाषेत तुम्हाला सांगतो-*

*एकदा नैमिष अरण्यामध्ये शौनकादिक ऋषींने सूतांना प्रश्न केला. इंदिरापति जो व्यंकटेश त्याचे चरित्र आम्हाला सांगा. त्यावर सूतांनी सांगण्यास आरंभ केला. तेच तुम्हाला मी सांगणार आहे.*

*पूर्वी मिथिला नावाच्या नगरीमध्ये राजा जनक राज्य करीत होता. त्याच्या वागण्याने लोक त्याला राजर्षी म्हणत असत. तो नेहमी ईश्वराची भक्ती करीत असे. त्याला कुशकेत नावाचा भाऊ होता. त्याच्यावर सर्व कारभार सोपवून तो ईश्वर भजन करण्यात मग्न होता. कुशकेतुला तीन मुलगे आणि तीन मुली होत्या. जनक राजाला जानकी नावाची एक सुंदर मुलगी होती. राजा जनक अत्यंत सुखाने काल घालवत होता. आपण फार सुखी आहोत असे हा राजा मानीत होता. विद्वान माणसाने सुख किंवा दुःख याचा विचार न करता सर्वदा शांतपणाने रहावे. राजाला आपल्या गुणांचा फार अभिमान झाला. पुढे त्याचा परिणाम असा झाला की त्याचा बंध जो कुशकेतु तो एकाएकी मरण पावला. कुशकेतुच्या पत्नीने अग्निप्रवेश केला. यामुळे राजाला फार त्रास झाला, वृद्धापकालामध्ये त्याची चिंता वाढू लागली. त्याने खाणे पिणे सर्व सोडून दिले. असा तो दुःखी असताना एक दिवस त्यांच्या पुरोहिताचा मुलगा शतानंद त्यांच्याकडे आले. राजाने जाऊन त्यांचा सन्मान केला. त्यांची पूजा वगैरे केली आणि आपली सर्व हकिकत त्याला सांगितली. माझ्या व माझ्या बंधूच्या मुलीकरिता चौघे भाऊ गुणवान माझे जामात असावेत अशी माझी इच्छा आहे. याला मी काय करू? यावर शतानंदाने सांगण्यास सुरुवात केली. शतानंद म्हणाले.*

*राजा या पृथ्वीवर वेंकटगिरीचा महिमा फार मोठा आहे. वेदव्यासांनी भविष्योत्तर पुराणात त्याचे महत्त्व सांगितले आहे. या कलियुगात जे कोणी त्यांची भक्ती करतात, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. शतानंदाच्या मुखातून राजाने वेंकटगिरीचे महत्त्व ऐकण्यास सुरुवात केली.*

*राजा कृतयुगामध्ये ज्याला वृषभाद्री असे म्हणतात. त्रेतायुगामध्ये अंजनाद्री म्हणतात, द्वापारयुगात शेषाचल आणि कलीयुगामध्ये वेंकटाद्री म्हणतात. यावर राजाने प्रश्न केला की, एकाच पर्वताला निरनिराळ्या युगात निरनिराळी नावे का प्राप्त झाली? असा प्रश्न केला असताना शतानंद सांगू लागले तो कथाभाग द्वितीया अध्यायापासून सुरू झाला आहे.*

श्रीमंगलमूर्तये नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीकुलदेवतायै नमः ॥ श्रीसद्गुरुनाथाय नमः ॥ श्रीवेदव्यासाय नमः ॥ ॐ नमोजी अपरंपारा ॥ आदिअनादिविश्वंभरा ॥ मायातीता अगोचरा ॥ दीनोद्धारा जगत्पति ॥१॥नमो भवरोगनिवारणा ॥ नमो सर्गस्थित्यंतकारणा ॥ नमो जन्ममृत्युपाशमोचना ॥ सज्जनरंजना श्रीनिवासा ॥२॥नमो नागराजतनूशयना ॥ विश्वोद्धारा खगवरकेतना ॥ भक्तवत्सला मनमोहना ॥ मधुसूदना भक्तपति ॥३॥विधिविष्णुईशान ॥ ऐशी त्रिधा रूपे साकारून ॥ उत्पत्तिस्थितिलयकारण ॥ करिता तूची श्रीहरी ॥४॥तू

निर्गुणनिर्विकार ॥ भक्तकार्या जाहलासी साकार ॥ तुझे क्रमावया गुणांबर ॥ शक्त नव्हेति श्रुतिशास्त्रे ॥५॥तूचि जाहलासी विनायक ॥ तुज नाही दुसरा नायक ॥ सकळविद्येचा आरंभ देख ॥ सुखदायक दासाचा ॥६॥जैसा पूर्णिमेचा निशानाथ ॥ तैसा एकदंत झळकत ॥ तडित्प्रायपीतांबरमिरवत ॥ नागभूषणे शोभती ॥७॥परमसुहास्यकरिराजवदन ॥ सरळसोंड लंबायमान ॥ शेंदूरचर्चितशोभायमान ॥ सिद्धगजानन विलसितसे ॥८॥चतुर्भुजपाशांकुशधर ॥ विराजमान दोंदील सुंदर ॥ पाहतांचि रूप मनोहर ॥ आल्हादकारक वाटतसे ॥९॥तुझे स्मरण करिता गणपति ॥ विघ्ने बारावाटे पळती ॥ वेंकटेशविजय वदावया निश्चिती ॥ देई मति मजलागी ॥१०॥नमू आता विरिंचि कुमारी ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी ॥ चहू वाचांची ईश्वरी ॥ आदिमाता अवतरली ॥११॥जय मूळप्रकृति जगदंबे ॥ सकळविद्येची आरंभे ॥ प्रणवरूपिणी स्वयंभे ॥ त्रिजगत्स्तंभे सरस्वती ॥१२॥तुझे गायन ऐकता सुरंग ॥ सुधापानी होती कुरंग ॥ तप्तचामीकरा ऐसे अंग ॥ प्रभा अभंग दिसतसे ॥१३॥बोलता झळकती दंत ॥ तेणे दशदिशा पै उजळत ॥ मर्गजाशी बिंक चढत ॥ हिरिया ऐसे भासती ॥१४॥हंसावरी आरुढोन ॥ करी सुस्वरवीणा घेऊन ॥ कविजनांसी द्यावया वरदान ॥ प्रसन्नवदन सर्वदा ॥१५॥तुझे कृपामात्रे करून ॥ मूक शास्त्रज्ञ होईल गहन ॥ ग्रंथारंभी तुझे चरण ॥ प्रेमभावे वंदितसे ॥१६॥गणेशसरस्वतीचे स्तवन ॥ जेणे करविले कृपेकरून ॥ ज्याचेनियोगे भवपाशगहन ॥ तुटे बंधन क्षणमात्रे ॥१७॥ऐसे सद्गुरुचैतन्यघन ॥ गोविंदराज नामाभिधान ॥ ज्याचे देखता महिमान ॥ गोविंदचि अवतरला ॥१८॥जो क्रोधनगभंजनवज्रधर ॥ जो कामगजविदारक हरिवर ॥ जो अपरोक्षज्ञानाचा सागर ॥ जो मंदिरधैर्याचे ॥१९॥ज्याची ऐकता कवित्वरचना ॥ आश्चर्यवाटे सर्वांच्या मना ॥ ज्याणे भक्तिबळे नारायणा ॥ आपणाधीन केलाअसे ॥२०॥ऐसा तो गोविंदराज ॥ नमूनि त्याचे चरणांबुज ॥ रात्रंदिवस चरणरज ॥ वीर इच्छा करीतसे ॥२१॥नमू आता श्रीकुलदैवत ॥ जो का श्रीकृष्ण वेणीतटस्थ ॥ दक्षयज्ञविध्वंसोनी अद्भुत ॥ खळमर्दन केले जेणे ॥२२॥शिवनेत्री उद्भवोनी सहज ॥ दाविले जेणे अगाधतेज ॥ ग्रंथारंभी श्रीवीरभद्रराज ॥ प्रेमभावे वंदिला ॥२३॥नमू आता मातापितर ॥ जे ज्ञानरूप परमपवित्र ॥ श्रीशंकरउपासकनिर्धार ॥ भजती निरंतर उभयता ॥२४॥जन्मलो ज्याचे उदरात ॥ पितयाचे नाम बाळाजीपंत ॥ कृष्णाबाई माता विख्यात ॥ पतिव्रता शांतगुणी ॥२५॥त्याउभयतांचे चरणी ॥ वीरबाळ मस्तक ठेउनी ॥ श्रीवेंकटेशविजयकथनी ॥ आरंभ केला साक्षेप ॥२६॥आता नमू साधुसंत ॥ जे ब्रह्मानंदे डुल्लत ॥ ज्यांचे दृष्टी जनवनसमस्त ॥ समानचि भासतसे ॥२७॥जे ज्ञानामृताचे सागर ॥ जे श्रीहरीचे कृपापात्र ॥ ज्यासाठी श्रीवेंकटेश्वर ॥ घेत अवतार युगायुगी ॥२८॥ज्याची कृपा होता देख ॥ इंद्रपदापावे रंक ॥ मुर्खाचे ह्रदयी ज्ञानार्क ॥ उगवे कृपेने जयाचे ॥२९॥ऐसे जे का संत सज्जन ॥ त्यांचे चरणी अनन्यशरण ॥ मजवरी कृपाकरून ॥ ग्रंथसिद्धीसी नेइजे ॥३०॥ऐसे ऐकोनी संतस्तवन ॥ बोलती श्रोते विचक्षण ॥ पाल्लाळ अवघा टाकोन ॥ वेंकटेशविजय बोल का ॥३१॥तंदूळांतील खडे समग्र ॥ निवडती जैसे निवडणार ॥ तैसे पाल्लाळ सांडोनी समग्र ॥ बोल साचार चरित्र पै ॥३२॥ऐका आता सावधान ॥ श्रीवेंकटेशाचे चरित्र गहन ॥ जे ऐकता भावेकरून ॥ सर्वमनोरथ पुरती ते ॥३३॥आयुरारोग्यैश्वर्यसंतती ॥ हे ऐकंताची होय प्राप्ती ॥ देणार श्रीवेंकटपती ॥ शेषाचलनिवासी जो ॥३४॥श्रीवेदव्यासस्वमुखेकरोनी ॥ बोलिला

भविष्योत्तरपुराणी ॥ त्याचा मथितार्थ काढोनी ॥ प्राकृतभाषणी रचियेले ॥३५॥बोलणे माझे अरसबहुत ॥ परी संती घालावे पोटात ॥ जैसे बालक बोबडे बोलत ॥ जनकजननीसी आवडे ते ॥३६॥मी नव्हे चतुरपंडित ॥ संस्कृतव्युत्पत्ति नाही किंचित ॥ ग्रंथ वदावयाचा हेत ॥ मनी धरिला निर्धारी ॥३७॥श्रीवेंकटेश वैकुंठविहारी ॥ जो का भक्तजनाचा सहाकारी ॥ मूढाहाती ग्रंथनिर्धारी ॥ करविता तोची सर्वथा ॥३८॥शौनकादिमुनि विख्यात ॥ नैमिषारण्यी ऋषींसहित ॥ सूताप्रती प्रश्न करित ॥ अत्यादरे करोनिया ॥३९॥इंदिरापति मनमोहन ॥ त्याचे चरित्र परमपावन ॥ श्रीवेंकटेशविजय आम्हांलागून ॥ श्रवणकरविला पाहिजे ॥४०॥यावरी सूत वक्ता निरूपण ॥ वदता जाहला हर्षायमाण ॥ श्रीनिवासाचे गुणकीर्तन ॥ ऐका सावधान श्रोते हो ॥४१॥पूर्वी मिथिलानाम नगरी ॥ राव जनक राज्य करी ॥ परमविख्यात अवनीवरी ॥ राजऋषि म्हणवितसे ॥४२॥जो धार्मिकसुभट ॥ जो सकलरायांमाजी वरिष्ठ ॥ जो ज्ञानगंगेचा लोट ॥ पुण्यश्लोकात गणना ज्याची ॥४३॥दुष्टदंडनी कृतांत ॥ संतसज्जनासी नम्र बहुत ॥ बालकापरी रक्षित ॥ प्रजाजनांसी सर्वदा ॥४४॥सत्यवादी शास्त्रज्ञ थोर ॥ कामक्रोध आवरोनी समग्र ॥ वासुदेवभजनी तत्पर ॥ अहोरात्र मज ज्याचे ॥४५॥तयाचा बंधु विख्यात ॥ नाम त्याचे कुशकेत ॥ जनकरायासी आवडत ॥ प्राणांहूनि पलीकडे ॥४६॥राज्यकारभार समस्त ॥ जनकराव बंधूसी सांगत ॥ यथान्याय पारपत्य ॥ सर्वही तूचि करावे ॥४७॥बंधूसी राज्यनिरवून ॥ आपण करी श्रीहरिचिंतन ॥ कथाकीर्तन पुराण श्रवण ॥ येणेकरोनी कालक्रमी ॥४८॥कुशकेतूचे उदरी ॥ जन्मल्या तिघी कुमारी ॥ तीन पुत्र निर्धारी ॥ तयालागी जाहले ॥४९॥जनकरायाची कन्या ॥ जानकी नामे कमलनयना ॥ जीचिया स्वरूपावरूना ॥ कोटिकाम वोवाळिजे ॥५०॥संततिसंपत्तिसमवेत ॥ जनकराजा राज्य करित ॥ मनी म्हणे नृपनाथ ॥ सुखी निश्चित मी एक ॥५१॥कदापि दुःखाची वार्ता ॥ मज नाही ठाऊक सर्वथा ॥ पुढे ही दुःख तत्त्वता ॥ दृष्टी न पडो माझिया ॥५२॥राव आपुले चित्तात ॥ सुखी मी म्हणोनि मानित ॥ परी ही गोष्ट असंमत ॥ साधूंसी संमत न होय ॥५३॥ज्ञानियाचे मुख्य लक्षण ॥ सुखदुःख असावे समसमान ॥ कामक्रोधादिक जिंकून ॥ द्वंद्वातीत सर्वदा ॥५४॥मृत्तिका आणि कांचन ॥ ज्यासि भासावे समान ॥ रावजनक ज्ञानी संपूर्ण ॥ त्यासी हे गुण न साजे ॥५५॥कमळपत्राक्ष कृपाघन ॥ जो वैकुंठवासी रमारमण ॥ निजभक्तांचे उणे जाण ॥ पडो नेदी सर्वथा ॥५६॥रावजनक ज्ञानसागर ॥ त्याने सुखाचा मानिला हरिख फार ॥ काही दिवस गेलियावर ॥ पुढील विचार ऐका पा ॥५७॥जनकाचा बंधु कुशकेत ॥ मरण पावला अकस्मात ॥ त्याची स्त्री अग्निप्रवेश करित ॥ पतिसमागमे तेधवा ॥५८॥जनकराजा ते अवसरी ॥ परमदुःखित जाहला अंतरी ॥ लेकुरे पाहोनि निर्धारी ॥ शोक भारी करितसे ॥५९॥म्हणे जगन्निवासा श्रीहरी ॥ मज का दुःख दाविले निर्धारी ॥ ऐसे राजा अहोरात्री ॥ तळमळीतसे तेधवा ॥६०॥राजा परम सज्ञान ॥ त्यासी दुःख व्हावया काय कारण ॥ सुखाचा संग धरिला म्हणून ॥ दुःख त्यासी अनुसरले ॥६१॥सुखदुःखांची समानता ॥ मानोनिया हरीसी भजता ॥ त्यासी दुःखसांकडे तत्वता ॥ न पडे सर्वथा काळत्रयी ॥६२॥असो रात्रंदिवस ऐशापरी ॥ राजा शोक करी भारी ॥ म्हणे परदेशी बाळे निर्धारी ॥ कैशी परी करू आता ॥६३॥मज आले वृद्धपण ॥ शत्रु सर्वदा पाहती न्यून ॥ इंद्रजितरावणादि दुर्जन ॥ पाहो न शकती मजलागी ॥६४॥दिशा शून्य बंधूविण ॥ आता पाठिराखा नाही कोण ॥ या लेकरांचे संरक्षण ॥ कवणे परी करू आता ॥६५॥प्राप्त होता चिंता दारुण ॥

गोड न लगे अन्न पान ॥ राजभोग तांबूल शयन ॥ नावडेची सर्वथा ॥६६॥ऐसा राव चिंताक्रांत ॥ तो उदेले भाग्य अद्भुत ॥ जैसा दुर्बळाचे घर शोधित ॥ चिंतामणी पातला ॥६७॥की रोगियाच्या मुखांत ॥ सुधारस पडे अकस्मात् ॥ की क्षुधितासि प्राप्त ॥ क्षीराब्धि जैसा जाहला ॥६८॥तैसा शतानंदपुत्र गौतमाचा ॥ तो पुरोहित होय जनकाचा ॥ संकटकाल जाणोनि नृपाचा ॥ अकस्मात पातला ॥६९॥ऋषि आला जाणोनी ॥ राव सामोरा गेला धांवोनी ॥ साष्टांगप्रणिपात करोनी ॥ लोटांगण घालितसे ॥७०॥सिंहासनी बैसवून ॥ केले अर्घ्यपाद्यादि पूजन ॥ पुढे उभा कर जोडून ॥ स्तवन प्रीतीने करीतसे ॥७१॥म्हणे गुरुवर्या ऐक पूर्ण ॥ तु सर्वऋषींमाजी चूडारत्न ॥ माझे संकट जाणोन ॥ प्रकटलासी कृपाळुवा ॥७२॥मज आजपर्यंत प्रपंचाची आधी ॥ ऋषी ठाऊक नव्हती कधी ॥ आता स्थिर नाही माझी बुद्धी ॥ कैसे करू सांग आता ॥७३॥माझे दःख हरायाते ॥ तुज वाचोनि नाही समर्थ ॥ मी अनन्यशर यथार्थ ॥ तुझिया चरणी गुरुवर्या ॥७४॥ शतानंद म्हणे नृपनाथा ॥ तुज काय दुःख जाहले तत्त्वता ॥ ते आद्यंत सर्ववार्ता ॥ सांग आता मजप्रती ॥७५॥जनक बोले यथार्थ ॥ माझा बंधु कुशकेत ॥ काळे ग्रासिला तयाते ॥ स्त्रियेसहित गुरुवर्या ॥७६॥त्याची लेकुरेही अज्ञान ॥ त्याकडे न पाहवे माझेन ॥ मज आले वृद्धपण ॥ ऐशियासी काय करू ॥७७॥मज पाहोनी पक्षहीन ॥ शत्रु उठत्ल चहूंकडून ॥ दुःख प्राप्त जाहले गहन ॥ किती म्हणोनि वर्णावे ॥७८॥जानकी माझी कुमारी ॥ बंधु कन्या तिघी सुंदरी ॥ या योग्यवर निर्धारी ॥ कोठे पाहू सांग आता ॥७९॥माझ्या मनींचा हेत ॥ एकरायाचे चौघे सुत ॥ कुलशील आणि विद्यावंत ॥ ऐसे जामात मिळावे ॥८०॥कन्या आणि जामात ॥ होवोनिया आयुष्यवंत ॥ सुखे वर्तावे यथार्थ ॥ हे मनोगत माझे असे ॥८१॥माझे पुत्रकलत्रसहित ॥ सुखरूप असावे यथार्थ ॥ ऐशियासि उपाय त्वरित ॥ सांग यथार्थ महाराज ॥८२॥ऐशी नृपतीची वाणी ॥ ऐकोनिया शतानंदमुनी ॥ परम कृपाळू होऊनी ॥ काय बोलता जाहला ॥८३॥शतानंद म्हणे राजोत्तमा ॥ ऐका वैकुंठगिरीचा महिमा ॥ बहुत शोधिता उपमा ॥ दुसरी त्यासी नसेची ॥८४॥वैकुंठनायक मुरारी ॥ तो साक्षात वसे पर्वतावरी ॥ ज्याची महिमा ऐकता श्रोत्री ॥ पावन होती जढमूढ ॥८५॥सत्यवतीहृदयरत्न ॥ भविष्योत्तरी बोलिला गहन ॥ कलियुगी वर्तेल माहात्म्य पूर्ण ॥ सर्वकाम फलप्रद जे ॥८६॥धनविद्याआयुष्य अपार ॥ संतति आणि ज्ञानविचार ॥ श्रवणमात्रे देणार ॥ श्रीरमावर निजांगे ॥८७॥सकळ यात्रेचे फळ ॥ महामखाचे पुण्य केवळ ॥ श्रवणमात्रे मनोरथ सकळ ॥ पूर्ण होती तात्काळी ॥८८॥मनी करिता श्रवणाची आस ॥ तत्काळ शत्रू पावती नाश ॥ अनंतजन्मीचे दोष ॥ भस्म होती निर्धारी ॥८९॥भूवैकुंठ पृथ्वीवरी ॥ तो हा साक्षात शेषाद्री ॥ त्याची महात्म्याची थोरी ॥ किती म्हणोनि वर्णावी ॥९०॥आकाशाची उंची किती ॥ वर्णवेल सांग नृपती ॥ पृथ्वीवरील कणांची गणती ॥ करवेल निश्चिती एकदा ॥९१॥व्यासवाल्मिक्यादिक मुनी ॥ तेही भागले गुणवर्णनी ॥ चारी सहा अठरा जणी ॥ वर्णिता तटस्थ जाहल्या ॥९२॥ज्याचे गुण ऐकोनी ॥ शीतळ जाहला शूलपाणी ॥ ब्रह्मा इंद्र ज्याचेनी ॥ पदे आपुली पावले ॥९३॥ऐक आता चित्त देऊन ॥ श्रीवैकुंठगिरीचे वर्णन ॥ कृतयुगी जया लागून ॥ वृषभाद्रि ऐसे नाम होते ॥९४॥त्रेतायुगी अंजनाद्री ॥ नाम पावला निर्धारी ॥ शेषाचळ ऐसे द्वापारी ॥ श्रीवेंकटाद्रि कलियुगी ॥९५॥युगायुगी एकेक नाम ॥ पावला तो नगोत्तम ॥ जनक म्हणे स्वामी उत्तम ॥ इतिहास सांगा सर्वही ॥९६॥कृतयुगी वृषाद्रि म्हणोन ॥ नाम पडावया काय कारण ॥ त्रेतायुगी अंजनाद्रि म्हणोन ॥ किंनिमित्त बोलिले

॥९७॥शेषाद्रि ऐसा द्वापारी ॥ कलियुगामाजी व्यंकटगिरी ॥ ऐसे व्हावयासि निर्धारी ॥ कारण सर्व वदावे ॥९८॥शतानंद हर्षयुक्त ॥ बोलेल आता कथा अद्भुत ॥ ते ऐकावया एकचित्त ॥ जनक राजा अनुसरला ॥९९॥सभा घनवट दाटली पूर्ण ॥ सावध ऐकती साधुजन ॥ ब्रह्मक्षत्रियआदि चहु वर्ण ॥ अत्यादरे ऐकती ॥१००॥पुढील अध्यायी कथा गहन ॥ वदेल वामदेव नंदन ॥ ते संत श्रोते विचक्षण ॥ ऐका चित्त देऊनिया ॥१०१॥चैतन्यघना श्रीनिवासा ॥ श्रीगोविंदा वैकुंठवासा ॥ भक्तवत्सला रमाविलासा ॥ मायाधीशा जगत्पते ॥२॥तू कृपाकरशील जरी ॥ तरी ग्रंथसिद्धि होय निर्धारी ॥ श्रीवेंकटेशा शेषाद्रिविहारी ॥ करी धरी बाळकाते ॥३॥श्रीगोविंद पदारविंद ॥ तेथील सेवावया मकरंद ॥ कुडचीवीर होऊनि षट्पद ॥ दिव्य आमोद सेविसते ॥४॥इति श्रीवेंकटेशविजय सुंदर ॥ संमत पुराण भविष्योत्तर ॥ परिसोत ज्ञानीपंडित चतुर ॥ प्रथमोध्याय गोड हा ॥१०५॥

## अध्याय २ रा

*मागील अध्यायात शतानंद गौतमांनी व्यंकटगिरीचा महिमा सांगून चारही युगात तो निरनिराळ्या नावांनी प्रसिद्धीस आला आहे असे सांगितले. तेव्हा राजाने एकाच पर्वतास भिन्न भिन्न काळी अशी निराळी नावे का पडली असा प्रश्न केला; तेव्हा शतानंद गौतमांनी तो इतिहास सांगण्यास सुरुवात केली.*

*राजा ! कृतयुगात याला वृषभाद्री नाव पडण्याचे कारण आता तुला मी सांगतो; ते ऐक.*

*पूर्वी वृषभ नावाचा एक फार भयंकर राक्षस होता. तो लोकांना फारच त्रास देतसे. त्याचे आचरण वाईट होते. तो एकदा या पर्वतावर आला. त्याने आपल्या कपाळास शेंदूर फासला होता. त्याचे तोंड फार मोठे होते. त्याला पांढरी शुभ्र लांब दाढी होती. वर्णाने तो अतिशय काळा असल्याने काळापर्वतच असा तो भासत होता. तोंडातून जीभ बाहेर काढून तो जेव्हा फिरत असे तेव्हा लोक भयाने घाबरत असत. असा हा उन्मत्त राक्षस या पर्वतावरील तुंबर तीर्थावर राहत असे. ब्राह्मण याच्या भीतीने थरथरा कापत असत. ब्राह्मणाचे स्नान संध्या ध्यान अध्यापन होमहवनदि सर्व कर्म याच्या भीतीने बंद पडले. केव्हातरी सर्व ब्राह्मण मंडळी आपापल्या अनुष्ठात मग्न होऊन बसत. त्यावेळी याचे भयंकर ओरडणे ऐकू आले की त्याचे मन चलबिचल होतेसे.*

*याप्रकारे तो वृषभ राक्षस जरी महाभयंकर होता, तरी तो विष्णुभक्त असून नरसिंह शालिग्रामाची पूजा फार भक्तीने करीत असे. पूजेच्यावेळी अतिशय प्रेमाने आपले मस्तक तोडुन विष्णूस समर्पण करीत असे. भगवान विष्णूंनीही त्याच्या प्रेमाने त्यास पुनः सजीव करावे. असे पाच हजार वर्षे त्याचे तप चालले होते. सर्व लोक त्याच्या उग्रपणास फार घाबरले होते, तेव्हा त्यांनी आता आम्हांस या संकटातुन कोण सोडविणार? आता कोणास शरण जावे? या राक्षसाचा नाश कोण करिल असा विचार करीत असता त्यांनी ठरविले की, एका भगवंतावाचून आमचे रक्षण कोण करील ! त्यानेच जर मनावर घेतले तरच आमचे रक्षण होईल, मग त्या ब्राह्मणांनी स्नाने वगैरे केली व पर्वताच्या शिखरावर ते चढले. तेथे जाऊन त्यांनी भगवंताची एकाग्र मनाने स्तुती केली, त्यांची स्तुति ऐकून भगवान गरुडावर बसुन तेथे आले. त्यांचे ते स्वरूप अत्यंत सुंदर व तेजस्वी पाहून सर्वांना फार आनंद झाला. सर्व ब्राह्मणांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला व स्तुती केली. त्यांची ती स्तुती ऐकून भगवान प्रसन्न झाले व त्यांनी ब्राह्मणांना घाबरू नका असा वर दिला. तुमचे कल्याण होईल. नंतर भगवान विष्णु राक्षसाकडे आले. त्यानेही भगवंताला पाहून नमस्कार केला व स्तुतीने त्यांना संतुष्ट केले. संतुष्ट भगवंताना पाहून राक्षस म्हणाला, देवा मला राज्य वगैरे काही वैभव नको. माझे हे बाहू स्फुरण पावतत तेव्हा मला युद्धभिक्षा दे. मला तुझ्याबरोबर लढाई करावी असे वाटते. भगवंतांनी त्यास तथास्तु म्हणून त्याच्याबरोबर घनघोर युद्ध केले. त्रैलोक्यावर त्या युद्धाचा परिणाम झाला. देव, माणसे वगैरे सर्व घाबरून गेले. असे युद्ध सुरू असता याचा मला पराजय करता येत नाही हा साक्षात भगवान भक्तरक्षणाकरिता अवतरला आहे असे राक्षसास वाटले. शेवटी श्रीभगवंतांनी आपले सुदर्शनचक्र त्यावर टाकले व त्याचे मस्तक तोडले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. सर्व लोक सुखी झाले. भगवान वैकुंठास परत गेले.नंतर शतानंद*

*गौतमांनी राज्याच्या प्रश्नाप्रमाणे त्रेतायुगात याला अंजनाद्री असे नाव का मिळाले ती हकीकत सांगितली ती तिसऱ्या अध्यायात पाहू.*

श्रीगणेशाय नमः ॥ जयजय क्षीरसागरविलासिया ॥ निर्विकल्पवृक्षा श्रीहरिराया ॥ भक्त वत्सला शेषाद्रिनिलया ॥ निरसी माया दासाची ॥१॥तू जगदात्मा परात्पर ॥ भक्तसाहकरी निर्विकार ॥ दासासि रक्षी वारंवार ॥ हेही बोलणे नसाहे ॥२॥चकोरासि निववी म्हणोन ॥ चंद्रासि प्रार्थणे काय कारण ॥ अद्भुत प्रकाश पाडी म्हणोन ॥ सूर्यासि सांगणे नलगेची ॥३॥तैसा तू कृपाळू सर्वकाळ ॥ तुज काय प्रार्थावे वेळोवेळ ॥ भक्तरक्षणार्थ अवतार प्रबळ ॥ युगानुयुगी घेतोसी ॥४॥जयजयाजी वेंकटपति ॥ वेदशास्त्रे तुज वर्णिती ॥ कृपाकरूनि दीनावरुती ॥ ग्रंथसिद्धीसी नेई हा ॥५॥पूर्वाध्यायी कथाविशेष ॥ शतानंद सांगे जनकास ॥ कृतयुगी त्या पर्वतास ॥ वृषभाद्रि ऐसे नामका ॥६॥पूर्वी वृषभनामे निशाचर ॥ परमदुरात्मा दुर्धर ॥ लोकपीडक दुराचार ॥ तया पर्वतासी पातला ॥७॥महाभयानक निष्ठुर ॥ कपाळी चर्चित सेंदूर ॥ विक्राळवदन भयंकर ॥ दाढा शुभ्र दीसती ॥८॥जैसा का कज्जलपर्वत ॥ तैसा शरीरे उंच भासत ॥ जिव्हा बाहेर लळलळित ॥ पाहता भय वाटतसे ॥९॥ऐसा तो राक्षस उन्मत्त ॥ तुंबरतीर्थाजवळ राहत ॥ त्याच्या भये विप्रसमस्त ॥ चळचळा कापती ते काळी ॥१०॥न चले स्नानसंध्यातपाचरण ॥ असुरभये विव्हळमन ॥ वेदशास्त्रांचे अध्ययन ॥ न चले अनुष्ठान सर्वथा ॥११॥जैसा अजाजवळी वसता वृक ॥ त्यासि नाठवे तहान भूक ॥ तेवि असुरभये ऋषि सकळिक ॥ भयभीत सर्वदा ॥१२॥यमनियमप्राणायामकरून ॥ ऋषि बैसती होऊनि तल्लीन ॥ तो इतक्यात ऐकता हाक दारुण ॥ विगलित मन होय त्यांचे ॥१३॥ऐसा तो दैत्यदुर्धर ॥ परी विष्णुभजनी होता तत्पर ॥ श्रीनृसिंहशालग्राम मनोहर ॥ पूजी निरंतर अत्यादरे ॥१४॥असुराचे निश्चय थोर ॥ छेदूनि आपुले शिर ॥ नित्य काळी देवावर ॥ प्रेमभावे वाहतसे ॥१५॥प्रसन्न होऊनी जगन्नाथ ॥ नित्य सजीव त्याते करीत ॥ पाचसहस्त्रवर्षपर्यंत ॥ याचप्रकारे जाहले ॥१६॥ऐसा तो भाविक सत्य ॥ परी असुरस्वभावे वर्तत ॥ क्रुरकर्म पाहता मनात ॥ भयभीत विप्र जाहले ॥१७॥मग ऋषी मिळोनी समग्र ॥ म्हणती कैसे करावे विचार ॥ संकट पडिले परमदुर्धर ॥ सोडवी कोण आम्हाते ॥१८॥कोणासि जावे आता शरण ॥ कोण साहकार करील पूर्ण ॥ एक म्हणती असुरहनन ॥ होय ऐसे योजावे ॥१९॥जो जगदात्मा श्रीहरी ॥ भक्तजनांचा कैवारी ॥ त्रिभुवनपति वैकुंठविहारी ॥ त्यासी शरण जावे आता ॥२०॥तो जरी होईल कृपावंत ॥ तरी सत्य करील दैत्यांत ॥ मग विप्र होऊनी शुचिर्भूत ॥ पर्वतमस्त की चढियले ॥२१॥एकाग्र मन करोन ॥ उभे राहिले कर जोडून ॥ अंतरी आठविला मनमोहन ॥ पीतवसनजगद्गुरु ॥२२॥म्हणती पुराणपुरुषा नारायणा ॥ दीनबंधो रमारमणा ॥ क्षीराब्धिवासा जगन्मोहना ॥ मधुसूदना केशवा ॥२३॥भक्तकामकल्पद्रुमा ॥ साधुजनमनोभिरामा ॥ करुणासागरा मेघश्यामा ॥ पूर्णकामा सर्वेशा ॥२४॥हे दशावताररूपधारणा ॥ अंधकारिह्रदयभूषणा ॥ धुमुरनरकप्राणहरणा ॥ जगत्पाळणा दीनबंधो ॥२५॥नमो जगत्स्थित्यंतकारण ॥ भक्तकार्याझालाशि सगुण ॥ तुझे वर्णावया गुण ॥ सहस्त्रवदन शक्त नव्हे ॥२६॥जरी तू कृपाकरिशी स्वये ॥ तरी निगर्मतेचि सुगम होय ॥ मृत्तिका जो खणो जाय ॥ निधान त्यासी

सापडे ॥२७॥जेथे जाय तेथे विजय ॥ दुर्जन नाश शत्रुपराजय ॥ निजभक्त होऊन निर्भय ॥ तुझे चिंतिती चरणांबुज ॥२८॥नमो कमलावरा कमलभूषणा ॥ कमलोद्भवजनका कमलयना ॥ कमलनाभा कमलशयना ॥ कमलधारणा कमलप्रिया ॥२९॥नमो दुष्टदानवनिकृंतना ॥ शिष्टसाधुजन प्रतिपालना ॥ मायामोहपाशविमोचना ॥ नागेंद्रशयना श्रीहरी ॥३०॥हे द्वारकानगरविहारा ॥ विश्वव्यापका क्षीराब्धिजावरा ॥ खगवरकेतना शार्ङ्गधरा ॥ विश्वोद्धारा विश्वपती ॥३१॥तुझी वेदाज्ञा शिरी वंदून ॥ करित असता तुझे चिंतन ॥ विघ्नकरी दैत्यदुर्जन ॥ रक्षी श्रीहरी आम्हांते ॥३२॥ऐसे ऐकोनिया स्तवन ॥ वैकुंठीहूनि नारायण ॥ गरुडावरी आरुढोन ॥ जगज्जीवन पातला ॥३३॥सुरंगविराजे पीतांबर ॥ गळा डोले वैजयंतीहार ॥ मुकुटमंडले मकराकार ॥ निढळी केशर विराजितसे ॥३४॥परमसुकुमार घनश्यामवर्ण ॥ आकर्णविराजतीराजीवनयन ॥ आजानुबाहु सुहास्यवदन ॥ देदीप्यमान शोभतसे ॥३५॥शंख चक्र गदा पद्म ॥ चारी आयुधे उत्तमोत्तम ॥ उदारवदन पुरुषोत्तम ॥ निगमागमा वंद्य जो ॥३६॥ऐसा तो इंदिराकांत ॥ जो देवाधि देव समर्थ ॥ विप्रांनी देखिला अकस्मात ॥ घालिती दंडवत प्रेमभावे ॥३७॥दृढ धरोनि चरण कमळ ॥ ऋषि विनविती तेव्हा सकळ ॥ तू कृपाळु दीनदयाळ संकटप्रबळ निवारी हे ॥३८॥देखता विप्रांचे भावार्थ ॥ प्रसन्न जाहला लक्ष्मीकांत ॥ म्हणे भिऊ नका हो समस्त ॥ चिंता अणुमात्र करू नका ॥३९॥अभय देऊनि द्विजांसी ॥ वेगी पातले असुरापाशी ॥ येता देखिले हृषीकेशी ॥ असुरमानसी आनंदला ॥४०॥देखता साक्षात भगवान ॥ राक्षस करी साष्टांगनमन ॥ उभयहस्त जोडून ॥ करी स्तवन प्रीतीने ॥४१॥म्हणे जय जय कमलपत्राक्षा ॥ हे कंसारे निर्विकल्पवृक्षा ॥ निगमागमवंद्या सर्वसाक्षा ॥ कभीध्यक्षा कर्ममोचका ॥४२॥हे भवभयपाशनिवारणा ॥ हे सच्चिदानंद मुरमर्दना ॥ सुरकैवारीया बंधच्छेदना ॥ दानवमर्दना दयानिधे ॥४३॥तू नाढळसी बहुत यत्ने ॥ साधिता पंचाग्निसाधने ॥ अष्टांगयोगादिप्रयत्ने ॥ करिता दर्शन न होय ॥४४॥नानातपे आचरता ॥ प्राप्त न होशी रमाकांता ॥ भक्त वत्सला दीननाथा ॥ अनाद्यनंता श्रीहरी ॥४५॥पंच सहस्त्र संवत्सर ॥ मी येथे तप करितसे घोर ॥ परी दर्शन नव्हेचि साचार ॥ बहुत यत्न केलिया ॥४६॥आता गांजले भक्तजन ॥ जाणोनि आलासि धावोन ॥ भक्तपाळक ब्रीदगहन ॥ साचकरोनि दाविले ॥४७॥ऐसे ऐकता ते अवसरी ॥ प्रसन्न जाहले मधुकैटभारी ॥ राक्षसासि म्हणे मुरारी ॥ माग झडकरी अपेक्षित ॥४८॥असुर बोले अधोक्षजा ॥ प्रसन्न जाहलासि गरुडध्वजा ॥ मनोरथ पूर्ण माझा ॥ करी आता दयानिधे ॥४९॥नावडे राज्यसिंहासन ॥ इंद्रपद नावडे मज लागून ॥ बाहु स्फुरती माझे दारुण ॥ युद्धभिक्षा देई मज ॥५०॥तुजशी करावा संग्राम ॥ ऐसा मनोरथ माझा उत्तम ॥ पूर्णकर्ता तू मेघश्याम ॥ कृपाकरोनि देइजे ॥५१॥ऐकोनि तयाची वचनोक्ती ॥ मंदस्मितवदन जगत्पती ॥ अवश्य म्हणोनि असुराप्रती ॥ युद्धालागी प्रवर्तले ॥५२॥असुर सरसावला तेच क्षणी ॥ शस्त्रास्त्रसामग्री सिद्धकरोनी ॥ हरीसवे रणांगणि ॥ निर्वाण युद्ध करितसे ॥५३॥युद्धहोतसे घनचक्र ॥ भयभीत जाहले सुरवर ॥ विमानी बैसोनि समग्र ॥ कौतुक थोर पाहती ॥५४॥दिग्गज कापती भयेकरोन ॥ ग्रीवाहालवी विषकंठभूषण ॥ आदिवराह सावरोन ॥ पृथ्वी धरिती दाढेवरी ॥५५॥घोरांदर मांडला रण ॥ बाणमंडप दाटलासे घन ॥ त्याचेनियोगे संपूर्ण ॥ चंडकिरण झाकोळला ॥५६॥चळचळा कापती द्विज सर्वत्र ॥ म्हणती कैसा मरेल अमित्र ॥ श्रीहरिरूप कोमळ साचार ॥ कैसा

आकळे असुरहा ॥५७॥एक म्हणे दुष्टवधार्थ ॥ अवतरला हा रमाकांत ॥ त्यासि दैत्य वधावाया निश्चित ॥ उशीर काय असे पै ॥५८॥जेणे उचलोन गोवर्धन ॥ नखाग्री धरिला सप्तदिन ॥ त्या हरीसी असुरभंजन ॥ करावया काय उशीर ॥५९॥असोयुद्ध मांडले दुर्द्धर ॥ शार्ङ्गधनुष्य चढवोनि श्रीधर ॥ सोडित शरा पाठी शर ॥ राक्षसेंद्रासि लक्षोनिया ॥६०॥शक्तिपाशगदातोमर असिलताआदि शस्त्र ॥ सोडी राक्षस बहुत प्रकार ॥ परी श्रीधर नाटोपे ॥६१॥आसुरी माया परम अद्भुत ॥ प्रकट करी दैत्यनाथ ॥ क्षणांत व्याघ्रादिरूपे धरित ॥ परमभ्यासुरतेकाळी ॥६२॥जैशी वेदोक्तमंत्रापुढे निश्चित्त ॥ गारुडियाची विद्या न चलत ॥ तैशा कापट्यविद्या बहुत ॥ हरी पुढे न चलती ॥६३॥असो नानापरीचे शस्त्रपात ॥ असुरावरी करी रमानाथ ॥ बहुत प्रकारे युद्ध करीत ॥ नाटोपे दैत्य सर्वथा ॥६४॥अग्निअस्त्र पर्जन्यास्त्र ॥ वातपर्वत आणि वज्र ॥ गरुडसर्पादि अस्त्रविचित्र ॥ परस्परे प्रेरिती ॥६५॥बाणयुद्ध गदायुद्ध ॥ मल्लमहिषीकुंजरयुद्ध ॥ अंतरिक्षयुद्ध अगाध ॥ नानामंडळे दाविती ॥६६॥ऐसे सहस्त्रवर्षपर्यंत ॥ रात्रंदिवस युद्ध होत ॥ परी नाटोपे दैत्यनाथ ॥ मग रमानाथ काय करी ॥६७॥विश्वरूप ते अवसरी ॥ प्रकट करी मधुकैटभारी ॥ ते रूप अगाध निर्धारी ॥ कृतांत पाहो शकेना ॥६८॥वाटे त्याचे तेजावरती ॥ चंद्रसूर्य बुचकळ्या देती ॥ चराचरजीवांसि निश्चिती ॥ कल्पांतचि भासला ॥६९॥सहस्त्रमस्तके अद्भुत ॥ सहस्त्रकर आयुधे मंडित ॥ सहस्त्रचरणविराजित ॥ सहस्त्रलोचन दिसती पै ॥७०॥रक्त श्वेत आणि पीत ॥ कृष्ण नील वर्णभासत ॥ परमभयानकरूप अद्भुत ॥ पाहता न पाहवे तयाकडे ॥७१॥पृथ्वी आणि अंबर ॥ दाही दिशा व्यापिल्या समग्र ॥ दंत दाढा कराळ शुभ्र ॥ भयंकर वाटती ॥७२॥तेहतीसकोटी सुरवर ॥ दिसती त्याचे अवयवसमग्र ॥ नेत्र जयाचे मित्र ॥ अत्रिपुत्र मन ज्याचे ॥७३॥अश्विनीकुमार तेचिश्रोत्र ॥ अहंकार तो साक्षातरुद्र ॥ पाणी जयाचे पुरंदर ॥ कर्तृत्व सर्व करितसे ॥७४॥सहस्त्रसूर्य उगवले अकस्मात् ॥ त्याहुनि तेजविशेष भासत ॥ भयभीत असुर मनात ॥ म्हणे हे अद्बुत प्रकटले ॥७५॥या पुढे माझे कपटयुक्ती ॥ आता कदापि न चालती ॥ हा साक्षात जगत्पती ॥ भक्तकार्यार्थ अवतरला ॥७६॥याही वेगळे रूप सगुण ॥ चतुर्भुज गरुडवाहन ॥ हाती घेऊनि धनुष्यबाण ॥ अनंतरूपे दीसती ॥७७॥चहूकडोनी येती शर ॥ भुलोनि गेला हो असुर ॥ ऐसे रूप मनोहर ॥ कोणासि दृष्टी पडेना ॥७८॥करिता अष्टांगयोगसाधन ॥ किंवा आचरता महायज्ञ ॥ की करिता तीर्थाटन ॥ कदापि दर्शन न होय ॥७९॥अथवा प्रयागी जाऊन ॥ देह करवती घातले जाण ॥ तथापि ऐसे दर्शन ॥ त्यासि ही दुर्लभ सर्वथा ॥८०॥सुरभूसुरादिक चित्ती ॥ ऐसे दर्शन इच्छिती ॥ परी त्यास ही तत्प्राप्ती ॥ सर्वथा ही नव्हेची ॥८१॥त्या दैत्याचे सुकृत ॥ त्याचे कोणासि न करवे गणित ॥ साक्षात इंदिराकांत ॥ रूप अद्भुत दाविले ॥८२॥असो आता सर्वेश्वर ॥ करी घेउनी सुदर्शनचक्र ॥ असुरावरी जगदीश्वर ॥ धावला हो ते काळी ॥८३॥राक्षस ऐसे पाहून ॥ करिता झाला साष्टांगनमन ॥ म्हणे श्रीनिवासा माझे हनन ॥ करी आता झडकरी ॥८४॥तुझ्या चक्राचा पराक्रम ॥ पूर्वी च म्या ऐकिला उत्तम ॥ तुझे घोररूप हे परम ॥ आजि दृष्टी देखिले ॥८५॥तुझे रूप पहावया दृष्टी ॥ योगी होती परमकष्टी ॥ त्यासि नातळसी जगजेठी ॥ कृपादृष्टि मज केली ॥८६॥तुझ्या सुदर्शनेकरून ॥ तू जवळी असता नारायण ॥ तव हस्ते पावतो मरण ॥ सभाग्य नसे मज ऐसा ॥८७॥यावरी बोले मुरहर ॥ मी करितो आता तुझा

संहार ॥ अंतकाळी इच्छित वर ॥ माग काही मजलागी ॥८८॥राक्षस म्हणे मन्मथताता ॥ मागणे माझे हेचि आता ॥ माझे नाम या पर्वता ॥ लागी असावे जाणपा ॥८९॥कृतयुगाचा होईल अंत ॥ तोवरी यासी नामप्राप्त ॥ वृषभाचल ऐसे विख्यात ॥ जाहले पाहिजे स्वामिया ॥९०॥आणि मजसी केलासि संग्राम ॥ ही कथा ऐकती उत्तम ॥ त्यासि प्रसन्न होऊनि मेघश्याम ॥ अक्षयपद देईजे ॥९१॥ऐसे ऐकोनि श्रीधर ॥ अवश्य म्हणोनि दीधला वर ॥ मग सोडोनिया चक्र ॥ शिर तात्काळ छेदिले ॥९२॥जाहला एकचि जयजयकार ॥ सुमने वर्षती सुरवर ॥ आनंदले द्विजवर ॥ श्रीहरीजवळ पातले ॥९३॥म्हणती पुराण पुरुषा मधुसूदना ॥ मायातीता जगन्मोहना ॥ भक्तजनमानसरंजना ॥ जनार्दना जगद्गुरु ॥९४॥हे मनोजताता श्रीकरधरा ॥ असुरभंजना परमोदारा ॥ असुर संहारूनि परात्परा ॥ सुखी केलेसि आम्हांते ॥९५॥असो आता खगवरकेतन ॥ वैकुंठासि केले गमन ॥ शतानंद म्हणे जनकालागून ॥ ऐसे कथन पूर्वीचे ॥९६॥तै पासूनि वृषभाचळ ॥ नाम पावला हा अचळ ॥ ही कथा ऐकता प्रेमळ ॥ पावती अढळ हरिपद ॥९७॥मग बोले नृपवर ॥ कथा ऐकिली मनोहर ॥ पुढील कथा सुंदर ॥ श्रवणकरवी गुरुवर्या ॥९८॥त्रेतायुगि निर्धारी ॥ नाम पावला अंजनाद्री ॥ ती कथा ऐकावी चतुरी ॥ अतिआदरे करोनिया ॥९९॥श्रीवेंकटेशचरित्रगहन ॥ ऐका आता चित्त देउन ॥ पुढील अध्यायी कथन ॥ अति सुंदर असे पै ॥१००॥सज्जनरंजना श्रीनिवासा ॥ जगद्व्यापका आदिपुरुषा ॥ चैतन्यघना रमाविलासा ॥ अनंतवेषा जगत्पती ॥१०१॥तू अजअव्ययअविनाश ॥ मायातीता चित्प्रकाश ॥ मी रे तुझा दासानुदास ॥ तोडी पाश तयाचे ॥१०२॥श्रीवेंकटेशविजय सुंदर ॥ संमत पुराणभविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ द्वितीयाध्याय गोड हा ॥१०३॥एकंदर ओवीसंख्या ॥२०८॥

# अध्याय ३ रा

*शतानंद गौतमांनी राजास अंजनाद्रि नावाचा इतिहास सांगण्यास सुरुवात केली. पूर्वी त्रेतायुगात केसरी नावाचा एक वानर होता. त्याची अंजनी नावाची एक पतिव्रता स्त्री होती. तिला संतती नसल्याने ती नेहमी काळजीत असे. एके दिवशी मतंग नावाचे एक ऋषि तिच्या आश्रमास आले. त्यांचा तिने योग्य आदरसत्कार करून आपली हकीगत तिने त्यांना सांगितली. मतंगऋषींनी तिजवर कृपा करून तिला सांगितले की, तू काळजी करू नकोस. तुझे कल्याण होवो. तुला मी एक युक्ति सांगतो. येथून थोड्या अंतरावर स्वामी तीर्थापासून एक कोस अंतरावर आकाशगंगा नावाचे तीर्थ आहे. तेथे जाऊन तू बारा वर्षे भगवंताची तपश्चर्या कर. म्हणजे तुला पुत्र होईल.*

*हे ऐकून अंजनी ऋषीच्या आज्ञेप्रमाणे तेथे जाऊन दीर्घ काल फार उग्र असे तप करू लागली. तिने सर्व काही सोडून दिले. तपाने तिचे शरीर लाकडासारखे झाले. अशी बारा वर्षे पूर्ण झाली; तेव्हा एक आश्चर्य घडले. ती ओंजळ करून ध्यान करण्यात मग्न झाली असता प्रत्यक्ष वायुदेवतेने येऊन तिच्या हातात एक फळ टाकले. तो प्रसाद म्हणून अंजनिने भक्षण केला. ती त्यामुळे गर्भवती झाली. दहा महिने पूर्ण होताच तिला एक तेजस्वी व पराक्रमी पुत्र झाला तेच रामदुत हनुमंत. या पर्वतावर अंजनीमातेने तप करून भगवंताकडून प्रसाद मिळविला म्हणून याला अंजनाद्रि असे म्हणतात.*

*यानंतर द्वापार युगा त्याला शेषाचल असे नाव मिळाले आहे. शतानंदांनी ती हकीकत राजा जनकास सांगण्यास सुरुवात केली.*

*एकदा भगवान विष्णु लक्ष्मीसह एकांतात होते. द्वारपाल जय व विजय यांना सनकादिकांनी शाप दिल्यामुळे ते राक्षस योनीत जन्मास आहे होते. त्यावेळी द्वाररक्षणाच्या कामावर महाशेषाची योजना झाली होती. त्यावेळी वायुदेव भगवंताच्या दर्शनास आले असता श्रीशेषांनी त्याला अडविले. वायूने त्यास सांगितल, येथे भगवंताच्या राज्यात कोणासही अडथळा नसता तू का अडवतोस. शेषांनी आपला अधिकार सांगितला. आपण माझे ऐकले पाहिजे असे सांगितले. दोघांच पुष्कळ वादविवाद झाला. तो वादविवाद ऐकून श्रीमहालक्ष्मी बाहेर आली. तिने श्रीविष्णूंना दोघांचे भांडण सांगितले. भगवान बाहेर आले. दोघांनी त्यांना पाहून नमस्कार केला. शेषांनी आपली योग्यता व वायूची अयोग्यता सांगितली. त्यावेळी भगवान म्हणाले, उगाच कलह का! शेषा येथून उत्तरेकडे मेरुःपर्वताचा पुत्र जो एक पर्वत आहे त्याला तू वेढून घट्ट धरून राहा. त्यावेळी वायू त्याला उडविण्याचा प्रयत्न करील व मग श्रेष्ठ कोण हे ठरेल. दोघांनीही ही गोष्ट मान्य केली व स्पर्धेस सुरवात झाली. सर्व देवदानव मानव वगैरे सर्व पाहाण्यास आले. शेषाने आपल्या शरिराने तो पर्वत घट्ट धरला. तेव्हा भगवंतांनी वायूला तो उडविण्यास सांगितले असता त्यांनी केवळ आपल्या करांगुलीने त्या पर्वतास शेषांसह उडवून टाकले. तेथून तो फार लांबवर जाऊन पडला. सर्वांना फार आश्चर्य वाटले. सर्वांनी वायूची स्तुती केली. शेषाचा गर्व परिहार झाला. त्यांनी भगवंताची स्तुति केली. वायू देवतेची क्षमा मागितली. भगवंतांनी सर्वांना आशीर्वाद दिला. अभिमान कोणासही नसावा असे सांगितले. शेषांनी या पर्वताला वेढल्यामुळे या पर्वताला शेषाचल असे नाव पडले आहे*.

श्रीलक्ष्मीवेंकटेशायनमः ॥ जयजयाजी जगदुद्धारा ॥ मत्स्यरूपा सर्वेश्वरा ॥ वधूनिया निगमचोरा ॥ सुखी केलासि भक्तजन ॥१॥सागरमथनी मंद्राचळ ॥ भेदित चालिला रसातळ ॥ कूर्मरूप तू घननीळ ॥ धरिला अचल पृष्ठावरी ॥२॥हिरण्याक्षदैत्यदुर्जन ॥ पृथ्वी नेत असता चोरुन ॥ तू वराहवेष भगवान ॥ धावलासि ते काळी ॥३॥प्रल्हादासि गांजिले असुरे ॥ तू नृसिंह जाहलासी भयंकर ॥ स्तंभभेदोनी दानवेश्वर ॥ निर्दाळिले क्षणार्धे ॥४॥शतमख करी दनुजेश ॥ तुवा धरुनी वामनवेष ॥ भूदानमिषे दैत्यास ॥ पाताळांतर गाडिला ॥५॥तीनसप्तके धरित्री ॥ निःक्षत्री केली मातृकैवारी ॥ भार्गवरूपा मधुकैटभारी ॥ भक्तकैवारी तू साच ॥६॥महा बलोन्मत्तरावण ॥ बंदी घातले त्रिदशगण ॥ तू श्रीरामरूपधरोन ॥ राक्षस मर्दिले सर्वही ॥७॥कंसचाणूरकालयवन ॥ शिशुपाळवक्रदंत दुर्जन ॥ श्रीकृष्णावतारी मर्दोन ॥ मनमोहन विजयी तू ॥८॥कलीयुगी लोक मतिहीन ॥ तुज न जाणती दुर्जन ॥ तू बौद्धरूपे जनार्दन ॥ कोणासी न बोलसी ॥९॥म्लेंच्छ माजतील अपार ॥ त्यांसि मर्दावया उदित साचार ॥ कल्किरूप श्रीकरधर ॥ तुरंगारूढ धावसी ॥१०॥तोचि तू वेंकटाद्रीवरी ॥ उभा भक्तजनाचा साहकारी ॥ वाट पाहसी अहोरात्री ॥ निजदास येतील म्हणोनिया ॥११॥पूर्वाध्यायी अनुसंधान ॥ वृषभासुरासि मर्दून ॥ वैकुंठासी रमारमण ॥ जाता जाहला जगदात्मा ॥१२॥पुढील कथेचे वर्तमान ॥ परिसा येता श्रोतेजन ॥ शतानंद म्हणे जनकालागून ॥ ऐक राया सादर ॥१३॥त्रेतायुगामाजी साचार ॥ केसरी नामा वानर ॥ त्याची स्त्री पतिव्रता थोर ॥ अंजनी नाम तियेचे ॥१४॥पोटी नाही पुत्रसंतान ॥ या करिता चिंताक्रांतमन ॥ मग ती अंजनी परमउद्विग्न ॥ विचार करी निजमानसी ॥१५॥पुत्रावांचोनी शून्यसदन ॥ सरोवर जैसे जीवनाविण ॥ की नासिकेवाचोनि वदन ॥ शोभा नयेचि सर्वथा ॥१६॥की प्राणविण शरीर ॥ की फळेविण तरुवर ॥ तैसे पुत्राविण साचार ॥ वंश पवित्र न होय ॥१७॥या करिता अंजनी ॥ परम चिंताक्रांत अंतःकरणी ॥ मग मतंगनामे महामुनी ॥ त्याच्या आश्रमा पातला ॥१८॥जो ऋषियांमाजी मुकुटमणी ॥ जो तपस्वियांत अग्रगणी ॥ त्यापाशी येवोनि अंजनी ॥ साष्टांगनमन करितसे ॥१९॥म्हणे महाराजा ऋषिवर्या ॥ तू तापसियांमाजी राजया ॥ मी शरण आले तुझ्या पाया ॥ करी छाया कृपेची ॥२०॥पोटी नाही सत्पुत्र ॥ या लागी मी चिंतातुर व तू सद्गुरु माझा कृपासागर ॥ सांग निर्धार काय करू ॥२१॥ऐसे ऐकता वचन ॥ मतंग बोले कृपाकरोन ॥ म्हणे कल्याण ऐकपुर्ण ॥ सांगतो तुज युक्तीते ॥२२॥शुभ लोचने ऐकवचन ॥ पंपापासोनि पूर्वेस जाण ॥ दूर आहे पन्नास योजन ॥ नारसिंहाचा आश्रम पै ॥२३॥त्याचे दक्षिणेसि निर्धारी ॥ नारायणगिरीचे उत्तरी ॥ स्वामितीर्थाहूनि कोशावरी ॥ वियद्गंगा वसतसे ॥२४॥तू जाय आता झडकरी ॥ तेये स्नान करून निर्धारी ॥ श्रद्धायुक्त तपश्चर्या करी ॥ द्वादशवर्ष पर्यंत ॥२५॥त्या पुण्ययोगे करून ॥ दिव्यपुत्र होईल तुजलागून ॥ ऐकोनि ऋषीचे वचन ॥ अंजनी तेथूनि निघाली ॥२६॥तत्काळ पावली ते स्थान ॥ करूनि स्वामितीर्थी स्नान ॥ वंदिले वराहरूप भगवान् ॥ अश्वत्थप्रदक्षिना करितसे ॥२७॥तप आचरली खडतर ॥ आहार त्यागिला निर्धार ॥ काष्ठवत् जाहले शरीर ॥ सर्वभोग वर्जिले ॥२८॥परम शुचिर्भूत होऊन ॥ एकाग्रमने करी चिंतन ॥ ऐसे द्वादश वर्षे होतांचि जाण ॥ नवल एक वर्तले ॥२९॥एके दिवशी अंजनी ॥ ध्यानकरी अंजलीपसरोनि ॥ तो साक्षात पवमान येऊनी ॥ प्रसाद दिधला तियेते ॥३०॥पक्व फळ ते अवसरी ॥ दिधले अंजनीचे करी ॥

येरी नेत्र उघडोनि ते अवसरी ॥ पाहती जाहली ते काळी ॥३१॥प्रसाद ऐसे जाणोन ॥ येरी अविलंबे करी भक्षण ॥ तो तत्काळ जाहली गर्भिण ॥ अंजनी देवी तेधवा ॥३२॥दशमास भरतांचे वेल्हाळ ॥ पुत्र प्रसवली परमसबळ ॥ जैसे पूर्वेसि मित्रमंडळ ॥ निशाअंती उगवले ॥३३॥परमतेजस्वी देदीप्यवंत ॥ वानरवेष बळ अद्भुत ॥ अवतरला हो हनुमंत ॥ श्रीरामदूत प्रतापी ॥३४॥अंजनीसी पुत्र जाहला ॥ तै पासून या पर्वताला ॥ अंजनाचल विख्यात जाहला ॥ त्याचे नाम राजेंद्रा ॥३५॥त्रेतायुगी अंजनाद्री ॥ नाम पावलायापरी ॥ आता शेषाचल द्वापारी ॥ काय कारण ऐकपा ॥३६॥एकदा वैकुंठी भगवान् ॥ एकांती लक्ष्मीसहितजाण ॥ केले असता शयन ॥ तो अपूर्व वर्तले ॥३७॥जयविजय द्वारपाळ ॥ द्वारी नव्हते तये वेळे ॥ सनकादिकी त्यांशी श्रापिले ॥ दैत्ययोनीत जन्मले ते ॥३८॥त्यावेळी द्वारी रक्षण ॥ भोगिनायक करी आपण ॥ ऐसे असता एकेदिन ॥ नवल अपुर्व वर्तले ॥३९॥साक्षात प्राणेश आपण ॥ दर्शनालागी पातला जाण ॥ त्याशी नागेंद्र बोले वचन ॥ आत सर्वथा जाऊ नको ॥४०॥स्पर्शून म्हणे तयासी ॥ काय कारण अवरोधावयासी ॥ अहो म्हणे तुजशी ॥ न सोडी मी सर्वथा ॥४१॥मग क्रोधावला प्रकंपन ॥ म्हणे आत जाईन ॥ हरिद्वारी अवरोधन ॥ नाही कोणाशि आजिवरी ॥४२॥जयविजयसनकादिकांशी ॥ अवरोधितागति जाहली कैशी ॥ तुज ठाऊक असता निश्चयेसी ॥ आडविसी तू किंनिमित्त ॥४३॥यावरी तो काद्रवेनायक ॥ परम कोपारूढ जाहला देख ॥ वायूसि म्हणे तू मूर्ख ॥ सांगता हीन ऐकसी ॥४४॥माझे प्रताप नेणोन ॥ भलतेंचि जल्पसी येऊन ॥ मी हरीचे प्रियपात्रगहन ॥ प्राणांहूनि आवडता ॥४५॥माझ्यावरी सर्वेश्वर ॥ शयनकरी निरंतर ॥ कैलासपती शंकर ॥ भूषणरूपे वाहे मज ॥४६॥म्या सर्षपप्राय धरिली अवनी ॥ माझा प्रताप जाणे चक्रपाणी ॥ मशका माते न गणोनी ॥ आत कैसा संचरशी ॥४७॥प्राणेश बोले ते अवसरी ॥ स्वमुके स्वगुण वर्णन करी ॥ तो शतमूर्ख पुरुष निर्धारी ॥ तुज ऐसाचि जाणपा ॥४८॥माझे तुझे पराक्रम ॥ जाणतसे मेघश्याम ॥ व्यर्थ वल्गना करिता अधम ॥ नाही दुसरा तुज ऐसा ॥४९॥यावरी बोले अहिनायक ॥ मी हरीचा निकट सेवक ॥ मजवरी प्रीतिविशेष देख ॥ ऐशी नाही दुसरीकडे ॥५०॥तुम्ही सर्व इतर भक्त ॥ हरीसी आवडता यथार्थ ॥ परी मजवरी जैशी हरीची प्रीत ॥ तैशी नाही इतरांकडे ॥५१॥प्राणेश म्हणे बिडाळका ॥ अंतरगृही प्रवेश देखा ॥ बाहेर असतो करिनायक ॥ परी प्रीति अधिक कोणीकडे ॥५२॥पर्यंकावरी चढे चरणसेवक ॥ परी पुत्राहूनि नव्हे अधिक ॥ तैसे श्रीहरिसी प्रिय देख ॥ मजहूनि न होसी तू ॥५३॥तू जवळी अससी जरी ॥ अभिमाने भरलासि अंतरी ॥ अहंभाव असलियावरी ॥ त्यासि श्रीहरी नातळे ॥५४॥तू सेवक म्हणविसी थोर ॥ परी मी श्रीहरीचा असे कुमर ॥ पुत्राहूनि सेवकावर ॥ प्रीति फार केवी होय ॥५५॥उभयता ऐसे प्रकारे ॥ बोलती पररस्परे कठोर ॥ गजबज ऐकोनी बाहेर ॥ जगन्माता पातली ॥५६॥उभयताचा कलह देखोन ॥ हरीसी सांगे वर्तमान ॥ शेषवायूंचे भांडण ॥ महाद्वारी मांडले ॥५७॥कोण्या कारणास्तव भांडती ॥ आपण पहावे जगत्पति ॥ आपणावाचोनि अन्याप्रती ॥ न मानिती दोघेही ॥५८॥ऐसे ऐकता नारायण ॥ तत्काळ आले उठोन ॥ उभयता हरीसी पाहोन ॥ साष्टांग नमन पै केले ॥५९॥यावरी मधुकैटभारी ॥ शेषासि म्हणे ते अवसरी ॥ कासयाचा कलह तरी ॥ सांग निर्धारी मजलागी ॥६०॥श्रीहरीप्रती धरणीधर ॥ सांगता जाहला सर्व समाचार ॥ मजसमान वायु पामर

॥ होईल कैसा जगदात्मया ॥६१॥मी तुझे प्रीतिपात्र ॥ मज एवढा बळिया वीर ॥ पाताळ भू आणि स्वर ॥ लोकी दुसरा नसेचि ॥६२॥ऐकता हासला जगन्मोहन ॥ म्हणे स्वमुखे स्वगुणवर्णन ॥ हे असे परमदूषण ॥ विद्वज्जन मानिती ॥६३॥जो असेल बलवंत ॥ तो स्वमुखे न वर्णी पुरुषार्थ ॥ कर्तृत्व करोनि दावित ॥ जेणे त्रिभुवन धन्य म्हणे ॥६४॥शेषासि म्हणे रमावर ॥ उत्तरेसि गिरिमेरूचा पुत्र ॥ तू स्वदेह रज्जूवेष्टूनि सत्वर ॥ दृढधरी अचळाते ॥६५॥मग वायु स्वबळे करून ॥ उडवील पर्वता लागून ॥ कोणाचे बळ असेल गहन ॥ सहज परीक्षा होईल ॥६६॥सर्वा देखता सहज ॥ तुम्ही करावे एवढे काज ॥ ऐसे बोलता वैकुंठराज ॥ अवश्य म्हणोनी ऊठिले ॥६७॥हे कौतुक पाहावया लागून ॥ आकाशी दाटले सुरगण ॥ सावित्रीसहित कमळासन ॥ पहावयासी पातला ॥६८॥इंदिरेसहित इंदिरावर ॥ अपर्णेसहित पंचवस्त्र ॥ शचीसहित पुरंदर ॥ येते जाहले साक्षेपे ॥६९॥यक्षगण गंधर्व किन्नर ॥ चारण गुह्यक विद्याधर ॥ अष्टदिक्पाळ समग्र ॥ कौतुक पाहो पातले ॥७०॥आले सकळऋषीश्वर ॥ यावरी तो पन्नगेश्वर ॥ मनी गर्व धरोनी फार ॥ पर्वतापाशी पातला ॥७१॥विशाळ वपू पसरून ॥ नगाशी घातले वेष्टन ॥ सबळबळे करून ॥ पर्वत दृढ धरियेला ॥७२॥जेणे पुष्पप्राय धरिली अवनी ॥ तो आपुले निजबळेकरूनी ॥ पर्वत धरिला आकर्षोनी ॥ न हाले ऐसा ते काळे ॥७३॥यावरी तो तमाळनीळ ॥ वायूशी आज्ञापी तात्काळ ॥ प्रकट करी सामर्थ्य प्रबळ ॥ सर्वा देखता प्राणेशा ॥७४॥ऐसे ऐकतांचि चंड मारुत ॥ कनिष्ठ अंगुळीने अकस्मात ॥ उडविल हो पर्वत ॥ शेषासमवेत तेधवा ॥७५॥वातचक्रांत निर्धारी ॥ तृण जैसे उडे अंबरी ॥ की पक्षी उडे ज्यापरी ॥ तैसा गिरि उडविला ॥७६॥दक्षिणेसि तो गिरिवर ॥ पडिला पाचकोटी योजनावर ॥ त्रिदशांसहित वृत्रहर ॥ आश्चर्य करिती तेकाळी ॥७७॥पाहता प्राणेशाचे बळ ॥ अद्भुत म्हणतील लोक सकळ ॥ तृणप्राय उडविला अचळ ॥ हे अपूर्व आजि पाहिले ॥७८॥जाहल एकचि जयजयकार ॥ देव वर्षती सुमनसंभार ॥ शेषाचा गर्व समग्र ॥ निरसोनी गेला तेकाळी ॥७९॥तो मेरु आला धावोन ॥ करी प्रभंजनासी नमन ॥ म्हणे केवळ माझा नंदन ॥ सांभाळी त्यासि दयाळा ॥८०॥असो यावरी कद्रुतनुज ॥ धरूनि हरीचे चरणांबुज ॥ म्हणे तू देवाधिदेव अधोक्षज ॥ तुझे चरित्र न कळेची ॥८१॥माझे मनी गर्व फार ॥ की मी एकलाची बळसागर ॥ मजसमान दुसरा वीर ॥ ब्रह्मांडोदरी नसेचि ॥८२॥ऐसा माझा गर्व होता ॥ तो आजि निरसला अनंता ॥ कमळपत्राक्षा दीननाथा ॥ करी आता कृपा मज ॥८३॥तू देवाधिदेवा सनातन ॥ मायातीत शुद्धचैतन्य ॥ तुझा महिमा नेणोन ॥ मूर्ख मी गर्व केला वृथा ॥८४॥मग वायूसि करूनि नमस्कार ॥ बोलता जाहला धरणीधर ॥ मी तुझा महिमा नेणोनि पामर ॥ वृथागर्व केला पै ॥८५॥अपराध क्षमा करोन ॥ मजवरी कृपा करी पूर्ण ॥ यावरी तो प्रभंजन ॥ काय बोलता जाहला ॥८६॥म्हणे ऐक आता भोगिपाळा ॥ श्रीहरीचा प्रताप आगळा ॥ भक्तांशी अभिमान केवळ ॥ येऊ नेदी सर्वथा ॥८७॥सर्वांसी समान जैसा अर्क ॥ तैसाचि असे वैकुंठनायक ॥ एकाशि उणे एकाशि अधिक ॥ जगन्नायक नसेची ॥८८॥दासांसी नसावा अभिमान ॥ यालागी केले विंदान ॥ तू निराभिमान होऊन ॥ भज चरण हरीचे ॥८९॥असो शेषवेष्टित पर्वत ॥ यालागी शेषाचल नाम विख्यात ॥ शतानंद म्हणे जनकाते ॥ पूर्वकथा ऐसी असे ॥९०॥नैमिषारण्यी सूत ॥ शौनकादिकांसी कथा वर्णित ॥ शेषाचल या पर्वताते ॥ याचिलागी म्हणती पै ॥९१॥कलियुगी

वेंकटेशगिरी ॥ नाम पावले निर्धारी ॥ ती कथा ऐक यावरी ॥ सादरचित्ते करोनिया ॥९२॥सज्जन रंजना श्रीनिवासा ॥ चिद्धनानंदा आदिपुरुषा ॥ जगद्व्यापका शेषाद्रिवासा ॥ आशापाशरहित तू ॥९३॥तुझे गुण वर्णावया श्रीपती ॥ सहस्त्रमुखाची न चले गती ॥ मी मानव पामर निश्चिती ॥ केवि वर्णू गुण तुझे ॥९४॥मी मतिमंद किंकर ॥ केवि क्रमू महिमांबर ॥ परी आत्महितास्तव साचार ॥ तव गुणी लीन जाहलो ॥९५॥तू सूत्रधारी सर्वेश्वर ॥ कर्ता करविता तूचि समग्र ॥ जैसे नाचविता सूत्र ॥ बाहुली नाचे तैसेची ॥९६॥वाजविणार नसता बरवा ॥ कैसा वाजेल पोवा ॥ जगन्निवासा कमलाधवा ॥ तुझे चरित्र तू बोलवी ॥९७॥क्षीराब्धिजा मानसमोहना ॥ भक्तवत्सला मायाविपिनदहना ॥ वीरवरदा मनमोहना ॥ मधूसूदना श्रीहरी ॥९८॥इतिश्रीवेंकटेशविजयसुंदर ॥ संमतपुराणभविष्योत्तर ॥ श्रवणकरोतपंडितचतुर ॥ तृतीयाध्यायगोडहा ॥९९॥३॥एकंदरओवीसंख्या ॥३०७॥

# अध्याय ४ था

*पुढे सुतांनी शौनकादिक ऋषींना सांगण्यास प्रारंभ केला. तीच हकीकत शतानंद गौतम राजाजनकास सांगू लागले. शतानंद म्हणाले- राजा या कलियुगामध्ये त्या पर्वताला वेंकटगिरी हे नाव का पडले ती कथा आता तुला मी सांगतो. या पृथ्वीवर कालहस्ती या नावाचे एक सुंदर नगर आहे. तेथे वेदशास्त्रात पारंगत हरिभक्त आणि सदाचारसंपन्न, स्नानसंध्या पंचमहायज्ञ नित्य करणारा, दया, क्षमा, शांती अशा सर्व गुणांनी संपन्न सत्य भाषण करणारा पुरंदर नावाचा एक ब्राह्मण तेथे रहात होता. त्याला संतती नसल्याकारणाने तो अनेक प्रकारचे उपाय करीत असे. पुष्कळ नवससायास केल्यावर त्या ब्राह्मणाला एक मुलगा झाला. ब्राह्मणाला व सर्वांना परमेश्वर संतुष्ट झाला म्हणून आनंद झाला. ब्राह्मणाने बालकाचे जातकर्म केले. चंद्राच्या कलेप्रमाणे तो मुलगा वाढू लागला. पुरंदर ब्राह्मणाने त्या मुलाचे नाव माधव असे ठेवले. आठ वर्षे पूर्ण होताच त्यांची मुंज करून वेदशास्त्र इतर सर्व विद्या व पुराणे त्याला शिकविली. त्याचे विद्येतील प्राविण्य पाहून सर्व लोक आश्चर्यचकित होत असत. आपल्या मुलाची ही योग्यता पाहून आपल्या कुलात सत्पुत्र जन्माला आला म्हणून पुरंदराला अतिशय आनंद झाला. पुढे वयात आल्यावर पांडिव राजाची अत्यंत सुंदर आणि सर्व गुणसंपन्न अशा चंद्ररेखा नावाच्या मुलीबरोबर त्याचे लग्न केले. सुनेला घेऊन पुरंदर ब्राह्मण आपल्या गावी येऊन आनंदाने राहू लागला.*

*पुढे एकेदिवशी माधवाने अतिशय कामातुर होऊन आपल्या पत्नीशी दिवसा रममाण होण्याची इच्छा व्यक्त केली. चतुर पत्नीने अनेकवार ही गोष्ट अयोग्य आहे, हे शास्त्रविहित नाही, लोक हसतील आपण विद्वान आचारसंपन्न ब्राह्मण आहात असे अनेक प्रकारे सांगून पाहिले; परंतु आपली इच्छा पूर्ण न झाल्यास आपले प्राण जातील असे माधव म्हणताच चंद्ररेखा म्हणाली, नाथ आपण कुशसमिधा आणावयास वनात चलावे; मीही पाणी आणावयास आपणाबरोबर येते. असे म्हणताच ठीक आहे म्हणून तो ब्राह्मण उठला व ती दोघेही गंगेच्या काठी असलेल्या एका अरण्यात आली. तो तेथे येताच एक आश्चर्य घडले ! तेथे एका झाडाखाली त्याला एक सुंदर स्त्री दिसली. तिला पाहून तो आश्चर्यचकित झाला, व तो म्हणाला, ही जर आपणांस मिळेल तर आपण फार सुखी होऊ. असा विचार करून तो आपल्या पत्नीस म्हणाला, तू घरी जा. माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले. तुझे मन मी पाहिले. तू आता येथे राहू नकोस. पतीच्या आज्ञेप्रमाणे ती चंद्ररेखा घरी परत आली.*

*नंतर तो त्या स्त्रीपाशी जाऊन तिला म्हणाला. सुंदरी तू कोण, कोठे राहतेस वगैरे सांग तिनेही त्याला असाच प्रश्न केला. माधवाने आपली सर्व हकीकत सांगितली, व तुझ्या रूपावर मी मोहित झालो आहे. माझी इच्छा पूर्ण कर असे तो तिला म्हणाला. तेव्हा ती त्याला म्हणाली. महाराज मी जातीने चांडाळीण आहे. माझे नाव कुंथळा आपल्यासारख्यांना माझा स्पर्शही न व्हावा. असे असता आपण हे काय बोलत आहा.*

*ब्राह्मण म्हणाला- तुझ्या सौंदर्यापुढे हे सर्व फुकट आहे. जगात अशा पुष्कळ गोष्टी आहेत; व लोकही फळाकडे दृष्टि देऊनच वागत असतात. आता तू माझे मनोरथ पूर्ण कर. असे म्हणताच ती चांडाळ स्त्री म्हणते. आपण आपल्या*

*मातापित्यांचा कुलधर्म कुलाचारांचा व प्रिय पत्नीचा त्याग करून ही अयोग्य गोष्ट करण्यास तयार झाला तर लोक आपल्याला हसतील. आपणास जातीबाहेर टाकतील. हे तिचे बोलणे ऐकूनही माधव आपला अविचार बदलण्यास तयार नाही असे पाहाताच ती स्त्री विचार करू लागली की, या ब्राह्मणास वेड लागले आहे. असे म्हणत ती आपल्या घरी जाण्यास उठली असता वीज तळपल्याचा भस झाला. ब्राह्मण झटदिशी पुढे गेला व त्याने पकडून तिच्याशी तो पूर्ण रममाण झाला. ती चांडाळीण नंतर त्यास म्हणाली. आता माझ्या घरी आपण चलावे, मद्यमांसाचे सेवन करीत मजबरोबर आपण राहावे. त्याप्रमाणे तिच्या घरी जाऊन तो ब्राह्मण राहू लागला. सर्व आचारविचार, ब्राह्मण्य वगैरे त्याचे नष्ट झाले. तो आपले सर्व कुलगोत विसरून गेला. केवढा हा स्त्रीसंगाचा परिणाम !*

*पुढे माधवाच्या आईबापांना ही हकीकत समजली. पत्नीसह सर्वांना फार दुःख झाले. पूर्व कर्मास दोष देऊन सर्व लोक व्यवहार करीत राहिले. बारा वर्षे याप्रमाणे तो ब्राह्मण अनाचार करीत पिशाचाप्रमाणे राहिला.*

*नंतर अकस्मात ती चांडाळीणच मरण पावली. माधवास फार दुःख झाले. आता त्याला आपल्या सर्व गोष्टींची आठवण झाली. आपण कोण होतो, काय झाले याचा विचार करीत तो फार उदासीन झाला. प्रिय पत्नी, आईबाप यांचा मी त्याग केला ही माझ्याकडून फार मोठी चूक घडली; पण आता उपाय काय? आता आपण देशान्तर करावे. आपणास महानरक यातना भोगाव्या लागणार. यातून कोणीही सोडविणार नाही. कोणास शरण जावे. कोण आपला उद्धार करील असा विचार तो रात्रंदिवस करू लागला. याप्रकारे अरण्यात हिंडत असता यात्रेस जाणारे लोक माधवास भेटले. त्यांना माधवाने विचारले असता शेषाद्रीच्या यात्रेस जात आहोत असे त्यांनी सांगताच माधव त्यांचेबरोबर जाऊ लागला. माधवाने आपली घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगताच ते त्यास धीर देऊन म्हणाले तू त्या पर्वताचे दर्शन घे. तू सर्व पातकापासून मुक्त होशील.*

*हे ऐकताच त्यांचेबरोबर तो ब्राह्मण जाऊ लागला. त्या यात्रेकरू लोकांनी भोजन करून बाहेर टाकलेल्या उष्ट्या पत्रावळीवरील अन्न खात तो आपला उदरनिर्वाह करीत असे. त्यांची सेवा तो करू लागला.*

*असा जात असता पुष्कळ राजेमहाराजे, साधुसंत मंडळी तेथे जमा झाली होती. ते सुंदर स्वामीतीर्थ पाहून यालाही समाधान वाटले. तेथे क्षौरश्राद्धादि विधि इतरांनी केल्याप्रमाणे माधवाने ही केले. पुढे ती मंडळी पर्वत चढू लागली. त्यांचेबरोबर हाही जाऊ लागला असता पर्वतस्पर्शाने याचे पातक नष्ट होऊ लागले. तेथे त्यास एकदा ओकारी झाली, त्याबरोबर त्याचे सर्व पातक नाहीसे झाले. ब्राह्मण पवित्र व तेजस्वी झाला. सर्व लोकांनाही फार आश्चर्य वाटले. पर्वताच्या दर्शनास आलेल्या ब्रह्मदेवाने माधवास म्हटले, माधवा तू आता सर्व पातकांतून मुक्त झाला आहेस. स्वामी तीर्थापाशी स्नान कर. वराहाचे दर्शन घे व तेथेच देहसमर्पण कर. पुढील जन्मी तू आकाशराजा म्हणून जन्म घेशील व तुझ्या पोटी लक्ष्मीमाता जन्म घेईल. भगवान तिला वरतील व ते तुझे जामात होतील. असा पर्वतदर्शनाचा महिमा सांगून ब्रह्मदेव गुप्त झाले. वें म्हणजे महादोष. ते केवळ स्पर्शाने नाहीसे झाले म्हणून या पर्वताला कलियुगात वेंकटगिरी असे नाव पडले आहे.*

श्रीसज्जनरंजनायनमः ॥ मनमोहन मेघश्यामा ॥ मुनिजनह्रदया मंगलधामा ॥ चराचरफळांकितद्रुमा ॥ पूर्णकामा सर्वेशा ॥१॥करुणासागरा लक्ष्मीरमणा ॥ कामजनका कल्मषमोचना ॥ कैटभारे मुरमर्दना ॥ कमलावर श्रीहरी ॥२॥मागील अध्यायी गतकथार्थ ॥ वायूने उडविला पर्वत ॥ शेषाद्रि ऐसे नाम प्राप्त ॥ तैपासूनि जाहले ॥३॥सूत म्हणे शौनकादिकांप्रति ॥ पुढे ऐकाहो एक चित्ती ॥ कलियुगी त्या नगोत्तमाप्रति ॥ वेंकटगिरी नाम जाहले ॥४॥तेचि कथा परमपवित्र ॥ ऐका आता सादर ॥ कालहस्ती नाम नगर ॥ पृथ्वीवरी विख्यात पै ॥५॥तेथील रहिवासी द्विजवर ॥ नाम तयाचे पुरंदर ॥ वेदशास्त्रिनिपुण पवित्र ॥ हरीभक्त सत्वागळा ॥६॥नित्यनैमित्तिक कर्म उत्तम ॥ स्नानसंध्यादिसत्कर्म ॥ पंचमहायज्ञ नित्यनेम ॥ यथासांग करीतसे ॥७॥सत्यवचनी क्रियावंत ॥ दया, क्षमा ह्रदयी नांदत ॥ ऐसा विप्र सर्वगुणी युक्त ॥ तया नगरात वसतसे ॥८॥परी पोटी नाही संतती ॥ अहोरात्र हेचि त्याचे चित्ती ॥ यत्न करीत नाना रीती ॥ पुत्रप्राप्ती कारणे ॥९॥असो नवस करिता बहुत ॥ एक पुत्र जाहला अकस्मात ॥ विप्र होउनी आनंद भरित ॥ म्हणे नारायण तुष्टला ॥१०॥परमहर्षे द्विजसत्तम ॥ करी बाळाकाचे जातकर्म ॥ चंद्रवद्धि होत उत्तम ॥ तैसे वाढे बाळक ॥११॥दिवसंदिवस थोर जाहले ॥ माधव ऐसे नाम ठेविले ॥ आठा वर्षी व्रतबंधन केले ॥ परमानंदे ते काळी ॥१२॥करविले वेदशास्त्रपठण ॥ करतळामळ अवघे पुराण ॥ ज्याची विद्या पाहोन ॥ जन होती तटस्थ ॥१३॥पुत्र पाहोनि विद्यावंत ॥ पुरंदर मनी आनंदभरित ॥ म्हणे मी भाग्याचा बहुत ॥ सुपुत्रकुळी उपजला ॥१४॥मग पांडीव राजाविख्यात ॥ त्याची कन्यासुंदर अत्यंत ॥ चंद्ररेखा नामे गुणभरित ॥ ती दिधली माधवाते ॥१५॥परमसुंदर चातुर्यखाणी ॥ रूपासि रंभा उर्वशी उणी ॥ जिचे स्वरूप पाहोनी ॥ मीनकेतन तटस्थ ॥१६॥विशाळभाळ आकर्ण नयन ॥ शोभे सोगयाचे अंजन ॥ सरळनासिका विराजमान ॥हंसगमनी हरिमध्या ॥१७॥चंद्रवदना अहिवेणी ॥ अलंकारासि शोभातनू आणि ॥ दंतझळकता मेदिनी ॥ वरी पडे प्रकाश ॥१८॥ऐसी स्वरूपे सुंदर ॥ राजकन्या ती मनोहर ॥ माधवासि देउनी साचार ॥ लग्न केले यथाविधि ॥१९॥पुत्रसुनेसहित ॥ पुरंदर आला स्वनगरात ॥ आनंदरूपे वर्तत ॥ ऐका राया सादर ॥२०॥एके दिवसी माधव विप्र ॥ दिवसा होउनी कामातुर ॥ कांते प्रती साचार ॥ काय बोलता जाहला ॥२१॥प्राणवल्लभे ऐक वचन ॥ मनी भरला पंचबाण ॥ काहीच न सुचे मजलागून ॥ अंगसंग देई वेगी ॥२२॥ऐकोनि पतीचे वचन ॥ चंद्ररेखा बोले हसून ॥ तुह्मी शास्त्रज्ञ ब्राह्मण ॥ सर्वनिगमार्थ ठाऊका ॥२३॥घरी आहेती सासूश्वशुर ॥ लोक हिंडती आत बाहेर ॥ दिवसा ऐसा प्रकार ॥ घडे कैसा प्राणेश्वरा ॥२४॥आपुला प्रपंच करिता आपण ॥ लोकापवाद सांभाळावा पूर्ण ॥ आपुलेच शरीर म्हणोन ॥ नग्न फिरता न येकी ॥२५॥इष्टमित्र आप्तजन ॥ ऐकता हासतील अवघेजण ॥ लोकी प्रतिष्ठेशि न्यून ॥ ऐसे कर्म करू नये ॥२६॥याकरिता वल्लभा अवधारी ॥ काम जिरवावा अंतरी ॥ निशा प्राप्त जाहलिया वरी ॥ मनोरथ पूर्ण करावे ॥२७॥ऐसे बोलता सती ॥ माधव बोले तियेप्रती ॥ वेदशास्त्राची पद्धती ॥ कायकारण तुजलागी ॥२८॥माझे वचन तुज प्रमाण ॥ कामे जाताति माझे प्राण ॥ सर्व संशय टाकोन ॥ अंगसंग देई मज ॥२९॥काम खवळला मानसी ॥ नाठवेचि दिवसनिशी ॥ देखोनि तव वदन शशी ॥ मम मानसचकोर वेधले ॥३०॥टाकोनी

सर्वही लाज ॥ प्रिये आलिंगी आता मज ॥ तेणे माझे सर्वकाज ॥ पूर्ण होती गुणसरिते ॥३१॥तू न करिता अनुमान ॥ वेगी येई झडकरोन ॥ नाही तरी जाताति माझे प्राण ॥ प्राणप्रिये जाण पा ॥३२॥अनंग भरिला अंतरी ॥ भयलज्जा त्यागिले दुराचारी ॥ कामापुढे कळाकुसरी ॥ लोपोनि जाती सर्वही ॥३३॥कामचि बंधासि कारण ॥ कामे बुडविले सर्वसाधन ॥ मोक्षद्वारासि अर्गळा पूर्ण ॥ नरकासि कारण कामची ॥३४॥कामासंगे थोरथोर ॥ बुडाले सज्ञानी चतुर ॥ क्षयरोगी केला चंद्र ॥ किरणलोप भास्कराचा ॥३५॥कामे भंगला पाकशासन ॥ शंकराचे जाहले लिंग पतन ॥ विधातियाचे शिरजाण ॥ कामानिमित्त छेदिले ॥३६॥मरण पावले पंडु दशरथ ॥ कौरवांचा झाला निःपात ॥ कीचकाचा प्राणांत ॥ द्रौपदी निमित्त जाहला ॥३७॥रावणाचा सकुळ झाला नाश ॥ मरण आले सुंदोपसुंदास ॥ विश्वामित्राचे तपविशेष ॥ भंग पावले कामसंगे ॥३८॥असो काम ऐसा अपवित्र ॥ तेणे ग्रासिला माधवविप्र ॥ कांतेसि म्हणे वल्लभे सत्वर ॥ संग देई एकदा ॥३९॥घूर्णित झाले लोचन ॥ विसरला देहगेहअभिमान ॥ मग चंद्रलेखा विचार करून ॥ काय बोलती जाहली ॥४०॥म्हणे प्राणेश्वरा गोष्टी ऐका ॥ मी आणावया जाते उदका ॥ तुम्ही कुश आणावयासी देखा ॥ वनाप्रती चलावे ॥४१॥ऐसे ऐकतांचि वचन ॥ तात्काळ उठिला तो ब्राह्मण ॥ गंगातीरी उपवन ॥ तया स्थानासी पातला ॥४२॥घट घेऊनिया सुंदरी ॥ गेली गंगेचिया तीरी ॥ पतीसमीप येता झडकरी ॥ तो अपूर्व वर्तले ॥४३॥तव तया उपवनात ॥ एक वृक्षाखाली निश्चित ॥ तरुणी स्त्री सुंदर बहुत ॥ अकस्मात देखिली ॥४४॥स्वरूप पाहिले परमसुंदर ॥ वदन विराजे जैसा द्विजवर ॥ विशाळभाळ सुकुमार ॥ पद्मनेत्र विराजती ॥४५॥सरळ नासिका आकर्णलोचन ॥ विलसतसे नेत्रांजन ॥ गौरवर्ण सुहास्यवदन ॥ धनुष्याकृति भृकुटिया ॥४६॥कनककलश जैसेसुंदर ॥ तैसे दिसती युग्मपयोधर ॥ तटतटीत कंचुकी सुंदर ॥ मनोहर गृह मदनाचे ॥४७॥हरिमध्या हंसगमनी ॥ शशिवदना भुजंगवेणी ॥ बोलता दशन झळकती वदनी ॥ आकर्ण नयन शोभती ॥४८॥द्विजराजमुखी सुहास्यवदन ॥ मृगराजकटी विराजमान ॥ करिणिराजगमनागमन ॥ पाहता मनविस्मित ॥४९॥अत्यंत सुंदररूपागळे ॥ देखता कामाची मुरकुंडी वळे ॥ पाहता विप्राचे उभय डोळे ॥ वेडे जाहले ते काळी ॥५०॥ऐसी पाहिली सुंदरी ॥ विप्र मानसी विचार करी ॥ ही प्राप्त होईल मजजरी ॥ सुखास पार नाहीच ॥५१॥मग आपले कांतेलागून ॥ विप्र बोले तेव्हा वचन ॥ म्हणे प्रिये जाय त्वरोन ॥ मनोरथ पूर्ण झाले ॥५२॥तुझे अंतर पहावया कारण ॥ मागीतले मी भोगदान ॥ आता जाय तू येथून ॥ प्राणवल्लभे सत्वर ॥५३॥पतीची आज्ञा वंदून ॥ चंद्रलेखा पावली स्वस्थान ॥ मग तो माधव ब्राह्मण ॥ तिये जवळी पातला ॥५४॥म्हणे कल्याणवंते तू कोण ॥ काय तुझे नाम खूण ॥ देशग्राम मजलागून सांग आता सत्वर ॥५५॥ती म्हणे तुम्ही कोण ॥ मज पुसावया काय कारण ॥ यावरी तो विप्र म्हणे ॥ नाम माधव माझे असे ॥५६॥मी यातीचा ब्राह्मण ॥ मन वेधले तव रूप पाहोन ॥ तुझा मुखेंद्रु देखोन ॥ कामसिंधु उचंबळे ॥५७॥देखता तव मुखनिशाकर ॥ माझे नयन झाले चकोर ॥ तव वचन गर्जता अंबुधर ॥ मम मानस मयूर नृत्यकरी ॥५८॥कुरंगनेत्रे कृपाकरून ॥ शांतवी मनींचा मीनकेतन ॥ तू सांगसी ते ऐकेन ॥ तुझे अधीन जाहलो ॥५९॥यावरी बोलेती अबळा ॥ नाम माझे असे कुंथळा ॥ चांडाळजातीची अमंगळा ॥ माझा विटाळ न व्हावा ॥६०॥तुम्ही उंचवर्ण ब्राह्मण ॥ आणि

वेदशास्त्रपरायण ॥ करतळामल अवघे पुराण ॥ परमपवित्र देह तुमचा ॥६१॥आमुचे शब्द कानी ऐकता ॥ सचैल स्नान करावे तत्वता ॥ तो तुम्ही मदनयुक्त बोलता ॥ हेचि आश्चर्य वाटतसे ॥६२॥विप्र म्हणे पद्मनयने ॥ मम हृदयानंदवर्धने ॥ तुझ्या स्वरूपासी उणे ॥ रंभा मेनका वाटती ॥६३॥तू झालीस चांडाळिण ॥ तथापि दोष नाही जाण ॥ जैसा क्षारसिंधूत चवदारत्न ॥ निघता देवी ग्रहण केले ॥६४॥रत्नमुख्य जाहले देवांसी ॥ काय कारण त्या सागरासी ॥ तैसी तू सौंदर्यरत्नाशी ॥ काय जातीसी कारण ॥६५॥द्राक्षवेलीसी घालिति खत ॥ त्यातच त्याची वृद्धि होत ॥ परी फळे येती मधुर बहुत ॥ सेविती समस्त विद्वज्जन ॥६६॥तैसि तू आहेसि निधान ॥ काय मुळाशि कारण ॥ आता अविलंबे करून ॥ मनोरथ पुरवी माझे पै ॥६७॥यावरी कुंथळा बोलत ॥ हे वार्ता प्रकटता लोकांत ॥ होईल तुझा अपमान बहुत ॥ आप्तवर्गा माझारी ॥६८॥हासतील जन समस्त ॥ विप्र जाती अपूर्वअत्यंत ॥ महत्पुण्ये प्राप्त होत ॥ हा का अनर्थ आठवला ॥६९॥धर्मपत्नीचा त्याग करून ॥ मातापितयांसी घरी सोडून ॥ मी आहे चांडाळिण ॥ मजसी संग इच्छिशी ॥७०॥माधव बोले नेमवचन ॥ जाईल तरी जावो प्राण ॥ परी मी न सोडी तुजलागून ॥ खंजनाक्षी सर्वथा ॥७१॥नाही विप्रपणाचे काज ॥ लोक सर्व हासोत मज ॥ मायबाप आणि भाज ॥ नलगे कोणीच मज आता ॥७२॥कुंथळा ऐकता हासतसे ॥ म्हणे या विप्रासि लागले पिसे ॥ यासि आता करावे कैसे ॥ विचारी मानसी कामिनी ती ॥७३॥हळूच उठोनी तत्वता ॥ कुंथळा सदनासि जाऊ पाहता ॥ तळपे जैसी विद्युल्लता ॥ देखिली जाता ब्राह्मणे ॥७४॥धावोनी धरिली सत्वर ॥ रगडिले तिचे युग्म पयोधर ॥ आरक्त तिचे बिंबाधर ॥ चुंबन देवोनि दंशिले ॥७५॥कुंजांत नेली झडकरी ॥ वाम हस्ती कवळिली सुंदरी ॥ सव्यहहस्ते फेडिली निरी ॥ येरी करी हाहाकार ॥७६॥लाज सोडोनी झडकरी ॥ तिज सवे सुरतक्रीडा करी ॥ आपपर काही अंतरी ॥ नाठवे चित्ती तयासी ॥७७॥असो त्या माधवविप्रासी ॥ सुरत घडला चांडाळाशी ॥ यावरी कुंथळा म्हणे त्याशी ॥ चाल मंदिरासी माझिया ॥७८॥गेले तुझे विप्रपण ॥ राही आता अंत्यज होऊन ॥ मद्यमांसादि भक्षण ॥ करी सत्वर मजसंगे ॥७९॥अवश्य म्हणोनी झडकरी ॥ माधव गेला दुराचारी ॥ मद्यमांसरत अहोरात्री ॥ मारकर्दमी लोळतसे ॥८०॥विसरला जपतपानुष्ठान ॥ नाठवे वेदशास्त्र अध्ययन ॥ शौच सत्कर्म देवतार्चन ॥ नावडेची तयाते ॥८१॥नावडे त्यासि मातापिता ॥ विसरला धर्मपत्नीशि तत्वता ॥ आसक्त कुंथळेसी सुरता ॥ लागी निमग्न सर्वदा ॥८२॥पहा कर्म कैसे बळवंत ॥ आपण विप्रशुचिर्भूत ॥ वेदशास्त्री पारंगत ॥ विसरोनि उन्मत्त जाहला ॥८३॥स्त्रीसंगे केवढा अनर्थ ॥ स्त्रीसंगे होतो आत्मघात ॥ जरी ज्ञानी असेल बहुत ॥ होईल मोहित स्त्रीसंगे ॥८४॥स्त्री केवळ अनर्थाचे मूळ ॥ अनाचारी परम अमंगळ ॥ असत्याचे भाजन केवळ ॥ किंवा कल्लोळ दुःखाचा ॥८५॥की हे कामाची दरी ॥ की हे मत्सरव्याघ्राची जिव्हा खरी ॥ की क्रोधसर्पाची वैखरी ॥ विषदंतचि प्रकटली ॥८६॥स्त्रीरूपाची ही दिवटी ॥ भुलवूनी लावी नरकाच्या वाटी ॥ महाज्ञानियासी उठाउठी ॥ भुलवी शेवटी कामिनी हे ॥८७॥स्त्री ही असत्याचे घर ॥ नाही पापपुण्याचा विचार ॥ सकळमूर्खत्व मिळोनि साचार ॥ कामिनीरूप आकारली ॥८८॥असो हा आता अनुवाद ॥ जरी कृपा करील चिद्घनानंद ॥ भक्तवत्सल गोविंद ॥ आनंदकंद जगद्गुरू ॥८९॥स्त्री पुरुष नपुंसक खूण ॥ नाहीच ज्यासी मुळींहून ॥ त्याची कृपा

जाहल्यावीण ॥ भवबंधन सुटेना ॥९०॥असो तो माधव निश्चिती ॥ रतला त्या कुंथळेप्रती ॥ वर्ष पळा ऐसे वाटती ॥ तिच्या संगे विप्रासी ॥९१॥मातापित्यांसी कळला वृत्तांत ॥ चंद्रलेखा शोक करी बहुत ॥ पतिवियोग घडला सत्य ॥ जाहला अनर्थ सर्वस्वे ॥९२॥एकमेकांचे गळा पडोन ॥ दुःख करिती तिघेजण ॥ त्यांचे दुःख पाहता गहन ॥ न वर्णवेची सर्वथा ॥९३॥वेदशास्त्रसंपन्न ॥ तेवढाच पुत्र तयालागून ॥ पूर्वकर्माचे विंदान ॥ न सुटे जाण काळत्रयी ॥९४॥असो पुरंदर विप्र ॥ दीनरूप जाहला साचार ॥ प्रारब्धरेखा विचित्र ॥ उपाय काही चालेना ॥९५॥येरीकडे माधवप्रिय ॥ कुंथळेसि रतला अहोरात्र ॥ नाठवेचि दुसरा विचार ॥ पिशाचवत जाहला ॥९६॥द्वादश वर्षपर्यंत ॥ या प्रकारे दिवस लोटत ॥ तो दैवयोगे अकस्मात ॥ कुंथळा मरण पावली ॥९७॥माधव शोक करी फार ॥ गडबडा लोळे भूमीवर ॥ मृत्तिका घेऊनि सत्वर ॥ मुखामाजी घालितसे ॥९८॥म्हणे कुंथळे गुणभरिते ॥ हे कुंथळे सद्गुणसरिते ॥ हे कुंथळे स्वरूपवंते ॥ गेलीस टाकोनी मजलागी ॥९९॥आता तुज ऐसी सुंदरी ॥ न मिळेचि कदापि दुसरी ॥ अहा प्राणप्रिये ये अवसरी ॥ कैसे परी करू आता ॥१००॥तुजसाठी त्यागिले जनकजननी ॥ सोडोनि दिधली धर्मपत्नी ॥ जातिअभिमान सांडोनी ॥ तुझे ठायी मीनलो ॥१॥तूही गेलीस सोडून ॥ तुजविणे मी परदेशी दीन ॥ आता मज आहे कोण ॥ काय करू यावरी ॥२॥अहा प्रिये तुजवीण ॥ सदन वाटे केवळ अरण्य ॥ गोड न लगे अन्नपान ॥ तळमळी ब्राह्मण तेकाळी ॥३॥इकडे मायबाप त्यागिले सत्य ॥ तिकडे कुंथळा पावली मृत्य ॥ उभयभ्रष्ट होऊनी निश्चित ॥ दीनवदन जाहला ॥४॥मग विचार करी माधव विप्र ॥ म्हणे न मिळे आता संसार ॥ विरक्त होऊनि देशांतर ॥ हिंडावया जाऊ आता ॥५॥मनी जाहला पश्चात्ताप ॥ म्हणे मज घडले महापाप ॥ मी स्वधर्म सोडोनी पापरूप ॥ कर्म केले भलतेंची ॥६॥द्विजयोनीत जन्मोन ॥ मजग्रंथ त्रयी होते ज्ञान ॥ मी विचार न करिता पूर्ण ॥ घोर कर्मासि प्रवर्तलो ॥७॥उभयपक्षी जाहली हानी ॥ आता मज न शिवती कोणी ॥ अंती यमपुरिची जाचणी ॥ होईल पुढे मजलागी ॥८॥असिपत्रादि नरक दारुण ॥ भोगणे न सुटे मजलागून ॥ आता ऐसिया दुःखापासून ॥ सोडवी कोण निर्धारी ॥९॥मी कोणासि जाऊ शरण ॥ काय करू आता साधन ॥ परम तळमळी ब्राह्मण ॥ दिशा शून्य वाटती ॥११०॥ऐसे विप्र निज मनात ॥ रात्रंदिवस आहळत ॥ हिंडत असता अरण्यात ॥ तो एक अपुर्व वर्तले ॥११॥दूरदेशस्थ राजे बहुत ॥ जात होते यात्रानिमित्त ॥ दैवयोगे माधवाते ॥ अकस्मात भेटले ॥१२॥माधव पुसे त्यांते ॥ कोठे जाता येणे पंथे ॥ ते म्हणती जातो तीर्थाते ॥ शेषाद्रिसी पहावया ॥१३॥ऐकोनि तयांचे वचन ॥ विप्र जाहला आनंदघन ॥ म्हणे यांची संगती धरोन ॥ तीर्थयात्रा करावी ॥१४॥ऐसा करोनी विचार ॥ त्यासंगे चालिला सत्वर ॥ आपण कर्म केले अपवित्र ॥ कथिले त्यांसी सर्वही ॥१५॥ते म्हणती शेषाचळ उत्तम ॥ दर्शने पाविजे सर्व काम ॥ अनंतजनींचे पाप दुर्गम ॥ हरती जाण माधवा ॥१६॥मग त्यांची संगती धरोन ॥ तीर्थासि चालिला ब्राह्मण ॥ नगोत्तमाचा महिमा पूर्ण ॥ श्रवण केला त्यांच्या मुखे ॥१७॥ते ही भोजन करोनी समग्र ॥ बाहेर टाकिती उच्छिष्टपात्र ॥ त्यातील अन्न मेळवूनी सत्वर ॥ उदरनिर्वाह करीतसे ॥१८॥नीचसेवा असेल जाण ॥ ती स्वये करी आपण ॥ असो त्यांचे संगतीकरून ॥ जाता झाला ते काळी ॥१९॥राजे जाऊनी अमूप ॥ उतरले स्वामितीर्था समीप ॥ ते स्थान पाहता तेजोरूप ॥ मनोरम्य होतसे ॥१२०॥सर्वलोक तीर्थावरी

॥ वपन करोनी ते अवसरी ॥ यथाशास्त्रे निर्धारी ॥ पिंडदान करिती पै ॥२१॥ते पाहोन माधवविप्र ॥ आपणही केले क्षौर ॥ मृन्मयपिंडदानसत्वर ॥ पितरप्रीत्यर्थ करीतसे ॥२२॥महादोष त्याचे गहन ॥ त्यापुण्ये जाहले क्षीण ॥ तृप्त जाहले पितृगण ॥ ब्राह्मणाचे ते काळी ॥२३॥मग त्या राजयांची हारी ॥ चढती तया पर्वतावरी ॥ माधवविप्र ये अवसरी ॥ तोही चालिला त्यांसवे ॥२४॥पर्वतस्पर्शतांची तात्काळ ॥ क्षय जाहले पापसमूळ ॥ तेथेंचि वमिला तयेवेळ ॥ पापे सकळ निघाली ॥२५॥ग्रासामाजी मक्षिका भक्षिती ॥ ते तात्काळचि जैसे वमिती ॥ तैसे विप्राने दोष निश्चिती ॥ वमिले तेथे समूळ ॥२६॥दुर्गंधी सुटली अरण्यात ॥ असंख्यात पापाचे पर्वत ॥ बाहेर पडले समस्त ॥ निष्पाप त्वरित जाहला ॥२७॥किंचित लागता कृशान ॥ भस्म होय जैसे तृण ॥ की सूर्योदय होताची जाण ॥ निरसे तम ज्यापरी ॥२८॥किंवा काष्ठ अग्नीत पडत ॥ ते भस्म होय जैस क्षणात ॥ की सुटता वात अद्भुत ॥ मेघ जैसा वितळे ॥२९॥दर्पणाचा जाता बुरसा ॥ मग स्वच्छ दिसतसे जैसा ॥ की लोह लागता परिसा ॥ चामीकर सहजची ॥३०॥ ऐसा तो द्विजेंद्र ॥ निष्पाप जाहला निर्धार ॥ आश्चर्य करती समग्र ॥ केवढा पापी उद्धरला ॥३१॥ब्रह्म इंद्र आणि रुद्रगण ॥ नित्य येती पर्वताकारण ॥ निष्पाप द्विजवरास पाहोन ॥ परमेष्ठी त्यासि बोलत ॥३२॥म्हणे माधवा तू धन्य ॥ पर्वतदर्शने झालासि पावन ॥ अनंतजन्मींचे दोषगहन ॥ भस्म जाहले तुझे पै ॥३३॥तू स्वामितीर्थी करोनी स्नान ॥ घेउनी वराहाचे दर्शन ॥ त्याचे समिप देहअर्पण ॥ करी येथे द्विजवरा ॥३४॥पुढील जन्मींचा साचार ॥ आकाश नामे होसि नृपवर ॥ परम पुण्यशीळ निर्धार ॥ जन्म येईल तुजलागी ॥३५॥तेथे तुझिये उदरी ॥ अवतरेल जगद्वंद्याची अंतुरी ॥ वैकुंठवासी श्रीहरी ॥ जामात होईल तुझा पै ॥३६॥तुझ्या कुळाचा उद्धार ॥ पर्वतदर्शने झाला निर्धार ॥ ऐसे बोलोनि सत्वर ॥ विधि पावला स्वस्थाना ॥३७॥वेंनाम दोषदारुण ॥ स्पर्शमात्रे नासले जाण ॥ यालागी वेंकटगिरी नामाभिधान ॥ व्हावया कारण जाहले ॥३८॥जनकासि म्हणे मुनिवर ॥ ऐसी ही कथासुंदर ॥ राजा जाहला परम निर्भर ॥ श्रवण करिताचि साक्षेप ॥३९॥शौनकादिकांसि सूत ॥ परमहर्षे कथा वर्णित ॥ हे ऐकतांची भक्तियुक्त ॥ हरते दुःख सर्वही ॥४०॥चिद्घनानंदा राजीवनयना ॥ वीरवरदा सज्जन रंजना ॥ भक्तपाळका रमारमणा ॥ क्षीराब्धिवासा श्रीहरी ॥४१॥इतिश्रीवेंकटेशविजय ग्रंथसुंदर ॥ संमत पुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडितचतुर ॥ चतुर्थाध्याय गोड हा ॥१४२॥ एकूण ओवीसंख्या ॥४४९॥प्रसंगः ॥४॥

## अध्याय ५ वा

*मागील अध्यायात माधव नावाचा ब्राह्मण सर्व पापांपासून मुक्त झाला म्हणून या पर्वताला 'वेंकटाद्रि' असे नाव पडले. ह्यानंतर पुन्हा शौनक ऋषींनी सूताना प्रश्न केला असताना लक्ष्मीकांत माधव वैकुंठ सोडून का आले ही हकीकत आम्हाला सांगा. तेव्हा सूतांनी सांगण्यास आरंभ केला.*

*एकदा सर्व ऋषींनी मिळून गंगेच्या काठी मोठा यज्ञ सुरू केला. यज्ञमंडप सुंदर घातला होता. तेथे कश्यप अत्री, विश्वामित्र वसिष्ठ इत्यादि विद्वान ब्राह्मण आले होते. इतक्यात येथे नारदमुनी आले. सर्व ऋषींनी व ब्राह्मणाने नारदाची पूजा करुन त्यांना उत्तम आसनावर बसविले; त्यावेळी नारदांनी ऋषींना प्रश्न केला की, तुम्ही हा यज्ञ जो सुरू केला आहे त्याचे फळ काय? सर्व देवतात श्रेष्ठ देव कोण आहे? याचा उपयोग काय हे मला सांगा.*

*त्यावेळी ऋषी म्हणाले, याचे श्रेय कोणाला द्यावे हे अद्याप आम्हाला कळले नाही. तेव्हा नारद म्हणाले, तुम्हाला जर कळत नाही तर यज्ञाचा उपयोग काय? हे नारदाचे बोलणे ऐकून सर्व ऋषींनी भृगु ऋषीला बोलावून सांगितले की, तुम्ही स्वर्गात जाऊन सर्व देवात श्रेष्ठ कोण याचा विचार करून लवकर या.*

*भृगु ऋषी सत्यलोकाला गेले. तेथे ब्रह्मदेव होते. सर्व देव त्याची स्तुती करीत होते. भृगु ऋषी तेथे गेला असताना त्याला कोणी विचारले नाही. भृगु ऋषींना राग आला, याला अभिमान झाला आहे हा सर्वज्ञ नाही. त्यामुळे हा यज्ञभोक्ता नाही असे ठरवून भृगु ऋषी तेथून निघाले ते कैलासावर आले. तेथेही त्यांना कोणी विचारले नाही. उलट संमति न घेताना ऋषी येथे आला म्हणून शंकर त्रिशूळ घेऊन त्याच्यावर धावले, भृगु ऋषी म्हणाले हा तामसी आहे. त्यांनी त्याला शाप दिला, तुझी पूजा कोणी करणार नाही. तुझ्या लिंगाची पूजा करतील. तेथून तो वैकुंठाला गेला. तेथे लक्ष्मीसहित विष्णू बसले होते. तेथे त्याला कोणी विचारले नाही. म्हणून ऋषीला राग आला व त्याने विष्णूच्या छातीवर लाथ मारली. लगेच विष्णू उठले व ऋषीचे पाय धरून वंदन केले. मी अपराधी आहे. मला आपण शासन केले चांगले झाले. माझा देह कठीण, आपला पाय दुखवला असेल म्हणून विष्णूने त्याच्या पायाला तेल लावून पाणी घातले व पूजा केली. विष्णूचा हा आदर पाहून ऋषींना वाटले. दयासागर विष्णू ही सत्यगुणी देवता आहे. म्हणून त्याचि स्तुती केली. सर्व देवतात हा श्रेष्ठ आहे.*

*नंतर भृगु ऋषी यज्ञस्थानी आले. विष्णु श्रेष्ठ आहे असे त्यांनी सांगितले. ज्यावेळी भृगुनी विष्णूला लाथ मारली त्यावेळी विष्णूने ऋषींचे पूजन केले. हे पाहून लक्ष्मीने विष्णुला प्रश्न केला, देवा आपण सर्व देवात श्रेष्ठ आहात. भृगुने तुम्हाला लाथ मारली असता राग का नाही आला? त्यावेळी विष्णू म्हणाले देवी भृगु ऋषी तपस्वी ब्राह्मण आहे. ब्राह्मण हे माझे मुख्य दैवत आहे. तो माझा भक्त आहे. भक्त हे माझे आवडते आहेत. म्हणून मी त्याचा पाय भूषण म्हणून माझ्या वक्षःस्थलावर धारण करतो. हे ऐकून लक्ष्मीला राग आला. मला हे आवडत नाही. विष्णूस सोडून लक्ष्मी पृथ्वीवर येऊन कोल्हापूरास राहिली.*

*कोल्हापूर म्हणजे करवीर क्षेत्र. हे पंचगंगेच्या काठी आहे. पुण्यक्षेत्र म्हणून फार प्रसिद्ध आहे. लक्ष्मी आपणा सोडून गेली म्हणून त्यांना बरे वाटेना. त्यांनी सर्व पदार्थांचा त्याग केला. उदासीन होऊन वैकुंठाचा त्याग करून विष्णूही पृथ्वीवर आले. निरनिराळ्या ठिकाणी शोध करीत ते दक्षिण दिशेला आले. प्रवरानदीच्या उत्तरेला वैंकटगिरी या नावाचा शंभर योजन लांब आणि तीस मैल रुंद असा मेरू पर्वताचा मुलगा म्हणून जो प्रसिद्ध आहे अशा वेंकट पर्वतावर ते आले. त्याला भूवैकुंठ म्हणतात. त्यांना ते स्थान आवडले. अनेक प्रकारची अरण्ये, पक्षे, हिंस्त्र प्राणी, कस्तुरी मृग अनेक तीर्थे त्या ठिकाणी आहेत. त्या तीर्थाजवळ एक चिंचेचे झाड असून तेथे एक वारुळ होते. त्या वारुळात शिरून भगवान त्या ठिकाणी गुप्त रूपाने राहिले. तेथे ते दहा हजार वर्षे होते.*

*सर्व देवास चिंता पडली; आता देवास कोठे शोधावे? सर्व देवांनी ब्रह्मदेवाला विचारले, श्रीहरींना कोठे शोधावे. ब्रह्मदेवाने आपल्या मनामध्ये विचार केला आणि करवीर क्षेत्रात जाऊन लक्ष्मीला ही हकीकत सांगितली. तू सोडून गेल्यापासून श्रीहरी कोठे दिसेना. त्याचा शोध कोठे करावा व सर्व देवांना बरोबर घेऊन महादेवी लक्ष्मी श्रीविष्णूच्या शोधात निघाले.*

*सर्व देवास चिंता पडली; आता देवास कोठे शोधावे? सर्व देवांनी ब्रह्मदेवाला विचारले. श्रीहरींना कोठे शोधवे. ब्रह्मदेवाने आपल्या मनामध्ये विचार केला आणि करवीर क्षेत्रात जाऊन लक्ष्मीला ही हकीकत सांगितली. तू सोडून गेल्यापासून श्रीहरी कोठे दिसेना. त्याचा शोध कोठे करावा व सर्व देवांना बरोबर घेऊन महादेवी लक्ष्मी श्रीविष्णूच्या शोधात निघाले. सर्व ठिकाणी शोध केला पण कोठेही विष्णूचा पत्ता लागेना. त्यावेळी ब्रह्मदेवाने गायीचे रूप धारण केले. स्वतः शंकराने वासराचे रूप घेतले. गोपीचा वेष लक्ष्मीने घेतला. सर्वजण विष्णूचा शोध करण्याकरिता या पृथ्वीवर आले. शोध करता करता चोल राजाच्या राज्यात ते आले. तो राजा धार्मिक होता. ही गायवासरू त्या राज्यामध्ये हिंडत असताना त्या गायीला पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटले. असली सुंदर गाय येथे कशी आली व ही कोणाची काही समजेना. राजाला ही हकीकत समजली. त्यांनी ती गाय आणवली. त्यालाही आनंद झाला. राजाने गौळणीला विचारले. तिने सांगितले ही गाय विकावयास आणिली आहे. राजाने द्रव्य देऊन ती विकत घेतली व आपल्या गायीच्या कळपात असताना एकदा या वैंकट पर्वतावर गवळ्यांनी ती गाय चरावयास नेली. त्या गायीने गवत भरपूर खाल्ले व पाणी पिण्यास म्हणून स्वामीतीर्थावर गेली. तेथे चिंचेच्या झाडाखाली असलेल्या वारुळातून सुंदर सुवास येत असलेला गायीस आढळला. ब्रह्मदेवाने तो सुवास ओळखला. येथेच श्री विष्णू आहेत असे त्यांनी ओळखले. ब्रह्मदेवगायीने त्या वारूळावर दुधाचा अभिषेक केला याप्रमाणे रोज तेथे येऊन ती गाय आपल्या दुधाचा अभिषेक करीत असे. असे होत असताना एके दिवशी त्या गायीची धार काढण्यास सांगितले असताना थोडेहि दूध निघेना. ती त्या गवळ्यास बोलू लागली. गवळ्यास तिने मारविले. त्यांनी ठरविले की त्या गायीच्या दुधाचे काय होते ते पाहू.*

*एकदा तो गवळी सर्व गायींना पाणी पाजवून सावलीत बसला असताना ती गाय त्या वारूळावर जाऊन आपल्या दुधाचा अभिषेक करते आहे हे पाहून त्याला राग आला. हिच्यामुळे आपल्याला शिक्षा भोगावी लागली असे म्हणून हिला मारून टाकतो असे म्हणून तो हातात कुऱ्हाड घेऊन तो तिला मारण्यास धावला हे पाहून देवांना दया आली. भक्ताचे रक्षण करणे हे माझे ब्रीद आहे असे म्हणून देव वारूळाबाहेर आले. गवळ्याची कुऱ्हाड गायीच्या अंगावर पडणार इतक्यात विष्णूने त्या कुऱ्हाडीचा प्रहार आपल्या डोक्यावर घेतला. खूप रक्तस्राव झाला. हे पाहून तो गवळी मरण पावला. हे पाहून ती गाय राजाच्या दरबारी जाऊन जमिनीवर पडून लोळू लागली. राजास आश्चर्य वाटले. सर्व लोक पहावयास धावले. त्या गायीने अरण्याची वाट धरली. राजा म्हणाला हिच्याबरोबर जाऊन काय ते पहा गाय त्या वारूळाजवळ आली. तेथे येऊन ओरडू लागली. लोक येऊन पाहतात तो गवळी मरण पावला आहे. वारूळ फुटले आहे. चहुकडे रक्त उडाले आहे. हे पाहून नोकरांनी ती गोष्ट राजाला सांगितली. राजा तेथे पहाण्यास आला. त्यालाहि आश्चर्य वाटले.*

*इतक्यात विष्णू वारूळातून बाहेर आले. त्यांचे मस्तक फुटले होते. आणि म्हणाले, दुष्टा मी येथे एकटा वारूळात गुप्त होतो, तू माझे मस्तक फोडून मला दुःख दिले आहेस. मी तुला शाप देईन. तू पिशाच्च म्हणून या अरण्यात हिंडशील. तुला फार दुःख भोगावे लागेल. हा शाप ऐकून राजा घाबरला. त्यांनी भगवंताच्या चरणी मिठी मारून देवा मला व्यर्थ का शाप दिला? तुला दुःख कोणी दिले हे मला माहित नाही. माझी चूक काय आहे सांगा. आता याच्यातून मी मुक्त कसा होईन ते सांगा तेव्हा विष्णु म्हणाले, मी विचार न करता शाप दिला. तुझी कर्मगती विचित्र आहे. भोगल्याशिवाय सुटका नाही. कलीयुगाचा नाश झाल्यानंतर कृतयुगात तुझा उद्धार होईल. तोपर्यंत तू येथे पिशाच्च म्हणून रहा. आकाश नावाचा राजा चंद्रवंशात होईल. त्याची सुंदर कन्या मी वरीन. तो राजा आंदण म्हणून मला एक मुकुट देईल. आठव्या दिवशी शुक्रवारी मी तो मुकुट माझ्या मस्तकावर धारण करीन. तू त्यावेळी दर्शनास येत जा. त्यावेळी तुला सुख होईल.*

*विष्णूच्या शापाने राजा पिशाच्च होऊन, गुप्त होऊन वनांमध्ये राहिला. भगवान विष्णू वारूळात गुप्तरूपाने राहिले. त्यांनी गुरु बृहस्पतीचे चिंतन केले. तेव्हा ते त्याच्याकडे येऊन वंदन केले. विष्णू म्हणतात, गुरो माझ्या डोक्यात फार वेदना आहेत. याला उपयोग सांगा. गुरु म्हणाले, उंबराच्या चिकात कापसाची राख घालून ती जखमेत भरावी; म्हणजे जखम बरी होईल. गुरुनी औषध करून त्यांच्या डोक्यास बांधून त्यांची आज्ञा घेऊन ते गेले. काही दिवस गेल्यावर विष्णू औषधाचा शोध करण्याकरिता म्हणून अरण्यामध्ये हिंडत असताना एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. रस्त्यातून जात असताना वराहाचा अवतार धारण करणारे श्री विष्णू सगळ्या अरण्यातील प्राण्याबरोबर तेथे आले. श्री विष्णू समोर येताच समोरून राजा येत आहे हे पाहिल्याबरोबर ते गुप्त झाले. तेव्हा ते म्हणाले, मी तुला पाहिले आहे. तू गुप्त होऊ नकोस.*

*पुढे ते एकमेकास भेटले. वराहरूपी नारायण त्याला म्हणाले, 'आपण वैकुंठ सोडून येथे का आलात आपल्या डोक्याला जखम कसली? या अरण्यात का येऊन राहिलात?'*
*यावर विष्णू म्हणाले, 'भृगु ऋषींनी लाथ मारली म्हणून लक्ष्मी रागावली व ती करवीर क्षेत्री येऊन राहिली. म्हणून मी ही या वनात येऊन राहिलो. येथील गवळ्याने माझे डोके फोडले. मी एकटाच येथे राहतो. मला रहावयास जागा नाही आणि सेवा करावयास कोणी नाही. मला रहावयास जागा द्या.' असे विष्णू म्हणताच वराहरूप विष्णूने त्याला रहावयास जागा दिली व बकुला नावाची दासी दिली. ती दासी त्यांची उत्तम प्रकारे सेवा करू लागली. ती बकुला कोण? तिने एवढे पुण्य केव्हा केले होते? यावर सूत सांगू लागले. कृष्णावतारास गोकुळात नंदाच्या घरी भगवान खेळत होते. मथुरेला भगवान गेल्यावर यशोदा शोक करू लागली. त्यावेळी विष्णूने सांगितले, 'कलियुगात मी प्रगट होईन व तुझे सर्व मनोरथ पूर्ण करीन.' तीच ही बकुला दासी म्हणजे यशोदा.*
श्रीमंगलमूर्तये नमः ॥ समर्थाचे दर्शनासि जाता ॥ रिक्तहस्ते न जावे सर्वथा ॥ परि दुर्बळाशि उत्तम पदार्था ॥ नाही सामर्थ्य न्यावयासी ॥१॥मग तो फळमूळघेऊन ॥ जाय दर्शनालागून ॥ तैसे हे प्राकृत बोल रसहीन ॥ संतांपुढे निवेदिले ॥२॥परि संत अभेदसत्य ॥ त्यांसि नाही विषयस्वार्थ ॥ समर्थ दुर्बळ समान निश्चित ॥ भाविती ते ही सर्वदा ॥३॥याकरिता हे रसहीनबोल ॥ संती कृपेने मान्य केले ॥ जैसे बाळकाचे बोबडे बोल ॥ जनकजननींशी आवडे ॥४॥की द्वितीयेच्या चंद्राशी ॥ लोक वाहती जीर्ण दशी ॥ त्रिभुवनदीपक सूर्याशी ॥ एकारती करती जेवि ॥५॥परी तो भक्तापाहोन ॥ ग्रहण करी प्रीतीकरून ॥ तैसे मजवरी कृपाकरून ॥ श्रोते सादर परिसिजे ॥६॥गतकथाध्यायी सुंदर ॥ निष्पाप जाहला माधवद्विजवर ॥ श्रीवेंकटाद्रि नाम परिकर ॥ पर्वतालागी पडियेले ॥७॥शौनकादिऋषि सुमती ॥ सूताप्रती प्रशन करिती ॥ तू चिदाकाशीचा रोहिणीपती ॥ करी तृप्ति श्रवणचकोरा ॥८॥श्रीहरीचे कथामृत ॥ तव मुखे गोड वाटे बहुत ॥ ऐकावयासी आर्तभूत ॥ श्रवण आमुचे जाहले ॥९॥श्रीवैकुंठगिरीचे वैभव ॥ ऐकोनि तृप्त जाहलो सर्व ॥ त्या पर्वतावरी रमाधव ॥ काय निमित्त पातले ॥१०॥टाकोनिया वैकुंठ भुवन ॥ येथे वसावया काय कारण ॥ हे अवघे समूळ वर्तमान ॥ आम्हालादि सांगिजे ॥११॥यावरी सूत ऋषींसी बोलत ॥ म्हणे ऐका आता प्रेमयुक्त ॥ शतानंद म्हणे जनकाते ॥ ऐक राया सावध ॥१२॥एकदा सर्वऋषी मिळोन ॥ जान्हवीतीरी आरंभिला यज्ञ ॥ यज्ञमंडप शोभायमान ॥ परमविस्तीर्ण रचियेला ॥१३॥कश्यपात्रिभरद्वाज ॥ विश्वामित्र गौअम तेजःपुंज ॥ जमदग्नि वसिष्ठादि द्विज ॥ अध्वरासि आरंभिले ॥१४॥तव तया मंडपात ॥ जो का कमळोद्भवाचा सुत ॥ ब्रह्मवीणा घेवोनि त्वरित ॥ नारदमुनी पातला ॥१५॥येता देखोनी नारदासी ॥ नमन करिती सर्वही ऋषी ॥ आसन देवोनी तयासी ॥ षोडशोपचारे पूजिले ॥१६॥नारद म्हणे तये वेळा ॥ तुम्ही तो यज्ञ आरंभिला ॥ शेवटी या मखाचे फळ ॥ कोणालागी अर्पिता ॥१७॥सर्वदेवांमाजी परम ॥ कोण दैवत आहे उत्तम ॥ अध्वराचा परिणाम ॥ कोण मजला सांगा पै ॥१८॥ऋषी म्हणती ते वेळा ॥ श्रेय अर्पावे कोणाला अद्यापि आम्हांसी कळला ॥ नाही सर्वथा जाणपा ॥१९॥मग नारद काय बोलिला ॥ यज्ञभोक्ता नाही कळला ॥ मख करिता कासयाला ॥ महा आयास करोनिया ॥२०॥ऐसे ऐकोनि वचन ॥ विप्र सर्व यथार्थ मानून ॥ भृगुऋषीसी बोलावून ॥ सांगते झाले तेधवा ॥२१॥तुम्ही स्वर्गलोकासी जाऊन ॥ देवांमाजी श्रेष्ठ कोण ॥ त्याचा विचार करोन ॥ सत्वरचि येईजे ॥२२॥सर्वोतम न येता

प्रत्यया ॥ व्यर्थ यज्ञ करावे कासया ॥ जैशा भ्रताराविणे स्त्रिया ॥ न शोभती सर्वथा ॥२३॥वऱ्हाडी जैसे वराविणे ॥ की बुबुळेविणे व्यर्थ नयन ॥ की नासिकेवाचोनि वदन ॥ शोभा न ये सर्वथा ॥२४॥यालागी तुम्ही सत्वर ॥ श्रेष्ठदेव कोण साचार ॥ याचा शोध करोनि परिकर ॥ यावे लौकरी द्विजवर्या ॥२५॥ऐसे ऐकोनि भृगुऋशी ॥ सत्वर गेला सत्यलोकासी ॥ तो कमळासन बैसला सभेसी ॥ नारदतुंबर गाती पुढे ॥२६॥मरुद्गण पितृगण ॥ एकादश रुद्र द्वादशादित्य जाण ॥ अष्टवसु कर जोडून ॥ उभे राहिले सम्मुख ॥२७॥सावित्री आणि सरस्वती ॥ सन्निधसेवेसी उभ्या असती ॥ अष्टनायका नृत्य करिती ॥ गायन करिती गंधर्व ॥२८॥ऐशी ब्रह्मसभा अभिनव ॥ त्याची शोभा अतिअपूर्व ॥ सिंहासनी कमळोद्भव ॥ बैसला असे आनंदे ॥२९॥चारी वेद मूर्तिमंत ॥ हस्त जोडोनि उभे तेथे ॥ भृगु गेला सभेत ॥ परी कोणी न पुसे तयासी ॥३०॥ऋषि आला म्हणोन ॥ विधातयासी न होय स्मरण ॥ ऐसा अनादर पाहोन ॥ विप्र मनी विचारी ॥३१॥म्हणे पदाभिमानी उन्मत्त ॥ सर्वज्ञत्व नाही एथ ॥ यज्ञभोक्ता यथार्थ ॥ सर्वथा हीन होय ॥३२॥मग तेथून निघाला सत्वर ॥ कैलासासि आला मुनिवर ॥ तो गिरजेसहित श्रीशंकर ॥ एकांती रमत होता पै ॥३३॥ऋषि प्रवेशला आत ॥ देखोनी पार्वती झाली लज्जित ॥ शिवाप्रति विनवीत ॥ काय बोलत जगदंबा ॥३४॥म्हणे कैलासपते शूळपाणी ॥ सोडा त्वरित मजलागूनी ॥ भृगुऋषि प्रवेशला सदनी ॥ प्राणवल्लभा ऐकपा ॥३५॥ऐसे ऐकता भाळलोचन ॥ झाला परम कोपायमान ॥ त्रिशूळहाती घेऊन ॥ उठता झाला सत्वर ॥३६॥काळवेळ न पाहता ॥ आत संचरला अवचिता ॥ यासि मारीन आता ॥ म्हणोनि बाहेर पातला ॥३७॥क्रोधयुक्त पाहोनि शंकर ॥ ऋषी पळाला भयातुर ॥ म्हणे हा तामसी त्रिनेत्र ॥ विचार काही नसे येथे ॥३८॥मग शाप देता झाला मुनी ॥ तुझी पूजा न करो कोणी ॥ तुझिया लिंगासी आजपासोनी ॥ करिती पूजन निर्धारी ॥३९॥ऐसे शापोनी त्रिनेत्रासी ॥ विप्र पातला वैकुंठासी ॥ तो लक्ष्मीसहित हृषीकेशी ॥ शयन केले एकांती ॥४०॥परमकोपारूढ ब्राह्मण ॥ म्हणे तिन्ही देव झाले समान ॥ एकाहुनी एक पूर्ण ॥ जाहले जाण विषयांध ॥४१॥उताणा निजला श्रीनिवास ॥ ऋषीस चढला कोपविशेष ॥ आत जावोनि श्रीहरीस ॥ लत्ताप्रहारे ताडिले ॥४२॥सव्यभागी हृदयावरी ॥ पदाघात बैसला ते अवसरी ॥ चरण रुतला शरीरी ॥ जगदात्महरीयाच्या ॥४३॥तात्काळ उठोनी जगज्जीवन ॥ धरिले ऋषीचे चरण ॥ म्हणे स्वामी मजकारणे ॥ श्रम बहुत पावले ती ॥४४॥मी अपराधी असे पूर्ण ॥ बरे केले मजलागी शासन ॥ परी दुखावले स्वामीचे चरण ॥ महाकठीण देहमाझा ॥४५॥वज्राहूनी अष्टगुण ॥ तनू माझी असे कठिण ॥ आपुले बहुत मृदुचरण ॥ दुखवले असतील ऋषिवर्या ॥४६॥मग सुगंधतैल लाऊन ॥ स्वहस्ते करी मर्दन ॥ जगदात्मा मनमोहन ॥ आपण निजांगे करितसे ॥४७॥उष्णोदके करून ॥ केले ऋषीचे चरणक्षालन ॥ मग वस्त्रे पुसून ॥ चुरितसे क्षणभरी ॥४८॥ऐसा देखता आदर ॥ संतोष पावला द्विजवर ॥ म्हणे एवढा देवनिर्धार ॥ दयासागर दिसतसे ॥४९॥केवल सत्वगुणमंडित ॥ देवाधिदेव वैकुंठनाथ ॥ त्रिभुवनपाळक समर्थ ॥ वेदशास्त्र वर्णिती जया ॥५०॥मग तो भृगुऋषीश्वर ॥ स्तवन करी जोडुनी कर ॥ म्हणे तू जगदात्मा साचार ॥ कोणासी पार न कळे तुझा ॥५१॥जयजयाजी जगन्नायका ॥ भक्तवत्सला विश्वव्यापका ॥ नमो दानवकुळ पावका ॥ इंदिरापति श्रीहरी ॥५२॥ऐसे स्तवूनी श्रीनिवासासी ॥ ऋषि परतला वेगेसी ॥

जेथेकश्यपादि होते ऋषी ॥ तया स्थानासी पातला ॥५३॥विप्र बोलतसे सप्रेम ॥ सर्वदेवात हरि सर्वोत्तम ॥ जो जगदात्मा अत्माराम ॥पूर्णकाम सर्वेश ॥५४॥जैसे नवग्रहात दिवाकर ॥ की अंडजांमाजी खगेश्वर ॥ देवांमाजी इंदिरावर ॥ श्रेष्ठ असे जाणावे ॥५५॥की भोगियामाजी धरणीधर ॥ की धनाढ्यामाजी कुबेर ॥ देवांमाजी श्रीकरधर ॥ श्रेष्ठ ऐसे जाणावे ॥५६॥ज्याचा पार नेणती श्रुती ॥ तो हा जाणावा रमापती ॥ त्या समान देव निश्चिती ॥ दुसरा कोणी असेना ॥५७॥ऐकोनि संतोषले मुनिजन ॥ ते ही करोनी महायज्ञ ॥ अर्चिते जाहले जनार्दन ॥ अत्यानंदे ते काळी ॥५८॥असो सिंहावलोकने करून ॥ परिसा मागील अनुसंधान ॥ भृगुऋषीने पदताडण ॥ हरीसी केले ज्याकाळी ॥५९॥तेव्हा हरींनी सत्कारून ॥ केले भृगूचे पूजन ॥ ते पाहोनि कमळा आपण ॥ श्रीहरिप्रती बोलतसे ॥६०॥म्हणे क्षीराब्धिवासा जगज्जीवना ॥ त्रिभुवनपालका मनमोहना ॥ दीनबंधो जनार्दना ॥ जगद्रक्षणा जगद्गुरु ॥६१॥तू देवाधिदेव मुररी ॥ तुज वंदिती कमळोद्भव त्रिपुरारी ॥ इंद्रादिदेव निर्धारी ॥ तुझिया सत्तेने वर्तती ॥६२॥तुजवाचोनी तत्त्वता ॥ दुजा थोर नाही अनंता ॥ आणि भृगूने मारिली लाथ ॥ जगन्नाथा न सोसे मज ॥६३॥तू समर्थ सर्वांहून आणि भृगु मनुष्य दुर्बळहीन ॥ तेणे तुजला पदताडण ॥ करिता क्रोध न ये तूते ॥६४॥यावरी बोले मनमोहन ॥ म्हणे वल्लभे ऐकवचन ॥ भृगुऋषि केवळ ब्राह्मण ॥ तपोधन ज्ञानी तो ॥६५॥ब्राह्मण माझे मुख्य दैवत ॥ मी निजभक्तांसी प्रिय अत्यंत ॥ भक्तावाचोनि यथार्थ ॥ मज न गमे सहसाही ॥६६॥मीनासी न सोडवे जीवन ॥ की धेनूसी जैसे नवे तृण ॥ तैसे मज भक्तांविण ॥ दुसरे काही नावडे ॥६७॥याकरिता वल्लभे जाण ॥ ह्रदयी मिरवितो विप्रचरण ॥ भूषणरूपे मजकारण ॥ श्रीवत्स लांच्छन शोभतसे ॥६८॥यावरी जगन्माता बोलत ॥ स्वामी मज न सोसवे ऐसे सत्य ॥ मी न राहे आता येथ ॥ जाईन त्वरित भूतळा ॥६९॥ऐसा प्रेमकलह करून ॥ जगन्माता निघाली तेथून ॥ पृथ्वीवरी येऊन ॥ करवीर क्षेत्री राहिली ॥७०॥जितुकी तीर्थे पृथ्वीवरी ॥ तितुकी असती करवीरक्षेत्री ॥ पंचगंगेचिया तीरी ॥ राहती झाली आदिमाता ॥७१॥ती वर्णावी समूळकथा ॥ समुद्रा ऐसे होईल ग्रंथा ॥ यालागी बोलिले ध्वनितार्था ॥ कळले पाहिजे निर्धारी ॥७२॥टाकोनिया वैकुंठपरी ॥ इंदिरा गेली करवीर क्षेत्री ॥ इकडे क्षीरसागरविहारी ॥ काय करिता जाहला ॥७३॥जगन्माता गेलियावरी ॥ परमचिंताक्रांत श्रीहरी ॥ न गमेचि कदा दिवसरात्री ॥ उदास अंतरीसर्वदा ॥७४॥गोड नलगे विलासगायन ॥ नावडेची सुमनहार चंदन ॥ भोजन तांबूल शयन ॥ सर्वही वीट वाटतसे ॥५॥मायाविरहित श्रीधर ॥ तो सर्वदाही निर्विकार ॥ परी लौकिकभावे जगदुद्धार ॥ नानाप्रकारे दावितसे ॥७६॥असो सर्वदा उदासचित्त ॥ काय करी जगन्नाथ ॥ त्याग करोनी वैकुंठाते ॥ भूतळाप्रती पावले ॥७७॥कोठे रहावे म्हणोन ॥ स्थळ पाहे मनमोहन ॥ ऐसा हिंडत जनार्दन ॥ दक्षिणदेशी पातला ॥७८॥भागीरथीचे दक्षिणतीरी ॥ तीनशत योजनांवरी ॥ तीर्थनाम सुवर्णमुखरी ॥ प्रवरा नदी वसतसे ॥७९॥त्याचे उत्तरेसी कोशावरी ॥ नामाभिधान वेंकटगिरी ॥ शतयोजन लांबनिर्धारी ॥ त्रिंशद्योजन रुंद जो ॥८०॥जो कनकाद्रीचा पुत्र ॥ तृतीयाध्यायी वर्णिले चरित्र ॥ शेष वायु संवादमात्र ॥ दक्षिणदेशासि पातला ॥८१॥तोचि हा पर्वतशेषाद्री ॥ वेंकटेश ज्याचे मस्तकावरी ॥ मध्यभागी निर्धारी ॥ श्रीनृसिंह वसतसे ॥८२॥पुच्छभागी मल्लिकार्जुन ॥ श्रीशैल्य म्हणती त्यालागून ॥ ऐसा हा क्षेत्रराजपूर्ण ॥ भूवैकुंठ म्हणवितसे

॥८३॥ऐसा तो वेंकटेशगिरी ॥ देखता जाहला वैकुंठविहारी ॥ स्वामिपुष्करणी तीरी ॥ येता जाहला जगदात्मा ॥८४॥वन पाहिले परमसुंदर ॥ नाना वृक्ष लता मनोहर ॥ शीतळ छाया परिकर ॥ मनोरम्य वाटतसे ॥८५॥शाल तमाल देवदार ॥ आम्र कदंब शेवंती मंदार ॥ वट पिंपळ औदुंबर ॥ दाडिंबी पारिजातक शोभती ॥८६॥मालती मोगरी जाईजुई ॥ मलयागर कृष्णागर पाही ॥ लवंग वृक्ष ठायी ठायी ॥ नागचंपक शोभती ॥८७॥केळी नारळी पोफळी ॥ पुन्नाग राय कर्पूर कर्दळी ॥ फणस निंबोण्या जांभळी ॥ रायअवळी डोलती ॥८८॥शेवंतीका बकुल चंपक ॥ पुन्नाग करवीर सुवासिक ॥ तुळसी बिल्व सुरेख ॥ शोभायमान दिसती ॥८९॥कनकवेली नागवेली परिकर ॥ आरक्त प्रवाळवेली सुंदर ॥ वनस्पती अठराभार ॥ तया वनात शोभती ॥९०॥चातक मयूर बदक ॥ चक्रवाके राजहंस देख ॥ रावे चकोर गरुडादिक ॥ कोकिळा वसती तये स्थळी व९१॥सिंहव्याघ्र सूकर ॥ वनगायी अस्वल वानर ॥ ससे हरिण मार्जार ॥ जंबुक कुंज वसती तेथे ॥९२॥कस्तूरीमृग जवादी बिडाळक ॥ नकुळवन गौवा शशक ॥ शार्दूलादि मृग बहुतेक ॥ निर्वैर विचरती त्या स्थळी ॥९३॥तीर्थजळ दिसे मनोहर ॥ माजी विलसते जळचर ॥ मत्स्य कच्छ मगरी परिकर ॥ जळडुंडुभ मंडूक पै ॥९४॥माजी विकसली अरविंदे ॥ त्यात रुणझुणती मिलिंद ॥ निर्वैर विचरती श्वापद ॥ तीर्थासमीप सर्वदा ॥९५॥धनुर्मासाचे सितपक्षात ॥ द्वादशी तिथि पर्वविख्यात ॥ ब्रह्मादिसुरवर इच्छित ॥ तया तीर्थाचे स्नान पै ॥९६॥जितुकी तीर्थे पृथ्वीवर ॥ ती एथेंचि वसती निरंतर ॥ ऐसे स्थळ पाहूनि श्रीधर ॥ राहो इच्छित ये स्थानी ॥९७॥तीर्थासमीप सुरेख ॥ तिंतिणी वृक्ष असे एक ॥ तया खाली वल्मीक ॥ होते जाण निर्धारी ॥९८॥त्या वल्मीकाचे अंतरी ॥ प्रवेशता झाला मुरारी ॥ गुप्त रूपे ते अवसरी ॥ तया स्थळी राहिला ॥९९॥मनी चिंतूनि रामावतार ॥ म्हणे वल्मीक हेचि कौसल्यासुंदर ॥ तिंतिणी दशरथ साचार ॥ तीर्थसरयू गंगा पै ॥१००॥अथवा वल्मीक देवकी जननी ॥ वसुदेव हाचि तिंतिणी ॥ गोपगोपिका वृक्ष भावोनी ॥ यमुना हे तीर्थ मानितसे ॥१॥ऐशियापरी मेघश्याम ॥ जो देवाधिदेव आत्माराम ॥ वारुळामाजी पूर्णकाम ॥ राहता जाहला तेकाळी ॥२॥दहा सहस्त्र वर्षपर्यंत ॥ तेथेचि राहिलासे गुप्त ॥ देव चिंताक्रांत जाहले समस्त ॥ म्हणती करावे काय आता ॥३॥वैकुंठनाथ श्रीहरी ॥ जो भक्तजनांचा कैवारी ॥ कोठे गेला निर्धारी ॥ कैसा ठायी पडेल आता ॥४॥आम्ही क्षणक्षणा जावोन ॥ गाऱ्हाणे सांगत होतो पूर्ण ॥ आता आम्हांसी रक्षील कोण ॥ जगद्वंद्या वाचोनिया ॥५॥असो सर्वही देव मिळून ॥ जवळी केला कमलासन ॥ म्हणे श्रीहरीसी त्वरेकरून ॥ ठायी पाडी विधातिया ॥६॥ब्रह्मा विचारी मानसी ॥ म्हणे कैसे करावे आता यासी ॥ मग जावोनि करवीरपुरासी ॥ जगन्मातेसि बोलती ॥७॥माते तू आलिस रुसोन ॥ तुझिया विरहेकरून ॥ सांडला कोठे मनमोहन ॥ आम्हांसी कोण रक्षील आता ॥८॥तू आदिमाता मूळप्रकृती ॥ ठायी पाडी जगत्पती ॥ तुजवाचूनी हरीप्राप्ती ॥ नव्हे आम्हांसी सर्वथा ॥९॥मग सर्वदेवा समवेत ॥ जगन्माता हरीसी शोधित ॥ कोठे गेला जगन्नाथ ॥ ठायी न पडे सर्वथा ॥११०॥जो वेदशास्त्रांसि अगोचर ॥ अठराजणांसी न कळे पार ॥ सहस्त्रमुखांचा साचार ॥ गुण वर्णिता भागला ॥११॥चारीमुखांचा शिणला ॥ पाच मुखांचा तटस्थ राहिला ॥ सहा मुखांचा दडाला ॥ वनामाजी जावोनिया ॥१२॥अष्टांगयोग साधिती पाही ॥ योगियांसी न पडे ठायी ॥ तीर्थयात्रादि पुण्यलवलाही ॥ करिताही हरि न सापडे ॥१३॥नाना व्रत केलिया

साधन ॥ तरी न सापडे नारायण ॥ करिता पंचाग्नि साधन ॥ सर्वथाही न सापडे ॥१४॥द्रव्यबळ विद्याबळे जाण ॥ धरू म्हणती मूर्खपणे ॥ निराहारी जळाहारी जाण ॥ नग्न मौनिया न सापडे ॥१५॥यज्ञयाग करिता बहुत ॥ ठायी न पडे जगन्नाथ ॥ बहुत प्रकारे कष्ट भोगिता ॥ दीननाथ न सापडे ॥१६॥एक दृढभक्तीवाचून ॥ वश्य नव्हे नारायण ॥ भक्तांघरी मनमोहन ॥ लक्ष्मीसहित वास करी ॥१७॥जे का अभेदप्रेमळभक्त ॥ तेचि श्रीहरीसी आवडत ॥ त्यावाचोनि ज्ञान प्राप्त ॥ आणिका नव्हे निर्धारी ॥१८॥ज्ञानावाचोनि चिद्घनानंद ॥ सर्वथा न मिळेची श्रीगोविंद ॥ श्रीगुरुवाचोनि ज्ञानबोध ॥ कदा काळी मिळेना ॥१९॥अंगी नसलिया अद्वयभक्ती ॥ श्रीगुरुचे चरण न मिळती ॥ असो देव सर्वही शोधिती ॥ नानाप्रकारे करोनिया ॥१२०॥मग सर्वही विचार करोन ॥ गोरूप धरी चतुरानन ॥ वत्सवेष भगवान ॥ शंकर स्वये जाहला ॥२१॥गोपींचे वेश तत्वता ॥ धरिती जाहली जगन्माता ॥ मग शोधावया विश्वपिता ॥ जाते जाहले भूमंडळी ॥२२॥पशुजातीचे स्वभावपूर्ण ॥ वास घेता होय पदार्थ ज्ञान ॥ वास घेतल्यावाचोन ॥ पशु तृण न भक्षिती ॥२३॥पृथ्वीत असेल गुप्त ॥ त्याचा शोध करावया निश्चित ॥ गायीचे वेष यथार्थ ॥ धरिता जाहला तेधवा ॥२४॥असो ऐसे तिघेजण ॥ चालिले तेव्हा शोधा कारण ॥ चोळराजाचे राज्यात जाण ॥ हिंडत हिंडत पातले ॥२५॥चोळदेशीचा नृपनाथ परम धार्मिक आणि समर्थ ॥ ज्याचिया प्रतापे यथार्थ ॥ शत्रु कापती थरथरा ॥२६॥सत्क्रियावंत आणि उदार ॥ प्रजापाळणी बहुत चतुर ॥ गोब्राह्मणप्रतिपाळक साचार ॥ सेना अपार तयाची ॥२७॥ज्याच्या राज्यात नारीनर ॥ स्वधर्मी रत अहोरात्र ॥ स्त्रिया पतिव्रता थोर ॥ लोक सर्व सत्यवचनी ॥२८॥गायी दुहती त्रिकाळ ॥ वृक्ष सदा डोलती सफळ ॥ अवर्षण दोष दुष्काळ ॥ नाही समूळ राज्यात ॥२९॥असो ऐसा नृपनाथ ॥ पातले त्याचे नगरात ॥ धेनु पाहोनी जन समस्त ॥ आश्चर्य मानिती ते काळी ॥१३०॥म्हणती ऐसी सुलक्षण गायी ॥ कधी कोणी पाहिली नाही ॥ कोण देशींची लवलाही ॥ आली येथे कळेना ॥३१॥नृपासी कळला वृत्तांत ॥ तेणे सभेसि आणविली त्वरित ॥ धेनु पाहोनि नृपनाथ ॥ परमानंद पावला ॥३२॥मग तिये गोपांली प्रती ॥ पुसता जाहला जगतीपती ॥ म्हणे कोण कोठील तुम्ही निश्चिती ॥ धेनु कासया आणिली ॥३३॥यावरी बोले गौळणी ॥ म्हणे ऐक नृपवर्य चूडामणी ॥ धेनु ही परम उत्तम गुणी ॥ मी आणिली विकावया ॥३४॥मग राजा देवोनि यथेष्टधन ॥ विकत घेतली गायी लागून ॥ आपुल्या कळपात नेऊन ॥ वत्सासहित बांधिली ॥३५॥असो जगन्माता झाली गुप्त ॥ सर्व गोधने चरावयाते ॥ वनाप्रती जाती त्वरित ॥ नित्यकाळी तेधवा ॥३६॥चरावया निमित्त करोन ॥ पृथ्वीत शोधे चतुरानन ॥ कोठे असेल मनमोहन ॥ ठायी पाडावा म्हणोनिया ॥३७॥काही दिवस गेलियावरी ॥ श्रीवेंकटाद्रि गिरिवरी ॥ गोधन चरावया निर्धारी ॥ घेवोनि गेला गोपाळ ॥३८॥तृण भक्षोनिया तुंबळ ॥ मग प्राशन करावया जळ ॥ स्वामितीर्थासी तात्काळ ॥ गोधन सर्व आणिले ॥३९॥तेथील सेवोनि पुण्यवारी ॥ वृक्षच्छायेसी राहिले निर्धारी ॥ विधाता हरीचा शोधकरी ॥ तीर्था समीप अवनीत ॥१४०॥तो तिंतिणी वृक्ष सुरेख ॥ तयातळी देखिले वल्मीक ॥ छिद्रांतूनि सुवास देख ॥ येत हरि अंगीचा ॥४१॥जैसी पेटीत ठेविली कस्तूरी ॥ परी मकरंद निघे बाहेरी ॥ की दिनमणी झांकिला अभ्री ॥ परी प्रकाश बाहेरी दिसे जेवी ॥४२॥परमचतुर कमळासन ॥ तात्काळ जाणिली खूण ॥ म्हणे येथे आहे जगज्जीवन ॥ मनमोहन जगद्गुरू

॥४३॥जैसे करिता श्रीगुरुसेवन ॥ अकस्मात होय अपरोक्षज्ञान ॥ की करिता योगसाधन ॥ साक्षात्कार होय जेवी ॥४४॥तैसा वारुळा भीतरी ॥ विधीने ओळखिला श्रीहरी ॥ म्हणे माझा पिता निर्धारी ॥ येथे येवोनि राहिला ॥४५॥परमहर्षेला चतुरानन ॥ म्हणे भाग्य माझे परिपूर्ण ॥ या चराचराचे जीवन ॥ सापडले पूर्ण मजलागी ॥४६॥निर्धनासी सापडे धन ॥ की जन्मांधासी आले नयन ॥ तैसा गोरूपी कमळासन ॥ चिद्धनानंदे नाचतसे ॥४७॥मग तया वल्मीकावरी ॥ विधाता दुग्धाभिषेक करी ॥ म्हणे जयजय वैकुंठविहारी ॥ एकांत भारी सेविलासी ॥४८॥तुझी राजस तनू सुकुमार ॥ का सेविलासि घोर कातार ॥ तुजवाचोनि निर्धार ॥ दीन आम्ही नारायणा ॥४९॥तान्ह्यासि टाकूनि घरी ॥ जननी गेलिया बहुत दूरी ॥ लेकरू तळमळी ज्यापरी ॥ तेवी श्रीहरी जाहलो पै ॥१५०॥असो ऐसे चतुरानन ॥ नित्य करी अभिषेचन ॥ लोटले किती एकदिन ॥ तो एक अपूर्व वर्तले ॥५१॥राजपत्नी एके दिवशी ॥ आपण येवोनी गायीपाशी ॥ लाविली दोहन करावयासी ॥ तो क्षीर न निघे अणुमात्र ॥५२॥पान्हा फुटे किंचित ॥ मग राजप्रिया क्रोधयुक्त ॥ गोपाळा प्रति बोलत ॥ क्षीर किंचित नसे का ॥५३॥वत्सासि पाजविले वनांतरी ॥ की तुवांचि दुहिले निर्धारी ॥ गोपाळ बोले ते अवसरे ॥ मी नेणे सर्वथा स्वामिणी ॥५४॥तुझे चरण साक्ष लवलाही ॥ मी वनी नाही दुहिली गायी ॥ वत्सासि पाजिले ते ही ॥ पाहिले नाही माउली ॥५५॥राजप्रिया कोपायमान ॥ गोपाळाशी करविले ताडण ॥ तू दुरात्मा परम दुर्जन ॥ अभिलासिलेसि तूचि पै ॥५६॥ऐसे होताचि निश्चित ॥ गोपाळ सर्वकाळ जपत ॥ गायीचे क्षीर काय होत ॥ पहावयालागी सर्वदा ॥५७॥एके दिवशी गोपाळाने ॥ स्वामितीर्थी जळ पाजून ॥ वृक्षच्छायेसि गोधन ॥ स्थिर केले नावेक ॥५८॥तो तया वल्मीकावरी ॥ धेनु जावोनि अभिषेककरी ॥ गोपाळ पाहोनि आपुले नेत्री ॥ कोपायमान जाहला ॥५९॥म्हणे धेनु हे अवगुणी ॥ वत्सा ना धन्याशी दुग्ध नेदूनी ॥ वारुळावरी दोहन करोनी ॥ शिक्षा करविली मजलागी ॥१६०॥आता इचा वध करीन ॥ म्हणोनी धावला फरश घेऊन ॥ ऊर्ध्व हस्त उचलोन ॥ घालावा जो गायींवरी ॥६१॥तव तो भक्तकामकल्पद्रुम ॥ वृत्तांत जाणोनी मेघश्याम ॥ मनी विचारी पुरुषोत्तम ॥ काय करावे ऐसियासि ॥६२॥ब्रह्मा माझा बाळक ॥ माझी काकुळती तयासी देख ॥ गायीचे स्वरूपे अभिषेक ॥ करीतसे मजलागी ॥६३॥ऐसा चालता नित्यनेम ॥ पाहो न शके गोपाळ अधम ॥ गोहत्या करावया दुर्गम ॥ प्रवर्तलासे दुरात्मा ॥६४॥मी भक्तजनांचा रक्षक ॥ ब्रीद माझे गाजे देख ॥ ऐसियास रक्षक ॥ मज वाचोनि कोण असे ॥६५॥ऐसे विचारूनि अंतरी ॥ जगदात्मा तेव्हा काय करी ॥ तत्काळ वारुळा बाहेरी ॥ प्रकट होता जाहला ॥६६॥ प्रहार पडावा जो गायीवरी ॥ आपुले निजांग छाया करी ॥ श्रीहरीचे मस्तकावरी ॥ कुठार प्रहार बैसला ॥६७॥मस्तक फुटोनी तात्काळ उचंबळला रक्तबंबाळ ॥ सप्तताल उंचप्रबळ ॥ रक्तधारा वर्षल्या ॥६८॥ऐसे गोपाळ देखोन ॥ मूर्च्छित पडला न क्षण ॥ निघोनि गेला प्राण ॥ गोपाळ मरण पावला ॥६९॥ऐसे देखोनि ते अवसरी ॥ धेनु धावली राजद्वारी ॥ नृपतीसम्मुख धरणीवरी ॥ लोळो लागली तेधवा ॥१७०॥राव आश्चर्य करी मानसी ॥ सेवक धावले पहावयासी ॥ जवळी मनुष्य पहाता वेगेसि ॥ मार्ग धरी वनाचा ॥७१॥राजा म्हणे सवे जाऊन ॥ पहा काय ते वर्तमान ॥ धेनुसंगे सेवकजन ॥ जाते जाहले वनासी ॥७२॥वारुळासमीप जावोनी ॥ धेनु हंबरे तये क्षणी ॥ दूत पाहती जवळी येवोनी ॥ तो गोपाळ मरण पावला

॥७३॥वारुळावरी कडोविकडी ॥ रक्त वर्षले चहूकडी ॥ सेवक धावले तातडी ॥ रायाप्रति सांगावया ॥७४॥म्हणती नृपवर्या ऐक पूर्ण ॥ गोपाळ पावला असे मरण ॥ स्वामितीर्था समीप जाण ॥ रक्त बहुत वर्षले ॥७५॥ऐसे ऐकता झडकरी ॥ राव घाबरला अंतरी ॥ सत्वर पातला ते अवसरी ॥ पहावया कारणे ॥७६॥तो चहूकडे रक्तबंबाळ ॥ प्रेत जाहला असे गोपाळ ॥ राव येवोनि पाहे जवळ ॥ परमाश्चर्य करोनिया ॥७७॥तव वारुळामधूनि अकस्मात ॥ प्रकटला कमळोद्भवाचा तात ॥ घाये मस्तक फुटला समस्त ॥ तैसाचि बाहेर पातला ॥७८॥सच्चिदानंदतनू सगुण ॥ षड्विकार रहित नारायण ॥ तेणेंचि व्यथा सोशिली दारुण ॥ दासाकारणे परमात्मा ॥७९॥असो राया सम्मुख प्रकटोन ॥ बोले इंदिरामनमोहन ॥ म्हणे पापिया मजकारणे ॥ तुवांचु दुःख दिधलेसि ॥१८०॥मी जनक जननी विरहित ॥ नसे स्त्रीपुत्रबंधुआप्त ॥ एकलाचि परदेशी एथ ॥ वारुळात गुप्त होतो पै ॥८१॥माझे मस्तक फोडून ॥ मज दुःख दीधले तुवा दारुण ॥ तुज मी आता शाप देईन ॥ महापापिष्ठा अविचारा ॥८२॥तू पिशाच होवोनी झडकरी ॥ हिडसील या वनांतरी ॥ आहार न मिळेल निर्धारी ॥ दुःख भारी भोगसी ॥८३॥ऐसा शाप ऐकोनी ॥ राव घाबरला अंतःकरणी ॥ धावोनि मिठी घाली चरणी ॥ नम्रवाणी विनवीतसे ॥८४॥म्हणे जगन्निवासा श्रीहरी ॥ काय माझा अन्याय तरी ॥ निरपराधियासि मुरारी ॥ शाप व्यर्थ दीधला ॥८५॥धेनु आली म्हणोन ॥ मी आलो पहावयालागून ॥ कोणे दुःख दीधले तुजलागून ॥ हेही नेणे कदा मी ॥८६॥विचार न करिता श्रीनिवासा ॥ मज शाप दीधलासी तू कैसा ॥ मनमोहना हृषीकेशा ॥ मी अन्यायी कैसा सांग पा ॥८७॥तुझे नाम घेता साचार ॥ प्राणी तरती घोर संसार ॥ मी प्रत्यक्ष रूप पाहोनी सुंदर ॥ पिशाचयोनि मजला का ॥८८॥लोह परिसाशी झगटोनी ॥ काळिमा न लोपे चक्रपाणी ॥ कल्पवृक्षतळी बैसोनी ॥ इच्छित झणी न मिळेची ॥८९॥तैसेचि जाहले एथे साच ॥ तव दर्शने झालो पिशाच ॥ आता कृपा करोनि उच्छाप वाचे ॥ बोल साच स्वामिया ॥१९०॥ऐसे ऐकताचि गोविंद ॥ उच्छाप वदला श्रीमुकुंद ॥ म्हणे मी न विचारिता अगाध ॥ शाप तुज दीधला ॥९१॥मी घाये होवोनी जर्जर ॥ न कळता शापिले निर्धार ॥ तुझी कर्मगति विचित्र ॥ भोगल्याविण न सुटेची ॥९२॥कलियुगाचा होईल अंत ॥ तू पिशाच होवोनी राही एथ ॥ कृतयुगामाजी यथार्थ ॥ उद्धार होईल तुझा पै ॥९३॥आकाशनामा नृपवर ॥ होईल सोमवंशी साचार ॥ त्याची कन्या परमसुंदर ॥ मी वरीन जाण निर्धारी ॥९४॥आंदणालागी राजेंद्र ॥ मुकुट एक देईल परिकर ॥ आठा दिवशी भृगुवारी ॥ मुकुट मस्तकी घालीन मी ॥९५॥त्यावेळी दर्शनासी ॥ तू येत जाइ निश्चयेसी ॥ तेव्हा क्षणमात्र सुख तुजसी ॥ होईल जाण राजेंद्रा ॥९६॥ऐसा उच्छाप वदोन ॥ गुप्त जाहला जनार्दन ॥ राव पिशाच होवोन ॥ वनामाजी राहिला ॥९७॥असो वल्मीकामाजी नारायण ॥ करी देवगुरूचे चिंतन ॥ तात्काळ पातला धावोन ॥ हरीसी नमन करीतसे ॥९८॥हरि म्हणे वाचस्पती ॥ मस्तकी वेदना बहुत होती ॥ यासी उपया त्वरित गती ॥ सांग निश्चिती मजलागी ॥९९॥गुरु म्हणे औदुबर चीक ॥ त्यात मिळवावी कार्पासराख ॥ घायात भरावे देख ॥ व्यथा दूर होईल ॥२००॥मग बृहस्पतीने औषध करून ॥ मस्तकासि बांधिले आवळून ॥ हरीची आज्ञा घेऊन ॥ जाता जाहला देवगुरु ॥१॥काही दिवस लोटल्यावरी ॥ औषधालागी मुरारी ॥ स्वये निघाला निर्धारी ॥ वनामाजी गोविंद ॥२॥नानावृक्ष लागले सघन ॥ माजी न दिसे सूर्यकिरण ॥ सुंदर लता सुवास सुमन ॥

चहूंकडे शोभती ॥३॥ऐसिया वनी रमावर ॥ हिंडत असता निर्धार ॥ तव तेथे नवल जाहले थोर ॥ तेचि श्रोते परिसीजे ॥४॥मार्गी जाता निर्धारी ॥ वराहरूपी जो श्रीहरी ॥ वनचर मेळासवे झडकरी ॥ त्याच मार्गे पातला ॥५॥वेंकटेश जाता सन्मुख ॥ येता देखिला भूमिपाळक ॥ पृथ्वीमाजी तात्काळिक ॥ लीन झाला तेधवा ॥६॥ते देखोनि धरणीधर ॥ बोलता झाला पै निर्धार ॥ म्हणे श्रीहरि वैकुंठविहारा ॥ पाहिले म्या तुजलागी ॥७॥लीन होऊ नका सर्वथा ॥ प्रकट होई जगन्नाथा ॥ ऐसा भूमिपाळ बोलता ॥ प्रकट जाहला श्रीहरी ॥८॥एकमेकांसी आलिंगन ॥ देते झाले प्रीतीकरून ॥ जैसे भार्गवआणिरघुनंदन ॥ पूर्वी ज्यापरी भेटले ॥९॥एकरूप दोघे जण ॥ नाही तेथे भेदभान ॥ वराहरूपी नारायण ॥ बोलता झाला त्यावरी ॥२१०॥म्हणे जगन्निवासा मुरारी ॥ का टाकिली वैकुंठपुरी ॥ कोण्या गुणे मधुकैटभारी ॥ एथे येणे जाहले ॥११॥मस्तकावरी घाय दारुण ॥ पडावयासी काय कारण ॥ तू कोमळ तनु नारायण ॥ घोर वन का सेविलेसी ॥१२॥यावरी बोले जगन्नाथ ॥ भृगूने मज दीधली लाथ ॥ ते न सोसवले इंदिरेते ॥ गेली रुसोन करवीरा ॥१३॥मग मी होवोनि उदास ॥ टाकोनिया वैकुंठास ॥ या वनामाजी केला वास ॥ बहुत दिवस भूमिपाळा ॥१४॥चोळ रायाचा गोरक्षक ॥ कुठार प्रहारे फोडिले मस्तक ॥ बहुत व्यथा जाहली देख ॥ ते दुःख आता न वर्णवे ॥१५॥मी एकलाचि वसतो एथे ॥ कोणीच नाही मज सांगाते ॥ रहावयासी स्थळ यथार्थ ॥ तेही न मिळे जाणपा ॥१६॥तरी या पर्वतावरी देख ॥ मज ठाव देई भूमिपाळका ॥ वराह म्हणे जगन्नायका ॥ अवश्य राही एथेंचि ॥१७॥मग नगमस्तकी यथार्थ ॥ शतपाद भूमि हरिसी अर्पित ॥ तया स्थळी क्षीराब्धिजामात ॥ राहता जाहला ते काळी ॥१८॥बकुलानामे आपुली दासी ॥ सेवा करावया वेंकटेशासी ॥ देता जाहला वराहवेषी ॥ तिये प्रती बोधोनिया ॥१९॥म्हणे मी आणि वेंकटपती ॥ एकरूप दोघे निश्चिती ॥ याची सेवा परमप्रीती ॥ करीत राहे बकुले तू ॥२००॥ऐसे बोलोनि वेगेसी ॥ वराह गेला स्वस्थानासी ॥ बकुले सह वैकुंठवासी ॥ राहिला हो तेथेचि ॥२१॥बकुला परमप्रीती करून ॥ सेवा करी रात्रंदिन ॥ उत्तमान्न निर्मून ॥ भोजनालागी देतसे ॥२२॥घाय मस्तकीचे बांधोन ॥ सर्वदा करी पादसेवन ॥ जेणे संतोष नारायण ॥ तेचि करी सर्वदा ॥२३॥वराहकल्पाचे द्वितीय परार्धात ॥ अष्टाविंशति द्वापाराचा अंत ॥ वैकुंठीहूनी कमळाकांत ॥ भुतळासी पातले ॥२४॥याचि कलियुगी यथार्थ ॥ श्रीविक्रमार्काचे संवत ॥ सहस्त्रवर्षे जाहल्यावरुत ॥ प्रकट जाहला परमात्मा ॥२५॥नैमिषारण्यी सूताप्रती ॥ शौनकादिक प्रश्न करिती ॥ बकुला नाम दासी प्रती ॥ भूमिपाळे दीधली ॥२६॥परी ती बकुला कोठील कोण ॥ काय आचरली एवढे पुण्य ॥ जिणे साक्षात नारायण ॥ वश केला ऐसे परी ॥२७॥यावरी सूत बोलत ॥ कृष्णावतारी जगन्नाथ ॥ गोकुळामाजी क्रीडत ॥ नंदाघरी सर्वदा ॥२८॥नंदाराणी यशोदासती ॥ जिचा पुत्र जाहला जगत्पती ॥ पुढे मथुरेशी जाता श्रीपती ॥ शोक करी यशोदा ॥२९॥म्हणे तान्ह्या माझ्या मनमोहना ॥ टाकोनि जातोसि मजलागून ॥ मी त्यागीन आपुला प्राण ॥ वियोग तुझा न सोसवे ॥२३०॥तुजे बाळपणीचे खेळ ॥ कृष्णा म्या पाहिले सकळ ॥ परी तुझे लग्नाचे सोहळे ॥ पाहिले नाही सर्वथा ॥३१॥तू सोडूनी जासी आता ॥ पुरला नाही मनींचा अर्थ ॥ मग मातेप्रती इंदिराकांत ॥ काय बोलता जाहला ॥३२॥म्हणे कलियुगा माझारी ॥ मी प्रकट होईन पृथ्वीवरी ॥ तुझे मनोरथ ते अवसरी

॥ पूर्ण करीन जननिये ॥३३॥ऐसा वर देवोन ॥ मथुरेसी गेले नारायण ॥ तेचि हे बकुला दासी जाण ॥ कलियुगामाजी प्रकटली ॥३४॥श्रोते ऐकावे सावधचित्त ॥ पुढील अध्यायी कथा अद्भूत ॥ आकाश राजाची उत्पत्ति सत्य ॥ परम रसिक असे पै ॥३५॥या अध्यायी वैकुंठनाथ ॥ भूतळा आले यथार्थ ॥ हा अध्याय त्रिकाळ वाचिता ॥ सकळ मनोरथ पुरती पै ॥३६॥प्रीती करोनि निश्चित ॥ अखंड पहावा हा ग्रंथ ॥ न घडे तरी त्वरित ॥ हा अध्याय तरी वाचावा ॥३७॥श्रवण पठण आणि लेखन ॥ जे प्रीतीने ग्रंथ करिती रक्षण ॥ त्यांसी निजांग साउली करोन ॥ रक्षी नारायण सर्वदा ॥३८॥चिद्धनानंदा सुखदायका ॥ वीरवरदा वैकुंठनायका ॥ भक्तकामकल्पद्रुम ॥ मुरांतका ॥ न येसी तर्का कोणासी ॥३९॥इतिश्रीवेंकटेशविजयग्रंथ सुंदर ॥ संमतपुराणभविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ पंचमाऽध्यायगोडहा ॥२४० ॥ एकंदर ओवीसंख्या ॥६८९॥

## अध्याय ६ वा

*मागील अध्यायात श्रीभगवान विष्णु बकुलेसहित आनंदाने राहिले असे सांगितले. त्यानंतर श्रीविष्णूंनी अरण्यात शिकारीस जाण्याचा विचार ठरविला. इतक्यात एक उत्तम घोडा त्या ठिकाणी आला. त्या घोड्यावर बसून भगवान शिकारीस निघाले असता बकुलेने विचारले, 'आपण कोठे जाता?' तेव्हा ते म्हणाले, 'मी या वनात शिकारी करिता जातो.' अरण्यात जाऊन अनेक प्राण्यांची त्यांनी शिकार केली. त्यांना तेथे एक मदोन्मत्त हत्ती दिसला. त्याच्या मागून ते धावत जाऊ लागले. तो ते नारायणापुरापर्यंत गेले. हत्ती त्रासून भगवंतास शरण आला, तेव्हा त्यांनी त्यास सोडून दिले.*

*पुढे त्या नगराजवळ एक सुंदर बगीचा दिसला. तेथे विपुल फुले-फळे होती. त्या उद्यानात सुंदर मुली इकडे तिकडे खेळत होत्या. त्यात एक अतिशय सुंदर कन्या वेंकटेशांनी पाहिली व तिजवर ते मोहित होऊन गेले. मध्येच सूतांना ऋषींनी ' या मुली कोण? ती सुंदर मुलगी कोण?' असे विचारले असता त्यांनी त्या मुलीचा इतिहास सांगावयास सुरुवात केली-*

*पूर्वी द्वापर युगाच्या शेवटी कौरव पांडवांचे युद्ध झाल्यावर अठ्ठाविसाव्या कलियुगात हजार वर्षे गेल्यावर चंद्रवंशात सुवीर नावाचा एक राजा होऊन गेला. त्याला सुधर्म या नावाचा एक मुलगा होता आणि त्यास आकाशराव व तोंडमान या नावाचे दोन फार उत्तम पुत्र होते. हा आकाशराव म्हणजेच पूर्वीचा माधव ब्राह्मण. तो फार धार्मिक व उदार होता. त्याच्या राज्यात प्रजा फार सुखी होती; परंतु या राजाला संतती नसल्याने तो फार दुःखी होता. त्याने आपल्या गुरूंना एकदा याबद्दल विचारले तेव्हा, 'ईश्वरकृपेने सर्व काही ठीक होईल' असे सांगून राजाचे त्यांनी समाधान करण्याचा प्रयत्न केला. राजाला गुरूंनी पुत्र कामेष्टी यज्ञ करण्यास सांगितले. त्या करिता राजास सोन्याच्या नांगराने जमीन नांगरण्यास सांगितले असता राजाने सोन्याचा नांगर करवू त्याने नांगरण्यास सुरुवात केली. तेव्हा नांगराच्या दातास सोन्याचे एक कमळ लागले. सर्वांना आश्चर्य वाटून त्यांनी ते राजास दाखविले. राजा तो प्रकार पाहून अतिशय आश्चर्यचकित होऊन कमळ पाहू लागला; तो त्या कमळात एक सहा महिन्यांची अतिशय सुंदर मुलगी त्याला आढळली. राजास परानंद झाला. त्याला ईश्वरकृपेचे मोठे कौतुक वाटले.*

*इतक्यात आकाशवाणी झाली. 'राजा ही साक्षात लक्ष्मी आहे. तुझ्या पूर्वपुण्याईने तुला ही मिळाली आहे. तू हिचे उत्तम पालन कर. भगवान प्रत्यक्ष येऊन इचे पाणिग्रहण करतील.' राजा त्या मुलीस घेऊन घरी गेला व आपल्या पत्नीस सर्व हकीकत सांगून तिजकडे तिला दिले. राजाचे हे बोलणे ऐकून धरणीदेवीला अतिशय आनंद झाला. सर्व नागरिकांना आनंद झाला व त्यांनी गावात साखर वाटून आनंदोत्सव केला. कमळातून या मुलीचा जन्म झाला म्हणून त्या मुलीचे नाव राजाने पद्मावती असे ठेवले. ती अतिशय रूपवती होती. चंद्रकलेप्रमाणे वाढत असता ती लग्नास योग्य झाली. त्या मुलीच्या पायगुणाने राणीही गर्भवती झाली. राजाला अतिशय आनंद झाला. राजाने तिचे सर्व डोहाळे पुरवून सर्व सोहळे उत्तम केले. सर्वांना आनंद झाला. नऊ महिने होताच राणीला मुलगा झाला. राजाने पुण्याह*

वाचन करून जातकर्म केले व पुत्राच्या मुखाचे अवलोकन केले. तेव्हा राजाने मोठा दानधर्म केला. नागरिक सुवासिनींनी राणीची ओटी भरली. सर्वांना अतिशय आनंद झाला. पुढे काही दिवसांनंतर पद्मावती उपवर झाली. राजाला तिच्या योग्यतेचा वर कोठे मिळेना.

एक दिवस ती आपल्या मैत्रिणींबरोबर उद्यानात क्रीडा करण्यास गेली होती. तेव्हा नारदांनी वृद्ध ब्राह्मणाचा वेष घेऊन त्या अरण्यांत प्रवेश केला. तेथे मैत्रिणींच्या समुदायात त्यांनी पद्मावतीस पाहिले. नारद तिच्याजवळ गेले व म्हणाले, 'मी हस्त सामुद्रिक आहे. तुझा हात मला दाखव' मुलगी म्हणाली, 'तू कोण आहेस?' 'मी ब्राह्मण आहे.' तेव्हा ती त्यांच्याजवळ येऊन नमस्कार करून आपला डावा हात तिने त्यास दाखविला. तिच्या हातावरील स्वस्तिक चिन्ह पाहून ते म्हणाले, 'ही साक्षात लक्ष्मी असून कलियुगात हिने जन्म घेतला आहे. अशी मुलगी या पृथ्वीवर कुठेही नाही. ही भगवान विष्णूलाच योग्य आहे. नारद म्हणाले, 'तुला भगवान विष्णू पती मिळेल.' ब्राह्मणाचे बोलणे ऐकून तिला आनंद झाला. नारदांना नमस्कार करून ती घरी परत आली.

घरी आल्यावर तिने ही सर्व हकीकत कुणाला सांगितली नाही. परंतु ती कृष्णाचे ध्यान करू लागली. पुढे ती मैत्रिणींबरोबर त्या उपवनात जात असे. याप्रमाणे एकदा ती गेली असता त्याच अरण्यात श्री वेंकटेश शिकारीकरता गेला होता. त्यांना तेथे क्रीडा करणाऱ्या पुष्कळ मुली दिसल्या. व त्या मेळाव्यात पद्मावतीला पाहिले. पद्मावतीने त्यांना पाहिले. वेंकटेशाला पाहून तिला असे वाटले की, हा जर आपल्याला पति मिळेल तर आपले भाग्य फार मोठे आहे. तिने आपल्या सखीला तो कोण आहे ते विचारण्यास सांगितले. त्या वेंकटेशाला विचारू लागल्या, 'तुम्ही कोण? तुमचे आईवडील कोठे असतात. तुम्ही येथे का आलात? तुमचे नाव काय? हे आम्हाला सांगा?'

तेव्हा घोड्यावर बसलेले वेंकटेश त्या मुलीपाशी येऊन म्हणाले, 'हे सुंदरी चंद्रवंशात माझा जन्म झाला. वसुदेव हे माझे वडील. देवकी ही माझी आई. बलराम हे माझे बंधु. सुभद्रा ही बहीण. अर्जुन हा माझा मेहुणा. माझे नाव श्रीकृष्ण. मला लग्न करावयाचे आहे. म्हणून मी येथे आलो. तू कोण सांग?' तिने आपली हकीगत सांगितली-

'सोमवंशात आकाशराजा नावाचा प्रसिद्ध राजा आहे. त्याची मी मुलगी. मग वेंकटेश म्हणाले, 'तुझ्याशी मी विवाह करू इच्छितो.' पद्मावती म्हणाली, 'भिल्ला! ही हकीकत राजाच्या कानावर पडली तर फार मोठी हानी होईल. असे म्हणून त्या मुलींच्यासह ती निघून गेली. श्री वेंकटेश तिच्या मागून चालले. आपल्या मागून हा येतो आहे हे पाहून त्या मुलींनी त्याच्यावर दगड मारले. त्यांनी त्याचा घोडा पाडला. घोड्यास सोडून ते आपल्या मंदिराला येऊन चिंतातूर होऊन राहिले. सर्व आहारविहार बंद झाले. झोप नाही तेव्हा बकुला त्यांना म्हणाली, 'तुला काय झाले? तू असा दुःखी का?' त्यावेळी वेंकटेशांनी उपवनात घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. त्यावर बकुला म्हणाली, 'मला मार्ग सांगा. मी आताच जाते. मुलगी तुला द्यावी म्हणून त्याला सांगून निश्चय करून येते.'

वेंकटेशांनी तिचा पूर्व इतिहास सांगितला. 'मागील जन्मात मी राम होतो. ही सीता होती. रावणाने तिला लंकेस नेले होते. ती अग्नीजवळ गुप्त होऊन राहिली. रावणवधानंतर ती प्रगट झाली असता आता आपण माझा स्वीकार करावा

*असे तिने सांगितले असताना रामाने तिला आश्वासन दिले, 'मी एक पत्नीव्रत असल्याने या अवतारात तुझा स्वीकार करता येत नाही. तुला असा वर देतो की पुढे २८व्या कलियुगात मी वेंकटेश या नावाने पृथ्वीवर प्रगट होईन त्यावेळी तुझी इच्छा पूर्ण करता येईल.' त्यांनी आपला अवतार संपविला.*

*सीता हीच पुढे आकाशराजाची मुलगी जन्मास आली. तेव्हा बकुला म्हणाली, 'मला मार्ग सांग.' वेंकटेशांनी हास्य केले व म्हणाले, 'मी तुला घोडा देतो.' असे म्हणून एक घोडा त्या थिकाणी उत्पन्न केला. त्याच्यावर बसून ती निघाली. त्यांनी तिला मार्ग दाखविला ' त्या वाटेने जाताना तुला कपिलेश्वर मंदिर लागेल. त्या ठिकाणी कैलासपतीचे दर्शन घेऊन त्यांच्याकडे प्रार्थना कर, हे कैलासपती आपण समर्थ आहात माझी इच्छा पूर्ण करा. त्यापुढे गेल्यावर शुकाचार्यांचा आश्रम लागेल. त्यांचा आशीर्वाद घेऊन पुढे रामकृष्णांच्या मूर्ती लागतील. तिथून पुढे गेल्यावर अगस्तींचा आश्रम व नारायणपूर लागेल.*

*घोड्यावर बसून ती निघाली. वाटेतील सगळी स्थाने तिने पाहिली. अगस्तींच्या आश्रमाजवळील शिवमंदिरात ब्राह्मण रुद्राभिषेक करीत होते. ते पहाण्यास नारायणपुरातील लोक, पद्मावतीच्या मैत्रिणी आल्या होत्या. त्या दर्शन घेऊन निघाल्या असताना त्यांचे आपसातील बोलणे तिने ऐकले. त्या म्हणत होत्या की या अरण्यातील सुंदर पुरुषाच्या दर्शनाने पद्मावती दुःखी झालेली आहे. त्यांच्या सखीचे बोलणे ऐकून बकुलेने विचारले, 'ती कोण? तिला कोण पुरुष भेटला?' तिच्या सखींनी सगळी हकीकत सांगितली. या पुढील इतिहास पुढच्या अध्यायात पाहू.*

**श्रीवेंकटेशाय नमः ॥ श्रीवेंकटेशकथामनोहर ॥ हेचि कृष्णा वेणी गंगा थोर ॥ स्नान करितांचि साचार ॥ पापसंहार क्षणमात्रे ॥१॥श्रोत्यावक्त्यांची इच्छा अधिक ॥ हेचि इचे दोनी तटाक ॥ प्रेमपूर भरला सुरेख ॥ मनोरम्य वाहतसे ॥२॥भक्ति ज्ञान वैराग्य विचित्र ॥ हेचि एथे तळपती जळचर ॥ भाव माघमासी ज्ञानीनर ॥ स्नानाकारणे धावती ॥३॥या गंगेत करिता स्नान ॥ अंगी संचरे वैराग्य ज्ञान ॥ त्रिविधताप अवघे निरसून ॥ सायुज्य सदन पावती ॥४॥भावे श्रवण करिता विशेष ॥ कृपा करील श्रीवेंकटेश ॥ जो मायातीत अविनाश ॥ वैकुंठवासी जगद्गुरू ॥५॥पूर्वाध्यायी अनुसंधान ॥ वेंकटाद्रीवरी मधुसूदन ॥ बकुलेसहित रमारमण ॥ राहता जाहला जगदात्मा ॥६॥पुढे कैसे वर्तले चरित्र ॥ सावध ऐके जनक नृपवर ॥ शतानंदऋषि परम पवित्र ॥ सांगे विचित्र नवल पै ॥७॥एके दिवशी हृषीकेशी ॥ चिंतिता जाहला निजमानसी ॥ क्रीडावयालागी वनासी ॥ मृगयानिमित्त जाइजे ॥८॥अश्वावरी आरूढोन ॥ करावे काननामाजी गमन ॥ ऐसे चिंतिता जनार्दन ॥ तो अश्व तात्काळ पातला ॥९॥तो परब्रह्म मुरारी ॥ इच्छामात्रे सर्व करी ॥ मनी चिंतिता निर्धारी ॥ घोडा प्रकटला अकस्मात ॥१०॥शुभ्रवर्ण घोडा परिकर ॥ वरी जीन घातले परम सुंदर ॥ आरक्तवर्ण नेत्र ॥ अश्वोत्तमाचे दीसती ॥११॥उच्चैः श्रवा समान ॥ गति त्याची परम गहन ॥ मुखी मोहली विराजमान ॥ रत्नखचित शोभतसे ॥१२॥जैसे चांदणे शोभिवंत ॥ तैसे अंगीचे तेज दिसत॥ ऐसे पाहोनी रमानाथ ॥ उठिला तेव्हा तात्काळी ॥१३॥बकुला म्हणे जगज्जीवना ॥ कोठे जातोसि मनमोहना ॥ यावरी**

बोले जनार्दन ॥ बकुलेप्रती तेधवा ॥१४॥म्हणे वनामाजी जाऊन ॥ येतो आता मृगयाकरून ॥ नेसला तेव्हा पीतवसन ॥ कटी मेखळा विराजती ॥१५॥मस्तकी रत्नखचितमुकुट ॥ कुंडलांची शोभा सुभट ॥ सभोवती मुक्ताफळे दाट ॥ विराजमान शोभती ॥१६॥चतुर्भुज घनश्यामवर्ण ॥ कस्तूरीतिलक शोभायमान ॥ चौभुजांवरी बाहुभूषण ॥ रत्नजडित झळकती ॥१७॥गळा वैजयंती हार ॥ कौस्तुभ मणि तेजपरिकर ॥ श्यामसुंदर मुख उदार ॥ सुहास्यवदन शोभतसे ॥१८॥असो ऐसा वेंकटेश ॥ अश्वारूढ जगन्निवास ॥ मृगया करीत ह्रषीकेश ॥ काननामाजी चालिला ॥१९॥वृक व्याघ्र रीस सूकर ॥ हरिण जंबुक वानर ॥ ससे आणि जवादी मार्जार ॥ श्वापदे धावती चहूकडे ॥२०॥बहुत जीवांचा संहार ॥ करीत जात श्रीधर ॥ तो एक उन्मत्तकुंजर ॥ देखता जाहला जगदात्मा ॥२१॥त्याचे पाठीलागोन त्वरित ॥ पिटित जात रमानाथ ॥ मातंग धावता बहुत ॥ जगन्नाथ न सोडी ॥२२॥ऐसे धावत धावत ॥ नारायण पुरा समीप येत ॥ मग गज होवोनी शरणागत ॥ श्रीहरीसन्मुख जाहला ॥२३॥शुंडादंड वरुते करून ॥ विलोकी श्रीवेंकटेशाचे वदन ॥ म्हणे दीनदयाळा मजकारणे ॥ न मारावे सर्वथा ॥२४॥कृपा उपजली जगज्जीवना ॥ सोडोनि दीधला न लागता क्षण ॥ तो अकस्मात देखिले उपवन ॥ नारायणपुरा समीप ॥२५॥जाईजुई मालती परिकर ॥ शेवंती बकुल मंदार ॥ आगस्ती जपा करवीर ॥ सुमनभारे शोभती ॥२६॥मध्यभागी दिव्यसरोवर ॥ माजी भरले असे नीर ॥ त्यात विकसली कल्हारे ॥ तीरी मराळ खेळती ॥२७॥ऐशा सुंदरवनात ॥ विलोकी कमळोद्भवाचा तात ॥ सुंदरकुमारी असंख्यात ॥ चहूंकडे पसरल्या ॥२८॥शौनकादिक मुनिजन ॥ सूताप्रती करिती प्रशन ॥ तू चिदाकाशींचा रोहिणीरमण ॥ करी तृप्ति श्रवण चकोरा ॥२९॥वेंकटेश उपवनात ॥ कन्या देखिल्या अकस्मात ॥ त्या कोठील कोण समस्त ॥ कायनिमित्त पातल्या ॥३०॥ही कथा सविस्तर ॥ सांग आम्हांसी मनोहर ॥ यावरी सुत वक्ता चतुर ॥ बोलता झाला आनंदे ॥३१॥म्हणे ऐका आता एकचित्ती ॥ पुर्वी द्वापाराचे अंती ॥ पांडवकौरवांची युद्धनिश्चित्ती ॥ संपल्यावरी जाण पा ॥३२॥निजधामा गेलिया पंडुसुत ॥ अठ्ठावीसावे कलियुगात ॥ विक्रमादिक नृपसमस्त ॥ स्वर्गाप्रती गेलियावरी ॥३३॥सहस्त्रवर्षे क्रमलियावर ॥ चंद्रवंशी एक नृपवर ॥ परमधार्मिक पवित्र ॥ सुवीर नामा होता पै ॥३४॥त्याचा पुत्र नामे सुधर्म ॥ जाहला जाण नृपसत्तम ॥ त्यापासोनी उत्तम ॥ पुत्र दोघे जन्मले ॥३५॥आकाशराव वडील जाण ॥ दुसरा पुत्र तोंडमान ॥ सोमवंशी दोघे जण ॥ कुलदीपक उपजले ॥३६॥पूर्वीचा जो माधव ब्राह्मण ॥ चतुर्थाध्यायी वर्णिले संपूर्ण ॥ तोचि आकाश राजा होवोन ॥ जन्मला हो निर्धारी ॥३७॥परम धार्मिक भक्त थोर ॥ नारायणभक्तीसी तत्पर ॥ दानशूर आणि उदार ॥ कृपावंत सर्वांवरी ॥३८॥तोंडदेशींचा अधिपती ॥ राज्य चालवी बहुत नीती ॥ दुःख अणुमात्र कोणाप्रती ॥ नाही निश्चित्ती लोकांते ॥३९॥गायी दुहती त्रिकाळ ॥ वृक्ष विराजती सदा फळ ॥ चहूवर्ण प्रजा सकळ ॥ स्वधर्माचारे वर्तती ॥४०॥असो तो नृपवर ॥ सकळसंपत्तीचा सागर ॥ परी पोटी नाही पुत्र ॥ तेणे उद्विग्न सर्वदा ॥४१॥पुत्राविणे

शून्यसदने ॥ की नासिकेवांचोनी वदन ॥ की बुबुळेविण नयन ॥ शोभा नयेचि सर्वथा ॥४२॥की जीवनेविण सरिता ॥ की फळेविण वृक्ष वृथा ॥ की पतिविणे पतिव्रता ॥ न शोभेचि ज्यापरी ॥४३॥तैसे पुत्राविणे साचार ॥ कदापि नव्हे वंश पवित्र ॥ रात्रंदिवस आकाशनृपवर ॥ संततीकारणे दुश्चित्त ॥४४॥आपुल्या गुरूशी पाचारोन ॥ बोलता झाला उदास वचन ॥ म्हणे न देखता पुत्रवदन ॥ व्यर्थ काय संसारी ॥४५॥मी हतभागी होय निश्चय ॥ मज कैशी पुत्रप्राप्ति होय ॥ धनधान्य पशु संपत्ति पाहे ॥ करावे काय मज आता ॥४६॥राया हा तुझा पुत्र ॥ ऐसे कोणी न बोलती निर्धार ॥ पुत्राचा रुदन शब्दसाचार ॥ म्या कर्णी नाहीच आकर्णिला ॥४७॥नानापरीचे आभरण ॥ म्या न केले पुत्राकारण ॥ एवढी संपत्ति घेऊन ॥ काय करावी व्यर्थची ॥४८॥ऐसा राव चिंताग्रस्त ॥ दुजे काही नाठवे मनात ॥ मग गुरु तयाप्रती बोलत ॥ ऐक राया सादर ॥४९॥प्राक्तन भोग दारुण ॥ ते कदा न सुटे भोगिल्याविण ॥ परी काही तरी करावा यत्न ॥ पुत्र उत्पत्तीकारणे ॥५०॥जरी हरि होईल कृपावंत ॥ तरी अघटित तेचि घडे निश्चित ॥ यालागी तू शोक न करी बहुत ॥ ऐक मात नृपश्रेष्ठा ॥५१॥ऐकोनि गुरूचे वचन ॥ राजा धावोनि धरी चरण ॥ म्हणे तू सांगसी ते करीन ॥ बोल यथार्थ गुरुवर्या ॥५२॥काळमृत्यु भयदारुण ॥ त्यापासूनि रक्षिता श्रीगुरुपूर्ण ॥ तुझे वचन मज प्रमाण ॥ आज्ञा करी शीघ्र आता ॥५३॥गुरु म्हणे हरिप्रीत्यर्थ पुत्रकामेष्टि करावी सत्य ॥ उत्तम पुत्र प्राप्त ॥ होईल सत्य राजेंद्रा ॥५४॥राव म्हणे करितो अवश्य ॥ तूचि आचार्यत्व करी वेगेस ॥ काय जे लागेल यज्ञास ॥ सिद्ध करीन स्वामिया ॥५५॥गुरु म्हणे आधी ॥ केली पाहिजे भूमिशुद्धि ॥ तू न करिता अवधी ॥ नांगर करवी सुवर्णाचा ॥५६॥भूमि आधी नांगरून ॥ शुद्ध करावी परिपूर्ण ॥ मग त्यावरि मंडप रचून ॥ कुंड वेदिका करावी ॥५७॥आधी एवढा करी उद्योग ॥ मग मी येतो सवेग ॥ यथाशास्त्र करवीन सांग ॥ चिंता काही न करावी ॥५८॥ऐशी आज्ञा देऊन ॥ गुरु पवला अंतर्धान ॥ रावप्रधानाशी आज्ञापोन ॥ सुवर्ण हल करविला ॥५९॥सुमुहूर्ते करोनि सत्वर ॥ राजा जुंपविला नांगर ॥ भूशोधना लागी निर्धार ॥ आरंभ केला तेधवा ॥६०॥नांगरदाती अकस्मात ॥ हेमपद्म लागले तेथ ॥ सेवक रायासी सांगत ॥ नवल अद्   भुत जाहले हो ॥६१॥भूमि नांगरता नृपाळ ॥ निघाले असे सुवर्णकमळ ॥ आश्चर्य पहावया तात्काळ ॥ जवळी नृपवर पातला ॥६२॥तो सुवर्णकमळ शोभायमान ॥ कमळगर्भी देखिले कन्यारत्न ॥ रूप पाहता परमलावण्य ॥ राव अंतरी वेधला ॥६३॥षण्मासांची कुमारी ॥ असंभाव्य तेज पडले अंबरी ॥ जिचिया स्वरूपाची सरी ॥ ब्रह्मांडोदरामाजी नसेची ॥६४॥कोट्यानकोटी मीनकेतन ॥ वोवाळावे पदनखांवरून ॥ पद्मनेत्री सुहास्यवदन ॥ आकर्णनयन सुकुमार ॥६५॥राव हर्षला अंतरी ॥ म्हणे माझ्या भाग्यासि नाही सरी ॥ सायास न करीता निर्धारी ॥ कन्यारत्न मिळाले ॥६६॥पुत्र किंवा कन्या निश्चित्ती ॥ दोन्ही नव्हती मजप्रती ॥ मजवरी तुष्टला रमापती ॥ कन्या सुंदर दीधली ॥६७॥ऐसे बोलोनि नृपनाथ ॥ कन्या उचलिली अकस्मात ॥ तो आकाशवाणी बोलत ॥ राजा ऐकत सावध ॥६८॥म्हणे हे राजेंद्रा अवधारी ॥ हे साक्षात वैकुंठपतीची

अंतुरी ॥ अवतरली जाण पृथ्वीवरी ॥ तुज सापडली पूर्वभाग्ये ॥६९॥आता करी इचे पाळण ॥ थोर होईल हे कन्यारत्न ॥ साक्षात वेंकटेश येऊन ॥ अंगीकार करीय इयेचा ॥७०॥ऐसे ऐकता राजेंद्र ॥ उचंबळला आनंदसमुद्र ॥ त्या सुखाचा पार ॥ कोणाचेनि न करवे ॥७१॥रायाचे आनंदगहन ॥ जैसे निर्धनासी सापडले धन ॥ की जन्मांधासी नयन ॥ अकस्मात पातले ॥७२॥तैसा हर्षसागर ॥ उचंबळला आकाश नृपवर ॥ कन्या घेऊनानि सत्वर ॥ मंदिराप्रति पातला ॥७३॥कांतेपाशी येऊन ॥ राजा बोले प्रसन्नवदन ॥ म्हणे हरिपूर्ण जाहला असे ॥७४॥हे घेई कन्यारत्न ॥ करी इचे प्रतिपालन ॥ हे अयोनि संभव जाण ॥ साक्षात इंदिरा अवतरली ॥७५॥ऐसे ऐकता वचनोक्ती ॥ धरणीदेवी हर्षला चित्ती ॥ आनंदाश्रु नयनी दाटती ॥ रोमांच अंगी उभारले ॥७६॥मरत्यामुखी त्वरित ॥ येऊनि पडले अमृत ॥ की रोगियासी अकस्मात ॥ रसायन सापडले ॥७७॥ऐशी धरणी आनंद भरित ॥ नगरजन जाहले हर्षयुक्त ॥ शर्करा वाटिती नगरात ॥ उत्साह करिती बहुतची ॥७८॥नामकरण करोन ॥ पद्मसंभव कन्ये लागून व पद्मावती नामाभिधान ॥ राये ठेविले ते काळी ॥७९॥जैसा शुद्ध द्वितीयेचा चंद्र ॥ तैशी दिवसे दिवस जाहली थोर ॥ जिचा पाहता वदनचंद्र ॥ उपमा नाहीच द्यावया ॥८०॥मागे बहुत कविजन स्त्रिया वर्णिल्या सुलक्षण ॥ परी पद्मावतीच्या नखांवरून ॥ वोवाळोनि टाकाव्या ॥८१॥नगारिशित्रूची जाया ॥ की दशकद्वय नेत्राची भार्या ॥ तारकारिजनकशत्रुप्रिया ॥ उपमेसी वाटती हळुवट ॥८२॥की नैषधराणी दमयंती ॥ की चित्रांगदाची सीमंतिनी सती ॥ बहुत वर्णिल्या युवते ॥ उपमेसी न शोभती इयेच्या ॥८३॥तप्तहाटक जैसे सुरंग ॥ तैसे विराजे दिव्यअंग ॥ लाजोनि जाय अनंग ॥ स्वरूप तिचे पाहोनिया ॥८४॥चंद्राचे ठायी वसे कलंक ॥ त्याहूनि विशेष कमळमुख ॥ गमनगती पाहता करिनायक ॥ लाजोनि गेला निर्धारी ॥८५॥वेणीची आकृती पाहोन ॥ विवरी दडाला भुजंग जाऊन ॥ कटी पाहता हरि लाजोन ॥ वाहन जाहला दुर्गेचे ॥८६॥आकर्णनेत्र सुरेख ॥ शुक भुलती पाहता नासिक ॥ दाडिंबी बीजासि देख ॥ दंत जिचे लाजविती ॥८७॥क्षणेक चाले हंसगती ॥ देखोनि शंकला रतिपती ॥ आरक्त ओष्ठ विराजती ॥ उपमा नाहीच द्यावया ॥८८॥पदमुद्रा जेथे उमटती ॥ तेथे दिव्य कमळे उगवती ॥ अंगीच्या मकरंदासि भुलोनि येती ॥ भ्रमरपंक्ति प्रीतीने ॥८९॥हास्यकरितांचि सहज ॥ झळके दंतपंक्तीचे तेज ॥ हिरिया ऐसे दिसती मर्गज ॥ प्रकाश पडताचि निर्धारी ॥९०॥असो ऐसे ती चित्कळा ॥ अवतरली साक्षातकमळा ॥ वाढता वाढता वेल्हाळा ॥ उपवर जाहली तेधवा ॥९१॥असो त्या कन्येचे गुण ॥ राजपत्नी जाहली गर्भिण ॥ गर्भचिन्हे दिसती पूर्ण ॥ राजा मनी आनंदला ॥९२॥अष्टमासपर्यंत आगळा ॥ आठांगुळादि केला सोहळा ॥ भूदेवगण सुखी केला ॥ द्रव्य अपार वाटोनिया ॥९३॥नवमास भरतांचि ते वेळी ॥ उत्तमलग्न उत्तम काळी ॥ राजपत्नी प्रसूत जाहली ॥ पुत्र जाहला तियेते ॥९४॥रायासि कळता वृत्तांत ॥ धावला वेगे विप्रांसहित ॥ पुण्याहवाचन करोनी त्वरित ॥ पुत्रमुख पाहिले ॥९५॥जातकर्मादि वर्तोन ॥ नाम ठेविले वसुदान ॥ गोभूहिरण्यदान ॥ विप्रांलागी दीधले ॥९६॥भांडार फोडोनि नृपवरे

॥ सुखी केले धरामर ॥ नगरनारी येऊनि समग्र ॥ वोटी भरिती धरणीची ॥९७॥जैसा शुक्लपक्षी मृगांक ॥ तैसा वाढतसे बाळक ॥ रायास वाटले बहुतसुख ॥ कन्यापुत्र पाहोनिया ॥९८॥उपजली तेव्हा पद्मावती ॥ नगरात नाही दरिद्राची वस्ती ॥ लोक सर्व सुखे वर्तती ॥ धेनुदुहती त्रिकाळी ॥९९॥असो उपवर जाहली राजबाळी ॥ रायासि मनी चिंता उपजली ॥ म्हणे इच्या योग्य वर ये वेळी ॥ कोठे मिळेल न कळे ते ॥१००॥एके दिवशी ती वेल्हाळा ॥ सवे घेवोनि सखियांचा मेळा ॥ उपवनामाजी राजबाळा ॥ क्रीडत होती तेधवा ॥१॥तो नारदमुनि ते वेळा ॥ वृद्धब्राह्मणाचा वेष धरिला ॥ उपवनामाजी प्रवेशला ॥ देखिला मेळा कन्यांचा ॥२॥त्यामाजी ती कमळनयनी ॥ पद्मावती देखिली नयनी ॥ जैसी मेघमंडळी सौदामिनी ॥ झळके तैसी चालता ॥३॥मृगमदाहूनि विशेष ॥ सुटला अंगीचा सुवास ॥ नारद पाहोनि तियेस ॥ जवळी पातला साक्षेप ॥४॥म्हणे शृंगार सरोवरमराळी ॥ चातुर्यगंगे आकाशबाळी ॥ तुझे हस्त पाहीन ये वेळी ॥ दाखवी मज आताची ॥५॥सामुद्रिक चिन्ह पाहोन ॥ सांगेन आता तुझे लक्षण ॥ कन्या म्हणे तुज लागून ॥ हस्त का सया दाखवावे ॥६॥तू आहेसि कोणाचा कोण ॥ हस्त पहावया काय कारण ॥ तो म्हणे मी ब्राह्मण ॥ पाहीन हस्त माते तुझे ॥७॥मग समीप येऊनि राजबाळी ॥ ब्राह्मणाचे चरण वंदिली ॥ वामहस्त तये वेळी ॥ दाविती झाली द्विजासी ॥८॥नारदे पाहिला हस्त ॥ तो स्वस्तिक चिन्ह मंडित ॥ म्हणे इंदिरा होय साक्षात ॥ कलियुगामाजी अवतरली ॥९॥ऐसी सुलक्षण नारी ॥ नाही कोठे पृथ्वीवरी ॥ वैकुंठपतीची अंतुरे ॥ होय निर्धारी हे साच ॥१०॥नारद म्हणे कुमारी ॥ तुज नवरा मिळेल श्रीहरी ॥ जो क्षीरसागरविहारी ॥ भक्तकैवारी जगदात्मा ॥१॥ब्राह्मणाचे वचन ऐकोनी ॥ पद्मावती आनंदली मनी ॥ नारदाचे चरण वंदोने ॥ जाती जाहली सदनाप्रती ॥१२॥कोणासि न सांगे मात ॥ मनामाजी ऐसी चिंतित ॥ श्रीवेंकटेशाचे चरण प्राप्त ॥ कधी होतील मजलागी ॥१३॥असो सखिया सहित वरानना ॥ क्रीडावयालागी उपवना ॥ नित्य करितसे गमना ॥ परमानंदे करोनिया ॥१४॥एके दिनी उपवनात ॥ पद्मावती सखियांसहित ॥ क्रीडावयासि हर्षयुक्त ॥ तया वनासी पातली ॥१५॥एक कमळे तोडिती ॥ एक पुष्पकळी काढिती ॥ नानाविनोदे क्रीडा करिती ॥ गीत गाती स्वानंदे ॥१६॥सिंहावलोकने करून ॥ ऐका मागील अनुसंधान ॥ वेंकटेश मृगयेलागून ॥ त्याचि वनासी पातला ॥१७॥उपवनी पाहे जगन्नाथ ॥ तो कन्या मिळाल्या असंख्यात॥ ठायी ठायी पुष्पे तोडित ॥ क्रीडताती स्वानंदे ॥१८॥तया कामिनीचक्रात ॥ मध्यमंडळी विलोकित ॥ तो जैसी विद्युल्लता तळपत ॥ तैसी देखिली पद्मावती ॥१९॥पाहता तिचे स्वरूपासी ॥ वाटती रंभा उर्वशी दासी ॥ पृथ्वीवरी तियेसी ॥ उपमा द्यावया असेना ॥१२०॥मुखी निघती सुगंधवास ॥ अंगीच अजो निघे सुवास ॥ भेदुनिया महदाकाश ॥ जात विशेष लवलाहे ॥२१॥पाहोनि तिच्या वदनेंदूस ॥ तन्मय जाहला वेंकटेश ॥ नेत्र चकोर वेधले निःशेष ॥ रूप विशेष देखोनिया ॥२२॥पद्मावती ही अकस्मात ॥ देखती जाहली हरिमुखाते ॥ श्यामसुंदर दैदीप्यवंत ॥ मदनमनोहर साजिरा ॥२३॥कोटिकाम

ओवाळून ॥ टाकावे श्रीमुखावरून ॥ पद्मावतीचे वेधले मन ॥ जगद्भूषण पाहताचि ॥२४॥मनी विचारी सुंदर ॥ म्हणे कोठील मदन मनोहर ॥ हा जरी होईल माझा वर ॥ भाग्याशी पार नाही मग ॥२५॥तनूराजस सुकुमार ॥ वनी धावता श्रमला फार ॥ मनामाजी वाटेसाचार ॥ की धावोनि यासि आलिंगावे ॥२६॥मी तो लज्जावेष्टित कामिण ॥ हा पुरुष न कळे आहे कोण ॥ मग सखियांप्रती दावी खूण ॥ म्हणे आहे कोण विचारा ॥२७॥कोटिकामसदृश सुंदर ॥ दिसतो बरवा मनोहर ॥ सखे ऐसा जोडला जरी वर ॥ सुखासि पार नाही माझ्या ॥२८॥मग सखया पुढे येउन ॥ पुसती वेंकटेशा लागून ॥ म्हणती तुम्ही कोठील कोण ॥ काय निमित्त पातला ॥२९॥तुमचे जनकजननी कोण ॥ तुम्ही राहता कवणे स्थान ॥ सांगा तुमची नामखूण ॥ आम्हा लागी सर्वही ॥३०॥ऐसे ऐकता वचनासी ॥ अश्वारूढ हृषीकेशी ॥ येता झाला राजकन्येपाशी ॥ वर्तमान तिशी सांगतसे ॥३१॥म्हणे कमलाक्षी परियेसी ॥ जन्म माझा सोमवंशी ॥ वसुदेव पिता आम्हासी ॥ देवकी माता निर्धारी ॥३२॥बलभद्र आमुचा बंधुपूर्ण ॥ सुभद्रा भगिनी होय जाण ॥ शालंक आमुचा अर्जुन ॥ पांडव बांधव आमुचे ॥३३॥नाम माझे श्रीकृष्ण ॥ कन्यार्थी पातले एथे जाण ॥ तुझे आता वर्तमान ॥ सांग सर्व वरानने ॥३४॥ती म्हणे सोमवंशात ॥ आकाशराजा जाण विख्यात ॥ त्याची कन्या मी निश्चित्त ॥ पद्मावती नाम माझे ॥३५॥मग बोले श्रीधर ॥ मी कन्यार्थी आहे साचार ॥ तुझे स्वरूप पाहता मनोहर ॥ मन मृग माझे वेधले ॥३६॥तू नयनकटाक्ष जाळे पसरून ॥ बांधिला माझा मानस मीन ॥ तव वदनारविंद देखोन ॥ मम नयन मिलिंद झेपावती ॥३७॥तुझा सौंदर्यइंदु देखोन ॥ मनसिंधु उचंबळला पूर्ण ॥ आता तूवरी मजलागून ॥ मनोरथ पूर्ण करी पै ॥३८॥ऐकताचि ऐसी गोष्टी ॥ येरी केली सक्रोधदृष्टी ॥ सम्मुख राहे उठाउठी ॥ परती जाय वेगेसी ॥३९॥हरी म्हणे जळी गुंतला मीन ॥ तो परत जाईल कोठून ॥ तुझे रूपी जडले मन ॥ ते न सरे माघारे ॥१४०॥पद्मावती म्हणे ही वाणी ॥ जरी पडेल रायाचे कानी ॥ तरी होईल तुझी प्राणहानी ॥ किरातवेषिया जाणपा ॥४१॥हरि म्हणे कार्य साधिल्याविण ॥ कदापि येउ नये मरण ॥ मनोरथ पुरलियावरी जाण ॥ मग ते मरण येता बरे ॥४२॥क्षुधार्थी आलिया समयासी ॥ सज्ञानी न दवडिती तयासी ॥ तैसा मी सकाम आलो तुजपाशी ॥ वरी वेगेसि वरानने ॥४३॥ऐसे ऐकता उत्तर ॥ पद्मावती कोपली फार ॥ कन्याचक्रासहित सत्वर ॥ निघाली वेगे करोनिया ॥४४॥जाता देखोन तियेसी ॥ वेंकटेश चालिला पाठीसी ॥ मग पाषाणप्रहारे श्रीहरीसी ॥ ताडिल्या जाहल्या कन्या त्या ॥४५॥जैसा पर्जन्यवर्षे निर्धारी ॥ तैसे पाषाण येती श्रीहरीवरी ॥ अश्व पडिला पाषाणप्रहारी ॥ कन्या गेल्या निघोनिया ॥४६॥मुक्तकेशी जनार्दन ॥ भ्रमित होवोनिया मन ॥ अश्व तेथे त्यागोन ॥ उत्तरपंथे चालिला ॥४७॥स्वस्थनी येऊनि श्रीहरी ॥ शयन करी मंचकावरी ॥ परम चिंताक्रांत अंतरी ॥ सतीचा वेध लागला ॥४८॥निद्रा नाही किंचित ॥ शोकाकुलित जगन्नाथ ॥ स्फुंदस्फूंदोनी रडत ॥ तव बकुला काय बोलतसे ॥४९॥म्हणे श्रीनिवासा वैकुंठपती ॥ काय दुःख आठवले चित्ती ॥ किमर्थ करितोसी खंती ॥ सांग मज प्रती जनार्दना

॥१५०॥हरि बोले उत्तर ॥ म्हणे माते ऐक समाचार ॥ मृगयामिषे वनांतर ॥ हिंडत असता अकस्मात ॥५१॥नारायणपुराजवळी यथार्थ ॥ उपवन पाहिले शोभिवंत ॥ तेथे स्त्रियांचा मेळा देखिला सत्य ॥ कुसुमे न्यावया पातल्या ॥५२॥तयामाजी एक कामिनी ॥ जैसा उडुगणांमाजी निशामणि ॥ जीचिया स्वरुपावरोनी ॥ मीनकेतन ओवाळिजे ॥५३॥पाहता जिच्या स्वरूपाशी ॥ वाटती रंभा उर्वशी दासी ॥ माझे चित्त तिये पाशी ॥ गुंतले जाण जननिये ॥५४॥म्या पुसिले तियेते ॥ कोण कोठील वार्ता समस्त ॥ तिणे कथिली आकाश नृपनाथ ॥ सोमवंशी जन्मला ॥५५॥त्याची कन्या होय निश्चित्ती ॥ नाम माझे पद्मावती ॥ मग म्या विनविले बहुत रीती ॥ परी वश नव्हे सर्वथा ॥५६॥मज नावडे भोजन शयन ॥ प्रियेलागी गुंतले मन ॥ ती जरी न मिळे मज लागून ॥ तरी प्राणत्याग करीन मी ॥५७॥बकुला म्हणे नारायणा ॥ क्षीराब्धिवासा जगज्जीवना ॥ मार्ग सांगावा मज लागून ॥ करीते गमन आताची ॥५८॥कन्या तुज द्यावी म्हणोन ॥ येईन आता निश्चय करून ॥ ऐसे ऐकता मधुसूदन ॥ काय बोलता जाहला ॥५९॥बकुले तू जाय सत्वर ॥ तूचि माझी देवकी सुंदर ॥ उद्धव अक्रूर रेवतीवर ॥ खगेश्वर तूचि ॥१६०॥तूचि सर्व माझे आप्त ॥ आता तु जाई यथार्थ ॥ बकुले प्रती जगन्नाथ ॥ प्रार्थितसे यापरी ॥६१॥जरी माझे पूर्वसुकृत ॥ असेल काही बळिवंत ॥ तरी कन्या होईल प्राप्त ॥ मजलागी बकुले ती ॥६२॥बकुला म्हणे जगज्जीवना ॥ कन्या ती कोणाची कोण ॥ पूर्वी काय आचराली पुण्य ॥ तू नारायण भाळलासी ॥६३॥तुझीच ती मूळप्रकृती ॥ तरीच तुज आवडे श्रीपती ॥ पूर्ववृत्तांत मजप्रती ॥ सांग निश्चिती श्रीहरी ॥६४॥वेंकटेश बोले हासोन ॥ म्हणे बकुले ऐक सावधान ॥ पूर्वी त्रेतायुगामाजी जाण ॥ श्रीरामरूप जाहलो मी ॥६५॥तेव्हा पितृवचनाचे मिसे ॥ मी गेलो काननास ॥ पंचवटीस केला वास ॥ सीता सौमित्रा समवेत ॥६६॥तेथे येऊनी रावण ॥ जानकीसी हरू पाहे दुर्जन ॥ मग अग्नी जानकीस घेऊन ॥ पाताळासि पै गेला ॥६७॥रावणही वेगे करून ॥ प्रवेशला पाताळभुवन ॥ जानकी गुप्त होऊन॥ अग्नीमाजी राहिली ॥६८॥वेदवती नामे कन्यारत्न ॥ अग्नीने तिसी बोलावोन ॥ जैसे जानकीचे रूप सगुण ॥ तैसीच केली तियेसी ॥६९॥हेचि जानकी म्हणोन ॥ रावणे नेली उचलोन ॥ लंकेमाजी नेऊन ॥ अशोकवनी ठेविली ॥७०॥श्रीराम जाऊनि लंकेप्रती ॥ रावणासि वधिले निश्चिती ॥ मग जगदात्मा अयोध्यापती ॥ सीतेलागी आणवी ॥७१॥लोकापवाद आला जाणोन ॥ दिव्य दिधले जानकीने ॥ तो अग्नीमाजी रूप दोन ॥ राघवेंद्रे देखिले ॥७२॥आश्चर्य करोनी रघुपती ॥ पुसता जाहला जानकीप्रती ॥ तुझीच रूपे दोनी दिसती ॥ काय निमित्त सांगपा ॥७३॥जनकजा म्हणे प्राणेश्वरा ॥ पुराणपुरुषा जगदुद्धारा ॥ भक्तवत्सला करुणासमुद्रा ॥ वर्तमान ऐकाते ॥७४॥पंचवटीसी असता रघुनंदन ॥ मज न्यावया आला दशानन ॥ तेव्हा अग्नीने साह्य करोन ॥ नेता जाहला पाताळा ॥७५॥तेथेचि आला असुर ॥ वेदवती नामे कन्या सुंदर ॥ स्वधादेवी पाशी साचार ॥ होती जाण श्रीरामा ॥७६॥मग इने माझे प्रतिबिंबरूप ॥ धरोनि बैसली साक्षेप ॥ मीचि मानोनी लंकाधिप ॥ घेवोनि गेला इयेते ॥७७॥मी

अग्नीत होते गुप्त ॥ लंकेसी गेले नाही निश्चित ॥ मजकारणे कष्ट बहुत ॥ षण्मासावरी भोगिले इने ॥७८॥आता दिव्याचे मिसे करोन ॥ दोघी प्रकटलो अग्नीतून ॥ तुझी आशा मनी धरून ॥ आली असे श्रीरामा ॥७९॥माझीच प्रतिमा ही निर्धारी ॥ सर्वोत्तमा इचा अंगीकार करी ॥ कष्टाचे सार्थक झडकरी ॥ करी आता राघवेशा ॥१८०॥ऐसे ऐकता रविकुळभूषण ॥ कमळदळाक्ष राजीवनयन ॥ जनकजेप्रती सुहास्यवदन ॥ काय बोलता जाहला ॥८१॥म्हणे प्राणप्रिये अवधारी ॥ शृंगारसरोवर विहारी ॥ तू बोललीस निर्धारी ॥ परी या अवतारी न घडे ते ॥८२॥मी एकपत्नीव्रती वीर ॥ प्रिये तुजठाऊक समाचार ॥ आता इचा अंगीकार ॥ करिता नये सर्वथा ॥८३॥तरी हाचि वर देतो इयेते ॥ पुढे अष्टाविंशति कलियुगात ॥ वेंकटेश नामे त्वरित ॥ प्रकट होईन पृथ्वीवरी ॥८४॥तेव्हा इचा मनोभाव ॥ प्रिये पूर्ण होईल सर्व ॥ ऐसे बोलोनि राघव ॥ अवतार अपुला संपविला ॥८५॥तेचि हे पद्मसंभव ॥ पद्मावती नामे अभिनव ॥ सोमवंशी आकाशराव ॥ कन्या त्याची जाणही ॥८६॥ऐसे हे पूर्व वर्तमान ॥ तिये पाशी गुंतले माझे मन ॥ यालागी नारायणपुरालागून ॥ जाई आता जननिये ॥८७॥बकुला म्हणेवेंकटेशा ॥ भक्तवत्सला क्षीराब्धिवासा ॥ तुझी लीला जगदीशा ॥ ब्रह्मादिकांसी न कळेची ॥८८॥नारायणापुरलागून ॥ मी जाते आता त्वरे करून ॥ राजस्त्रियेसि शिष्टाई करोन ॥ कार्य साधन करिते हे ॥८९॥तरी मज जावयालागून ॥ मार्ग सांग त्वरे करून ॥ श्रीवेंकटेश सुहास्यवदन ॥ काय बोलता जाहला ॥१९०॥इच्छामात्रे श्रीहरी ॥ अश्व एक निर्मिला झडकरी ॥ बकुलेसि दिधला ते अवसरी ॥ बैसावया कारणे ॥९१॥त्या अश्वावरी आरुढोन ॥ बकुला निघाली तेथून ॥ वेंकटेश म्हणे याचि पंथे करून ॥ जाई आता झडकरी ॥९२॥या पर्वत कड्यातून ॥ गमन करावे पुढे जाण ॥ कपिलेश्वर देवदयाघन ॥ तीर्थ तेथे विराजितसे ॥९३॥त्यातीर्थी करोनिया स्नान ॥ घेई कपिलेश्वराचे दर्शन ॥ कैलासपति भगवान ॥ प्रार्थना करी तयाची ॥९४॥जयजय शंकरा भाळनयना ॥ जगद्वंद्या कैलासराणा ॥ भक्तवत्सला उमारमणा ॥ दीनोद्धारा जगदगुरू ॥९५॥जयविरूपाक्षा त्रिपंचनयना ॥ कर्माध्यक्षा शुद्धचैतन्या ॥ नमो भवपाशनिकृंतना ॥ गजास्यजनका मन्मथारी ॥९६॥तू सर्वात्मा साक्षात ॥ मी जातसे वेंकटेशानिमित्त ॥ कार्यसिद्ध करी तू समर्थ ॥ ऐसे प्रार्थी तयाते ॥९७॥मग पुढे जाई सप्रेम ॥ लागेल शुकाचा आश्रम ॥ त्याचे चरणी मनोधर्म ॥ प्रणिपातकरावे निर्धारी ॥९८॥आशीर्वचने संपादून ॥ पुढे करावे प्रयाण ॥ पद्मतीर्थ वसे जाण ॥ तयापाशी जाईजे ॥९९॥तेथे वसती रामकृष्णमूर्ती ॥ मनी धरोनि स्वकार्याची आर्ती ॥ भक्तियुक्त तयांप्रती ॥ नमनकरी जननिये ॥२००॥त्यातीर्थी करोनि स्नान ॥ तेथील कल्हार घेऊन ॥ पूजोनि रामकृष्णालागून ॥ प्रार्थना करी माते तू ॥१॥श्रीनिवासाचे कार्य ॥ सिद्धकरा तुम्ही निश्चय ॥ ऐसे प्रार्थून लवलाहे ॥ सत्वर पुढे जाइजे ॥२॥त्यावरी सुवर्णमुखरीप्रती ॥ अगस्ति आश्रम वसे निश्चिती ॥ नारायणपुरासि याचिपंथी ॥ जाई वेगी वरानने ॥३॥श्रीनिवासाची आज्ञा घेऊन ॥ बकुला निघाली तेथून ॥ अश्वावरी आरूढोन ॥ जाती जाहली तात्काळी ॥४॥वेंकटेश कथिले यथार्थ ॥

बकुला गेली तैसेचि करित ॥ सुवर्णमुखरी शोभिवंत ॥ अगस्तिआश्रम पाहिला ॥५॥तेथे शिवालय देखिले उत्तम ॥ आत द्विज दाटले सप्रेम ॥ रुद्रघोष करिती नेम ॥ सदाशिवासी प्रीतीने ॥६॥ते पहावया लागी देख ॥ पातले नारायणपुरीचे लोक पद्मावतीच्या सख्या बहुतेक ॥ कन्या तेथे पातल्या ॥७॥त्याही घेवोनि शिवदर्शन ॥ माघाऱ्या जाती त्वरेकरून ॥ एकमेकांसि बोलती वचन ॥ बकुला कर्णी आकर्णितसे ॥८॥म्हणती आम्ही पद्मावतीसहित ॥ क्रीडार्थ गेलो वनात ॥ तेथे सुंदरपुरुष अकस्मात ॥ अश्वारूढ पातला ॥९॥त्याचे रूप पाहता सुंदर ॥ पद्मावतीस दाटला विरहज्वर ॥ ऐसे कन्येचे बोलपरिकर ॥ ऐकोनि बकुला बोलतसे ॥२१०॥म्हणे कन्याहो ऐकावचन ॥ पद्मावती कोठील कोण ॥ वनी पुरुषभेटला कोणालागून ॥ विरह कोणासी दाटला ॥११॥हे आद्यंतवर्तमान ॥ सख्याहो सांगा मजलागून ॥ मग बकुले प्रती कथन ॥ कन्या सर्वही करिताती ॥१२॥ते कथा गोड बहुत ॥ पुढील अध्यायी ऐका सावचित्त ॥ जे ऐकता यथार्थ ॥ कलिकल्मष नासती ॥१३॥श्रीमद्वेंकटाचलनिवासा ॥ चिद्घनानंदा आदिपुरुषा ॥ तुझे चरित्र जगदीशा ॥ तूचि बोलवी रसाळ ॥१४॥मी कर्ता हा अभिमान ॥ नाहीच सर्वथा मुळीहून ॥ थोरथोरांसी न कळे महिमान ॥ माझा पाड काय तेथे ॥१५॥मी मतिमंदकिंकर ॥ माझेनि न तरवे गुणसागर ॥ परी आत्मसार्थकालागी निर्धार ॥ तवगुणी लीन जाहलो ॥१६॥तू कृपाकरशील यथार्थ ॥ तरी सिद्धी पावेल हा ग्रंथ ॥ सज्जनरंजना स्वामी समर्था ॥ सांभाळी ब्रीद आपुले ॥१७॥बालक जैसा छंद घेत ॥ माता पुरवि मनोरथ ॥ तैसे वीरवर ब्रीदसत्य ॥ सांभाळी त्वरित दयानिधे ॥१८॥इतिश्रीवेंकटेशविजयसुंदर ॥ संमत पुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत भक्तचतुर ॥ षष्ठोध्याय गोडहा ॥२१९॥६॥एकंदर ओवीसंख्या ॥९०८॥ श्रीलक्ष्मीवेंकटेशार्पणमस्तु ॥

# अध्याय ७ वा

*मागील अध्यायाच्या शेवटी सांगितल्याप्रमाणे बकुला नारायणपुरास आली. तेथे तिला पद्मावतीच्या सखी भेटल्या. बकुलेने त्यांना विचारले असता त्या बकुलेला म्हणू लागल्या-*

*'सोमवंशात आकाश नावाचा राजा आहे. त्याची पद्मावती नावाची मुलगी आमची सखी आहे. तिच्याबरोबर आम्ही उद्यानात खेळत असतो. एके दिवशी आम्ही उद्यानात फुले आणावयास गेलो असता घोड्यावरून त्या ठिकाणी आलेला एक अतिशय सुंदर कुमार आमच्या सखीने पाहिला; तो तिच्या मनात फारच भरला आहे.'*

*पद्मावतीने आम्हास त्याची चौकशी करण्यास सांगितले. आम्ही विचारले असता आम्हास काही न सांगता तो थेट पद्मावतीकडे जाऊन त्याने तिला आपली हकीकत सांगितली. 'मी क्षत्रिय आहे. वेंकटगिरीवर मी राहतो. माझे नाव श्रीनिवास आहे. चंद्रवंशात माझा जन्म झाला आहे. माझे आई वडील देवकी व वसुदेव असून बलिराम माझा भाऊ आहे.'*

*नंतर त्याने पद्मावतीकडे तिच्या कुळगोत्राची चौकशी केली. तिने ही आपली हकीकत त्यास सांगितली. 'मी क्षत्रिय आहे. वेंकटगिरीवर मी राहतो. माझे नाव श्रीनिवास आहे. चंद्रवंशात माझा जन्म झाला आहे. माझे आई वडील देवकी व वसुदेव असून बलिराम माझा भाऊ आहे.'*

*नंतर त्याने पद्मावतीकडे तिच्या कुळगोत्राची चौकशी केली. तिने ही आपली हकीकत त्यास सांगितली.*

*पुढे भिल्लाचा वेष घेतलेल्या श्रीनिवासाने 'आपली लग्न करण्याची इच्छा असून तू वरावेस' असे म्हणता पद्मावतीस फार राग आला व त्या सख्यांसह ती नगराकडे निघाली असता त्याच्या मागून तो पुरुष जाऊ लागला. तेव्हा त्यांनी त्यास दगडाने मारण्यास सुरुवात केली. त्याचा घोडा वाटेत मरण पावला व तो पुरुष उत्तर दिशेकडे निघून गेला. आम्ही आमच्या मंदिराकडे आलो. तेव्हापासून आमची सखी पद्मावती त्याच्या विरहज्वराने व्याकूळ झाली आहे. तिच्या आजारीपणाने सर्व घाबरून गेले आहेत. वैद्य ज्योतिषी इत्यादिकांचे उपचार चालू आहेत; पण गुण नाही. नंतर राजाने आपल्या कन्येची हकीकत त्यांना सांगितली. त्यांनी श्रीशिवास अभिषेक करावयास सांगितले. राजाने कुलगुरूंच्या विचाराप्रमाणे उत्तम प्रकारची साधनसामग्री जमा करून अनुष्ठान सुरू केले आहे. आम्ही तिच्या सर्व सखी देवदर्शनास आलो आहोत.*

*नंतर त्या मुलींनी बकुलेला हकीकत विचारली. तिने 'मी वेंकटेशाची दासी आहे. काही काम मनात योजून आले आहे. मला राजमातेचे दर्शन घडवाल काय असे विचारताच मुली म्हणाल्या, 'मुलीच्या आजारीपणामुळे धरणीदेवी दुःखी आहे. आता भेटण्यास वेळ मिळणार नाही. गावातील स्त्रिया जातील त्यांचेबरोबर जा व राणीची गाठ घे' बकुला वेळेची वाट पहात थांबली.*

*इकडे वेंकटेशांनी विचार केला की, बकुला स्त्री आहे तिज एकटीकडून कार्य होणार नाही. आपण आणखी काही प्रयत्न केला पाहिजे. म्हणून स्वतः भिल्लीणीचा वेष घ्यावयाचे ठरवून ब्रह्मदेवास बोलावून लहान मुलाचा वेष*

घेण्याची आज्ञा केली. मलिन वस्त्रे धारण करून ओट्यात लहान मुलास बांधून घेऊन नाचत नाचत नारायणपुरास आली. तिने गावातील लोकांना ओरडून सांगण्यास सुरुवात केली. 'मी भूतभविष्य जाणणारी आहे. कोणास कशाची इच्छा असेल तर ती मजकडून पूर्ण करून घ्या. तुमचे सर्व मनोरथ मी पूर्ण करीन.'

हे तिचे भाषण ऐकून सर्व स्त्रिया आश्चर्यचकित झाल्या व त्यांनी राजमाता धरणीदेवीस तिची हकीकत सांगितली. राणी धरणीने तिला राजवाड्यात आणण्यास सांगितले. स्त्रियांनी जाऊन राणीची व राजकन्येची सर्व हकीकत तिला सांगताच ती म्हणाली, 'माझे हे मलीन कपडे पाहून राजवाड्यातील लोक मला हसतील. मी दरिद्री आहे. त्या धर्मदेवीस अनेक प्रकारे समजावून स्त्रियांनी तिला राजवाड्यात नेले. राणीने तिची सर्व चौकशी केली. तिने आपली हकीकत सांगताच राणीने आपल्या मुलीचा आजार तिच्या कानावर घातला.

तिने राणीस शुभ्र वस्त्र नेसून आपणास वायन देण्यास सांगितले. आपल्या मुलास पिण्यास दूध मागून घेतले. भोजन करून तांबूल वगैरे खाऊन झाल्यावर तिने सर्व देवतांचे स्मरण केले व ती म्हणाली, 'तुझ्या मुलीस भूतबाधा वगैरे काही नाही. तिने बागेत एक सुंदर पुरुष पाहिला असून त्याच्यावर तिचे मन बसले आहे. तिला विचारून खात्री करुन घे!'

तसेच तो तिच्या मागून येत असता मुलींनी त्यास दगड मारून परत पाठविले; व तो उत्तरेकडे गेला. राणीने आपल्या मुलीस विचारता ही सर्व हकीकत खरी असल्याचे तिला समजून आले. राणीने भिल्लीणीस परत येऊन सर्व खरे असल्याचे सांगितले. तिने त्या पुरुषास कोणताही विचार न करता मुलगी देण्यास सांगितले. न दिल्यास मुलगी वाचणार नाही असे सांगताच राणी घाबरली. राजाचा सल्ला घेऊन त्या पुरुषाचा शोध करण्यास तिने सांगितले. इतक्यात अभिषेकाचा प्रसाद घेऊन ब्राह्मण आले. त्यांना राजाने भोजन-दक्षिणा वगैरे देऊन निरोप दिला.

वेंकटेशाकडून एक दासी आल्याचे त्यावेळी राजास समजले. तिला राजवाड्यात बोलावून आणून सर्व स्त्रियांनी तिची चौकशी केली. तिने आपली व वेंकटेशाची सर्व माहिती सांगितली. राजाने वेंकटेशाचे कुलगोत्र वगैरे आपल्या मुलीच्या गणगोत्राशी जुळवून पाहता ३६ गुण उतरले. त्यावेळी राजाच्या मनात एक शंका आली. असा हा सर्व गुणसंपन्न मुलगा असता याचे लग्न अद्याप का झाले नाही. त्यावेळी बकुलेने संततीकरिता हा दुसरे लग्न करतो आहे असे सांगताच राजाचा संशय दूर झाला.

देवगुरु बृहस्पतीनीही वेंकटेशाचे वर्णन 'तुझ्या मुलीस हा वर मिळाल्यास मुलीचे भाग्य थोर आहे असे समज' असे सांगताच राजास फार आनंद झाला. आणि देवगुरु म्हणाले, 'येथुन जवळच अरण्यात शुक्राचार्य नावाचे थोर ऋषि राहतात त्यांना आणून सर्व हकीकत विचार. वेंकटेशावर त्यांचे फार प्रेम आहे. राजाने रथ पाठवून त्यांना बोलावून आणविले. सर्व हकीकत राजास सांगितली. राजा म्हणाला असा थोर जावई आम्हास कसा मिळणार तेव्हा शुकाचार्य म्हणाले- 'राजा तू एक पत्र लिहून दे.' राजाने पत्र लिहून दिले. महामुनी शुकाचार्यांनी पत्र दिल्यानंतरचा इतिहास पुढील अध्याय पाहू.

श्रीशेषाद्रिनिलयायनमः ॥ जय क्षीराब्धिनिवासिया ॥ श्रीवेंकटेशा निरामया ॥ निर्विकल्पवृक्षा करुणालया ॥ शेषाद्रिनिलया जगद्‌गुरू ॥१॥नमो सर्गस्थित्यंतकारणा ॥ चक्रपाणि नागांतक वाहना ॥ वैकुंठपति मुरमर्दना ॥ कैटभारि जगदात्मया ॥२॥मीनकेतनारि हृदयजीवना ॥ हे सनकसनंदनमानसरंजना ॥ भक्तहृदयारविंदवर्धना ॥ जनार्दना प्रतापिया ॥३॥तुझी लीला जगन्नाथा ॥ ना सरे कोटीवर्षे वाखाणिता ॥ सहस्त्रवदन भागला वर्णिता ॥ पाडकाय इतरांचे ॥४॥मी मानव शलभ पामर ॥ केवी क्रमू गुणसागर ॥ जरी तू मनी धरशील साचार ॥ तरी काय एक न होय ॥५॥असो पूर्वाध्यायाचे अंती ॥ बकुला आली नारायणपुरा प्रती ॥ शिवालयी भेटल्या तियेप्रती ॥ पद्मावतीच्या सख्या सर्व ॥६॥बकुला त्यांशी पुसत ॥ कैसा जाहला वृत्तांत ॥ मग कन्या बोलती समस्त ॥ बकुलेप्रती आदरे ॥७॥सोमवंशी आकाशनृपवर ॥ त्याची कन्या पद्मावती सुंदर ॥ ती आमुची सखी परिकर ॥ क्रीडतो आम्ही तिजसवे ॥८॥एके दिवशी आम्ही समस्त ॥ वनासी गेलो पद्मावतीसहित ॥ सुंदरपुष्पवाटिके आत ॥ सुमने सुवास आणावया ॥९॥नानाजातीचे कुसुम ॥ शोभायमान विकसले उत्तम ॥ नानाफळांकित द्रुम ॥ भेदित व्योम गेले पै ॥१०॥तया वनामाजी क्रीडता ॥ एकपुरुष आला अवचिता ॥ किरातरूप जाहला धर्ता ॥ अश्वारूढ होवोनिया ॥११॥वदन त्याचे मनोहर ॥ विराजमान श्यामसुंदर ॥ कंठी वैजयंती परिकर ॥ तुळशीवनमाळा शोभती ॥१२॥सुहास्यवदन राजीवनयन ॥ कर्णी कुंडले प्रभाघन ॥ दिसती शशिमित्रा समान ॥ बाहुभूषणे शोभती ॥१३॥जैसा नभी विराजे दिनमणी ॥ तैसे कौस्तुभ तेज पडिले मेदिनी ॥ कोटिकंदर्प त्यावरोनी ॥ वोवाळोनि टाकावे ॥१४॥जन्मारभ्य ऐसा सुम्दर ॥ न देखिला माते साचार ॥ विलोकिता त्याचा मुखचंद्र ॥ नेत्रचकोर वेधले ॥१५॥त्याचे विलोकिता वदन ॥ वेधले पद्मावतीचे नयन ॥ हृदयी दाटले पंचबाण ॥ तया पुरुषासी पाहता ॥१६॥म्हणे सख्याहो पुरुषकोण ॥ पुसा त्यासी वर्तमान ॥ मग आम्ही तया लागून ॥ वर्तमान पुसिले ॥१७॥म्हणालो तुम्ही कोठील कोण ॥ एथे यावया काय कारण ॥ जनक जननी राहते स्थान ॥ सांग आम्हांसी सर्वही ॥१८॥आम्हासी न बोलता वेगेसी ॥ पातला तो पद्मावती पाशी ॥ तिशी म्हणे लावण्यराशी ॥ वर्तमान ऐक सर्व ॥१९॥मी आहे क्षत्रिय परियेस ॥ वेंकटाद्रीस करितो वास ॥ नाम माझे श्रीनिवास ॥ चंद्रवंश आमुचा ॥२०॥वसुदेव होय आपुला पिता ॥ देवकी नामे माझी माता ॥ बंधु बळिभद्र तत्वता ॥ यादवकुळ आमुचे ॥२१॥ऐसे आमुचे वर्तमान ॥ आता तू आहेस कोणाची कोण ॥ ते सर्व सांग म्हणोन ॥ पद्मावतीस बोलिला ॥२२॥ती म्हणे चंद्रवंशात ॥ आकाश नाम राव विख्यात ॥ त्यांची कन्या निश्चित ॥ पद्मावती नाम माझे ॥२३॥मग किरातवेषी बोलत ॥ मी कन्यार्थी पातलो एथ ॥ पाहोनि तुझे स्वरूपाते ॥ मन माझे मोहिले असे ॥२४॥तरी तू आता झडकरी ॥ मजलागी वरी सुंदरी ॥ ऐसे शब्द ऐकता श्रोत्री ॥ कोपली अंतरी पद्मावती ॥२५॥मग सर्व कन्या मिळोन ॥ स्वनगरात परतलो वेगे करून ॥ पाठिसि पुरुष येतो जाणोन ॥ पाषाणवर्षलो तयावरी ॥२६॥पाषणप्रहारे करोन ॥ अश्व

भंगला न लागता क्षण ॥ मग तो पुरुषनिघोन ॥ उत्तर दिशेसी गेला पै ॥२७॥आम्ही आलो स्वमंदिरा ॥ परी पद्मावती सुंदरा ॥ व्यापोनिया विरहज्वरा ॥ अत्यंत मूर्च्छित जाहली ॥२८॥नाही देहाचे स्मरण ॥ न करी कोणासी भाषण ॥ त्यागोनिया अन्नपान ॥ विकळ होऊनी पडियेली ॥२९॥कन्या पाहोनिया विकळ ॥ जन घाबरले हो सकळ ॥ धावोनि आला नृपाळ ॥ कन्ये जवळी तेधवा ॥३०॥राजपत्नी घाबरी त्वरित ॥ कन्येकारणे शोक करित ॥ दृष्टावली असे निश्चित ॥ म्हणोनि सांडिती वोवाळणी ॥३१॥वैद्य नाडी पाहती ॥ पित्त क्षोभ जाहला म्हणती ॥ ज्योतिषी प्रश्न पाहती ॥ ग्रहपीडा म्हणती इयेते ॥३२॥नाना परीचे जप दान ॥ करविती कन्येकारण ॥ मांत्रिक म्हणती बाधा दारुण ॥ झडपले जाण इयेते ॥३३॥तेणेचि वोळखी मोडिली ॥ ऐसे तर्क करिती सकळी ॥ परी हे महद्भूते घेतली ॥ हे न कळे कोणासी ॥३४॥नाना परी प्रयत्न ॥ करिता नव्हे समाधान ॥ राजा चिंताक्रांते होवोन ॥ आपुल्या गुरूसी पाचारिले ॥३५॥तात्काळ पातला देवाचार्य ॥ चरणी लागला नृपवर्य ॥ म्हणे कन्येसी उपाय काय ॥ करू लवलाहे गुरुवर्या ॥३६॥गुरूनी पाहोनि दृष्टीसी ॥ मग म्हणे राजयासी ॥ अभिषेक करवी सदाशिवासी ॥ अरिष्ट नासेल सर्वही ॥३७॥उत्तम ब्राह्मण निवडोन ॥ करावे विधियुक्त अभिषेचन ॥ तात्काळ आज्ञा वंदून ॥ अनुष्ठाना लाविले ॥३८॥गुरु गेला स्वस्थानासी ॥ नित्य लघुरुद्र होत शिवासी ॥ आम्ही आलो शिवदर्शनासी ॥ सर्व कन्या मिळोनिया ॥३९॥तू आहेसी कोणाची कोण ॥ एकलीच आलीस कोठून ॥ हे आद्यंत वर्तमान ॥ सांग आता आम्हांते ॥४०॥बकुला मनी हर्षयुक्त ॥ कन्याप्रती काय बोलत ॥ मी वेंकटेशाची दासी यथार्थ ॥ आले कार्यार्थ कल्पोनिया ॥४१॥राजपत्नीचे दर्शन ॥ करवा आता मज कारण ॥ यावरी कन्या बोलती वचन ॥ बकुलेप्रती ते काळी ॥४२॥कन्येसाठी यथार्थ ॥ धरणीदेवी असे दुःखित ॥ आता दर्शन नव्हे सत्य ॥ आत कोणासी न सोडिती ॥४३॥तरी नगरींच्या कामिनी ॥ जातील पहावया लागूनी ॥ तयासंगे जावोनी ॥ दर्शन घेई माते तू ॥४४॥ऐकोनिया ऐशी मात ॥ बकुला राहिली समय लक्षित ॥ इकडे वेंकटाद्रीसी जगन्नाथ ॥ कायकरिता जाहला ॥४५॥मनी विचारा मधुकैटभारी ॥ बकुला गेली नारायणपुरी ॥ तिचेनि कार्य निर्धारी ॥ न साधेचि सर्वथा ॥४६॥बकुला एकली निर्धार ॥ जैसा एकुलता नव्हे पुत्र ॥ एक नेत्र नव्हे साचार ॥ तैसा प्रकार जाहला हा ॥४७॥बकुला केवळ स्त्रीपरिकर ॥ तिसी न कळे बोलण्याचा प्रकार ॥ माया वेषधारी मुरहर ॥ काय करिता जाहला ॥४८॥विधीसी पाचारोनि झडकरी ॥ आज्ञा करी पूतनारी ॥ तू बाळक वेष निर्धारी ॥ होई आता अविलंबे ॥४९॥आज्ञा वंदोनि विधाता ॥ बाळक जाहला अवचिता ॥ आपण पुलंदिनी वेष तत्वता ॥ नटला तेव्हा जगदात्मा ॥५०॥स्त्रीवेष अवलंबून ॥ नेसला चीर वस्त्र मलिन ॥ फाटकीकंचुकी लेऊन ॥ अनुपम रूप धरियेले ॥५१॥लंबोदरी लंबकर्णी ॥ लंबपयोधर दिसती दोनी ॥ गुंजमणीचे आभरणी ॥ सर्वांगी लेइली असे ॥५२॥वेणुगुल्म मस्तकावरी ॥ त्यात नव धान्ये भरली निर्धारी ॥ लेकरू अत्यंत कृश अहोरात्री ॥ रुदन करी सर्वदा ॥५३॥शिशु वोटीत बांधोन ॥ नाचत जात स्वच्छंदे

करून ॥ नारायणपुरा लागून ॥ धर्मदेवी पातली ॥५४॥नगरी सर्वस्त्रिया प्रती ॥ धर्मदेवी बोले निश्चिती ॥ जे इच्छित ज्याचे चित्ती ॥ पूर्ण करीन निर्धारी ॥५५॥पुत्र बंधु आणि पती ॥ मत्प्रसादे होईल प्राप्ती ॥ भूत भविष्य वर्तमान स्थिती ॥ कळते निश्चिती मजलागी ॥५६॥राहते नरनारायणाश्रमी ॥ कार्य प्रसंगे आले या ग्रामी ॥ तुमचे मनोरथ असतील ते मी ॥ पूर्ण करीन सर्वही ॥५७॥ऐसी ऐकता वचनोक्ती ॥ स्त्रिया सर्व आश्चर्य करिती ॥ मग जावोनी शीघ्रगती ॥ राजस्त्रियेसी सांगितले ॥५८॥नरनारायणाश्रमीहून ॥ धर्मदेवी आली जाण ॥ भूत भविष्य वर्तमान ॥ सर्वकळत तियेसी ॥५९॥आणि जे इच्छा असेल मानसी ॥ पूर्ण करील निश्चयेसी ॥ ऐकोनिया निजमानसी ॥ धरणीदेवी हर्षली ॥६०॥धरणी म्हणे तत्वता ॥ प्राणसख्या हो चला आता ॥ धर्मदेवी विलंब न करिता ॥ आणा यथार्थ मजपाशी ॥६१॥ऐसे ऐकताचि वचन ॥ स्त्रिया धावल्या वेगेकरून ॥ धर्मदेवीप्रती वचन ॥ बोलत्या जाहल्या ते काळी ॥६२॥स्त्रिया म्हणती शुभकल्याणे ॥ धर्मदेवी गुणसंपन्ने ॥ राजपत्नीने तुजलागून ॥ पाचारिले जननीये ॥६३॥तिची कन्या पद्मावती ॥ व्याधिग्रस्त जाहली निश्चिती ॥ यालागी माते तुजप्रती पाचारिले सतीने ॥६४॥धर्मदेवता बोले वचन ॥ मी केवळ दरिद्री दीन ॥ मलिनवस्त्र नेसले जाण ॥ गुंजाभूषण अंगावरी ॥६५॥तेथे आलिया तत्वता ॥ मज विनोद करतील यथार्थ ॥ श्रीमंताचे घरासि सर्वथा ॥ दरिद्रियांनी न जावे ॥६६॥हास्य करावया कारणे ॥ बोलाविली राजस्त्रियेने ॥ तेथे यावयाचे कारण ॥ नसे काही मजलागी ॥६७॥मग स्त्रिया सर्व मिळोन ॥ धर्मदेवीसी बहुत प्रार्थून ॥ राजसदना लागून ॥ नेत्या झाल्या ते काळी ॥६८॥धरणीदेवी येवोन ॥ धर्मदेवीसी करी वंदन ॥ म्हणे माते कृपाकरोन ॥ आलीस एथे दयार्णवे ॥६९॥तू आहेस कोठील कोण ॥ हरिसी लोकांचे दुःख दारूण ॥ आलीस कोणत्या देशीहून ॥ शुभकल्याणे सांग मज ॥७०॥येरी म्हणे नारायणाश्रमाहून ॥ मी आताचि पातले जाण ॥ साक्षात जो नारायण ॥ भ्रतार माझा निर्धारी ॥७१॥त्याचे वीर्ये हा पुत्र ॥ उत्पन्न जाहला निर्धार ॥ कार्यप्रसंगे आले साचार ॥ धर्मदेवी नाम माझे ॥७२॥धरणी म्हणे हो जननी ॥ तू सद्गुणरत्नाची खाणी ॥ आलीस माय कृपाकरोनी ॥ संकट जाणोनि अविलंबे ॥७३॥तरी माझी कन्यापरिकर ॥ पद्मावती नामे सुंदर ॥ व्याधिग्रस्त जाहली निर्धार ॥ सांग माते काय करू ॥७४॥येरी बोले साचार ॥ माते मी बोलेन स्पष्ट उत्तर ॥ तुम्हांसी तो विषाद फार ॥ वाटेल तथा गोष्टीचा ॥७५॥राजकांता बोले वचन ॥ माते तू न करी अनुमान ॥ अम्हावरी कृपाकरोन ॥ संकटवारी एवढे ॥७६॥मग उत्तमासन देऊन ॥ बैसवि धर्मदेवीलागून ॥ देवी बोले मग हास्यवदन ॥ धरणी प्रती ते काळी ॥७७॥म्हणे कल्याणे ऐक वचन ॥ तू करी वेगी मंगळस्नान ॥ शुभ्रकंचुकी शुभ्रवस्त्र नेसोन ॥ गुरुदेवतेसी नमस्कारी ॥७८॥येरी तैसेची करोन ॥ पश्चिमाभिमुख बैसली येवोन ॥ म्हणे माते बोल वचन ॥ काय करू यावरी ॥७९॥मग बोले पुलिंदिनी ॥ माते वायन देई त्वरे करोनी ॥ सुवर्णशूर्पी मौक्तिक भरोनी ॥ तंडुलयुक्त देइजे ॥८०॥भक्तिपूर्वक असे वायन ॥ देई माते त्वरेकरून ॥ धरणी तत्काळ सिद्धकरोन ॥ वायन देती

जाहली ॥८१॥पुलंदिनी म्हणे माते ऐक ॥ क्षुधाक्रांत माझे बाळक ॥ रात्रंदिवस रडे देख ॥ देई उत्तम अन्नाते ॥८२॥मग सुवर्ण पात्री क्षीरान्न ॥ तत्काळ आणिले निर्मून ॥ परी बाळक न भक्षी जाण ॥ मानुषी अन्न म्हणोनिया ॥८३॥न भक्षूनिया अन्न ॥ रुदन करिता न राहे जाण ॥ पुलिंदिनी ऐसे देखोन ॥ करी ताडण बाळकाते ॥८४॥म्हणे दरिद्री दुराचारी बाळ ॥ खाऊनि राहाणार कंदमूळ ॥ राजनिर्मित अन्न निर्मळ ॥ भक्षील कैसे निर्दैवी ॥८५॥ऐसे बोलोनि बाळासी ॥ आपण भोजनकरी वेगेसी ॥ म्हणे मी भक्षिल्या बाळकासी ॥ हित सहजची होतसे ॥८६॥असो जाहलिया भोजन ॥ बैसली स्वस्थ मने करून पूर्वाभिमुख बैसोन ॥ बाळ घेतले अंकावरी ॥८७॥एकाग्र करोनिया मन ॥ चिंती दैवतालागून ॥ मायावेषधारी भगवान ॥ नानाचरित्र दावितसे ॥८८॥जो साक्षात आदिनारायण ॥ ज्यासि वंदिती शक्र ईशान ॥ निज भक्त तारावया लागून ॥ कौतुक अगाधदावितसे ॥८९॥असो आता पुलिंदिनी ॥ सर्वदेवीसी स्मरी मनी ॥ आदिनारायणासि चिंतुनी ॥ मग ध्यात लक्ष्मीते ॥९०॥कमळोद्भव आणि सरस्वती ॥ चिंतिले ह्रदयी उमापती ॥ स्मरती जाहली गिरिजा सती ॥ इंद्रासि स्मरिले त्यावरी ॥९१॥काशीविश्वेश्वर निर्मळ ॥ बिंदुमाधव स्मरिला तत्काळ ॥ विंध्यपादप्रयागादि सकळ ॥ गोदातीर वासियांते ॥९२॥नारसिंह अहोबळ ॥ पांडुरंग पंपाधीश प्रबळ ॥ वेंकटाद्रि आणि श्रीशैल्य ॥ मल्लिकार्जुन स्मरियेले ॥९३॥घटिताचळ वृथाचळ साचार ॥ स्मरिला मनी कालहस्तीश्वर ॥ श्रीरंग कुंभकोण शार्ङ्गधर ॥ सेतुरामेश्वर स्मरियेले ॥९४॥सुब्रह्मण्य मधुसूदन शंकर ॥ चंद्रेश्वर गोकर्णेश्वर ॥ हरिहरेश्वर मनोहर ॥ स्मरिले साचार दैवते ॥९५॥गंगा गोदावरी कृष्णा ॥ तुंगभद्रा मलापहरणा ॥ कावेरी कपिला सुवर्णमुखरी जाणा ॥ अनुक्रमे नद्यासर्व ॥९६॥अंबिका आणि भैरव साचार ॥ कामाक्षी मीनाक्षी सुंदर ॥ करवीरवासिनी देवी परिकर ॥ स्मरोनि निर्भर जाहली ॥९७॥मग आपुला जो भ्रतार ॥ बद्रिकाश्रमवासी साचार ॥ मातापिता आणि गुरुवर ॥ चिंतिती जाहली मानसी ॥९८॥इतुकी दैवते चिंतून ॥ म्हणे आता सत्य बोलेन ॥ मुखशुद्धीसाठी त्वरेकरून ॥ तांबूल देई जननिये ॥९९॥मग तांबुल त्रयोदशगुणी ॥ आणोनि दिधला राजपत्नी ॥ येरी तो भक्षणकरोनी ॥ बोलती जाहली यावरी ॥१००॥म्हणे नृपवल्लभे ऐक आता ॥ तुझिया कन्येची व्यवस्था ॥ सखिया समवेत तुझी दुहिता ॥ उपवनासि गेली होती ॥१॥तेथे सर्व कन्यामिळोन ॥ पुष्पे तोडिती प्रीतीकरून ॥ स्वच्छंदे करिती गायन ॥ विनोद भाषण करिताती ॥२॥ऐसे आनंदे क्रीडता ॥ एक पुरुष आला अवचिता ॥ अश्व रूढ त्याचे स्वरूप पाहता ॥ कोटिकाम वोवाळिजे ॥३॥मृगमदाहूनि विशेष ॥ त्याचे अंगीचा सुटला सुवास ॥ मुखमृगांक राजस ॥ नीलजीमूत वर्ण जो ॥४॥आकर्णविराजती राजीवनयन ॥ कस्तूरीटिळक विराजमान ॥ मुकुटमंडले शोभायमान ॥ कौस्तुभगळा विलसतसे ॥५॥सुरंग नेसला पीतांबर ॥ वैजयंतीमाळा परिकर ॥ ज्याचे तेजी चंद्र दिवाकर ॥ झाकोळती पाहता ॥६॥ऐसा एक सुंदर पुरुष ॥ अकस्मात आला त्या वनास ॥ तन्मय जाहले मानस ॥ सख्यांसहित इयेचे ॥७॥देखता त्याचा वदनचंद्र ॥ जाहले इचे नयन चकोर

॥ देहभान विसरली समग्र ॥ अंगी विहर दाटला ॥८॥मग सखियांसी दावी खूण ॥ पुसा कोण कोठील वर्तमान ॥ सखिया पुसती त्यालागून ॥ तव तो जवळी पातला ॥९॥आपुला वृत्तांत वेगेसी ॥ सांगितला पद्मावतीपाशी ॥ हिने आपुला वृत्तांत त्यासी ॥ सर्वही कथिला जननिये ॥११०॥मग तो पुरुष विरहग्रस्त ॥ इयेसि बोलिला मदनयुक्त ॥ ही होऊनी क्रोधयुक्त ॥ सखियांसहित निघाली ॥११॥सर्वकन्या मिळोन ॥ त्यावरी वर्षल्या पाषाण ॥ त्या घाते करोन ॥ अश्व त्याचा भंगला ॥१२॥मग तो पुरुष म्लानवदन ॥ गेला उत्तर दिशा लक्षून ॥ परी इच्या मनी संपूर्ण ॥ ध्यास त्याचा लागला ॥१३॥म्हणे त्या सारखा संदर ॥ पुरुष नसे पृथ्वीवर ॥ मनात दाटला पंचशर ॥ विव्हळ शरीर जाहले ॥१४॥मनी वाटे परम खंती ॥ कैतो पुरुष देखेन पुढती ॥ विरहानळ जाळी तीप्रती ॥ आणि काही नसेची ॥१५॥भुतबाधा नाही तियेस ग्रहबाधा नाही नि:शेष ॥ विरहज्वरे व्यापिले मानस ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥१६॥तो पुरुष म्हणसील कोण ॥ साक्षात वैकुंठपति रमारमण ॥ श्रीवेंकटेश नामाभिधान ॥ शेषाचळ निवासी जो ॥१७॥सत्य की मिथ्या वर्तमान ॥ पूस तू आपुले कन्येलागून ॥ धरणी देवी तात्काळ उठोन ॥ कन्येपाशी पातली ॥१८॥तव ती नेत्रे झाकून ॥ पडिली होऊनि निचेतन ॥ मातेने सावध करून ॥ निजांकावरी घेतली ॥१९॥माता म्हणे कुमारी ॥ मजसी बोल क्षणभरी ॥ राजीव नेत्रे झडकरी ॥ उघडोनि पाहे मजकडे ॥१२०॥मग ती नेत्रे उघडोन ॥ मातेकडे पाहे अवलोकून ॥ माता म्हणे वर्तमान ॥ सत्य सांग सुकुमारे ॥२१॥भय लज्जा मनी धरोन ॥ सांगावया न करी अनुमान ॥ तुज असे माझी आण ॥ वृत्तांत सर्व सांगपा ॥२२॥कन्या म्हणे ऐक माते ॥ मी गेले होते उपवनाते ॥ सखियांसहित क्रीडता तेथे ॥ एक अपूर्व वर्तले ॥२३॥हयारूढ पुरुष एक ॥ अकस्मात पातला देख ॥ पाहता त्याचा मुखमृगांक ॥ त्रिभुवनामाजी दुजा नसे ॥२४॥मदनमोहन चारुगात्र ॥ आकर्णनयन सुहास्य वक्र ॥ चतुर्भुज शामसुंदर ॥ निमासुर डोळस ॥२५॥कोट्यानकोटी मीनकेतन ॥ कुरवंडी करावे नखावरून ॥ त्याचे सौंदर्य वर्णावया लागून ॥ सहस्त्रवदन शक्त नव्हे ॥२६॥त्याचा पाहोनी वदनचंद्र ॥ मजला दाटला पंचशर ॥ तो जरी होईल भ्रतार ॥ तरीच धन्य होईन मी ॥२७॥ऐसा वृत्तांत सांगोन ॥ नेत्र झाकिले मागुतेन ॥ मग धरणीदेवी येऊन ॥ पुलंदिनी प्रती बोलतसे ॥२८॥म्हणे देवी तुझे सत्य वचन ॥ ऐसियासी काय करू प्रयत्न ॥ धर्मा म्हणे सत्य बोलेन ॥ तुज ते विषम वाटेल ॥२९॥धरणी म्हणे बोल पूर्ण ॥ सांगसी ते आता करीन ॥ धर्मा म्हणे वेंकटेशालागून ॥ करी अर्पण कन्या ही ॥१३०॥वेंकटेशाकडून ॥ एथे आली एक कामिन ॥ वराननें तुज लागून ॥ भेटेल येवोनी तत्वता ॥३१॥कन्या त्यासी देतो म्हणोन ॥ संकल्प करी वेगेकरून ॥ आताचि होईल सावधान ॥ धरणीदेवी कन्या तुझी ॥३२॥जरी अनुमान करशील आता ॥ तरी न वाचे कन्या जाण तत्वता ॥ धरणी दचकली ऐकता ॥ म्हणे ऐसे सर्वथा बोलू नको ॥३३॥तू सांगसी तैसे करीन ॥ बोलू नको असह्यवचन ॥ मग राजया पाशी वर्तमान ॥ धरणीदेवी श्रुतकरी ॥३४॥आकाशराजा बंधूसहित ॥ कन्येपाशी पातला त्वरित ॥ आद्यंत अवघा

वृत्तांत ॥ कळविला तेव्हा राजयाते ॥३५॥राजा बोले वचन ॥ वेंकटेश हा कोणाचा कोण ॥ कोण याती कोण वर्ण ॥ राहते स्थळ कोणते ॥३६॥गोत्र ग्राम न कळे जरी ॥ कन्या अर्पावी कवणेपरी ॥ आणि त्याकडोनी आजिवरी ॥ कोणी आले नाहीत पै ॥३७॥धरणी बोले प्रिया लागून ॥ वेंकटेशाकडून एककामिन ॥ एथे आली म्हणोन ॥ धर्मदेवी सांगितले ॥३८॥तिने सांगितले पाही ॥ प्रत्ययासी आले सर्वही ॥ मग ती धर्मा लवलाही ॥ स्वस्थानासी पावली ॥३९॥ऐसे बोलता परस्परे ॥ सायंकाळ जाहला निर्धार ॥ शिवाभिषेक सारोनि विप्र ॥ प्रसाद घेऊनी पातले ॥१४०॥प्रसाद घेऊनी नृपनाथ ॥ भोजन केले विप्रांसहित ॥ दक्षिणा देवोनी अमित ॥ बोळविले ब्राह्मणांसी ॥४१॥तो नगरींच्या कामिनी ॥ पद्मावतीच्या सांगातिणी ॥ त्याही पहावया लागूनी ॥ येत्या जाहल्या साक्षेपे ॥४२॥त्यासवे बकुलासुंदरी ॥ येती जाहली राजमंदिरी ॥ धरणीपाशी निर्धारी ॥ सर्वस्त्रिया पातल्या ॥४३॥पद्मावतीसी पाहूनी ॥ बैसल्या हो अवघ्या जणी ॥ बकुलेप्रती बोले वचन ॥ राजपत्नी ते काळी ॥४४॥म्हणे बाई कोठील कोण ॥ येणे जाहले काय कारण ॥ या वरी बकुला हास्यवदन ॥ राजपत्निसी बोलतसे ॥४५॥म्हणे मी कन्यार्थी निश्चयेसी ॥ आहे वेंकटेशाची दासी ॥ वेंकटाद्रीहूनि वेगेसी ॥ आले माते तव दर्शना ॥४६॥धरणी बोले वचन ॥ वेंकटेश हा कोणाचा कोण ॥ कोणदेश कोणस्थान ॥ जनक जननी कोण त्याचे ॥४७॥कवण वंश कवण गोत्र ॥ सांग माते सविस्तर ॥ यावरी बकुलासुहास्य वक्र ॥ बोलती काय जाहली ॥४८॥सोमवंशी जन्मला तत्वता ॥ देवकीमाता वसुदेवपिता ॥ नाम त्याचे श्रीकृष्णनाथ ॥ यादवकुळी अवतरला ॥४९॥वसिष्ठगोत्री उत्पन्न ॥ श्रवण नक्षत्र परिपूर्ण ॥ वयरूपयौवन ॥ सर्वगुणे अलंकृत ॥१५०॥विद्यावंत आणि कुशळ ॥ द्रव्यवान पराक्रमी सबळ ॥ शोधिता हे पृथ्वीमंडळ ॥ ऐसा दुसरा नसेची ॥५१॥यावरी धरणी बोलत ॥ जरी ऐसा असेल लक्षणयुक्त ॥ तरी आजवरी किनिमित्त ॥ विवाह याचा न जाहला ॥५२॥बकुला ह्मणे ऐक माते ॥ लग्न जाहले असे निश्चित ॥ परी संततीलागी यथार्थ ॥ दुसरा विवाह करितसे ॥५३॥ऐकताचि ऐसी मात ॥ गुंतले धरणीचे चित्त ॥ मग रायापाशी वृत्तांत ॥ समूळ कथिती जाहली ॥५४॥म्हणे हे नृपचक्रचूडामणी ॥ वेंकटेशाकडूनी एक कामिनी ॥ कन्यार्थी आली आमचे भुवनी ॥ वार्ता ऐकली तिच्यामुखे ॥५५॥विद्या वय आणि सुंदर ॥ सभाग्य पराक्रमी आणि उदार ॥ वेंकटेशासारिखा वर ॥ पृथ्वीवरी दुजा नसे ॥५६॥ऐसा गुणाढ्य असेल जरी ॥ स्वामी त्याचा शोध घ्यावा झडकरी ॥ धर्मदेवीचे सांगणे निर्धारी ॥ हेचि असे प्राणेश्वरा ॥५७॥आणि कन्येचे मनी निर्धार ॥ वेंकटेशचि पाहिजे वर ॥ त्याचेचि विरहे साचार ॥ व्यथा थोर जाहली ॥५८॥कन्या वाचली मरता मरता ॥ काय पाहता प्राण नाथा ॥ वेंकटेशाचे नाम घेता ॥ सावध जाहली पद्मावती ॥५९॥ऐकोनि कांतेचे वचन ॥ राजा जाहला आनंदघन ॥ तोंडमान आणि वसुदान ॥ बंधु पुत्रांसी बोलाविले ॥१६०॥बंधु पुत्र प्रधान सहित ॥ विचार करी नृपनाथ ॥ आपला कुलगुरु अंगिरासुत ॥ तयालागी पाचारिले ॥६१॥देवाचार्य पातला वेगेसी ॥ राजा साष्टांग नमूनी त्यासी ॥ सिंहासनी

बैसवोनी निश्चयेसी ॥ षोडशोपचारे पूजिले ॥६२॥कर जोडोनी राजेश्वर ॥ गुरुसि विनवी वारंवार ॥ म्हणे गुरुवर्या ऐकसार ॥ वर्तमान आद्यंत ॥६३॥व्यथाभूत होवोनी ॥ कन्या निजली असता शयनी ॥ पुलंदिनी ब्रदिकाश्रमाहूनी ॥ आली एथे गुरुवर्या ॥६४॥पद्मावतीचा वृत्तांत ॥ तिणे कथिला हो समस्त ॥ उपवनी क्रीडता अकस्मात ॥ पुरुष एक पातला ॥६५॥नीलजीमूत वर्ण सुकुमार ॥ चतुर्भुज शंखचक्रधर ॥ त्याचे सौंदर्य पाहता विचित्र ॥ कन्येसी विरह दाटला ॥६६॥तो पुरुष म्हणाल कोण ॥ तरी साक्षात इंदिरारमण ॥ त्यासी पद्मावती गुणनिधान ॥ सर्वभावे अर्पावी ॥६७॥जरी कराल अनुमान ॥ कन्या न वाचे निश्चयवचन ॥ दृढ संकल्प कराल पूर्ण ॥ तरी गुण येईल आतांची ॥६८॥ऐसे बोलोनि पुलिदिनी ॥ गेली आपुल्या स्वस्थानी ॥ कन्येसि विचारिता एकांतस्थानी ॥ तिनेहि तेचि कथियेले ॥६९॥वेंकटेशाचे रूप पाहोन ॥ तेथेचि गुंतले माझे मन ॥ दुसरा वर त्या वाचोन ॥ सर्वथाही न वरीच ॥१७०॥ऐसा कन्येचा निर्धार ॥ परी वेंकटेश हा कोणपरिकर ॥ काय त्याचे कुळगोत्र ॥ ठाऊक नसे आम्हाते ॥७१॥यालागी गुरुवर्या अवधारी ॥ तुम्हांसी सर्व श्रुत असेल जरी ॥ कोण कोठील निर्धारी ॥ आम्हा लागी सांगावे ॥७२॥यावरी बोले वाचस्पती ॥ वेंकटेश हा वैकुंठपती ॥ आम्ही जाणतो त्याप्रती ॥ परी नवल चित्ती वाटतसे ॥७३॥जो अज अजित निर्विकार ॥ मायानियंता परमेश्वर ॥ तुझ्या कन्येलागी निर्धार ॥ तो वर कैसा जोडेल ॥७४॥ज्याचे नाम घेता साचार ॥ शीतळ जाहला अपर्णावर ॥ तो तुझ्या कन्येसी जोडला वर ॥ हेचि आश्चर्य वाटतसे ॥७५॥जो सर्गस्थित्यंतकारण ॥ जो इंद्राचा इंद्र नारायण ॥ वेदशास्त्रे भांडती ज्या कारण ॥ तो वर कैसा मिळाला ॥७६॥ज्याचे दर्शनालागी निश्चिती ॥ किती एक पंचाग्निसाधने करिती ॥ नानातपे आचरती ॥ परी तयालागी नातळे तो ॥७७॥तुझ्या कन्येसाठी पूर्ण ॥ तो कैसा आला वैकुंठाहून ॥ नवल वाटते मजलागून ॥ तरी एक सांगतो ऐक राया ॥७८॥शुक्राचार्या नामे विख्यात ॥ योगिराज वेदव्याससुत ॥ ज्याने षड्वैरी जिंकिले निश्चित्त ॥ इंद्रियजित महाराज ॥७९॥एथोनी पंचक्रोशा वरती ॥ काननी असे त्याची वस्ती ॥ वेंकटेशाची प्रीती ॥ त्यावरी असे अत्यंत ॥१८०॥त्यासी बोलोवोनि नृपवरा ॥ आद्यंत वार्ता श्रवणकरा ॥ ऐसे ऐकतांचि नृपवरा ॥ बंधूप्रती आज्ञापिले ॥८१॥म्हणे आताचि रथ घेऊन ॥ तुवा जावे त्वरे करोन ॥ शुकयोगींद्रासी प्रार्थून ॥ घेवोनि येई झडकरी ॥८२॥आज्ञा वंदोनी तोंडमान ॥ तात्काळ चालिला रथ घेऊन ॥ शुकाश्रमासमीप येवोन ॥ लोटांगण घालितसे ॥८३॥तोंडमानासी पाहोनि सहज ॥ धावला तो योगिराज ॥ आलिंगन देवोनि तेजःपुंज ॥ वर्तमान पुसतसे ॥८४॥म्हणे काय कारण कल्पून ॥ जाहले तुमचे आगमन ॥ येरी म्हणे नृप तुम्हालागून ॥ पाचारिले स्वामिया ॥८५॥पद्मावती नाम कन्येसी ॥ देऊ पाहती वेंकटेशासी ॥ त्याची वार्ता काय कैसी ॥ पुसावयासी बोलाविले ॥८६॥ऐसे ऐकता वर्तमान ॥ आनंदे दाटला व्यासनंदन ॥ नाचो लागला संपूर्ण ॥ हर्ष न माये गगनोदरी ॥८७॥कमंडलु टाकीला फोडून ॥ कृष्णाजिन टाकिले फाडून ॥ चिद्धनानंदे परिपूर्ण ॥ शुक योगींद्र नाचतसे ॥८८॥शुकाचे मनी हाचि भाव ॥ कि

माझा वेंकटेश दयार्णव ॥ याचा विवाह होईल अपूर्व ॥ म्हणोनिया नाचतसे ॥८९॥असो रथी बैसोनी सत्वर ॥ पावले वेगी नारायणपुर ॥ सभा घनवटली साचार ॥ तेथेचि रहंवर नेला पै ॥१९०॥शुक योगींद्र देखतांची दृष्टी ॥ रायाचे हर्ष न माये पोटी ॥ धावोनिया उठाउठी ॥ चरणी मिठी घातली ॥९१॥योगींद्रासी करी धरोनी ॥ बैसविले दिव्य सिंहासनी ॥ अर्घ्यपाद्यादि उपवारे करूनी ॥ षोडशोपचारे पूजिले ॥९२॥पुढे उभा कर जोडून ॥ म्हणे महाराज तू आनंदघन ॥ अतींद्रिय दृष्टांत परिपूर्ण ॥ मुकुटरत्न योगियांचा ॥९३॥माझी कन्या पद्मावती ॥ ती द्यावी वेंकटेशा प्रती ॥ परी कैसी आहे त्याची स्थिती ॥ ते आम्हाप्रती कळेना ॥९४॥यालागी योगींद्रा अवधारी ॥ कृपा करोनिया मजवरी ॥ वेंकटेश हा कोण निर्धारी ॥ श्रुत करी स्वामिया ॥९५॥यावरी शुक बोले हासोन ॥ म्हणे राया भाग्य तुझे परिपूर्ण ॥ उंच असे मेरूहून ॥ तरी जामात ऐसा जोडला ॥९६॥निर्धनासी सापडे धन ॥ की जन्मांधासी आले लोचन ॥ की क्षुधार्थी जो दीन ॥ क्षीराब्धि त्यासि मिळाला ॥९७॥की मर्त्याच्या मुखात ॥ पीयूष पडिले अकस्मात ॥ की चिंताग्रस्तासि निश्चित ॥ चिंतामणि मिळाला ॥९८॥तैसे जाहले तुजप्रती ॥ तो जगदात्मा वैकुंठपती ॥ अनायासे तुज नृपती ॥ जामात जोडला निर्धारी ॥९९॥ज्याकारणे करिती महायज्ञ ॥ देह कर्वती घालिती जाण ॥ अथवा सेविती घोरारण्य ॥ त्यासी नारायण न मिळेची ॥२००॥तू मानव नृपवर ॥ तुज प्राप्त जाहला इंदिरावर ॥ जैसे कूप स्नानासि जाता नर ॥ तो प्रयागराज भेटला ॥१॥ऐसे बोलता शुकयोगींद्र ॥ आनंदला आकाश नृपवर ॥ म्हणे नाडी कूटसमग्र ॥ मिळे कैसे पाहावे ॥२॥पुसिले बकुलेसी सत्वर ॥ वेंकटेशाचे कोणते नक्षत्र ॥ ऐकता तिसी निर्धार ॥ क्रोध आला किंचित ॥३॥शुकादिक सांगता ॥ अद्यपि संशय न फिटे सर्वथा ॥ ऐसे तिचे मनोगत ॥ व्याससुते जाणीतले ॥४॥मग शुकाचार्य बोलत ॥ क्रोधयावया किंनिमित्त ॥ यथार्थ सांगावे निश्चित ॥ काहि अनुमान न करिता ॥५॥ऐसे बोलता व्याससूनु ॥ बकुला पुन्हा बोले पूर्ण ॥ वेंकटेशाचे नक्षत्र श्रवण ॥ पूर्वीच म्या सांगितले ॥६॥यावरी बोले भूपती ॥ मृग नक्षत्र कन्येचे निश्चिती ॥ मग देवगुरु बृहस्पती ॥ पाहता जाहला विचारूनी ॥७॥तो मिळोनि आले छत्तिसगुण ॥ राजा आनंदला परिपूर्ण ॥ म्हणे माझे अगाध पूर्वपुण्य ॥ फळा आले एकदाची ॥८॥सभेमाजी सर्वासमीप ॥ राजा करी दृढ संकल्प ॥ म्हणे श्रीनिवास वैकुंठाधिप ॥ त्यासी कन्या दिधली ॥९॥ऐसे बोलता नृपवर ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ वाद्ये वाजती अपार ॥ सुमने सुरवर वर्षती ॥२१०॥आनंद जाहला एकसरा ॥ रथ भरोनि वाटिती शर्करा ॥ धरणीदेवीसी अपार ॥ आनंदपूर दाटला ॥११॥यावरी तो नृपनाथ ॥ शुकाचार्यांप्रती बोलत ॥ म्हणे स्वामी माझ्या मनात ॥ शंका एक वाटतसे ॥१२॥आम्ही केले घटितार्थ ॥ परि कळविले नाही वेंकटेशाते ॥ तो देवाधिदेव समर्थ ॥ मान्य करील की स्वामिया ॥१३॥मग बोले बादरायणी ॥ म्हणे राया चिंता न करी मनी ॥ तुवा पत्र एक लिहूनी ॥ देई वेगे मजपाशी ॥१४॥मी आताचि जाऊन ॥ भेटतो वेंकटेशालागून ॥ पत्राचे उत्तर घेऊन ॥ येतो आता झडकरी ॥१५॥ऐकता संतोषला भूपाळ ॥ दिव्य पत्र लिहिता

तत्काळ ॥ अभिप्राय लिहिला तो सकळ ॥ श्रोते सावकाश परिसिजे ॥१६॥चिरंजीव विजयी श्रीजगन्मोहना ॥ श्रीवेंकटेशा रमारमणा ॥ शेषाद्रिवासा वैकुंठराणा ॥ वेदपुराणा वंद्य तू ॥१७॥नारायणपुराहून ॥ आकाशराव करी आशिर्वचन ॥ आजिवरी क्षेम कल्याण ॥ तुझ्याकृपे असो आम्ही ॥१८॥तू अज अव्यय देवाधिदेव ॥ ऐक माझ्या मनींचा भाव ॥ माझी कन्या पद्मसंभव ॥ ते तुजलागी अर्पिली ॥१९॥सच्चिदानंद नारायणा ॥ मना आणी माझी प्रार्थना ॥ अंगीकारोनी कन्यारत्न ॥ मनोरथ पूर्ण करी माझे ॥२२०॥वैशाखशुद्ध दशमीसी ॥ भृगुवारी नेमिले लग्नासी ॥ सह परिवारे त्या संधीसी ॥ लग्ना कारणे येईजे ॥२१॥जगन्निवासा कृपाकरून ॥ पूर्ण करी एवढे कारण ॥ आणि आद्यन्तवर्तमान ॥ शुक योगींद्र सांगेल ॥२२॥मुख्य असे एवढे कारण ॥ आणिक नसे विशेष लिहिणे ॥ तू जगन्निवास नारायण ॥ पत्रोत्तर देईजे ॥२३॥ऐसे लिहोनि झडकरी ॥ दीधले शुकाचार्याचे करि ॥ म्हणे स्वामी निघा लौकरी ॥ वेंकटाद्रिसी जाईजे ॥२४॥नानायुक्ती बोलून ॥ वश्यकरावा मधुसूदन ॥ कार्यसिद्धि होय पूर्ण ॥ ऐसे करी मुनिराया ॥२५॥वरदक्षिणेसी साचार ॥ अर्बुद द्रव्य देईन निर्धार ॥ करोनिया नाना प्रकार ॥ कार्यसिद्धी करावी ॥२६॥पत्र घेवोनि वेगेसी ॥ शुक आला वेंकटाद्रीसी ॥ बकुला पुसोनि धरणी देवीसी ॥ तीही निघालि त्वरेने ॥२७॥आता शुकाचार्यालागून ॥ भेटेल इंदिरामनमोहन ॥ पुढील अध्यायी निरूपण ॥ श्रोते सावकाश परिसिजे ॥२८॥वेंकटेशविजय हे वैकुंठगिरी ॥ जो का श्रवणपठणावर्तन करी ॥ त्याचे दुष्कर्म तोडोनि श्रीहरी ॥ निष्पाप करी सर्वदा ॥२९॥भक्तवत्सला शुभदायका ॥ वीरवरदा वैकुंठनायका ॥ तुझी लीला भक्तपाळका ॥ ब्रह्मादिका कळेची ॥३०॥वेंकटेशविजयग्रंथसुंदर ॥ संमत पुराणभविष्योत्तर ॥ श्रवण करोत भक्तचतुर ॥ सप्तमाध्याय गोडहा ॥२३१॥७॥एकंदर ओवी संख्या ॥११३९॥

# अध्याय ८ वा

*मागील अध्यायात श्री शुकाचार्य आकाशराजाचे पत्र घेऊन श्रीवेंकटेशाकडे निघाले असे वृत्त आले आहे. श्री शुकाचार्य वेंकटगिरीवर येताना श्रीनिवासाने पाहिले. श्रीशुकाचार्यांना त्यांनी वंदन करून क्षेमकुशल विचारले. त्यांनी क्षेमकुशल सांगून राजाचे पत्र त्यास दिले. पत्र वाचून त्यांना आनंद झाला. शुकाचार्यांनी उत्तर मागताच श्रीवेंकटेशाने त्या पत्राखालीच उत्तर लिहिले. 'राजा आपणास आमचा नमस्कार. ऋषींच्याकडून पाठविलेले पत्र मिळाले. आम्हास आनंद जाहला आहे. वैशाख शुद्ध दशमीस आपण मुहुर्त निश्चय केला आहे. विवाहास येऊन कार्यसांग करावे. माझी मुलगी मी आपणास अर्पण केली आहे हा मजकूर समजला. आम्ही आपल्या म्हणण्याचा स्वीकार केला आहे.' असे उत्तर देऊन ते शुकाचार्यांच्या मार्फत पाठवून दिले.*

*इकडे आकाशराजा पत्रोत्तराची वाट पहातच होता. तोच शुकाचार्य आले व त्यांनी श्री वेंकटेशाचे पत्र राजास दिले. राजास फार आनंद झाला. इतक्यात बकुलाही आपले कार्य करून आली. बकुलेला श्रीनिवासांनी अनेक अलंकार देऊन संतुष्ट केले व तिची स्तुती करून संतुष्ट केले.*

*नंतर बकुलेने लग्नाचे दिवस जवळ आले, आपली अद्याप काहीच तयारी नाही असे सांगताच श्री नारायणांनी तयारीस आरंभ केला. गरुडाचे स्मरण करताच ते आले. त्यांच्याकडून सर्वांना निमंत्रणाची व्यवस्था करविली. सर्व देवदेवता, उपदेवता, राजेरजवाडे यांनाही निमंत्रणे गेली. योग्यवेळी ब्रह्मदेव, शंकर, विष्णु, देव, गंधर्व, किन्नर वगैरे आकाश मार्गाने येऊ लागले असता आकाश भरून गेले. बकुळा विचारू लागली. 'नारायणा हे काय आहे?' भगवान म्हणाले, ' हे लग्नाचे वऱ्हाड येत आहे.' यात इंद्र, ब्रह्मदेव मुख्य होते. सर्व मंडळी जमली. श्री नारायणास सर्व देव भेटले. त्यांनी त्यांनी वंदन केले. विश्वकर्म्यास बोलावून भगवंतांनी मंडपाची व्यवस्था व सर्वांना राहण्यास जागा उत्तम तयार करवून घेतल्या. त्या जागा उत्तम असून रत्नखचित जमिनी व शृंगारलेल्या होत्या. प्रत्येक ठिकाणी त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे स्नान, भोजन, राहणे, झोपणे, बसणे, उठणे इ० व्यवस्था फार सुरेख केली होती. भिंतीवर सर्व देवतांची चित्रे काढली होती. मंडप पाहिला की, सर्व विश्व पाहिल्याचा भास होतसे. समोर बगीचे. त्यात कारंजी. कमळांनी सुशोभित सरोवरे इ० ते स्थान पाहून कोणाचीही तृप्ति होत नसे. अशी व्यवस्था करून विश्वकर्म्याने भगवंतास येऊन वंदन केले. त्यांनी त्याचा सत्कार केला. पुढील अध्यायात याहिपेक्षा सुरस कथा श्रोत्यांनी ऐकावी.*

श्रीपद्मावतीवल्लभाय नमः ॥ पंकजोद्भवजनका दीनदयाळा ॥ पद्मानाभा वैकुंठपाळा ॥ पद्मधर मित्रा तुझी लीला ॥ पयोधिवासा बोलवी पुढे ॥१॥तू षडविकाररहित पूर्ण ॥ तुज नाही आदि मध्य अवसान ॥ सर्वातर्यामी व्यापून सर्वाहूनी वेगळा तू ॥२॥तुझे गुणवर्णिता उठाउठी ॥ सहस्त्रमुख जाहला हिंपुटी ॥ नेति म्हणोनि शेवटी ॥ शय्या तुझी जाहला ॥३॥मी मतिमंद मानव पामर ॥ केवि वर्णू गुणसमुद्र ॥ जन्म सार्थक व्हावा साचार ॥ म्हणोनि वर्णन आरंभिले ॥४॥गंगा न प्राशवे म्हणोन ॥ उगाचि न बैसवे तृषार्त्याने ॥ क्षीरसिंधु नव्हे शोषण ॥ म्हणोनि क्षुधार्थी न बैसे ॥५॥तैसे यथामती करोन ॥ वर्णावे हरीचे गुण ॥ म्हणोन आरंभिले लेखन ॥ श्रीवेंकटेश

विजयाते ॥६॥जय मायाचक्र चाळका ॥ कर्माध्यक्षा कर्ममोचका ॥ निर्विकल्पवृक्षा विश्वव्यापका ॥ दीनरक्षका जगत्पते ॥७॥अनंतब्रह्मांडाचा नायक ॥ तुज नसे दुसरा नायक ॥ वेंकटेशविजय कौतुक ॥ सिद्धी पाववी सर्वेशा ॥८॥आकाशरायाचे घेवोनि पत्र ॥ वेंकटाद्रीसी निघाला व्यासपुत्र ॥ गतकथाध्यायी विचित्र ॥ मनोहर वर्णिली ॥९॥आता पुढील अनुसंधान ॥ जनक म्हणे शतानंदालागून ॥ बोल रसाळ कथागहन ॥ पुढे कैसे वर्तले ॥१०॥शतानंद म्हणे राया ॥ ऐक आता चित्त देऊनिया ॥ जे ऐकता पाविजे विजया ॥ होय काया पावन ॥११॥पत्र घेवोनि बादरायणी ॥ पावला वेंकटाद्री लागूनी ॥ येता देखिले दुरोनी ॥ श्रीनिवासे ते काळी ॥१२॥सामोरा येवोनि दीनदयाळ ॥ वंदिले ऋषीचे चरणकमळ ॥ म्हणे कार्य सफळ की निष्फळ ॥ सांग आदि ऋषिवर्या ॥१३॥यावरी शुक बोले गोष्टी ॥ तू ब्रह्मांड नायक जगजेठी ॥ इच्छा मात्रे सर्वसृष्टी ॥ घडामोडी करिशी पै ॥१४॥तुझे कार्य निष्फळ ॥ कैसे होईल सर्वकाळ ॥ तू परब्रह्म तमाळनीळ ॥ सफळ कार्य तुझे असे ॥१५॥हरीनी शुकासि आलिंगूनी ॥ बैसउनी दिव्यासनी ॥ वर्तमान मुळीहूनी ॥ पुसिले सर्व ऋषीप्रती ॥१६॥मग रायाचे जे का लिखित ॥ श्रीनिवासाचे करी देत ॥ ते उकलोनिया जगन्नाथ ॥ वाचिता जाहला ते काळी ॥१७॥पत्रार्थ पाहोनी सर्व ॥ संतोषला रमाधव ॥ शुकाचे कंठी देवराव ॥ मिठी घाली स्वानंदे ॥१८॥शुक म्हणे त्रिभुवनपती ॥ उत्तर देई पत्रावरुती ॥ ऐसे ऐकता कमळापती ॥ उतर निश्चिती लिहीतसे ॥१९॥त्याचि पत्राखाली श्रीधर ॥ उत्तर लिहिता झाला सत्वर ॥ तेचि परिसावे श्रोते चतुर ॥ अत्यादरे करोनिया ॥२०॥जितुके तीर्थ पृथ्वीवरुती ॥ तस्वरूप तू आकाशभूपते ॥ नारायणपुरीचा नरपती ॥ नमन तुजप्रती असो पै ॥२१॥वेंकटाद्रीहूनी श्रीनिवास ॥ विज्ञापना करी विशेष ॥ व्यासपुत्र शुकाचार्यास ॥ पत्र देवोनि पाठविला ॥२२॥तो पत्र घेवोनि लवलाही ॥ प्रविष्टला आम्हांशी सुसमयी ॥ पत्रार्थ पाहता सर्वही ॥ परमानंद जाहला ॥२३॥पद्मसंभव कन्यासुंदरी ॥ आम्हांसि अर्पिली निर्धारी ॥ वैशाखशुद्ध दशमी भृगुवारी ॥ लग्न नेमिले असे पै ॥२४॥त्या संधीसी येऊनी ॥ कार्यसिद्धी करावी म्हणोनी ॥ पत्राभिप्राय सर्वही मनी ॥ मनन जाहला निर्धारी ॥२५॥तुमची आज्ञा प्रमाण ॥ केले आम्ही वचन मान्य ॥ पद्मसंभव कन्यारत्न ॥ अंगीकारिली निर्धारी ॥२६॥वैशाखमासी निघोन ॥ येतो आम्ही लग्नाकारण ॥ ऐसे उत्तर लिहून ॥ शुका करी दीधले ॥२७॥हरिआज्ञा घेवोनि त्वरा ॥ व्यास पुत्र गेला नारायणपुरा ॥ वर्तमान सांगता नृपवरा ॥ परमसंतोष जाहला ॥२८॥इकडे बकुला निघोन ॥ आली वेंकटाद्रीसी त्वरेन ॥ भेटली वेंकटेशालागून ॥ वर्तमान श्रुतकरी ॥२९॥म्हणे जगन्निवासा अवधारी ॥ आता कार्यसिद्धी जाहली खरी ॥ दृढनिश्चय करोनि निर्धारी ॥ मगराये पत्र दीधले ॥३०॥श्रीहरी म्हणे धन्यमाते ॥ तुवा साधिला कार्यार्थ ॥ तुझे उपकार जाहले अगणित ॥ न विसंबे कदापि ॥३१॥असो नानापरी नारायण ॥ गौरविले बकुले कारण ॥ स्वामिगौरव स्वमुखे करोन ॥ तुच्छ सुधा सत्यापुढे ॥३२॥असो काही दिवस गेलियावरी ॥ बकुला म्हणे मधुकैटभारी ॥ लग्नाचे दिवस यावरी ॥ जवळी आले सर्वेशा ॥३३॥अद्यापवरी साहित्य ॥ काहीच केले नाही सत्य ॥ तुजकडे वराडी यथार्थ ॥ कोणीच दिसत नाही की ॥३४॥राजयाचे संगती ॥ त्याचे वराडी बहुत मिळती ॥ त्याही साहित्य नानारीती ॥ सिद्ध केले असेल ॥३५॥आम्हाकडे न दिसे कोणी ॥ हेचि चिंता वाटे मनी ॥ पुराणपुरुषा मोक्षदानि ॥ कैसे यासि करावे ॥३६॥बकुलेचे वचन ऐकोन

॥ हास्य करी नारायण ॥ म्हणे या चिंतेचे कारण ॥ काहीच नसे जननिये ॥३७॥क्षणमात्रे सर्व साहित्य ॥ सिद्ध होईल पै यथार्थ ॥ वराडी मिळतील असंख्यात ॥ पाहे माते यावरी ॥३८॥ऐसे बोलोनि जनार्दन ॥ केले गरुड शेषांचे स्मरण ॥ तात्काळ पातले दोघेजण ॥ श्रीनिवासा जवळी पै ॥३९॥उभयता येवोनि ते वेळा ॥ वंदिले हरीचे चरणकमळा ॥ म्हणती भक्तवत्सला घननीळा ॥ कायते आज्ञा करावी ॥४०॥दीनबंधो दितिज संहारा ॥ दयासागरा क्षीराब्धिविहारा ॥ कायती आज्ञा विश्वंभरा ॥ निरोपी आता आम्हाप्रती ॥४१॥गरुडासि म्हणे हृषीकेशी ॥ तुवा जावे सत्यलोकासी ॥ माझी आज्ञा विधीपाशी ॥ कथन केली पाहिजे ॥४२॥मी देतो लिखितपत्र ॥ ते घेवोनि जायसत्वर ॥ चतुर्दशलोकीचे राहणार ॥ लग्नाकारणे आणावे ॥४३॥स्त्रियापुत्र अवघेजण ॥ आपुली सेनासंपती घेऊन ॥ वस्त्रालंकारसहित पूर्ण ॥ परमगजरे येईजे ॥४४॥रथ अश्व कुंजर ॥ विमानादि वाहने परिकर ॥ सहित घेवोनी सत्वर ॥ वेंकटाद्रीसी यावे पै ॥४५॥वैशाखशुद्ध दशमीसी ॥ लग्न नेमिले निश्चयेसी ॥ याकरणे गरुडा वेगेसी ॥ आताची जाई सत्वर ॥४६॥मग स्वहस्ते लिहोनि पत्र ॥ गरुडाकरी दीधले सत्वर ॥ आज्ञा वंदोनी खगेश्वर ॥ सत्यलोकासी चालिला ॥४७॥शेषाप्रती श्रीनिवास ॥ बोलता जाहला परमपुरुष ॥ तुवा जावोनि कैलासास ॥ शंकरासि बोलाविजे ॥४८॥आकाशरायाची कन्यका ॥ पद्मावती नामे चंपककलिका ॥ मजलागी अर्पिली देखा ॥ आकाशराये प्रीतीने ॥४९॥वैशाखशुद्धदशमी भृगुवार ॥ लग्ननेमिले असे साचार ॥ तुवा जावोनि सत्वर ॥ बोलवावे शंकराते ॥५०॥स्कंद आणि गजानन ॥ अष्टसिद्धी अष्ट भैरव पूर्ण ॥ साठिकोटी शिवगण ॥ लग्नाकारणे येईजे ॥५१॥नव कोटी कात्यायनी ॥ चौसष्टि कोटी महायोगिनी ॥ यांसहित गजास्य जननी ॥ लग्नाकारणे आणावी ॥५२॥छप्पन्नकोटी चामुंडासहित ॥ जगन्मातेसी आणावे एथ ॥ तात्काळ देखोनी लिखित ॥ म्हणे आताचि जाई झडकरी ॥५३॥चरण वंदोनी भोगिनाथ ॥ कैलासासि चालिला त्वरित ॥ इकडे सत्यलोकासि विष्णुरथ ॥ जाता जाहला ते काळी ॥५४॥तो सभा घनवटली अपूर्व ॥ सिंहासनी बैसला कमळोद्भव ॥ सम्मुख उभे सर्वदेव ॥ करजोडोनि साक्षेप ॥५५॥जैसे पुष्पराग रत्न ॥ तैसे प्रभामय ब्रह्मभुवन ॥ तेजोमय विराजमान ॥ पाहता मन भुलोनि जाय ॥५६॥मरुद्गण पितृगण ॥ एकादश रुद्र द्वादशादित्य जाण ॥ अष्टवसु दिक्पाळ पूर्ण ॥ कर जोडोनी तिष्ठती ॥५७॥यक्षगण गंधर्व किन्नर ॥ अष्टविनायकविद्याधर ॥ पुढे उभा सनत्कुमार ॥ करजोडोनी सर्वदा ॥५८॥मूर्तिमंत वेद चारी ॥ तेथे असती जाण निर्धारी ॥ सरस्वती आणि सावित्री ॥ पादसेवन करती पै ॥५९॥असो ऐसा सभेसि चतुरानन ॥ बैसला असता आनंदघन ॥ तो अकस्मात गुरूत्मान ॥ पत्र घेवोनी पातला ॥६०॥वंदोनिया ब्रह्मयासी ॥ पत्र दीधले वेगेसी ॥ म्हणे आज्ञा दिधली हृषीकेश ॥ सत्वर लग्नासी चलावे ॥६१॥घेवोनिया परिवार सहित ॥ वेंकटाद्रीसी यावे निश्चित ॥ मग कमलासन बोलत ॥ गरुडाकारणे ते काळी ॥६२॥कोणाचे लग्न काय वर्तमान ॥ कन्या कोणाची नवरा कोण ॥ कोठे आहे जगन्मोहन ॥ भक्तवत्सल जगदात्मा ॥६३॥बहुतदिवस नाही भेटी ॥ सुखी आहे की जगजेठी ॥ गरुडा तू असणार हरीनिकटी ॥ वर्तमान सर्व सांगे ॥६४॥यावरी बोले विनतासुत ॥ वैकुंठी असता जगन्नाथ ॥ भृगुऋषीने मारिली लाथ ॥ श्रीनिवासासी निर्धारी ॥६५॥त्या कोपे रुसोनी इंदिरा ॥ जाती जाहली करवीरपुरा ॥ तिच्या वियोगे वैकुंठपुरा ॥ त्यागोनी महीवरी

पातले ॥६६॥श्रीवेंकटाद्रि गिरिवरी ॥ राहता जाहला मधुकैटभारी ॥ आकाशरायाची कुमारी ॥ पद्मसंभव कन्या असे ॥६७॥ते दीधली श्रीहरीप्रती ॥ वैशाखमासी लग्ननिश्चिती ॥ याकारणे श्रीपती ॥ तुम्हा लागी बोलाविले ॥६८॥ऐकता ऐसे वर्तमान ॥ आनंदला कमलासन ॥ लग्नपत्रिका उकलोन ॥ वाचिता झाला ते काळी ॥६९॥सुवर्णाक्षर सुंदर ॥ पत्रिका लिहिली मनोहर ॥ जैसा पूर्णिमेचा चंद्र ॥ तैसे दिसे पत्र ते ॥७०॥जो सरस्वतीच्या पतीचा पिता ॥ काय त्या अक्षरांची कौशल्यता ॥ सहस्त्रवदनासि वर्णिता ॥ नवर्णवेची सहसाही ॥७१॥पत्रवाचित कमलोद्भव ॥ सभाजन ऐकती सर्व ॥ देवगण आणि गंधर्व ॥ सावधान होवोनिया ॥७२॥चिरंजीवा दीर्घायुष्या ॥ चतुरानना सत्यलोकेशा ॥ वेंकटाद्रीहूनि श्रीनिवास ॥ आशीर्वाद लिहितसे ॥७३॥सोमवंशीचा भूभुज ॥ नाम तयाचे आकाशराज ॥ त्याची कन्या परमसतेज ॥ पद्मावती नाम तिचे ॥७४॥ती दिधली मजसी ॥ वैशाख शुद्ध दशमी दिवशी ॥ लग्न नेमिले निश्चयेसी ॥ यास्तव तुम्हासी लिहिले असे ॥७५॥सहकुटुंब सहपरिवार ॥ तेत्तिसकोटी देवसमग्र ॥ सहित स्त्रियावस्त्रालंकार ॥ समवेत निघोनि येईजे ॥७६॥विलंब न करावा यथार्थ ॥ पत्र पाहताचि निघा समस्त ॥ ऐसे ऐकताची सत्य ॥ आनंद भरित जाहले ॥७७॥मग आज्ञापी कमळासन ॥ म्हणे दुंदुभी वाद्य वाजवोन ॥ श्रुत करावे सर्वालागून ॥ वेंकटाद्रीसी जावया ॥७८॥सेवक धावले चहूकडोन ॥ चतुर्दशलोकी जाणविले पूर्ण ॥ निघा सर्व अविलंबे करून ॥ लग्नाकारणे निर्धारी ॥७९॥ऐसी आज्ञा परिसोन ॥ लगबग करिती अवघेजण ॥ नुतन वस्त्रालंकार नेसून ॥ सिद्ध जाहले तात्काळी ॥८०॥सत्यलोकींचे सर्वजण ॥ निघाले हंसारूढ होवोन ॥ सावित्रि आदि स्त्रियापूर्ण ॥ मुख्य तिघे जणी निघाल्या ॥८१॥लेऊनि अमोल्य वस्त्रालंकार ॥ दिसती जेवि विद्युलतांचे भार ॥ आपापले वाहनी सत्वर ॥ बैसते जाहले सर्वही ॥८२॥तंतवितंत घन सुस्वर ॥ चतुर्विध वाद्यांचे लागले गजर ॥ तेणे नाद अंबर ॥ दणाणिले ते काळी ॥८३॥शची सहित पुरंदर ॥ ऐरावतारूढ निघाला सत्वर ॥ दुंदुभी वाजती एकसरे ॥ परमानंदे करोनिया ॥८४॥इंद्र अग्नि यम नैऋत्य ॥ वरुण समीर कुबेर सत्य ॥ परिवारेसि दिक्पाळ यथार्थ ॥ निघते जाहले ते काळी ॥८५॥मरुद्गण पितृगण ॥ एकादश रुद्र द्वादशादित्य जाण ॥ अष्टवसु गंधर्व गण ॥ अष्टनायिका निघाल्या ॥८६॥यक्ष आणि किन्नर ॥ निघाले नारद आणि तुंबर ॥ सनकसनंदन सनत्कुमार ॥ निघते जाहले ते काळी ॥८७॥मित्रलोक चंद्रलोक ॥ निघाले सर्वतेथींचे लोक ॥ आपुली संपत्ति घेवोनी सकळिक ॥ पहावया कौतुक पातले ॥८८॥सत्यलोकापासून ॥ स्वर्लोकापर्यंत संपूर्ण ॥ स्त्रिया पुरुष थोर लहान ॥ सर्वजण पातले ॥८९॥अवघे होवोनी एकत्र ॥ धडकत वाद्यांचे गजर ॥ वेंकटाद्रि लक्षोनि साचार ॥ उतरते जाहले सर्वही ॥९०॥असंभाव्य नभ मंडळी ॥ विमानांची दाटी जाहली ॥ रथ अश्व कुंजर याने सकाळी ॥ उतरताती भूमीवरी ॥९१॥अत्यंत गजर ऐकोन ॥ बकुला पाहे बाहेर येवोन ॥ तो वाद्यनादे गगन ॥ कोंदोनिया गेले असे ॥९२॥वरते पाहे ते अवसरी ॥ तो असंभाव्य पुष्करी ॥ बकुला मनी आश्चर्यकरी ॥ श्रीहरीप्रती बोलतसे ॥९३॥म्हणे हे पुराणपुरुषोत्तमा ॥ अज अजित मेघश्यामा ॥ मायातीता परब्रह्मा ॥ पूर्णकामा श्रीनिवासा ॥९४॥आश्चर्य दिसते मजप्रती ॥ काय दाटले आकाशावरुती ॥ असंख्य वाद्ये वाजती ॥ नवल श्रीपति वाटतसे ॥९५॥मग परमात्मा शेषशायी ॥ बकुलेसी बोले ते समयी ॥ म्हणे माते हे सर्वही ॥ वराडी पातले लग्नासी

॥९६॥कोणीच नाही आम्हापाशी ॥ म्हणोनि चिंता तुझे मानसी ॥ हे वरादी पाहे कुटुंबेसी ॥ पातले आता जननिये ॥९७॥ऐसे बोलता नारायण ॥ तो अकस्मात उतरले सुरगण ॥ दाटी जाहली संपूर्ण ॥ शेषाद्रीवरी ते काळी ॥९८॥रथ अश्व वाहन समस्त ॥ सैरावैर उतरले तेथ ॥ तेत्तिस कोटि सुरगण सत्य ॥ वेंकटाद्रीवरी मिळाले ॥९९॥मुख्य त्यात दोघे जण ॥ कमलोद्भव आणि शचीरमण ॥ श्रीहरीचे दर्शनाकारणे ॥ पुढे चालिले ते काळी ॥१००॥मागूनि चालिले सर्व देव ॥ मंदिरी बैसले रमाधव ॥ कमळासन आणि वासव ॥ साष्टांग नमन करिती पै ॥१॥मग अनुक्रमे करोन ॥ सर्व देवी वंदिले हरिचरण ॥ सावित्र्यादि स्त्रिया अवघ्या जणी ॥ श्रीहरीचे चरण वंदिले ॥२॥असो यथावकाश सर्व ॥ पर्वतावरी उतरले देव ॥ इकडे कैलासासि भोगिराव ॥ पत्र घेवोनि पावला ॥३॥शुभ्र वर्ण कैलासभुवन ॥ उंच सतेज विराजमान ॥ शुभ्र मंडप विशाळ गहन ॥ सिंहासन शुभ्र दिसतसे ॥४॥घवघवीत दिसे कर्पूरगौर ॥ मृडानी सहित जगदुद्धार ॥ पुढे विराजे नंदिकेश्वर ॥ शुभ्रवर्ण उभा असे ॥५॥गजानन स्कंद वीरभद्र ॥ कर जोडोनी उभे समोर ॥ नारद आणि तुंबर ॥ गाती सर्वदा शिवलीला ॥६॥चौदा भुवनी अधिपसत्य ॥ ते एथे असती होवोनि भृत्य ॥ तेत्तिस कोटी देव समस्त ॥ त्रिकाळ येती दर्शनासी ॥७॥रजतमांची वार्ता ॥ तेथे नाहीच सर्वथा ॥ वैराग्यशीळ पाहता ॥ जन तेथींचे सर्वही ॥८॥साठिकोटी गण समग्र ॥ उभे असती शंकरा समोर ॥ अर्धांगी गिरिजा सुंदर ॥ जगन्माता बैसली ॥९॥सर्वांगी चर्चिले भस्म ॥ सर्वभूषणे शोभती परम ॥ व्याघ्राजिन गजाजिन उत्तम ॥ रुंडमाळा सतेज ॥११०॥दशभुज आयुधे सुंदर ॥ विराजमान नीलकंधर ॥ ललाटी शोभे किशोरचंद्र ॥ मस्तकी नीर वाहतसे ॥११॥उदार सुहास्य वदन सुंदर ॥ तृतीयनेत्री वैश्वानर ॥ ऐसे स्वरूप मनोहर ॥ कद्रुतनये देखिले ॥१२॥पत्र करी देवोनी उत्तम ॥ चरणी लागला भुजंगम ॥ विनत होवोनी सप्रेम ॥ बोलता जाहला तेकाळी ॥१३॥म्हणे पंचदश नयना त्रिपुरारी ॥ हिमनगजामाता खट्वांगधारी ॥ सर्वव्यापका सर्वांतरी ॥ नांदसी निर्धारी विश्वेशा ॥१४॥श्रीवेंकटेशगिरी पासोन ॥ आलो स्वामिदर्शना लागोन ॥ श्रीनिवासे तुम्हाकारण ॥ बोलाविले जगदीशा ॥१५॥पत्र दीधले नारायणे ॥ ते पहावे आता वाचून ॥ सहपरिवारे लग्नाकारण ॥ श्रीवेंकटाद्रीशी चलावे ॥१६॥ ऐसे ऐकताचि वचन ॥ सदाशिव परम आनंदोन ॥ तात्काळ पत्र उकलोन ॥ पाहता जाहला जगदात्मा ॥१७॥पत्रात लिहिले नारायणे ॥ तेचि परिसा श्रोतेजन ॥ सावध ऐकती सभाजन ॥ गिरिजे सहित ते काळी ॥१८॥श्रीमत्कैलासाचळविहारा ॥ मीनकेतनारे अंधकसंहारा ॥ भक्तकैवारी त्रिपुरहरा ॥ श्रीशंकरा उमापते ॥१९॥श्रीनिवास साष्टांग नमन ॥ करी तुज वेंकटाद्रीहून ॥ तुझे कृपेने क्षेम कल्याण ॥ आजिवरी असे पै ॥१२०॥आता पत्र ल्याहावयासी कारण ॥ आकाशराज गुणनिधान ॥ त्याची कन्या परमसगुण ॥ पद्मावती नामे असे ॥२१॥ती दीधली मजप्रते ॥ लग्न धरिले यथायुक्ती ॥ वैशाखशुद्धपक्ष निश्चित्ती ॥ दशमी भृगुवारी नेमिले ॥२२॥याकरिता भोगिभूषणा ॥ परिसावी माझी विज्ञापना ॥ सहपरिवारे निघोन ॥ लग्नाकारणे येईजे ॥२३॥कुमार आणि करिराजवक्र ॥ साठिकोटी गण समग्र ॥ आपापले शस्त्रवस्त्र ॥ सहित त्वरे येईजे ॥२४॥सखियासहित त्रिजगज्जननी ॥ संगे आणावी हेरंबजननी ॥ एवं सर्वासहित निघोनी वेंकटाद्रीसी येइजे ॥२५॥ऐसे पत्र पाहता निर्धारी ॥ आनंद मय जाहला त्रिपुरारी ॥ सर्वांसही आज्ञा करी ॥ निघाला झडकरी

अविलंबे ॥२६॥मग तात्काळ अवघे जण ॥ सिद्ध जाहले शिवगण ॥ नाना वाहने आणि विमान ॥ आरूढ ते जाहले ॥२७॥सर्वांआधी विनायक ॥ निघता जाहला विघ्ननाशक ॥ सिद्ध करोनिया मूषक ॥ तयावरी बैसला ॥२८॥मयूरारूढ षाण्मातुर ॥ निघता जाहला हो सत्वर ॥ नंदिवाहन कर्पूरगौर ॥ सिद्धकरोनि चालिले ॥२९॥आदिमाता हिमनगनंदिनी ॥ तात्काळ निघाली सिंहवाहिनी ॥ सवे निघाल्या कात्यायनी ॥ चामुंडा योगिनी समवेत ॥१३०॥साठिकोटि गण समग्र ॥ नानावाद्ये वाजविती परिकर ॥ लक्षोनि वेंकटाद्री गिरिवर ॥ उतरते झाले ते काळी ॥३१॥वृषभ सिंहासी वैरदेख ॥ तैसेचि सर्प आणि मूषक ॥ परी निर्वैर चालती कौतुके ॥ करणी अद्भुत शिवाची ॥३२॥असो ऐशा गजरेंशी ॥ पावले वेगे वेंकटाद्रीसी ॥ भेटावया श्रीहरीसी ॥ येता जाहला सदाशिव ॥३३॥सामोरा जावोनि जगज्जीवन ॥ वंदिले मदनारीचे चरण ॥ एकमेकांसी आलिंगन ॥ देते जाहले ते काळी ॥३४॥देवांसमवेत कमळासने ॥ शिवासि वंदिले प्रीतीकरून ॥ मग सर्वांसहित नारायण ॥ सभा करोनि बैसला ॥३५॥जिकडे होता स्त्रियांचा मेळा ॥ तिकडे गेली हिमनगबाळा ॥ सावित्री आदि स्त्रिया सकळा ॥ एकीकडे राहिल्या ॥३६॥असो यावरी नारायण ॥ विश्वकर्म्यासि बोलावून ॥ आज्ञा दिधली मनमोहने ॥ न लागता क्षण ते काळी ॥३७॥म्हणे तुवा नारायणपुरा जाऊन ॥ मंडप रचावे विस्तीर्ण ॥ सर्वांसही उतरावया कारण ॥ शोभायमान करावे ॥३८॥हेमरत्न अलंकृत ॥ मंडप रचावे शोभिवंत ॥ स्त्रियांसि रहावया तेथ ॥ प्रत्येक स्थळ निर्मावे ॥३९॥बैसावया सभास्थान ॥ करावे सुंदर प्रभाघन ॥ उदकाच्या पुष्करणी जाण ॥ स्थळो स्थळी कराव्या ॥१४०॥लग्नाचे दिवस आले समीप ॥ शीघ्र जाहले पाहिजेत मंडप ॥ ऐसी आज्ञा वैकुंठाधिप ॥ देता जाहला तेधवा ॥४१॥अवश्य म्हणोनि झडकरी ॥ विश्वकर्मा निघाला ते अवसरी ॥ येवोनिया नारायणपुरी ॥ मंडपासी आरंभिले ॥४२॥जे का मर्गज पाषाण ॥ याहीच पाया काढिला भरून ॥ काश्मीराचे मंडपांगण ॥ साधिता जाहला ते काळी ॥४३॥स्फटिक शिळेची पोवळी ॥ आठहि आया साधिली तळी ॥ अष्टकोनी महाबळी ॥ अष्टदिक्पाळ स्थापिले ॥४४॥काश्मीराच्या रचिल्या भिंती ॥ हिरियाचे खांब लखलखिती ॥ सुवर्णाची तुळवटे निश्चिती ॥ लंबायमान पसरली ॥४५॥मंडप सर्वदा प्रभाघन ॥ नाही चंद्रसूर्याचे कारण ॥ रत्नमय प्रकाशगहन ॥ अंतरबाह्य लखलखितसे ॥४६॥ हिरियाचे केले सोपान ॥ पुष्परागांच्या चवकटी विराजमान ॥ पद्मरागाचे तोळंबे पूर्ण ॥ मनोहर दिसती ॥४७॥शतखणी मंडप विचित्र ॥ मुक्ताफळांचे सोडिले जालंदर ॥ नीळरत्नाचे मयूर ॥ प्राण नसता धावती ॥४८॥गरुड पाचूचे कीर ॥ शब्द करिती नवलथोर ॥ भिंतीवरी लिहिले चित्र ॥ छपन्नदेशींचे सर्वही ॥४९॥ते पाहता मंडपस्थान ॥ तेणे अवघी पृथ्वी पाहिली पूर्ण ॥ सुरगण गंधर्व मुनिजन ॥ चित्रे लिहिली भिंतीवरी ॥१५०॥शाण्णावकुळीचे राजे परिकर ॥ ज्याची आकृति जैसी साचार ॥ तैसेचि लिहिले भिंतीवर ॥ नवल थोर वाटतसे ॥५१॥स्थळी स्थळी पुष्करणी सुंदर ॥ माजी भरिले सुवासनीर॥ वर्णिता तेथींचा विस्तार ॥ सहस्त्रवर्षे न सरेची ॥५२॥तीन सहस्त्र योजन ॥ मंडप केले विस्तीर्ण ॥ पृथ्वीवरील सौंदर्य पूर्ण ॥ एकवटले तयास्थळी ॥५३॥घटिके न घटिका दिवस भरता ॥ तास पिटी पुतळी तत्वता ॥ ते स्थान पाहता ॥ तृप्ती नाही मनाते ॥५४॥असो ऐसे रचोनि दिव्यमंदिर ॥ वेंकटाद्रीसी पातला सत्वर ॥ विश्वकर्म्याने जगदुद्धार ॥ साष्टांग नमिला प्रीतीने ॥५५॥म्हणे आदि पुरुषा

श्रीनिवासा ॥ भक्तवत्सला क्षीराब्धिवासा ॥ दीनदयाळा मायावेषा ॥ परमपुरुषा श्रीहरी ॥५६॥हरी तुझी आज्ञा प्रमाण ॥ मंडप निर्मिले शोभायमान ॥ ऐकता संतोषला रमारमण ॥ गौरविले विश्वकर्म्याते ॥५७॥वेंकटेश विजय ग्रंथगहन ॥ हाचि केवळ आनंदवन ॥ भक्तियुक्त भाविकजन ॥ यात्रे लागी धावती ॥५८॥प्रेम हे जान्हवी नीर ॥ स्नान करोनी सज्जन नर ॥ श्रीवेंकटेश हा विश्वेश्वर ॥ दर्शनालागी धावती ॥५९॥दर्शन घेवोनी जाण ॥ जे करिती पारायण प्रदक्षिणा ॥ त्यांचे तुटोनि जन्ममरण ॥ कैवल्यधामा पावती ॥१६०॥पुढील अध्यायी विचित्र ॥ कथा असे परम मनोहर ॥ ते श्रवण करिता दोष समग्र ॥ भस्म होती एकदाची ॥६१॥ती कथा गोड गहन ॥ श्रवण करोत पंडितजन ॥ तेणे तुष्टे नारायण ॥ श्रीवेंकटेश दयाब्धि ॥६२॥आदि पुरुषा निर्विकारा ॥ श्रीमच्छेषाचल विहारा ॥ वीरवरदा रमावरा ॥ जगदुद्धारा जगत्पती ॥६३॥इति श्रीवेंकटेशविजयसुंदर ॥ संमतपुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ अष्टमाध्याय गोड हा ॥१६४॥८॥एकंदर ओवीसंख्या ॥१३०३॥

# अध्याय ९ वा

*श्रीवेंकटेशाच्या विवाहाकरिता सर्व देव वेंकट पर्वतावर आले. देवांनी विश्वकर्म्यास मंडप घालण्यास सांगितल्याचे वृत्त आठव्या अध्यायात आहे.*

*यानंतर ब्रह्मदेवांनी श्रीवेंकटेशास मंगलस्नान करण्यास सांगितले असता देव विचार करू लागले. येथे अठ्याऐंशी हजार ऋषि व तेहत्तीस कोटी देव वगैरे जमा झाले आहेत तेव्हा यांच्या व्यवस्थेकरिता कामे वाटून दिली पाहिजेत.*

*नंतर वसिष्ठ ऋषीस पौरोहित्य करण्यास सांगितले. शंकरांनी देव व ऋषीचे स्वागत करावे षडाननाने बोलावून योग्य ठिकाणी त्यांना बसवावे त्याला मदनाने मदत करावी. वरुणाने जलपुरवठा करावे. यमाने दुष्टांना शासन करावे. वायूने सुगंधी पदार्थ पुरवावेत. अष्टवसूंनी भांडी घासावीत. नवग्रहांनी पाने मांडावीत.*

*इतक्यात श्रीवेंकटेश पूर्वपत्नी लक्ष्मीच्या स्मरणाने दुःखी झाले. दुःख का असे देवांनी विचारताच देवांनी कारण सांगितले असता सर्वांनी थोडासा विनोद केला. त्यावेळी देव म्हणाले, ती आल्यावाचून कार्यसिद्धि होणार नाही. नंतर सूर्यास बोलावून श्रीवेंकटेशांनी सांगितले, तू करवीरास जा. तेथे द्वारात उभा राहून रडण्याचे सोंग कर म्हणजे लक्ष्मी तुझी चौकशी करील व तुजबरोबर येईल. एकदा इकडे आल्यावर मी तिची समजूत करीन.*

*सूर्याने त्याप्रमाणे करताच श्रीलक्ष्मी धावत आली व तिने सूर्याची चौकशी केली. सूर्याने श्रीवेंकटेशाची पहिल्यापासून सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून महालक्ष्मी घाबरून रथावरून ताबडतोब श्रीवेंकटगिरीवर आली. देवांनी प्रेमभराने स्वागत करून सर्व हकीकत सांगितली असता देवी म्हणते आता माझी गरज काय? नवीन कपडा मिळाला असता जुन्यास कोण विचारतो ! देवांनी महालक्ष्मीचे समाधान केले. रामावतारातील आठवण करून वेदवतीबरोबर लग्न केले पाहिजे ही इच्छा तिला सांगताच तिला समाधान वाटले.*

*सोन्याच्या कढ्यात सुगंधी पाणी तापवून सर्वांनी मंगलस्नाने केली. चौकन्हाण वगैरे झाले. मंगलवाद्यांचे गजर सुरू झाले. नंतर श्रीदेवास केशरकस्तुरीचा मळवट भरून उत्तम कपडे नसविले. इकडे पुण्याहवाचनादिकांची तयारी होऊन वसिष्ठ ऋषीने कुलदेवतेची स्थापना करविली. मंडपदेवतांचे स्थापन झाले.*

*ब्रह्मदेवांनी सर्वांना भोजनाचे आमंत्रण दिले. इतक्यांच्या भोजनव्यवस्थेस पैसा अमाप लागणार म्हणून कुबेरांकडून कागद लिहून कर्ज आणविले. देवांनी साक्षी घातल्या. कारण हे कलियुग आहे. त्याप्रमाणे वागले पाहिजे. पैसा येताच सर्व साहित्य गरुडाकडून आणवून सर्व सिद्धता केली. स्वामीतीर्थात अग्निदेवांनी उत्तम अन्न शिजविले. आकाशगंगेत खीर, देवतीर्थात सर्व भाज्या शिजविल्या. स्वयंपाक झाल्यानंतर पांडूतीर्थापासून मल्लिकार्जुनापर्यंत पाने मांडली. शंकरांनि सर्वांचे स्वागत करून भोजनास बसविले. श्रीवेंकटेशांनी पंक्तीत फिरून सर्वांचा समाचार घेऊन सर्वांना संतुष्ट केले. भोजनोत्तर पान, तांबूल, दक्षिणा वगैरे वाटण्यात आली.*

*नंतर ब्रह्मदेव, इंद्र, शंकर, लक्ष्मीसह श्रीवेंकटेश भोजनास बसले. सर्वांची भोजने होईपर्यंत सुर्य मावळला. सर्वांनी रात्र तेथेच काढली.*

*दुसरे दिवशी सकाळी सर्वांनी आपापले आन्हिक उरकून आपापल्या वाहनावरून विवाहास जाण्यास सर्व देव तयार झाले. तो समारंभ फार अपूर्व झाला. इतकी गर्दी झाली की, कित्येकांचे कितीएक पदार्थ हरवले. कोणाची कोणास भेट होईना.*

*नारायणपुरास विवाहास जात असताना वाटेत श्रीशुकाचार्यांचा आश्रम लागतो. देव येत आहेत हे ऐकताच त्यांना फार आनंद झाला. ते स्वतः सामोरे गेले. स्वागत करून आपल्या आश्रमात त्यांना भोजन दिले. श्रीभगवान हे भक्तिप्रिय आहेत; त्यांना इतर कशाचीही गरज नाहि हे येथे दाखविले आहे. आम्हास सोडून एकट्या देवासच भोजन दिल्यामुळे इतर देवांना वगैरे राग आला. श्रीशुकाचार्यांस शाप देण्यास तयार झाले असता श्रीवेंकटेशांनी सर्वांचे समाधान केले. तो दिवस व रात्र श्रीशुकाचार्यांच्या आश्रमात घालविली व नंतर देव आपापल्या ऐश्वर्यासह मिरवत नारायणपुरास निघाले. यापुढील चरित्र पुढील अध्यायात पाहू.*

**श्रीहरिराजप्रसन्न ॥ जयजयाजी पुराणपुरुषोत्तमा ॥ अज अजित निर्वाणधामा ॥ सच्चिदानंदा सर्वोत्तमा ॥ तुझा महिमा अगम्य ॥१॥तुझी अगाधलीला जगत्पती ॥ वेदशास्त्रांसि नव्हे गणती ॥ मी मानव अल्पमती ॥ केवि स्तवन करू तुझे ॥२॥जरी महायज्ञ करोन ॥ तुझे करावे आराधान ॥ तरी दरिद्री अत्यंत दीन ॥ कैसे करवेल निर्धारी ॥३॥की तीर्थयात्रा कराव्या अगाध ॥ देह पाहिजे दृढ सुबद्ध ॥ किंवा नसता द्रव्यसंबंध ॥ तेही न घडे सर्वथा ॥४॥अथवा वेदशास्त्र पढून ॥ करावे तुझे आराधान ॥ कलियुगी अल्पायुषी पूर्ण ॥ ज्ञान हीन असा आम्ही ॥५॥याकारणे साधु थोर थोर ॥ तेही करोनि ठेले दृढ विचार ॥ सर्वामाजी नाम सार ॥ तुझे जपावे सर्वदा ॥६॥तेणे जन्ममरणांची पंगती ॥ प्राणियांच्या सर्व तुटती ॥ परी कलियुगामाजी श्रीपती ॥ पापमति आम्ही असो ॥७॥फुकाचे नाम तुझे सार ॥ तेही न घडे साचार ॥ मन बुद्धि चित्त अहंकार ॥ विषयपर सर्वदा ॥८॥दश इंद्रिये आणि मन ॥ भजनी तत्पर जाहलियाविण ॥ सिद्धि न पावेची साधन ॥ ते आमुचेनि न साधे ॥९॥आम्ही केवळ पतीत दीन ॥ तू दिनबंधु पतीत पावन ॥ ब्रीद तुझे गाजले पूर्ण ॥ ब्रह्मांडभरी जगदीशा ॥१०॥तरी आम्ही असो विषयासक्त ॥ आम्हासि पुरवोनी विषय पदार्थ ॥ तुझे चरणी स्थिरावे चित्त ॥ ऐसे करी नारायणा ॥११॥तू सर्वव्यापका जगज्जीवन ॥ दृश्यादृश्य पदार्थ पूर्ण ॥ स्थावर जंगमात भरून ॥ उरोनि असशी शेवटी ॥१२॥माझे मन अस्थिर चंचळ ॥ ज्या पदार्थाकडे जाईल ॥ त्या त्या पदार्थामाजी सकल ॥ तू घननीळ व्यापक ॥१३॥सर्वाघटी तूचि असता ॥ कासया पाहिजे मनाची स्थिरता ॥ हेचि ज्ञान स्थिरावे चित्ता ॥ जगन्नाथा ऐसे करी ॥१४॥पदार्थ मात्र सर्वही जाणा ॥ तुझे रूप भासो नारायणा ॥ भक्तवत्सला रमारमणा ॥ सर्वदा करी ऐसेची ॥१५॥असो आता हे बोल ॥ वेंकटेशविजय ग्रंथ निर्मळ ॥ आठ अध्याय रसाळ ॥ श्रीगोपाळे बोलाविले ॥१६॥अष्टमाध्यायाचे अंती ॥ सर्वदेवांसहित अमरपती ॥ सदाशिव आणि प्रजापती ॥ वेंकटाद्रीसी पातले ॥१७॥विश्वकर्म्यासि आज्ञापून ॥ मंडप रचविला शोभायमान ॥ गतकथाध्यायी**

वर्तमान ॥ इतुके जाहले निर्धारी ॥१८॥यावरी सूत वक्ता निपुण ॥ सांगे शौनकादिका लागून ॥ म्हणे ऐका पुढील अनुसंधान ॥ चित्त देवोनि निर्धारी ॥१९॥सर्वदेवासहित वेंकटेश ॥ सभेसी बैसला आदिपुरुष ॥ परमेष्ठी आणि महेश ॥ दोही भागी बैसले ॥२०॥यावरी कमळासन बोलत ॥ मंगळस्नान करोनि त्वरित ॥ पुण्याहवाचन करावे यथार्थ ॥ विलंब आता कसया ॥२१॥परी येथे मिळाले बहुत जन ॥ तेत्तिस कोटी पावले देवगण ॥ अठ्याऐंशी सहस्त्र ऋषि पूर्ण ॥ शिष्यासहित पातले ॥२२॥आता यासर्वालागून ॥ यथास्थित व्हावया मानपान ॥ तरी एथे कार्य वाटिल्या वाचोन ॥ सर्वथाही न होय ॥२३॥सर्वव्यापका जगज्जीवना ॥ कोणा योग्य कोण कारण ॥ हे न कळे आम्हा लागून ॥ तू नारायण जाणसी ॥२४॥मग बोलावोनि ऋषिवसिष्ठ ॥ पुरोहित नेमिला श्रीवैकुंठे ॥ यजुः शाखापूर्वक स्पष्ट ॥ स्वस्तिवाचन करावे ॥२५॥देव आणि ऋषीलागून ॥ शंकरे करावे स्वये नमन ॥ सर्वदेवांचे आवाहन ॥ शिखिवाहन करावे ॥२६॥आलियासि देऊन अभ्युत्थान ॥ बैसवावे माने करून ॥ हे कार्य मन्मथालागून ॥ सांगता झाला तेधवा ॥२७॥पाकसिद्धीचे कार्य ॥ स्वये करावे धनंजये ॥ स्वाहा स्वधांसहित पाहे ॥ तेचि कार्य करावे ॥२८॥लागेल जितुके उदक ॥ तितुके पुरवावे रसनायके ॥ दुष्ट दंडनार्थ देख ॥ वैवस्तासी सांगीतले ॥२९॥सर्वांसि सुगंध पदार्थ ॥ वायूने पुरवावे यथार्थ ॥ धन वस्त ब्राह्मणाते ॥ किन्नरेशे देइजे ॥३०॥दीपिका पाजळोनी सतेज ॥ स्वये धरावे उडुराजे ॥ अष्टवसु मिळोनि सहज ॥ भांडशुद्धी करावी ॥३१॥नवग्रह मिळोनि देखा ॥ पात्रे मांडावी सकळिका ॥ योग्यानुसार निजभक्तसखा ॥ कार्यसर्वांसी वाटिले ॥३२॥यावरी हिरण्यगर्भ बोले वचन ॥ म्हणे स्वामी शीघ्र उठोन ॥ करावे की मंगलस्नान ॥ पुण्याह वाचन करावया ॥३३॥ऐसे विधाता बोलता ॥ तो रमा आठवली जगन्नाथा ॥ वियोगानळे तत्वता ॥ नाठवे सर्वथा आन काही ॥३४॥अंतरी जाहला सद्गदित ॥ नेत्री अश्रुधारावाहत ॥ स्फुंडस्फुंदोनी वैकुंठनाथ ॥ रडो लागला ते काळी ॥३५॥कमळोद्भव म्हणे मुरारी ॥ का शोक आरंभिला ये अवसरी ॥ काय कारण मधुकैटभारी ॥ मज निर्धारी सांग आता ॥३६॥मग बोले शेषशायी ॥ सर्वसिद्ध जाहले ये समयी ॥ परी रमा येथे आली नाही ॥ न गमे पाही तियेविण ॥३७॥जैसे प्राणविणे शरीर ॥ की नासिके वाचोनि वक्र ॥ फळेविण तरुवर ॥ जीवनाविणे सरिता जेवी ॥३८॥की अलंकार गळसरीविणे ॥ की बुबुळावाचोनि नयन ॥ तैसे महालक्ष्मी वाचोन ॥ शोभा नयेचि मजलागी ॥३९॥भृगूने दीधली लाथ ॥ तेव्हा रुसोनि गेली करवीराते ॥ वियोग न सोसवे माते ॥ मी वैकुंठाते त्यागिले ॥४०॥वियोगानळे आहळत ॥ बहुत श्रमलो आजिपर्यंत ॥ आता उत्साह मांडला बहुत ॥ परी तियेवाचोनि व्यर्थ हे ॥४१॥असो तिचे आठवोनि गुण ॥ शोक करी जगन्मोहन ॥ याजवरी तो पंचवदन ॥ बोलता काय जाहला ॥४२॥म्हणे जगदात्मया वैकुंठराया ॥ का शोक मांडिलाशि वाया ॥ तिजवरी एवढी तुझी माया ॥ तरी लग्न कासया आरंभिले ॥४३॥लक्ष्मी गेली त्यागोन ॥ म्हणोनि आरंभिले हे लग्न ॥ पुन्हा शोक करिसी तिये कारण ॥ जगन्नाथा नवल हे ॥४४॥स्त्रियांचे स्वभाव नारायणा ॥ पुरुषासि जाहलीया

दुसरे लग्न ॥ तरी मत्सर उपजे मुळीहून ॥ समाधान न वाटे ॥४५॥श्रीनिवास म्हणे धूर्जटी ॥ तुम्हासी न कळे ही गोष्टी ॥ लक्ष्मी न आलिया शेवटी ॥ कार्य सर्वथा न होय ॥४६॥मग सूर्यासि बोलावून ॥ आज्ञापिता जाहला जगन्मोहन ॥ म्हणे तू करवीरालागून ॥ आताचि जावे निर्धारी ॥४७॥तेथे असे क्षीराब्धिसुता ॥ तिसी बोलावोनि आणी आता ॥ ती आलियाविणे सर्वथा ॥ समाधान न वाटे ॥४८॥भृगूने लाथ दिली म्हणोन ॥ ती मजवरी गेली रुसोन ॥ तै पासून माझे मन ॥ उदास असे सर्वदा ॥४९॥तरी तू जावोनि तेथवरी ॥ समजाऊनी आणावी बरी ॥ यावरी तो तमारी ॥ बोलता काय जाहला ॥५०॥आधीच गेली रुसून ॥ तुम्ही आरंभिले दुसरे लग्न ॥ हे ऐकोनि वर्तमान ॥ कैसी समजेल जगन्माता ॥५१॥यावरी बोले जगत्पती ॥ तुजवरी सर्वांहूनि तिची प्रीति ॥ तरी नानाप्रकारे करोनि युक्ती ॥ एथवरी आणी भास्करा ॥५२॥मी सांगतो तैसे करावे ॥ शीघ्रचि करवीर पुरा जावे ॥ महाद्वारी उभे रहावे ॥ मग आरंभावे शोकाते ॥५३॥दीर्घस्वरे करून ॥ करू लागावे रुदन ॥ मग ते इंदिरा घाबरोन ॥ पुसेल येवोनि तुजलागी ॥५४॥काय संकट पडले म्हणोन ॥ इंदिरा पुसेल तुजकारण ॥ तू काही न करिता अनुमान ॥ इतुकेच सांग तिजप्रती ॥५५॥म्हणावे तुझ्याविरहे करोन ॥ वैकुंठ त्यागिले नारायणे ॥ वेंकटाद्रिवरी येवोन ॥ राहिलासे उदास ॥५६॥तेथे होवोनि व्यथा भारी ॥ जर्जर जाहला असे मुरारी ॥ या व्यथेतून निर्धारी ॥ वाचे की न वाचे कळेना ॥५७॥ऐसे तियेसी सांगोन ॥ पुन्हा करावे दीर्घरुदन ॥ मग ती अविलंबे करून ॥ येईल तुज समागमे ॥५८॥एकदा एथे आलियावरी ॥ मग मी समजावीन निर्धारी ॥ ऐशा प्रकारे मधुकैटभारी ॥ सूर्यालागी बोधिले ॥५९॥तमांतके आज्ञा वंदोन ॥ रथी बैसला न लगता क्षण ॥ मनोवेगे करून ॥ करवीरपुरा पातला ॥६०॥उभा राहोनी महाद्वारी ॥ चंडकिरण रुदन करी ॥ जगन्माता घाबरली ॥ आली झडकरी त्यापाशी ॥६१॥बाळकाचे रुदन ऐकोन ॥ माता धावे कार्य टाकोन ॥ तैसे तरणीचे रुदन पाहोन ॥ त्रिभुवन जननी धावली ॥६२॥म्हणे भास्करा अवधारी ॥ काय दुःख जाहले भारी ॥ कोणे दुर्जने निर्धारी ॥ पीडा केली तुजलागी ॥६३॥जगज्जननी ऐसे बोलोन ॥ स्वकरे पुशिले नेत्रींचे जीवन ॥ कृपाकरे करोन ॥ कुरुवाळी वदन प्रीतीने ॥६४॥यावरी बोले सविता ॥ जगन्माते ऐक आता ॥ तू रुसोनि आलियावरी जगत्पिता ॥ वियोग सर्वथा न सोसवे ॥६५॥परम उदासीन होऊन ॥ टाकून दीधले वैकुंठभुवन ॥ सेविता जाहला कानन ॥ महादुःखे करोनिया ॥६६॥वेंकटाद्रीवरी आदिपुरुष ॥ वास केला काही दिवस ॥ तेथे व्यथा जाहली विशेष ॥ तेन सांगवेची जननिये ॥६७॥जर्जर जाहला दारुण ॥ न जाय पळमात्र उदकपान ॥ अत्यंत तंद्रीव्यापून ॥ ऊर्ध्वश्वास लागला ॥६८॥पुन्हा वदन दृष्टी पडेल ॥ हा भरवसा नाही वहिला ॥ यालागी पातलो ये वेळा ॥ माउलीपाशी सांगावया ॥६९॥ऐसे ऐकता जगत्रयजननी ॥ परम घाबरी अंतःकरणी ॥ तात्काळ रथारूढ होऊनी ॥ पवनवेगे चालिली ॥७०॥वेंकटाद्रीसमीप येत ॥ मिळाजे जेथे देव समस्त ॥ रथाखाली उतरत ॥ जगन्माता ते काळी ॥७१॥आली देखोनि विश्वजननी ॥ आनंदले सुधापानी ॥ तात्काळ उठोनि अवघे जणी ॥

लागले चरणी इंदिरेच्या ॥७२॥येता देखोनि इंदिरेप्रती ॥ तात्काळ उठिला श्रीपती ॥ चारीभुजा पसरोनि निश्चिती ॥ आलिंगिले सप्रेमे ॥७३॥म्हणे प्राणवल्लभे तुजविण ॥ मी झालो परदेशी दीन ॥ दिशा शून्य तुज वाचोन ॥ झाल्या मज निर्धारे ॥७४॥आलिंगिता कमळेसी ॥ पुष्ट जाहला हृषीकेशी ॥ अवघे वर्तमान इंदिरेसी ॥ कथन केले ते काळी ॥७५॥जगन्माता मग हसोन ॥ विनोदे हरीसी बोले वचन ॥ मिळाल्या वरी वस्त्र नूतन ॥ काय कारण जीर्णाचे ॥७६॥घृत सापडले सद्यस्तप्त ॥ संचित आज्य कोण सेवित ॥ नूतन स्त्री आली तुम्हाते ॥ कासया माते आणिले ॥७७॥सूर्याहाती असत्य ॥ बोलवूनि आणविले माते ॥ तुमची माया ब्रह्मादिकाते ॥ न कळेची जाण सर्वथा ॥७८॥अंतरी हर्ष परिपूर्ण ॥ बाहेर विनोदे बोले रुसोन ॥ यावरी जगदात्मा वचन ॥ काय बोलता जाहला ॥७९॥तुझ्या इच्छामात्रे करोन ॥ ब्रह्मांड घडामोडी होय पूर्ण ॥ मज देऊन तुवाच सगुणपण ॥ नाना अवतार धरविले ॥८०॥येरवी मी अव्यय निर्विकार ॥ मी नेणे काही विचार ॥ आता विवाह जो होणार ॥ हेही इच्छा तुझीच की ॥८१॥रामावतारी मजलागून ॥ वल्लभे तू कथिलेसी पूर्ण ॥ की वेदवती लागून ॥ लग्न केले पाहिजे ॥८२॥तेव्हा मी एक पत्नीव्रत ॥ म्हणोनि न पुरले मनोरथ ॥ आता तो समय प्राप्त ॥ जाहला सत्य प्रियकरे ॥८३॥तू केवळ माझी ज्ञानकळा ॥ अंतर खूण जाणोनी सकळा ॥ व्यर्थ रुसणे ये वेळा ॥ प्राणवल्लभे कासया ॥८४॥ऐसे श्रीनिवास बोलता ॥ संतोषली लोकमाता ॥ वचन दीधले प्राणनाथा ॥ सत्य केले पाहिजे ॥८५॥ऐकोनि तिचे वचन ॥ परम हर्षला नारायण ॥ मग करावया मंगलस्नान ॥ सिद्ध जाहला श्रीहरी ॥८६॥सुवर्णकढया अपार ॥ ठेविते झाले सत्वर ॥ नानातीर्थांचे निर्मळ नीर ॥ आणोनिया भरियेले ॥८७॥जातवेदे न लगता क्षण ॥ सिद्ध केले जळ तापवून ॥ मग पंच कलश ठेऊन ॥ सूत्र गुंडाळिले सावित्री ॥८८॥मांडिला रत्नखचित चौरंग ॥ वरी बैसविला भक्तभवभंग ॥ सुवर्णवाटीत अभंग ॥ सुगंध तैल आणविले ॥८९॥आपुल्या हस्ते क्षीराब्धिसुता ॥ अभ्यंग मर्दन करी तत्वता ॥ सूत्रात बैसवोनि जगन्नाथा ॥ मज्जनाशी आरंभिले ॥९०॥मुख्यस्त्रिया सहा जण ॥ इंदिरा माता स्वये जाण ॥ दुसरी अपर्णा सती पूर्ण ॥ सावित्री आणि सरस्वती ॥९१॥पाचवी गायत्री तत्वता ॥ सहावी अरुंधती वसिष्ठकांता ॥ या स्त्रिया मिळोनिया समस्ता ॥ करविती मज्जन ते काळी ॥९२॥वाद्ये वाजती अपार ॥ कृष्णचरित्र गाती किन्नर ॥ देवांगना परिकर ॥ नृत्य करिती स्वानंदे ॥९३॥उदक घालिती पाचजणी ॥ अंग घासी मन्मथजननी अरुंधती आरती वोवाळोनी ॥ आशीर्वाद देतसे ॥९४॥म्हणे जगदात्मया नारायणा ॥ दीर्घायुष्य होई जगद्भूषणा ॥ भाग्यवान पुत्रवान होऊन ॥ चिरकाळ नांदावे ॥९५॥असो गजरे जाहलिया मज्जन ॥ तडित्प्राय पीत वसन ॥ स्वहस्ते कमळा आपण ॥ नेसविती जाहली ते काळी ॥९६॥सर्वांगी केशराची उटी ॥ कस्तूरी तिलक ललाटी ॥ वैजयंती माळा कंठी ॥ दहा बोटी मुद्रिका ॥९७॥सूर्यप्रभे समान ॥ कौस्तुभ तेज विराजमान ॥ मुकुट कुंडले दैदीप्यमान ॥ मनमोहन गौरविला ॥९८॥मग वसिष्ठ भृगु जमदग्नी ॥ कश्यपात्रि आदि मिळोनी ॥ यजुर्वेदोक्त मंत्रे करोनि ॥

स्वस्तिवाचन पै केले ॥९९॥वसिष्ठ म्हणे नारायणा ॥ करावे कुलदैवत स्थापना ॥ तू देवाधिदेव सनातन ॥ दैवत तूझे कोणते ॥१००॥हरि म्हणे कुलदैवत ॥ शमी वृक्ष होय यथार्थ ॥ त्याची पूजा करोनिया निश्चित ॥ दैवत स्थापन करावे ॥१॥मग शमी पाशी येऊन ॥ करोनी यथासांग पूजन ॥ श्रीवराहासमीप जाण ॥ मंडप दैवत स्थापिले ॥२॥प्रार्थोनिया वराहरूपासी ॥ पूर्वस्थळा आले वेगेसी ॥ मग बोले हृषीकेशी ॥ चला आता सत्वर ॥३॥निघावे सर्वत्वरे करोन ॥ जाऊ नारायणपुरालागून ॥ यावरी तो चतुरानन ॥ काय बोलता जाहला ॥४॥स्वस्तिवाचन करोन ॥ उपोषित न जावे एथोन ॥ देवऋषि आदि करोन ॥ क्षुधाक्रांत जाहले ॥५॥सारोनिया भोजन विधी ॥ मग गमन करावे कृपानिधी ॥ तरी सर्वदेवविधी यथासांग होईल ॥६॥हरि विचारी अंतरी ॥ यासि करावी कैशीपरी ॥ भक्तपाळपूतनारी ॥ काय करिता जाहला ॥७॥अश्वत्थाखाली संपूर्ण ॥ विचारासि बैसले चवघेजण ॥ वेंकटेश आणि विधि ईशान ॥ वैश्रवण चवथा जाणपा ॥८॥हरि म्हणे विधीसी ॥ भोजन आधी करावयासी ॥ द्रव्यानूकूल्या आम्हापाशी ॥ नसे काहीच साक्षेप ॥९॥द्रव्यावाचोनि निश्चय ॥ कलियुगी नव्हे कोणतेही कार्य ॥ द्रव्यप्राप्तीसी उपाय ॥ करावा काय यावरी ॥११०॥द्रव्याविणे न होय सार्थ ॥ द्रव्याविणे नव्हे परमार्थ ॥ द्रव्याविणे प्रतिष्ठावंत ॥ सर्वथा नव्हे कलियुगी ॥११॥वयोवृद्ध तपोवृद्ध सत्य ॥ जरी ज्ञानवृद्ध जाहला यथार्थ ॥ तरी धनवृद्धाचे द्वारी तिष्ठत ॥ किंकर होऊनि सर्वदा ॥१२॥द्रव्य असलिया संचित ॥ त्यासी मानिती सर्व आप्त ॥ स्त्रिया आणि सुत॥ आदर बहुत करती पै ॥१३॥द्रव्य नसलिया पदरी ॥ स्त्रिया पुत्र अपमानिती भारी ॥ प्राण जाय ऐसे कठिणोत्तरी ॥ निर्भार्सिती सर्वस्वे ॥१४॥कलीमाजी द्रव्याविण ॥ पुरुषास नसे किंचितमान ॥ द्रव्यहीन तो मूर्ख जाण ॥ जिताचि प्रेतासारिखा ॥१५॥विद्या जवळी बहुत असे ॥ परी तयासी कोणी न पुसे ॥ तो बोलता म्हणती पिसे ॥ लागले असे यासी ॥१६॥यालागी कमळासन ॥ कैसे करावे यासि प्रयत्न ॥ विधि म्हणे कुबेरापासून ॥ द्रव्य मागोनि घेईजे ॥१७॥यावरी बोले वैश्रवण ॥ अवघे द्रव्य तुझेचि पूर्ण ॥ मी तुझा सेवक होऊन ॥ द्रव्य रक्षण करितसे ॥१८॥द्रव्य घ्यावयासी नारायण ॥ तू स्वतंत्र आहेसी जगन्मोहना ॥ मग इंदिरा मनरंजन ॥ काय बोलता जाहला ॥१९॥म्हणे पूर्वयुगी साचार ॥ म्या घेतले नाना अवतार ॥ तेवेळी कुबेराचे भांडार ॥ स्वतंत्रपणे आणविले ॥१२०॥परी आता असे कलियुग ॥ वेगळा असे हा प्रसंग ॥ युगानुसार कार्यभाग ॥ केला पाहिजे वैश्रवणा ॥२१॥शिवमित्र बोले लवलाहे ॥ जरी युगानुसार करावे कार्य ॥ पत्रलिहोनि स्वये ॥ देईसत्वर श्रीहरी ॥२२॥लिहोनि या ऋणपत्र ॥ साक्ष घालोनि देई सत्वर ॥ द्रव्य देतो निर्धार ॥ लग्नाकारणे तुझिया ॥२३॥मग जगदात्मा श्रीकरधर ॥ लिहोनि दीधले तात्काळ पत्र ॥ पत्राभिप्राय विचित्र ॥ ऐका चतुर पंडित हो ॥२४॥धनको नाम वैश्रवणविशेष ॥ ऋणको नाम श्रीनिवास ॥ आत्मकार्यालागी द्रव्यास ॥ घेतले असे तुजपाशी ॥२५॥चवदा लक्ष निष्क ॥ राममुद्रांकित सुरेख ॥ कल्याणार्थ देख ॥ घेतले असे निर्धारी ॥२६॥आजिपासोनि यथार्थ ॥ सहस्त्र वर्षापर्यंत ॥ द्रव्य

पोहोचेल समस्त ॥ संशय यात असेना ॥२७॥ऐसे लिहोनिया पत्र ॥ साक्ष घाली चतुर्वक्र ॥ दुसरी साक्ष त्रिपुरहर ॥ घालिता जाहला तेकाळी ॥२८॥श्रोते म्हणती नवलपूर्ण ॥ जगदात्मा आदि नारायण ॥ षड्गुणैश्वर्य संपन्न ॥ उणे काय तयाते ॥२९॥ज्याने कृपेने निर्धार ॥ सुदाम्यासि दिधले सुवर्णनगर ॥ उपमन्यूशी क्षीरसागर ॥ दीधला जाण निजकृपे ॥१३०॥ऐसे जगदात्मा भगवान ॥ कुबेरापाशी घेतले ऋण ॥ कुबेर मागतो पत्रलिहोन ॥ हे आश्चर्य वाटतसे ॥३१॥मेघ चातकासि मागे जीवन ॥ दाता दरिद्रियासी मागे दान ॥ चकोरासि रोहिणीरमण ॥ म्हणे मज तृप्त करा तुम्ही ॥३२॥तैसा ज्याचा सेवक कुबेर ॥ त्यापाशी ऋण मागे श्रीधर ॥ ही गोष्ट निर्धार ॥ घडेल ऐसे न वाटे ॥३३॥हाचि संदेह मनी धरोन ॥ श्रोते पुसती आदरे करोन ॥ यासि प्रत्युत्तर संपूर्ण ॥ वीर देता जाहला ॥३४॥म्हणे जगन्निवास मुरारी ॥ जो भक्तजनांचा साहाकारी ॥ त्यासी ऋण घ्यावयासि निर्धारी ॥ संकट काय असे पै ॥३५॥परी समयाभिप्राय उत्तम ॥ दावीतसे पुरुषोत्तम ॥ कलियुगी जनांचे कार्य परम ॥ ऐसे होणार शेवटी ॥३६॥मम वर्त्मानुवर्त ते म्हणोन ॥ गीतेत बोलिले मधुसूदन ॥ लोकसंग्रहार्थ नारायण ॥ नाना चरित्र दावितसे ॥३७॥मायामयवेष निर्धारी ॥ जैसे गारुडी विद्या दाविती भारी ॥ किंवा नटवेषधारी ॥ नाना लाघव दाविती ॥३८॥तैसा वैकुंठीचा राणा ॥ दावी नाना कौतुक करोन ॥ येरवी तो अव्यक्तनिर्गुण ॥ त्यासी संकट कायसे ॥३९॥ऐसे सांगता उत्तर ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ श्रोते म्हणती चरित्र ॥ बोले पुढे रसाळ ॥१४०॥असो ऐसे पत्रलिहोन ॥ कुबेरासि दिधले साक्ष घालोन ॥ मग स्वर्गीहूनी वैश्रवण आणवी धन अविलंबे ॥४१॥द्रव्य येतांची जनार्दन ॥ गरुडादिकांसि आज्ञा करोन ॥ सर्वसाहित्य न लगता क्षण ॥ आणविले होते काळी ॥४२॥बोलावोनि वीतिहोत्रासी ॥ आज्ञापिले हृषीकेशी ॥ म्हणे घेऊनि स्वाहा स्वधेसी ॥ पाकसिद्धि करावी ॥४३॥मग धनंजय बोलत ॥ निर्मावया सर्व पदार्थ ॥ पात्रे पाहिजेत असंख्यात ॥ आणोनि त्वरित देइजे ॥४४॥हरि म्हणे तुमचे कार्य असेल ॥ तरी पात्रे मिळतील पुष्कळ ॥ आमचे कार्यासि ये वेळे ॥ पात्र एकही न मिळेची ॥४५॥आमुचे कार्याचे उठाउठी ॥ कोणासि आगत्य न दिसे पोटी ॥ करावया आला वेठी ॥ तुम्ही सर्वही दिसतसे ॥४६॥ज्याचे घरी कार्य असे ॥ त्याचे आगत्य दुसऱ्यासि नसे ॥ ऐसे बोलोनि त्रिभुवनाधीश ॥ पुन्हा सांगत अग्नीसी ॥४७॥स्वामितीर्थामाजी जाण करावे वेगे उत्तमान्न ॥ वियद्गंगेत परमान्न ॥ करावे पूर्ण वेगेसी ॥४८॥देवतीर्थी शाखा बहुत ॥ तुंबरतीर्थी निर्मावे घृत ॥ नाना भक्ष्य उत्पन्नार्थ ॥ कुमारतीर्थ योजावे ॥४९॥पांडुतीर्थामाजी सत्वर ॥ करावे नाना रस प्रकार ॥ ऐसे अग्नीपती श्रीधर ॥ सांगता जाहला ते काळी ॥१५०॥आज्ञा वंदोनी देख ॥ अग्नीने सिद्ध केला पाक ॥ षण्मुखाप्रती कमळानायक ॥ बोलता काय जाहला ॥५१॥म्हणे देव आणि ऋषी लागून ॥ सर्वांसि द्यावे आमंत्रण ॥ अवश्य म्हणोनी शिखिवाहन ॥ करिता जाहला तैसेची ॥५२॥देवद्विज सर्वही ॥ शीघ्र पातले लवलाही ॥ त्यांचे पूजन विधी सर्वही ॥ शंकर स्वये करितसे ॥५३॥पांडूतीर्थापासून सत्य ॥ मर्यादा श्रीशैल्य पर्यंत ॥ पात्रे मांडिली पै यथार्थ ॥ द्विजवरांसी

जेवावया ॥५४॥हरि म्हणे अनर्पित अन्न ॥ ब्राह्मणांसी न वाढावे पूर्ण ॥ एथे अहो बलनृसिंह जाण ॥ असे पुरातन साक्षात ॥५५॥करोनी त्यांचे पूजन ॥ नैवेद्य अर्पावे परिपूर्ण ॥ विधीने तैसेचि करोन ॥ वाढावयासी घेतले ॥५६॥अक्षता धूप दीप परिमळ ॥ अर्पोनि पूजिले द्विज सकळे ॥ मग भोजनासी बैसले ॥ ऋषीश्वर सर्वही ॥५७॥पंच भक्ष परमान्न ॥ साठि शाखा सुवास गहन ॥ दधि मधु घृत पूर्ण ॥ सर्वांसी समान वाढिले ॥५८॥विप्रांचिये पंक्ती प्रती ॥ स्वये येवोनि श्रीपती ॥ परामर्श घेतसे प्रीती ॥ जगन्नाथ ते काळी ॥५९॥विप्रांसि म्हणे भगवान ॥ स्वामी सावकाश कीजे भोजन ॥ उशीर झाला म्हणोन ॥ कोप मनी न करावा ॥१६०॥तेथे सुवास करोनी नीर ॥ भोजन कर्त्यासि वारंवार ॥ स्वये रसनायक साचार ॥ पुरविता झाला ते काळी ॥६१॥असो जाहलिया भोजन ॥ आचवले सकळ ब्राह्मण ॥ त्रयोदश गुणी विडे देऊन ॥ दक्षिणा हरि स्वये देत ॥६२॥एकैक निष्क जाणा ॥ दीधली ब्राह्मणांसी दक्षिणा ॥ विप्र परम आनंदोन ॥ मंत्राक्षता दिधल्या ॥६३॥सर्व देवांसहित एक पंक्ती ॥ भोजनासि बैसले रमापती ॥ ब्रह्मा इंद्र कैलासपती ॥ सहित निश्चिती बैसले ॥६४॥देवस्त्रिया समवेत ॥ एकपंक्ती बैसले समस्त ॥ भोजन सारिले यथार्थ ॥ षड्रस पक्वान्ने ते काळी ॥६५॥सर्वांचे जाहले भोजन ॥ तो अस्तास गेला चंडकिरण ॥ रात्रीमाजी सर्वजणे ॥ शयन केले तेथेची ॥६६॥सवेचि उगवला मित्र ॥ सिद्ध जाहले सर्वत्र ॥ आपापली वाहने विचित्र ॥ घेऊनिया निघाले ॥६७॥विधि म्हणे जगदुद्धारा ॥ चलावे आता नारायणपुरा ॥ गरुडारूढा होऊनि सत्वरा ॥ भुवनसुंदरा निघावे ॥६८॥तात्काळ उठोनी श्रीधर ॥ गरूडारूढ जाहला सत्वर ॥ नंदीवरी कर्पूरगौर ॥ सव्यभागी चालतसे ॥६९॥वामभागी कमळासन ॥ हंसारूढ करी गमन ॥ पुढे चाले सहस्त्रनयन ॥ ऐरावतारूढ पै ॥१७०॥तेहतीस कोटी देवसमग्र ॥ निजवाहनी बैसोनि सत्वर ॥ मागूनि चालती निर्धार ॥ वाद्ये अपार वाजती ॥७१॥मंडित वस्त्रालंकार ॥ देवस्त्रिया निघाल्या समग्र ॥ जैसे विद्युल्लतांचे भार ॥ वाहनारूढ चालती ॥७२॥भोवते दाटले ऋषिसुरवर ॥ मध्यमंडळी श्रीकरधर ॥ गरुडारूढ जगदुद्धार ॥ मिरवत जात ते काळी ॥७३॥जैसा पूर्णिमेचा चंद्र ॥ तैसे हरीवर शोभे छत्र ॥ दोही बाही चामर ॥ विराजमान दिसती ॥७४॥पुढे वाद्यगजर होत ॥ तेणे आकाश दुमदुमित ॥ मंद मंद चाले रमानाथ ॥ देवांगना नाचती ॥७५॥प्रळयी फुटला सागर ॥ तैसे चालिले देवऋषिभार ॥ दाटी जाहली अपार ॥ मंडप घसणी होतसे ॥७६॥स्त्रिया बाळक वृद्ध तरुण ॥ आदिकरोनी थोर लहान ॥ स्थळ नसे तिळ प्रमाण ॥ भरोनिया चालिले ॥७७॥कितीएक चरण चाली चालती ॥ अडखळोनी भूमीवरी पडती ॥ सवेचि सावरोनि उठती ॥ मग चालती त्वरेने ॥७८॥कित्येकांचे हरवले पदार्थ ॥ म्हणोनिया शोक करित ॥ ठायी ठायी कलह अद्भुत ॥ स्त्रियांमाजी होतसे ॥७९॥ऐसियामाजी एक ब्राह्मण ॥ स्त्रीपुत्र संगे घेऊन ॥ जात असता पंथे करून ॥ तो अपूर्व वर्तले ॥१८०॥स्त्रियेचे काखेत होता बाळ ॥ मस्तकावरी असे गाठोळ ॥ चालत असता वेल्हाळ ॥ पतीसहित ते काळी ॥८१॥मागे रथी बैसोनिया ॥ धावत पातल्या देवस्त्रिया ॥ दाटी जाहली

लवलाह्या ॥ चुकवोनि घेतले पतीते ॥८२॥हेनाथ नाथ म्हणोन ॥ आक्रोश करी हाक फोडोन ॥ पडली तेथे मूर्च्छा येउन ॥ कोणासी कोणी न पुसती ॥८३॥असो ऐसे मिरवत ॥ चालिले हो कमळानाथ ॥ जो पद्मोद्भवाचातात ॥ दीननाथ जगद्‌गुरु ॥८४॥पद्मवतीतीर्थासमीप ॥ आला विरिंचीचा बाप ॥ ज्यावरोनी कोटी कंदर्प ॥ वोवाळोनि टाकावे ॥८५॥तो शुकयोगींद्र वसे तेथ ॥ बैसला असता पर्णकुटीत ॥ आला कळला रमाकांत ॥ आनंद चित्ती न समाये ॥८६॥सामोरा आला धावोन ॥ हरीप्रती करोनी वंदन ॥ म्हणे जगदात्मा तू आदिनारायण ॥ तुझे दर्शन दुलर्भ ॥८७॥जय अनंतकोटीब्रह्मांडनायका ॥ हे दयार्णवा विश्वव्यापका ॥ भवरोगवैद्या मुरांतका ॥ सृष्टिपालका दीनबंधो ॥८८॥नमो भक्तकामकल्पद्रुमा ॥ नमो अज अजित आत्मारामा ॥ अपर्णापति हृदयविश्रामा ॥ पूर्णकामा सर्वेशा ॥८९॥नमो दशावतार चक्रचाळका ॥ नमो सर्वदुष्ट दैत्यांतका ॥ वेदवंद्या वेदपालका ॥ वेदस्थापका दीनबंधो ॥१९०॥तुझे करावयास्तवन ॥ शक्त नव्हे विधि सहस्त्रनयन ॥ मी केवळ दीन ब्राह्मण ॥ केवि स्तवन करू तुझे ॥९१॥ऐसे ऐकतांची स्तवन ॥ तोषिला इंद्रिराप्राणजीवन ॥ शुकाचार्यासि बोले वचन ॥ म्हणे कासया स्तवन आरंभिले ॥९२॥काय इच्छा असे मानसी ॥ ते सांग आता शीघ्र मजसी ॥ शुकाचार्य म्हणे हृषीकेशी ॥ परिस माझी विज्ञापना ॥९३॥नाना तपे आचरती दारुण ॥ त्यासी दुर्लभ तुजे चरण ॥ अनायासे करोन ॥ आलासि आश्रमा समीप ॥९४॥तरी माझे आश्रमी श्रीहरी ॥ उतरोनिया क्षणभरी ॥ कंदमूळ भोजन निर्धारी ॥ करोनि जाई गोविंदा ॥९५॥तू षड्‌गुणैश्वर्य संपन्न ॥ तुज काय पदार्थ असे न्यून ॥ परी माझे मनोरथ पूर्ण ॥ करी आता वेंकटेशा ॥९६॥हरी म्हणे त्वरे करून ॥ जातसो आम्ही लग्नाकारण ॥ आमुच्या संगे बहुतजन ॥ देव ऋषी असती ॥९७॥त्या सर्वांसी सोडून ॥ एकलेचि करिता नये भोजन ॥ यावरी तो बादरायण सूनु ॥ बोलता काय जाहला ॥९८॥अनंत ब्रह्मांडांच्या कोटी ॥ हरि आहेति तुझ्या पोटी ॥ तू भक्षिलिया जगजेठी ॥ सर्वसृष्टी तृप्त होय ॥९९॥ऐशी ऐकोनि शुकाची मात ॥ बकुलामाता हरीशी म्हणत ॥ शुकयोगींद्राचे वचनाते ॥ मान्य करी वेंकटेशा ॥२००॥ऐकता मातेचे वचन ॥ अवश्य म्हणोनि नारायण ॥ गरुडाखाली उतरोन ॥ शुकाश्रमात पातला ॥१॥आला देखोनि जगजेठी ॥ शुकाचा आनंद न माय सृष्टी ॥ तृणासनी उठाउठी ॥ लक्ष्मीसहित बैसविला ॥२॥जन्म आरभ्य आचरले तप ॥ त्याचे फळ जाहले अमूप ॥ जो विरिंचीचा बापा ॥ वैकुंठाधिप घरा आला ॥३॥ऐसे बोलोनी व्यासनंदन ॥ पद्मतीर्थी केले स्नान ॥ अमृती बीज कांडोन ॥ तंडुल केले मुष्टिभरी ॥४॥त्याचे केले उत्तमान्न ॥ तिंतिणीचा रस काढून ॥ बृहती फळ मिश्रकरून ॥ रस तयाचा केला पै ॥५॥मग आपुल्या स्वहस्ते ॥ पूजन करोनि श्रीहरीते ॥ नैवेद्य अर्पिला भक्तियुक्ते ॥ कमळपत्रात वाढोनिया ॥६॥हरीशी म्हणे बादरायणि ॥ येता श्रमलासि चक्रपाणी ॥ आता मजवरी कृपा करोनी ॥ करी भोजन सावकाश ॥७॥भक्तवत्सल जगज्जीवन ॥ आवडीने करी भोजन ॥ भक्तप्रिय नारायण ॥ बिरुद साच केले हो ॥८॥नावडे काही पक्वान्न ॥ नावडे लौकिक मान अभिमान ॥ मुख्यभक्तीच

कारण ॥ नावडे पूर्ण आन काही ॥९॥नावडे दुर्योधनाची तूपसाखर ॥ विदुराची आवडे कण्या भाकर ॥ द्रौपदीचे शाखापत्र ॥ राजीवनेत्रे भक्षिले ॥२१०॥भिल्लिणीचे उच्छिष्ट फळ ॥ आवडीने सेवी तमाळनीळ ॥ मुष्टीभरी पोहे स्वीकारिले ॥ सुदामयाचे गोविंदे ॥११॥धर्माघरी उच्छिष्ट काढी ॥ पार्थाची धूतली घोडी ॥ थोरपणाची प्रौढी ॥ श्रीनिवास न पाहे ॥१२॥भक्ताकारणे दशावतार ॥ घिरट्या घेत जगदुद्धार ॥ प्रल्हादासाठी विष दुर्धर ॥ सोसी श्रीधर निजांगे ॥१३॥ऐसाहा भक्त कैवारी ॥ शुकाची भक्तिपाहोनि भारी ॥ तापसान्न भक्षी मुरारी ॥ अत्यादरे करोनिया ॥१४॥ऐसा जेविला जगज्जीवन ॥ गुंफेबाहेर सर्वजन ॥ तेही जाहले क्रोधायमान ॥ शुकावरी ते काळी ॥१५॥म्हणे शुके केले अनुचित ॥ समीप असता आम्ही समस्त ॥ एकल्या हरीसी बोलावोनि त्वरित ॥ भोजनासी दीधले ॥१६॥आम्हा सर्वत्र ब्राह्मणांसी ॥ द्यावे होते भोजनासी ॥ अपमानिले आम्हांसी ॥ म्हणोनिया क्रोधावले ॥१७॥शुकासि शापावया सत्वर ॥ सिद्ध जाहले धरामर ॥ हे जाणोनिया श्रीधर गुंफेबाहेर पातला ॥१८॥मनी विचारी नारायण ॥ शापदेतील शुकालागून ॥ निज भक्ताचे रक्षण ॥ केले पाहिजे मजलागी ॥१९॥बाहेर येऊनी श्रीनिवास ॥ फुंकारोनि सोडिला श्वास ॥ तेणे सर्वांची क्षुधानिःशेष ॥ शांत जाहली तात्काळी ॥२२०॥सर्वाघटी आत्माराम ॥ व्यापक एकचि परब्रह्म ॥ यालागी क्षुधा दुर्गम ॥ शांत जाहली सर्वांची ॥२१॥आश्चर्य करिती सर्वविप्र ॥ म्हणती सूत्रधारी सर्वेश्वर ॥ भक्तरक्षणार्थ साचार चमत्कार केला हा ॥२२॥आम्ही सर्वही कोपून ॥ शाप देऊ शुका कारण ॥ हे जाणोनि जनार्दने ॥ नवल विंदाण केले हे ॥२३॥फुंकारासरसी साचार ॥ सर्वांची क्षुधा जाहली दूर ॥ आनंदमय सर्वत्र ॥ शुकाचार्यासी बोलती ॥२४॥म्हणती योगींद्रा तू धन्य ॥ तुज वश्य जाहला नारायण ॥ तुझ्या योगे करोन ॥ आम्ही धन्य जाहलो ॥२५॥आम्हासी न दीधले भोजन ॥ म्हणोनि शापित होतो तुज लागून ॥ त्याकारणे क्षुधाहरण केली आमुची मुकुंदे ॥२६॥आता आम्ही जाहलो संतुष्ट ॥ ऐसे बोलोनि ब्राह्मण वरिष्ठ ॥ सर्वही वंदिती श्रीवैकुंठ ॥ प्रेमभावे करोनिया ॥२७॥मग ते दिवसी हृषीकेशी ॥ शुकाश्रमी क्रमिली ती निशी ॥ प्रातःकाळी नवमी दिवसी ॥ पुढे निघाले सत्वर ॥२८॥निजभारेशी मधुसूदन ॥ मिरवत जातसे रमारमण ॥ इकडे नृपमंदिरी वर्तमान ॥ झाले तेचि परिसिजे ॥२९॥ती कथा परमसुंदर ॥ पुढील अध्यायी मनोहर चिद्धनानंदे कुडचीवीर ॥ वर्णीलसाचार आदरे ॥२३०॥वैकुंठवासा विश्वंभरा ॥ शेषाद्रि निलयाजगदुद्धारा ॥ पुढेइतिहास परात्पर ॥ बोलवी आता निजकृपे ॥३१॥इति श्रीवेंकटेशविजयसुंदर ॥ संमतपुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ नवमाध्याय गोड हा ॥२३२॥९ एकंदर ओवी संख्या ॥१५३५॥

## अध्याय १० वा

*श्रीवेंकटेश श्रीशुकाचार्यांच्या आश्रमात भोजन करून इतर सर्वदेवादिकांना संतुष्ट करून नारायणपुरास निघाले. नारायणपुरातही आकाशराजाने विवाहाकरिता आवश्यक ती मंडपवगैरे सर्व सामग्री उत्तम रीतीने तयार केली. सायंकाळपर्यंत नवमीच्या दिवशी पुण्याहवाचनादि सर्व वैदिक विधि उरकण्यात आले. सायंकाळी हेरांनी येउन श्रीवेंकटेश नगराजवळ येत असल्याची बातमी राजास सांगितली.*

*राजा सर्व लवाजमा बरोबर घेऊन देवास सामोरा गेला. पद्मावती सुद्धा एका हत्तिणीवर बसून बरोबर निघाली देवाच्या दर्शनास ती फार उत्सुक झाली होती.*

*देवाबरोबर सुद्धा पुष्कळ जनसमुदाय असल्याने श्रीभगवान कोठे आहेत हे लवकर कळून येईना. नंतर ज्यांच्या दोन्ही बाजूस ब्रह्मदेव व शंकर चालतात व मध्यभागी श्रीवेंकटेश येत आहेत हे पाहून राजास फार आनंद झाला व डोळ्याचे पारणे फिटल्याचे समाधान झाले. पद्मावतीचे भाग्य थोर म्हणून तिला असा पति मिळाला असे वाटून राजाच्या शरीरावर अष्टसत्विक भाव उठले.*

*इकडे श्रीवेंकटेशांनी नारदाकडे यात आकाश राजा कोण याची चौकशी करण्यास सुरुवात केली असता नारदांनी त्यांना लांबून दाखविले. दोघेही जवळ येताच आपल्या वाहनावरून उतरले. श्रीवेंकटेशांनी भावीश्वशुरास वाकून नमस्कार केला. राजाने त्यांना उठवून क्षेमालिंगन दिले. उत्तम साहित्यांनी तेथेच चौरंग मांडून श्रीरंगाचे राजाने सीमांत पूजन केले. सर्व मंडळी लग्न मंडपाकडे निघाली. नारायणपुरातील लोकांना श्रीभगवंताला पाहून फार आनंद व समाधान वाटले व सर्वजण पद्मावतीच्या भाग्याची प्रशंसा करू लागले.*

*मंडपात येताच भगवंतांनी सर्वजण भुकेलेले पाहून भोजनाची व्यवस्था करण्यास राजाच्या भावास सांगितले. उत्तम सर्व पदार्थांनी सर्वांची भोजने झाली. सर्वांची रात्री निद्रा झाल्यावर दुसरे दिवशी सकाळी विवाहाच्या पूर्वीची सर्व तयारी व सर्व वैदिक विधी पार पडले. लग्नाचा मुहूर्त रात्री असल्याने पुनः सर्वांची भोजने झाली. आवश्यक ती वधुवरांकडील मंडळीतेवढी उपोषित राहिली. धरणी देवींनी येऊन भगवंताचे प्रेमाने पूजन केले. देवाचे सौंदर्य पाहून धरणी देवीस फार आनंद झाला. तिने भगवंताना आपल्या हाताने तेल हळद लावली.*

*नंतर सर्वजण लग्न मंडपाकडे निघाले. ती मिरवणूक फार मोठी व सुंदर होती. वाद्यांचा गजर, दारूकाम, लवाजमा वगैरे सर्व साहित्यपूर्ण चाललेली ती मिरवणूक पाहून नारायणपुरातील लोक संतुष्ट झाले.*

*विवाह मंडपात जाताच राजाने सर्वांस यथायोग्य आसनावर बसविले. सर्वांचे प्रेमभराने स्वागत केले. मध्यभागी श्रीवेंकटेशास बसवून मधुपर्कपूजा केली. वस्त्राभरणे सर्व वैभव भगवंतास अर्पण केले. वाङनिश्चय झाला.*

*इकडी पद्मावतीही सर्व वस्त्राभरणे धारण करून विवाहमंडपात आली. अन्तःपट धरला गेला. सर्वांना सावध होण्याचा इशारा देऊन मंगलाष्टके सुरू झाली. उभयतांच्या मस्तकी सर्वांनी मंगलाक्षता टाकताच वाद्यांचा मोठा गजर झाला. राजाने दक्षिणेस भांडारखाना उघडून दिला. श्रीभगवंतास आकाशराजाने रत्नखचित सुवर्णमुकुट दिला. अनेक प्रकारचे*

*वैभव दिले. भगवंतांनी पद्मावतीच्या मस्तकावर आपल्या हातांनी अक्षता घालून वरदहस्त तिच्या मस्तकावर ठेविला. उभयतांच्या कडील पुरोहितांनी दोघांचेही गोत्रोच्चार करून कन्यादान करविले. मंगळसूत्र बांधणे, लाजाहोमादि सर्व विधी झाल्यावर वधूवर व इतर लोकांची भोजने झाली. त्यावेळीही फार मोठे समारंभ उत्साहपूर्वक झाले. स्त्रियांनी उटणी खेळण्याचाही कार्यक्रम भगवंताकडून घेतला. चार दिवस लग्न सोहळा झाल्यावर पद्मावतीस पाठविण्याच्या वेळी सर्वांना फार दुःख झाले. धरणी देवीने एक महिनाभर राहावे असा आग्रह केला. भगवंतांनी सर्वांचा प्रेमाने निरोप घेऊन जाण्याचे ठरविले. आपापल्या वाहनावर बसून सर्व देव निघाले पोचविण्यास येणाऱ्यांनी भगवंतांनी प्रेमाने निरोप दिला. भगवंतांनी आकाशराजास वंदन केले. त्यांनी आशीर्वाद दिला.*

*लग्न झाल्यावर सहा महिने पर्वतावर चढावयाचे नाही म्हणून भगवंतांनी सुवर्णमुखरी पाशी राहण्याचे ठरविले. तेथे अंगिरस ऋषींच्या आश्रमाजवळ एक मंदिर बांधविण्यात आले भगवान तेथे राहू लागले. सर्व देव आपापल्या ठिकाणी परत गेले. या ग्रंथाच्या वाचनपठणाने सर्वांच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात. श्रीभगवंताच्या आणखी काही लीला आपण पुढील १।२ अध्यायात पाहू.*

श्रीलक्ष्मीनारायणाय नमः ॥ ॐनमो श्रीगुरुचिद्घनानंदा ॥ करुणासागरा श्रीगोविंदा ॥ भक्तवत्सला आनंदकंदा ॥ जगद्वंद्या श्रीहरी ॥१॥क्षीराब्धिवासा दीनदयाळा ॥ कामातकध्येय त्रिभुवनपाळा ॥ कमळोद्भवजनका तुझी लीळा ॥ वर्णवेल कोणासी ॥२॥वाढ किती आहे गगन ॥ करवेल एक वेळा गणन ॥ खोल किती मेदिनीवसन ॥ हेही अंत पाहवेल ॥३॥पृथ्वीवर तृणांकुर किती ॥ हेही गणवेल रमापती ॥ रजःकण किती महीवरुती ॥ गणवेल श्रीपती एकदा ॥४॥हे असाध्यचि सर्व बोलणे ॥ साधतील करिता प्रयत्ने ॥ परी जगद्वंद्या तुझे गुण ॥ कोणाचेनि न वर्णवे ॥५॥निगम राहिले तटस्थ ॥ शेषाचेनि न वर्णवित ॥ नेति नेति म्हणोनि भोगिनाथ ॥ शय्या जाहला शेवटी ॥६॥चतुर्मुख तुझा बाळ ॥ त्यासि ही अंत न कळे ॥ सहस्त्रवर्षे कमळनाळ ॥ उतरता बहुत शीणला ॥७॥व्यास वाल्मीकांची मती ॥ वर्णिता खुंटली जगत्पती ॥ थोरथोरांची ऐेशी गती ॥ मी अल्प मति केवि वर्णू ॥८॥मक्षिका स्वपक्षे करोन ॥ पर्वत केवि उडवील गहन ॥ वृश्चिक स्वपुच्छे करोन॥ तोडील केवी वज्राते ॥९॥ऊर्णनाभी स्वतंतूने ॥ कैसा बांधील मत्तवारण ॥ तैसे वेंकटेशा तुझे गुण ॥ माझेनि कैसे वर्णवेल ॥१०॥जगद्वंद्या वेदसारा ॥ अखिल अद्वया निर्विकारा ॥ तुझी लीला विश्वंभरा ॥ तूचि बोले रसाळ ॥११॥शुकाश्रमी तापसभोजन ॥ प्रीतीने करोनि नारायण ॥ निजभारेसि मनमोहन ॥ निघता झाला गजरेसी ॥१२॥गत कथाध्यायाचे शेवटी ॥ इतुकी कथा जाहली गोमटी ॥ पुढील कथा कर्णपुटी ॥ श्रोते साठवा प्रीतीने ॥१३॥इकडे नारायणपुरात ॥ काय जाहला वृत्तांत ॥ नवमी दिवसी नृपनाथ ॥ अष्टवर्गासि आरंभिले ॥१४॥स्नेहहरिद्रा लावून ॥ करविले नवरीसी मज्जन ॥ राव करे मंगलस्नान ॥ धरणीदेवी समवेत ॥१५॥राजद्वारी वाद्यगजर ॥ मंडप उभारिलासे विचित्र ॥ मिळाले बहुत धरामर ॥ शापानुग्रह समर्थजे ॥१६॥राये अष्टवर्ग करोन ॥ मंडपदेवतास्थापन सूर्य पावला अस्तमान ॥ इतुके कार्य जाहले ॥१७॥आनंदमय असता नृपती ॥ चार जावोनि रायासि वंदिती ॥ म्हणती उठाहो शीघ्रगती ॥ वैकुंठपती जवळी आले ॥१८॥ऐसे ऐकता

उत्तर ॥ आनंदे दाटला नृपवर ॥ म्हणे निघावे आता समग्र ॥ सामोरे सत्वर जाऊ पै ॥१९॥सिद्धकरोनी दळभार ॥ गज अश्व आणि रहंवर ॥ नगरलोक समग्र ॥ श्रृंगारिले ते काळी ॥२०॥नारायणपुरींची मंदिरे ॥ अवघी श्रृंगारिली ॥ एकसरे ॥ चंदनसडा देवोनि परिकर ॥ तोरणे बांधिली स्थळी स्थळी ॥२१॥नगरीच्या सर्वसुवासिनी ॥ पद्मावतीच्या सख्या साजणी ॥ वस्त्राभरणी सिद्ध होवोनी ॥ निघत्या जाहल्या सत्वर ॥२२॥तंत वितंत सनसुस्वर ॥ चतुर्विध वाजती वाद्यगजर ॥ निजभारेसी आकाशनृपवर ॥ निघता जाहला तेधवा ॥२३॥श्रृंगारोनि एक हस्ती ॥ त्याजवरी बैसविली पद्मावती ॥ जीचिया मुखावरोनी निश्चिती ॥ कोटीकाम वोवाळिजे ॥२४॥असो ऐसे गजरे करोन ॥ सामोरा निघाला वेगे करून ॥ केव्हा होईल दर्शन ॥ ऐसे जाहले नृपासी ॥२५॥सहस्त्रवधी दीपिका निर्धारी ॥ पाजळिल्या सैन्यामाझारी ॥ मंगलवाद्ये नानापरी ॥ वाजो लागली एकसरे ॥२६॥असो ऐशा गजरेसी ॥ राजा निघाला वेगेसी ॥ तो देवभारेसी हृषीकेशी ॥ तिकडोनिया येतसे ॥२७॥सुरभूसुरांचे भार ॥ दिसतो जैसा क्षीरसमुद्र ॥ मध्यभागी जगदुद्धार ॥ गरुढारूढ येतसे ॥२८॥कोठे आहे वेंकटेश ॥ नृपासि नये प्रत्ययास ॥ मग विचार करोनि सावकाश ॥ दृष्टीने निरखोनि पहातसे ॥२९॥कोट्यानकोटी दीपिका ॥ सेनेत पाजळिल्या सुरेखा ॥ सावचित्त नृपनायक ॥ पाहता जाहला ते काळी ॥३०॥पुढे चाले पायदळ ॥ रक्तवस्त्रे मिरवती सकळ ॥ परी ते दिसे केवळ स्थूळ ॥ तेथे गोपाळ नसेची ॥३१॥त्यामागे श्वेत अश्वभार ॥ सूक्ष्म भासे दिसे मनोहर ॥ परी त्यात न दिसे इंदिरावर ॥ राजविचार करी पुढे ॥३२॥त्यामागे गज उन्मत्त ॥ कृष्णवर्ण दिसती जैसे पर्वत ॥ कारणरूप उन्नत ॥ कमळानाथ नसे तेथे ॥३३॥तया मागे रहंवर ॥ वरी आरूढले हरीचे वीर ॥ नीलवर्ण घोडे सुंदर ॥ जुंपिले असती तयासी ॥३४॥पाहता परम दैदीप्यमान ॥ जवळी दिसे हरिप्राप्ति चिन्ह ॥ अनुहत वाद्यांचे गजर गहन ॥ सावधान नृप एके ॥३५॥त्यामागे पाहे विलोकून ॥ तेथे पाहता वाटे उन्मन ॥ अष्टदिशेसी विराजमान ॥ अष्टदिक्पाळ असती पै ॥३६॥ब्रह्म आणि रुद्र ॥ दोन्ही भागी दिसती परिकर ॥ मध्यपीठी जगदुद्धार ॥ श्रीमनोहर देखिला ॥३७॥साधनकरिती साधन नर ॥ अकस्मात होय साक्षात्कार ॥ तैसा एकाएकी कमळावर ॥ नृपवरे दृष्टी देखिला ॥३८॥चतुर्भुज श्यामसुंदर ॥ गळा वैजयंती मनोहर ॥ मुकुटमंडले मकराकार ॥ मदनमनोहर भासतसे ॥३९॥जैसा पूर्णिमेचा चंद्र ॥ तैसे प्रकाशमान दिसे छत्र ॥ दोही बाही चामर ॥ मृगांक वर्ण दिसती ॥४०॥कोटिसूर्या समान ॥ प्रभा दिसे दैदीप्यमान ॥ तडित्प्राय पीतवसन ॥ नेसलासे जगदात्मा ॥४१॥ऐसा एकाएकी भूपाळे ॥ दृष्टी पाहिला तमाळनीळ ॥ सद्गदित जाहला नृपाळ ॥ अष्टभावे दाटला ॥४२॥म्हणे पद्मावतीचे भाग्य साचार ॥ नवरा मिळाला भुवनसुंदर ॥ याचे रूप पाहता मनोहर ॥ कोटिकाम वोवाळिजे ॥४३॥असो तिकडे जगज्जीवन ॥ नृपभार येता देखोन ॥ नारदाप्रती नारायण ॥ पुसता काय जाहला ॥४४॥हरि म्हणे येति बहुजन ॥ त्यात आकाशराज तो कोण ॥ त्वरित दाखवी मजलागून ॥ ब्रह्मनंदना आतांची ॥४५॥नारद म्हणे नृपवर ॥ दीर्घबाहू दिसे परिकर ॥ दीर्घश्मश्रु अश्वरहंवर ॥ अवघे दीर्घ दिसतसे ॥४६॥ऐसे बोले नारद साचार ॥ समीप जाहले दोनीभार ॥ रथाखाली आकाश नृपवर ॥ उतरता जाहला ते काळी ॥४७॥जवळी देखोनि राजेश्वर ॥ गरुडाखाली उतरला श्रीधर ॥ श्वशुरालागी जगदुद्धार ॥ वंदिता जाहला तेधवा ॥४८॥सम्मुख पाहता घनश्याम

॥ रायासि नावरे तदा प्रेम ॥ कंठी मिठी घालोनि परम ॥ दृढ आलिंगन दीधले ॥४९॥सोडावयासी मागुती ॥ ऐसे न वाटे रायाचे चित्ती ॥ म्हणे अंत नाही भाग्याप्रती ॥ जावई श्रीपति जोडला ॥५०॥मग तेथेचि मांडोनिया चौरंग ॥ वरी बैसविला रमारंग ॥ सीमंत पूजन सवेग ॥ करिता जाहला नृपनाथ ॥५१॥हरीचे चरण धुवोनी ॥ गंधपुष्पी अर्चिला ते क्षणी ॥ वस्त्राभरणे करोनी ॥ गौरविले हो हरीप्रती ॥५२॥करिणीवरोनी पद्मावती ॥ चोरदृष्टीने पाहे हरीप्रती ॥ लज्जायमान झाली चित्ती ॥ जगदात्मयासी पाहता ॥५३॥मना म्हणे सुंदरी ॥ मदनमोहन मूर्ति साजिरी ॥ कोटिकंदर्प मुखावरी ॥ वोवाळोनि टाकावे ॥५४॥माझे भाग्य परिपूर्ण ॥ नवरा जोडला नारायण ॥ देह गेह विसरोन ॥ गेली तेव्हा सुंदरी ॥५५॥नारायणपुरिचे जन ॥ तन्मय जाहले हरीसि पाहून ॥ म्हणती अंत नाही परिपूर्ण ॥ भाग्य पद्मावतीचे ॥५६॥असो करोनी सीमंतपूजन ॥ मिरवत चालिले संपूर्ण ॥ गरुडावरी आरोहण ॥ करिता जाहला श्रीहरी ॥५७॥मंगळतुरे अपार ॥ वाजो लागले एकसर ॥ चतुर्विध वाद्यनाद परिकर ॥ नभोदरी न समाये ॥५८॥लक्षानुलक्ष तैलदीप ॥ पाजळिले त्यांचे तेज अमूप ॥ पुष्पवृष्टि करिती विष्टप ॥ वारंवार ते काळी ॥५९॥असो ऐसे मिरवत ॥ चालिले नारायणपुरात ॥ नगरलोक पहावयासी धावत ॥ मंडप घसणी होतसे ॥६०॥नगरींच्या अवघ्या सुवासिनी ॥ पाहती गोपुरावरी चढोनी ॥ पुष्पांजळी समर्पूनी ॥ वोवाळिती रत्नदीप ॥६१॥पाहोनि श्रीहरीचा वदनचंद्र ॥ भुलोनि गेले जननयनचकोर ॥ म्हणती एवढा पुरुषसुंदर ॥ कोठेचि देखिला नव्हता पै ॥६२॥नानापरी उत्साह करित ॥ गेले मंडपा परियंत ॥ जे विश्वकर्मा निर्मित ॥ तेथे जावोनि उतरले ॥६३॥पाच घटिका जाहली रात्र ॥ मंडपासि पावला राजीवनेत्र ॥ तोंडमानासी नीळगात्र ॥ काय बोले तेधवा ॥६४॥सर्वजन झाले क्षुधाक्रांत ॥ देवऋषिआदि समस्त ॥ पाकसिद्धी करोनि त्वरित ॥ भोजन आधी देइजे ॥६५॥ऐसे ऐकताचि वचन ॥ बोले तेव्हा तोंडमान ॥ हरी तुझी आज्ञा प्रमाण ॥ सिद्धकरितो आताचि ॥६६॥तात्काळ पाकसिद्धी करून ॥ पात्रे मांडिली न लगता क्षण ॥ हरिआज्ञे सर्वजन ॥ भोजनासी बैसले ॥६७॥निर्मिले षड्रस पक्वान्न ॥ साठी शाखा सुवास गहन ॥ नानाप्रकार भक्षपूर्ण ॥ वाढिते जाहले ते काळी ॥६८॥दधि मधु घृत क्षीर ॥ वाढिते जाहले अपार ॥ भोजन कर्त्यासि सुवास नीर ॥ वारंवार पुरविती ॥६९॥असो देव आणि ऋषिगण ॥ स्त्रिया आदि थोर लहान ॥ भोजनविधी संपादोन ॥ शयन केले रात्रीमाजी ॥७०॥शुद्ध दशमी शुक्रवार ॥ उदयाद्रीवरी आला दिनकर ॥ अभ्यंगस्नान श्रीकरधर ॥ करिता झाला तेधवा ॥७१॥मग वैश्रवणासी पाचारोन ॥ आज्ञा देत लक्ष्मीरमण ॥ तुवा राजमंदिरासी जावोन ॥ इतुकेच निरोप सांगावे ॥७२॥रात्री घटिका त्रयोदश ॥ मुहूर्त असे अतिविशेष ॥ याकरिता देवऋषि सर्वांस ॥ भोजन आधी देइजे ॥७३॥कमळा आणि कमळासन ॥ माता बकुला पुरोहितपूर्ण ॥ मजसहित पाचजण ॥ उपोषित असो द्या ॥७४॥वधूपत्नी सहित नृपवर ॥ पुरोहित आणि राजपुत्र ॥ ऐसे दहा वेगळे सर्वत्र ॥ भोजनविधी सारावे ॥७५॥लग्न जाहलिया ब्रह्मभोजन ॥ रात्रीमाजी करावे जाण ॥ ऐसे नृपवरासी सांगोन ॥ शीघ्र येई आतांची ॥७६॥अवश्य म्हणोनी नरवाहन ॥ जाता जाहला न लगता क्षण ॥ हरि आज्ञा नृपती लागून ॥ श्रुत करिता जाहला ॥७७॥संतोषोनी धरणीपाळ ॥ पाकसिद्धि करवी तात्काळ ॥ ऋषिराजे देव दिक्पाळ ॥ किन्नरगंधर्व सर्वही ॥७८॥स्त्रिया वृद्ध बाळ तरुण ॥ सर्वजनी केले भोजन ॥

नानारसपक्वान्न ॥ जेवोनि तृप्त जाहले ॥७९॥सायंकाळचे अवसरी ॥ वर आणावया निर्धारी ॥ निजभारेसि ते अवसरी ॥ आकाशराव निघाला ॥८०॥बंधु सोयरे आप्तजन ॥ पुत्रमित्र आदिकरोन ॥ सर्वस्त्रियांशी आपण ॥ धरणीदेवी निघाली ॥८१॥श्रृंगारुनि ऐरावत ॥ नानाआभारण मंडित ॥ रत्नकंबळ चौरडोलयुक्त ॥ चामरे डोलत उभयकर्णी ॥८२॥वरासि बैसावया निश्चित्त ॥ सिद्धकरोनि घेतला त्वरित ॥ नानावाद्ये वाजवित ॥ गजरे करोनी पातला ॥८३॥सर्वांसहित राजेश्वर ॥ प्रवेशता जाहला हरिमंदिर ॥ जे विश्वकर्मानिर्मित मनोहर ॥ पाहता आल्हाद होतसे ॥८४॥सकळसुरवरा समवेत ॥ सभेसि बैसला वैकुंठनाथ ॥ ऋषींची मांदी समस्त ॥ सभोवते बैसली ॥८५॥कश्यप अत्रि विश्वामित्र ॥ भरद्वाज वसिष्ठ पवित्र ॥ जमदग्नि दधीची कण्व निर्धार ॥ हरी भोवते बैसले ॥८६॥मध्यभागी श्रीनिवास ॥ रत्नकांबळ्यावरी जगदीश ॥ बैसला असे आदिपुरुष ॥ आकाशनृपनाथे देखिला ॥८७॥नृपति आला देखोन ॥ काय बोले जगन्मोहन ॥ काय कारण कल्पून ॥ जाहले आगमन तुमचे ॥८८॥तुम्ही वडील राजेश्वर ॥ कासया आला एथवर ॥ मग बोले नृपवर ॥ हरीप्रती ते काळी ॥८९॥राव म्हणे जगज्जीवना ॥ ब्रह्मांडनायका मधुसूदना ॥ त्रिभुवन व्यापका जनार्दना ॥ सहज आलो दर्शनात ॥९०॥मग आपुलिया कांतेप्रती ॥ आज्ञापिता जाहला नृपती ॥ पूजन करावे श्रीपतीप्रती ॥ अरुंधती समवेत ॥९१॥रत्नजडित मांडिला चौरंग ॥ वरी बैसवूनी श्रीरंग ॥ हरिद्रामिश्रित सुरंग ॥ सुगंधतैल आणिले ॥९२॥हरीपूजना लागूनी ॥ सर्वस्त्रिया सहित नृपकामिनी ॥ जवळी आली तेवि क्षणी ॥ वदन न्याहळिती श्रीहरीचे ॥९३॥सुहास्य मुख श्यामसुंदर ॥ मुगुट कुंडले मकराकार ॥ कौस्तुभ वैजयंती मनोहर ॥ कंठी शोभती साजिरी ॥९४॥अंगी केशराची उटी ॥ कस्तूरीतिलक दिसे ललाटी ॥ मदनमनोहर मूर्ति गोमटी ॥ पाहता धणी न पुरेची ॥९५॥कोट्यानकोटी मीनकेतन ॥ ओवाळोनी टाकावे नखावरून ॥ सूर्यकोटी तेजगहन ॥ पाहता मनविस्मित ॥९६॥धरणीदेवी मनी भावित ॥ अनंतजन्मीचे पुण्य अद्भुत ॥ एकदाचि फळा आले समस्त ॥ जामाता श्रीहरी जाहला ॥९७॥आजन्मवरी ऐसा सुंदर ॥ देखिला नव्हता मनोहर ॥ पद्मावतीचे भाग्य परिकर ॥ अंत नाहींचि सर्वथा ॥९८॥धरणीदेवी आनंदाने ॥ हरिद्रातेल लावोन ॥ चरणांसि करी मर्दन ॥ मळकाढीत स्वहस्ते ॥९९॥सुगंध अंगी चर्चून ॥ पुष्पमाळा घातल्या जाण ॥ रत्नालंकारे करोन ॥ जगन्मोहन पूजिला ॥१००॥निघाले सर्वसभाजन ॥ गजारूढ जाहला जगज्जीवन ॥ कश्यपात्रि आदिकरून ॥ ऋषीश्वर निघाले ॥१॥तेहतीसकोटी देव समग्र ॥ वाहनारूढ जाहले सत्वर ॥ पार्वती आदि स्त्रिया सर्वत्र ॥ निघत्या जाहल्या तेचि क्षणी ॥२॥देवऋषिभार समवेत ॥ जगन्निवास चालिल मिरवत ॥ सव्यभागी उमाकांत ॥ वामभागी कमळोद्भव ॥३॥जैसा शरत्काळींचा द्विजवर ॥ तैसे हरिवरी विराजे छत्र ॥ मृगांकवर्ण चामरे सुंदर ॥ दोही भागी ढाळिती ॥४॥कोट्यानुकोटी तैलदीपिका ॥ पाजळिल्या हरिसमुखा ॥ वाद्ये वाजती अनेका ॥ नादे नभ भरियेले ॥५॥अष्टदिक्पाळ सवे चालती ॥ भाट यदुवंश वाखाणिती ॥ मकरबिरुदे पुढे शोभती ॥ आनंदे गर्जती बंदीजन ॥६॥अग्निऔषधी चित्रविचित्र ॥ नळया हवाया भरती अंबर ॥ चंद्रज्योती चंद्राकार ॥ प्रभा दिसती साजिरी ॥७॥अष्टनायकांचे नृत्यविशेष ॥ किन्नरगंधर्व गातीसुरस ॥ नारायणपुरीचे जनांस ॥ धणी पाहता पुरेना ॥८॥नगर श्रृंगारिले एकसरे ॥ तोरणे बांधिली चित्रविचित्रे ॥ चंदनसडे परिकर ॥ बिंदोबिंदीसी दिधले

॥९॥गोपुरावरी नरनारी ॥ रत्नदीप घेऊनि करी ॥ वोवाळिती सुंदरी ॥ पुष्पांजळी समर्पिती ॥११०॥पाहता श्रीमुख चांगले ॥ स्त्रियासर्वही भूलोनि गेल्या ॥ म्हणती पद्मावतीचे भाग्यवहिले ॥ अंत नाही पाहता ॥११॥स्वसेनेशी आकाशराज ॥ समागमे चाले तेजःपुज ॥ श्रीहरीचे मुखांबुज ॥ वारंवार पाहतसे ॥१२॥धडकत दुंदुभीचे ध्वनी ॥ वृंदारक सुमने वर्षती गगनी ॥ ऐसा मिरवत चक्रपाणी ॥ मंडपद्वारासि पातला ॥१३॥तो तोंडमानाची कामिनी ॥ कुंकुमोदक घट घेवोनी ॥ हरिसम्मुख येवोनि ॥ केले पूजन प्रेमभावे ॥१४॥ओवाळणी सांडून ॥ नेत्रांसि लाविले जीवन ॥ राये तात्काळ पशु आणून ॥ बलिदान दीधले ॥१५॥मग सर्वदेवांसमवेत ॥ मंडपी प्रवेशला जगन्नाथ ॥ त्या मंडपाची शोभा अद्भुत ॥ न वर्णवेची सर्वथा ॥१६॥स्फटिकशिळा दैदीप्यमान ॥ त्याचे साधिले मंडपांगण ॥ सुवर्णस्तंभशोभायमान ॥ ठायी ठायी उभविले ॥१७॥नानारत्नमणियुक्त ॥ मंडप केलाशोभिवंत ॥ मुक्तजालंधर विराजित ॥ चहूकडे सोडिल्या ॥१८॥अहोरात्र झगझगित ॥ दिवसनिशी न कळे तेथ ॥ पाहता मन तन्मय होत ॥ कर्तव्य विचित्र पाहोनिया ॥१९॥असो ऐसिया मंडपात ॥ प्रवेशला वैकुंठनाथ ॥ जो देवाधिदेव समर्थ ॥ तात कमळोद्भवाचा ॥१२०॥मध्यमंडपी विचित्र ॥ शोभायमान केला बैसाकार ॥ चहूंकडोनी परिकर ॥ कर्दळी स्तंभ उभविले ॥२१॥तेथे मांडोनी चवरंग ॥ वरी बैसविला भक्तभवभंग ॥ ब्रह्मादि देव सवेग ॥ हेमासनी बैसविले ॥२२॥अठ्याऐंही सहस्त्रऋषीश्वर ॥ त्रिदशांसहित अमरेंद्र ॥ आणि पृथ्वीचे राजेश्वर ॥ यथावकाशे बैसविले ॥२३॥पार्वती सावित्री सरस्वती ॥ गायत्री शची अरुंधती ॥ आदि करोनी देवयुवती ॥ तया मंडपी बैसविल्या ॥२४॥मग शास्त्रप्रमाणे करून ॥ राव करी मधुपर्कपूजन ॥ पुढे कनकपात्र ठेविले पूर्ण ॥ हरिचरण धुवावया ॥२५॥ज्याचे पदनखी निश्चिती ॥ उद्भवली असे भागीरथी ॥ तेचि चरण आकाश भूपती ॥ निजकरे करोनी स्पर्शिले ॥२६॥चरण धूतसे नृपवर ॥ मनात आनंद वाटे फार ॥ धरणीदेवी घाली नीर ॥ कनकझारी घेवोनिया ॥२७॥ पाद प्रक्षाळोनी ते नीर ॥ मस्तकी वंदी राजेश्वर ॥ आपुले कुटुंब पशु कोश समग्र ॥ प्रक्षाळिले पादोदके ॥२८॥मनात भावी नृपनाथ ॥ मी भाग्याचा होय अत्यंत ॥ मजसमान त्रिभुवनात ॥ सभाग्य नसे दूसरा ॥२९॥असो वस्त्राभरणे करोन ॥ गौरविला हो जगन्मोहन ॥ जो पुरुषशुद्ध चैतन्य ॥ आनंदघन जगदात्मा ॥३०॥जो वेदांचा निर्मिता यथार्थ ॥ त्यासि विप्र घालिती यज्ञोपवित ॥ माया वेषधारी जगन्नाथ ॥ लौकिकार्थ संपादितसे ॥३१॥जो मायेचा निर्मिता होय ॥ ब्रह्मादिक वंदिती ज्याचे पाय ॥ त्याहाती करविती वाङ्गनिश्चय ॥ यथान्याये करोनिया ॥३२॥लग्नघटिका आलि जवळी ॥ तव ते श्रृंगार सरोवरमराळी ॥ पद्मावती आकाशबाळी ॥ वस्त्राभरणे गौरविली ॥३३॥अंतःपट धरिले त्वरित ॥ देशिक सर्वासि सावधकरित ॥ म्हणे वादविवाद टाकोनि समस्त ॥ सावध व्हावे सर्वाही ॥३४॥राव जावोनी झडकरी ॥ जो सौंदर्यसागरींची लहरी ॥ तिसी कडिये घेऊनि निर्धारी ॥ नृपवर वेगेसि पातला ॥३५॥मंगळाष्टके विप्र बोलती ॥ म्हणती जयजयाजी लक्ष्मीपती ॥ सुखदायका वैकुंठपती ॥ करी कल्याण सर्वदा ॥३६॥हरि नारायणा केशवा ॥ मुकुंदा अच्युता कमळाधवा ॥ शेषशायी करुणार्णवा ॥ मंगळदायका तूचि पै ॥३७॥ऐसे विप्र अष्टक बोलता ॥ तो अंतःपट फिटला तत्वता ॥ सर्वजनही लग्नाक्षता ॥ टाकिते जाहले वधूवरांवरी ॥३८॥धडकत वाद्यांचा गजर ॥ नादे कोंदले पुष्कर ॥ देव वर्षती

सुमनसंभार ॥ जयजयकार जाहला ॥३९॥भांडार फोडोनी नृपनाथे ॥ दक्षिणा दिधली अपरिमित ॥ पुरे पुरे हेचि मात ॥ याचक सर्व बोलती ॥१४०॥वरदक्षिणेसी भांडार ॥ अर्पिता जाहला राजेश्वर ॥ हेममय मुकुटसुंदर ॥ रत्नखचित दीधले ॥४१॥अश्वकुंजर रहंवर ॥ दासदासी दीधल्या अपार ॥ रत्नराशि परिकर ॥ आंदण दीधले जामाता ॥४२॥मंत्राक्षता घेऊनि जगन्नाथ ॥ पद्मावतीचे मस्तकी घालित ॥ तोचि शिरी ठेविला वरदहस्त ॥ अक्षय कल्याण दायक जो ॥४३॥देवाचार्य येवोनि सत्वर ॥ करी वधूकडील गोत्रोच्चार ॥ अत्रि गोत्री उद्भवली साचार ॥ प्रपौत्री सुधर्म रायाची ॥४४॥सुशर्मरायाची पौत्रीहोय ॥ आकाशराजपुत्री निश्चय ॥ पद्मावती नाम कन्यास्वये ॥ अंगीकारी नारायणा ॥४५॥मग वराकडील पुरोहित ॥ वसिष्ठ ऋषि उच्चारकरित ॥ ययाति राजा विख्यात ॥ होय प्रपौत्र तयाचा ॥४६॥शूरसेनाचा पौत्र ॥ वसुदेवाचा होय पुत्र ॥ वसिष्ठ गोत्रोद्भव साचार ॥ श्रीवेंकटेश नाम साजे ॥४७॥ऐसे उच्चार करून ॥ केले यथाविधी कन्यादान ॥ मग आत्महस्ते नारायणे ॥ मंगळ सूत्र बांधिले ॥४८॥वधूवरांचे करी द्विजवरे ॥ लग्न कंकण बांधिले साचार ॥ धडकत वाद्यांचा गजर ॥ आनंद थोर होतसे ॥४९॥वसिष्ठ म्हणे श्रीहरी ॥ पद्मावतीसी घेऊनि कडेवरी ॥ चाल आता बोहल्यावरी ॥ लाजाहोम करावया ॥१५०॥हासोनी बोले श्रीपती ॥ म्हणे प्रपंचाची विपरीत गती ॥ तो सावित्री म्हणे जगत्पती ॥ घेई आधी कडेवरी ॥५१॥हासोनि बोलती सर्वजन ॥ हा मुळींचा अभ्यास असेलपुर्ण ॥ आता लाजावया कायकारण ॥ ऐकोनि नारायण हासतसे ॥५२॥मग पद्मावतीस उचलोन ॥ घेऊन चालिला जगज्जीवन ॥ बोहल्यावरी जाऊन ॥ लाजाहोम आरंभिला ॥५३॥यथासांग सप्तपदी ॥ शास्त्रप्रमाणे देवविधी ॥ करिता झाला कृपानिधी ॥ अंतरपदो नेदीच ॥५४॥तो इतक्यात अंतरगृही ॥ पाकसिद्धि जाहली पाही ॥ भोजनालागी लवलाही ॥ पात्रे मांडिली सत्वर ॥५५॥विचित्ररंगमाळा घालून ॥ सुवर्णपाट मांडिले समसमान ॥ जडित अडणियातळी ठेवून ॥ कनक ताटे मांडिली ॥५६॥पात्राप्रती कनक झारिया ॥ माजी सुगंधतोय भरूनिया ॥ ठेविल्या असे जडित समया ॥ रत्नदीपलावोनिया ॥५७॥जो जगदात्मा आदिनारायण ॥ तेथे कोणता पदार्थ नव्हे न्यून ॥ अष्टसिद्धी राबती पूर्ण ॥ हरिइच्छे करुनिया ॥५८॥जेथे सहाय्यकर्ता श्रीधर ॥ काय वर्णावा तेथील विस्तार ॥ असो देवऋषि राजे सर्वत्र ॥ भोजनालागी बैसले ॥५९॥पद्मावतीसहित सर्वोत्तम ॥ करी स्त्रियायुक्त भोजन ॥ त्यापंक्तीत मुख्यवराढिण ॥ बैसल्या कोण ऐकापे ॥१६०॥बकुला लक्ष्मी सावित्री पार्वती ॥ गायत्री आणि सरस्वती ॥ शची आणि अरुंधती ॥ आदिकरोनि सर्वही ॥६१॥दोन्ही भागी बैसल्या कामिनी ॥ पद्मावतीसहित चक्रपाणी ॥ मध्यभागी तेचि क्षणी ॥ भोजनालागी बैसले ॥६२॥रजत शुभ्रवर्ण केवळ ॥ तैसा भात वाढिला निर्मळ ॥ सुवर्णनग पिवळे ॥ तैसे वरान्न दिसतसे ॥६३॥सुवासकर पाच परमान्न ॥ शाखा निर्मिल्या पूर्ण ॥ दधि मधु घृत क्षीर जाण ॥ पाटचि तेथे लोटले ॥६४॥मांडे बुंदी अनारसे ॥ फेण्या आणि गुळोऱ्या सुरस ॥ केशर कस्तुरीयुक्त सुवास ॥ घवघवीत शोभती ॥६५॥जिलब्या आणि मोतीचूर ॥ बेसनदळ आणि घेवर ॥ नानापरिच्या कोशिंबिर ॥ मनोहर वाढिल्या असे ॥६६॥असो नानाप्रकारे पक्वान्न ॥ निर्मिलेते न वर्णवे पूर्ण ॥ ज्या अन्नालागी जाण ॥ सुरगण लाळ घोटिती ॥६७॥तो सावित्री ब्रह्मपत्नी ॥ बोले श्रीवेंकटेशालागूनी ॥ पद्मावतीचे वदनी ॥ ग्रास घाली स्वहस्ते ॥६८॥अवश्य म्हणोनी श्रीपती ॥ परमान्न ग्रास

घेवोनी हाती ॥ वधूचे मुखी जगत्पती ॥ घालिता जाहला तेधवा ॥६९॥मग पद्मावती प्रती ॥ बोलत्या जाहल्या सर्वयुवती ॥ हरिमुखी शीघ्रगती ॥ ग्रासघाली सत्वर ॥१७०॥आकाशरायाची बाळी ॥ परमसुकुमार चंपककळी ॥ ग्रास घेवोनी करकमळी ॥ उठोनि उभी राहिली ॥७१॥वामहस्ते करोनि देख ॥ आवरिले श्रीहरीचे मस्तक ॥ सव्यकरी ग्रास देख ॥ वदनी घालीत तेधवा ॥७२॥असो ऐसा आनंदयुक्त ॥ भोजनविधि सारिला समस्त ॥ मुखप्रक्षाळोनि यथार्थ ॥ विडे घेतले त्रयोदशगुणी ॥७३॥सर्वजन जाहले तृप्त ॥ ब्राह्मणांसि दक्षिणा अमित ॥ देता जाहला नृपनाथ ॥ नव्हे गणती तयाची ॥७४॥मग स्त्रिया सर्वही मिळोनी ॥ आरंभिले हळदी उटणी ॥ पद्मावती प्रति कामिनी ॥ बोलत्या जाहल्या ते काळी ॥७५॥नाव घेऊनी वेगेसी ॥ हरिद्रा लावावी हरिमुखासी ॥ लज्जित पद्मावती मानसी ॥ अधोवदन राहिली असे ॥७६॥मनी विचारी सुंदर ॥ हा नामरूपातीत अगोचर ॥ सर्वव्यापक परमेश्वर ॥ काय नाम ठेऊ याते ॥७७॥परम सलज्ज सुकुमार ॥ शब्दू नये मुखाबाहेर ॥ हरिद्रा घेऊनि सत्वर ॥ हरिमुखासी लाविली ॥७८॥स्त्रिया म्हणती विश्वंभरा ॥ नाव घेऊनी लावी हरिद्रा ॥ ऐकोनि हासे श्रीधर ॥ काय करिता जाहला ॥७९॥हाती हरिद्रा घेऊनी ॥ म्हणे पद्मावती विशेष शाहणी ॥ मज अव्यक्ता लागूनी ॥ व्यक्तीस जिणे आणिले ॥१८०॥ऐसे बोलोनि मोक्षदानी ॥ हरिद्रा लाविली तेचि क्षणी ॥ परमानंदे करोनी ॥ विडे तोडिती परस्परे ॥८१॥मग घालोनि काचोळीसि गाठी ॥ हरीप्रती बोलती गोरटी ॥ सोडावी आता जगजेठी ॥ उठाउठी सत्वर ॥८२॥हासोनि बोले श्रीपती ॥ लौकिकाची विचित्र गती ॥ मेहुणे हासोनि बोलती ॥ सोडी निश्चिती वेंकटेशा ॥८३॥या गोष्टीचा अभ्यास ॥ पूर्वीच असे तुम्हास ॥ आता काही नलगे सायास ॥ सोडावया कारणे ॥८४॥वेंकटेश पाहता निरखून ॥ गाठ सुटली न लगता क्षण ॥ जो मायानियंता नारायण ॥ नवल अद्भुत केले पै ॥८५॥जो पाहतांची कृपादृष्टी ॥ सुटे अगाध मायागाठी ॥ जो पुराणपुरुष जगजेठी ॥ ऐका गोष्टी तयाची ॥८६॥असो याचिप्रकारे करोन ॥ चार दिवसपर्यंत जाण ॥ नित्य उत्साह होतसे पूर्ण ॥ तो नवर्णवेची सर्वथा ॥८७॥पाचवे दिवशी नृपवर ॥ साडेकरोनी सत्वर ॥ नानाप्रकारे आहेर ॥ समर्पिले सर्वही ॥८८॥सद्गदित होऊनि अंतरी ॥ आकाशराज बोले निर्धारी ॥ पुत्रप्राय अजिवरी ॥ पालन केले कन्येचे ॥८९॥आता अर्पिली तुजप्रती ॥ स्नेहे पाळी रमापती ॥ ऐसे बोलता रायाप्रती ॥ अश्रु नयनी पातले ॥१९०॥धरणीदेवीचे नेत्रकमळी ॥ अश्रु श्रवती तये वेळी ॥ वसुदान तोंडमान तयेकाळी ॥ शोकाकुलीत जाहले ॥९१॥ऐसे पाहोनि वैकुंठपती ॥ सद्गदित जाहला चित्ती ॥ समयाभिप्राय रमापती ॥ दाविता जाहला लौकिकी ॥९२॥असो साडे जाहली यावरी जाण ॥ ऐरावतावरी नारायण ॥ पद्मावती सहित जगज्जीवन ॥ आरूढले ते तेकाळी ॥९३॥धडकते वाद्यांचा ध्वनी ॥ मंगळतुरे वाजती तेक्षणी ॥ सर्वभारेसि चक्रपाणी ॥ निजमंडपासी चालिले ॥९४॥यथाशास्त्र गृहप्रवेश ॥ नेले आपुल्या मंडपास ॥ धरणीदेवी विनवितसे ॥ हरीप्रती तेधवा ॥९५॥एकमास पर्यंत ॥ एथेचि वास करावा यथार्थ ॥ एवढे आमुचे मनोरथ ॥ पूर्ण केले पाहिजे ॥९६॥हरि म्हणे आहे कार्यार्थ ॥ आम्ही गमन करू यथार्थ ॥ तुम्ही पद्मावतीसि अर्पिले आम्हाते ॥ इतुकेन तृप्त असो आम्ही ॥९७॥नाना प्रकार वस्तु बहुत ॥ जामातासि अर्पी नृपनाथ ॥ आज्ञा घेऊनि जगन्नाथ ॥ निघता जाहला ते काळी ॥९८॥आपापले वाहनी बैसोन ॥ देवपाळ निघाले अवघेजण ॥ अठ्याऐंशी सहस्त्र ऋषिगण ॥

शिष्यांसहित निघाले ॥९९॥गरुडावरी गरुडध्वज ॥ आरूढता जाहला अधोक्षज ॥ निजभारेसी आकाशराज बोळवीत जातसे ॥२००॥मग तयाप्रती श्रीनिवास ॥ प्रार्थना करी आदिपुरुष ॥ तुम्ही परतावे आता नगरास ॥ परिवारेसि राजेश्वरा ॥१॥जगद्वंद्य आपण ॥ वंदिले आकाशरायाचे चरण ॥ येरी देत आशीर्वचन ॥ यशवंत होय सर्वदा ॥२॥असो आज्ञा घेऊनि तात्काळ ॥ स्वस्थानासि गेला नृपाळ ॥ निजभारेसी वैकुंठपाळ ॥ चालिला हो ते काळी ॥३॥आले सुवर्णमुखरी पाशी ॥ श्रीहरी विचारी निजमानसी ॥ षण्मास पर्यंत निश्चयेसी ॥ वास एथे करावा ॥४॥लग्न जाहलिया षण्मास ॥ पर्वतावरी न चढावे निःशेष ॥ याकरिता श्रीनिवास ॥ राहता जाहला तया स्थळी ॥५॥अगस्तीआश्रमाजवळी साचार ॥ उभविले रत्नमय शिबिर ॥ तेथे राहिला जगदुद्धार ॥ पद्मावती समवेत ॥६॥देवऋषि शिष्यांसहित ॥ वंदोनिया जगन्नाथ ॥ आपापले स्थानासि त्वरित ॥ जाते जाहले ते काळी ॥७॥शचीसहित सहस्त्रनयन ॥ सावित्री सहित चतुरानन ॥ अपर्णेसहित नंदिवाहन ॥ जाते जाहले स्वस्थाना ॥८॥आज्ञावंदोनी साचार ॥ करवीराशी गेली इंदिरा ॥ अगस्तीआश्रमी जगदुद्धार ॥ राहते झाले स्वइच्छा ॥९॥वेंकटेशविजयग्रंथ ॥ हाचि केवळ शेषाद्रिपर्वत ॥ श्रीवेंकटेश साक्षात एथे वसे सर्वदा ॥२१०॥भाविक यात्रेसि घेऊनि जाणा ॥ करिती पारायण प्रदक्षिणा ॥ वेंकटेशा त्यांचे जन्ममरण ॥ दूर करि निर्धारी ॥११॥की वेंकटेशविजय रसायन ॥ भवरोगी सेवावे प्रीतीकरोन ॥ ते आरोग्य होऊनि न लगता क्षण ॥ वैकुंठधामा पावती ॥१२॥ज्याचे घरी असेल हा ग्रंथ ॥ पिशाच भूत नरिघे तेथ ॥ सर्प व्याघ्र तस्कर त्याते ॥ बाधा करू न शकती ॥१३॥हा अध्याय वाचिता त्रिकाळ ॥ त्याची संकटे निरसती सकळ ॥ भाविकी प्रचीत पहावी निर्मल ॥ नाही अभाविकाशी कारण ॥१४॥नित्य एक आवर्तन यथार्थ ॥ हा अध्याय वाचे षण्मासपर्यंत ॥ दरिद्री लग्नार्थियाचि सत्य ॥ होईल लग्न निर्धारी ॥१५॥जो का अभाविक खळ ॥ एथ अविश्वास मानी केवळ ॥ तो अल्पायुषी होईल तात्काळ ॥ त्याशी अधःपात सुटेना ॥१६॥प्रचीत न पाहता यथार्थ ॥ उगेचि ग्रंथासि दोष ठेवित ॥ त्याशी न सुटे अधःपात ॥ कल्पपर्यंत निर्धारी ॥१७॥जे श्रीहरीचे प्रियपात्र ॥ त्यांशी आवडे हा परमपवित्र ॥ त्यावरी कृपा अहोरात्र ॥ श्रीवेंकटेश करील पै ॥१८॥जय सद्गुरु चिद्घनानंद ॥ महाराज स्वामी श्रीगोविंद ॥ त्याचे पदीचे मकरंद ॥ वीर षट्पद सेवीतसे ॥१९॥इति श्रीवेंकटेशविजय ग्रंथ सुंदर ॥ समंत पुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ दशमाध्याय गोड हा ॥२२०॥ एकंदर ओवीसंख्या ॥१७५५॥

# अध्याय ११ वा

*श्री वेंकटेशाचा लग्न सोहळा दहाव्या अध्यायात सांगून झाल्यावर पुनः सूतांनी देवाचे चरित्र सांगण्यास सुरुवात केली. सूत म्हणाले, हे ऋषिजनहो श्रीभगवान अगस्तिऋषींच्या आश्रमापाशी येऊन राहिले असता त्या अरण्यास अपूर्व शोभा प्राप्त झाली. सर्व वृक्षलतादिक फळाफुलांने नित्य बहरून गेले होते. अशा आश्रमात देव पद्मावतीसह आनंदाने येऊन राहिले.*

*इकडे नारायणपुरात आकाशराजा उत्तम रीतीने राज्यकारभार करीत राहिला होता. तो एकाएकी फार मोठ्या रोगाने पिडला गेला. त्या रोगाने त्याचा मृत्युकाल जवळ येत चालला होता. दैवगती विचित्र असते. पुढे तो रोग इतका वाढला की, राजाची वाणी बंद झाली. चलनवलन थांबले. त्याला ऊर्ध्वश्वास सुरू झाला.*

*राजाचा आसन्नमरणकाल जवळ आला हे पाहून तोंडमान नावाच्या राजाच्या भावाने श्रीवेंकटेशाकडे दूत पाठविला, व त्वरित येण्याविषयी कळविले. दूताची बातमी ऐकताच देवी पद्मावती दुःखाने मूर्च्छित पडली. अगस्तीऋषींच्या पत्नीने थंड उपचाराने तिला सावध केले. श्रीवेंकटेश बकुला पद्मावतीसह नारायणपुरास आले. भगवंतांनी राजाचे क्षेमकुशलाची चौकशी केली. प्रकृति बरी नसल्याचे ऐकून राजशयनमंदिरात भगवान गेले व त्यांनी राजाची गाठ घेतली. प्रकृतीमान पाहून उभयतांना फारच दुःख झाले. श्रीवेंकटेश राजाचे गुणवर्णन करून शोक करू लागले. ते पाहून राजा सावध होऊन भगवंतास म्हणाला, मी आता चाललो. आपण आता माझ्या बंधूस व मुलास सांभाळावे, असे सांगून राजाने प्राण सोडला. सर्वत्र शोकाकूल झाले. देवी पद्मावती व राणीच्या दुःखास पारावार उरला नाही. देवांनी सर्वांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. भगवंतांनी तेथे राहून आकाशराजाचे उत्तर कार्य यथासांग करविले. पुष्कळ दानधर्म करविला. ब्राह्मण भोजन वगैरे झाले. भगवान पद्मावती देवीसह आपल्या मंदिरास परत आल्यावर काही दिवस गेले. पुढे राजपुत्र वसुदान व तोंडमान यांच्यात राज्याच्या अधिकाराबद्दल वाद सुरू झाला. वाद संपेना शेवटी ते प्रकरण भगवंताच्याकडे आले. देवी पद्मावतीने आपल्या भावाचा पक्ष घेण्यास भगवंतांना सांगितले व आपली शस्त्रसामग्री तोंडमानास देवविली.*

*उभयतात घनघोर युद्ध सुरू झाले. विपुल हानी झाली, कोणी कोणास हटेना. भगवंतांनी मेहुण्याच्या बाजूने युद्धात भाग घेतला. त्यांना शस्त्राघाताने मूर्च्छा आली. पद्मावतीस ही बातमी कळताच तिला फारच दुःख झाले. थोड्यावेळाने भगवान सावध झाले. सर्वांचे त्यांनी समाधान केले.*

*शेवटी अगस्ति ऋषींच्या विचारे उभयतांना राज्य वाटून देण्याचे ठरवून युद्ध थांबविले. सर्व ऐश्वर्याची व राज्याची वाटणी करून तोंडदेशावर तोंडमान यास व नारायणपुरात वसुदान यास राज्यावर बसविले. विभाग करताना शेवटी तीन गावे उरली ती उभयतांनी भगवंतांना दिली. एवढे कार्य करून भगवान आपल्या स्थानी परत आले.*

*तोंडमान नेहमी श्रीवेंकटेशाच्या दर्शनास येत असे. एके दिवशी असाच तो आला असता त्याने काही तरी आपणाकडुन सेवा घेण्याविषयी विनंती करताच भगवंतांनी आपणास राहण्यास एक विशाल व अतिसुंदर असे मंदीर*

*बांधून देण्यास सांगितले. भगवंताच्या इच्छेप्रमाणे मंदीर बांधून तयार होताच योग्यवेळी वास्तुशांति वगैरे करून भगवान तेथे राहण्यास गेले. वास्तुशांतीचा समारंभही फार मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. भगवंतास उच्चासनावर बसवून सर्व देव व ऋषी वगैरे मंडळींनी पूजा केली. देवांनी व ऋषींनी या ठिकाणी आपण स्थिर राहा असा आशीर्वाद दिला. दोन दिवे लाविले. ते कलियुगाच्या अस्तापर्यंत कायम राहतील असे सांगण्यात आले. तोंडमानाने छत्रचामर वगैरे सर्व ऐश्वर्य भगवंतास समर्पण केले. अनेक प्रकारचे उत्सव समारंभ झाले. ध्वज चढविला गेला. शेवटी अवभृत स्नान करून मंडळी आपापल्या ठिकाणी गेली. शुक्रवारी आकाशराजाने दिलेला मुकुट देवाच्या मस्तकावर घातला जातो. अद्यापि सर्व उत्सव मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी चालतात. मोठी यात्रा नेहमी व अनेक उत्सव येथे होतात. श्रीभगवान आपल्या ऐश्वर्याने या ठिकाणी सतत वास्तव्य करून आहेत. जे कोणी भगवंताच्या दर्शनास जातात त्यांच्या मनोकामना सर्व पूर्ण होतात. यापुढील भगवन्माहात्म्य पुढील अध्यायात पाहू.*

श्रीगजाननाय नमः ॥ वेंकटेश चारी अक्षरे ॥ ज्याचे मुखी वसती निरंतर ॥ त्यासी वंदिती विधि पुरंदर ॥ कलिकाळासि जिंकिले त्याने ॥१॥जिही वेंकटेशासि गाइले ॥ ते तरती हे नव्हे नवल ॥ त्याचे दर्शने तात्काळ ॥ उद्धरतील बहुत जीव ॥२॥जो साक्षात इंदिरारमण ॥ जो ब्रह्मादिकांचे देवतार्चन ॥ त्याचे दास्यत्व कर्त्यासि विघ्न ॥ करू कोण शकेल पै ॥३॥ज्याचे नाम परम सार ॥ हृदयी ध्यातो अपर्णावर ॥ जो योगियांचे निज माहेर ॥ संहार कर दुर्जनांचा ॥४॥त्या श्रीहरीचे नामस्मरण ॥ आदरे करावे संपूर्ण ॥ तुटेल त्याचे भवबंधन ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥५॥असो गतकथाध्यायी निरूपणा ॥ जाहले पद्मावतीचे लग्न ॥ अगस्तीआश्रमी नारायण ॥ राहता जाहला स्वइच्छे ॥६॥दशमाध्यायाचे अंती ॥ इतुकी कथा ऐकिली संती ॥ यावरी सूत शौनकादिकांप्रती ॥ कथा विचित्र वर्णितसे ॥७॥अगस्ती आश्रमासमीप ॥ राहिला कमळोद्भवाचा बाप ॥ नानाप्रकार भोग अमूप ॥ भोगितसे परमात्मा ॥८॥जेथे उभविले असे शिबिर ॥ ते वनशोभिवंत सुंदर ॥ नानावृक्ष लता मनोहर ॥ फळपुष्पेशि विराजती ॥९॥शाल तमाल देवदार ॥ कदंब पारिजातक औदुंबर ॥ अश्वत्थ अंजीर ॥ बकुल मोगरी शोभती ॥१०॥वट कपित्थ पुन्नाग जाती ॥ नाग चंपक आणि शेवंती ॥ द्राक्षावेली पसरल्या निश्चिती ॥ सफळ दिसती सर्वदा ॥११॥नारिंगी केळी रातांजन ॥ नागवेली शोभती विराजमान ॥ वाळियाची बेटे गहन ॥ कर्पूर कर्दळी डोलती ॥१२॥नाना पुष्पफळ युक्त ॥ वन दिसे सर्वदा शोभिवंत ॥ तेथींचे उदक गोड बहुत ॥ अमृताहुनी कोटिगुणे ॥१३॥जेथे वास करी श्रीधर ॥ वसंत वन शृंगारी निरंतर ॥ अष्टही सिद्धि अहोरात्र ॥ दासी होऊनी राबती ॥१४॥असो ऐशा वनात ॥ पद्मावतीसहित रमाकांत ॥ क्रीडत असता जगन्नाथा ॥ काही दिवस लोटले ॥१५॥इकडे नारायणपुरात ॥ काय वर्तला हो वृत्तांत ॥ आकाशराजा राज्य करित ॥ यथान्याय करोनिया ॥१६॥एकाएकी रायासी तत्वता ॥ अंगी दाटली घोर व्यथा ॥ काल समीप आला निश्चित ॥ जाहले विचित्र पूर्वदत्ते ॥१७॥बहुत वैद्य आणोन ॥ दिधले नाना रसायन ॥ बरी नव्हे कदापि जाण ॥ व्यथा अधिक जाहली ॥१८॥वाचा जाहली खुंटित ॥ चळणवळन राहिले समस्त ॥ ऊर्ध्व श्वास लागला तयाते ॥ प्राणांत समय पातला ॥१९॥ऐसा समय पाहोनि कठिण ॥ काय करी तोंडमान

॥ वेगी सेवक बोलावून ॥ आज्ञा दीधली तात्काळ ॥२०॥अगस्तीआश्रमासी जावे त्वरित ॥ हरीसि श्रुतकरावा वृत्तांत ॥ पद्मावतीशी मात ॥ करावीस श्रुत वेगेसी ॥२१॥आकाशराजा व्यथा भूत ॥ समीप आला त्यासी मृत्यु ॥ तुम्ही शीघ्र याल त्वरित ॥ तरीच दर्शन होईल ॥२२॥ऐशी आज्ञा वंदोन ॥ दुत धावले त्वरेकरून ॥ पद्मावतीस करोनि नमन ॥ वर्तमान सांगती ॥२३॥म्हणती माते आकाश कुमारी ॥ रायासि जाहली व्यथा भारी ॥ अंत समय निर्धारी ॥ समीप वाटे जननिये ॥२४॥दूतमुखीचे वर्तमान ॥ ऐकोनि घाबरले अंतःकरण ॥ तेव्हा पद्मावतीस दारुण ॥ कल्पांतचि भासला ॥२५॥किंवा पर्वतचि कोसळला ॥ की मस्तकी विद्युत्पात जाहला ॥ दूतमुखींची वार्ता ऐकिली ॥ तैसे गमले सतीते ॥२६॥दुःखे पडिली मूर्च्छागत ॥ अगस्तीची स्त्री धावली त्वरित ॥ शीतळ उपचार करोनि बहुत ॥ सावध केली तियेसी ॥२७॥बैसविती जाहली उठवोन ॥ शोकसमुद्री गेली बुडोन ॥ तो जवळी आला नारायण ॥ कळला वृत्तांत सर्वही ॥२८॥मग पद्मावती आणि बकुलेसहित ॥ वेगे निघाले वैकुंठनाथ ॥ मनोवेगे आले त्वरित ॥ नारायणपुरा प्रती ॥२९॥द्वारपाळासि वेगे करोन ॥ पुसता जाहला पक्षिवाहन ॥ विपरीत नसे की वर्तमान ॥ आकाशराजा सुखी की ॥३०॥सेवक बोलती श्रीहरी ॥ राजयासी व्यथाभारी ॥ त्याचे मरण मुरारी ॥ समीप आले वाटतसे ॥३१॥ऐसे ऐकोनि जगन्नाथ ॥ शीघ्र प्रवेशले मंदिरात ॥ तो दर्भासनी राजयाते ॥ पहुडविले असे ते काळी ॥३२॥समीप देखोनिया मरण ॥ दुःखे व्याप्त नारायण ॥ रायासि ह्रदयी कवळोन ॥ अत्यंत शोक आरंभिला ॥३३॥मुखावरी ठेवोनि मुख ॥ विलापतसे रमानायक ॥ म्हणे राजेश्वरा मजसी एक ॥ बोल आता सत्वर ॥३४॥तू वडील सर्वांसी मान्य ॥ तुजविणे आम्ही परदेशी दीन ॥ तू धर्मात्मा पुण्यपरायण ॥ करिता गमन उचित नव्हे ॥३५॥आम्हासि नाही मातापिता ॥ बंधु आप्त नाही सर्वथा ॥ तुझा आश्रय तत्वता ॥ केला आम्ही सर्वस्वे ॥३६॥अहा राया गुणनिधाना ॥ अहा राया धर्म परायणा ॥ अहा राया आम्हासि टाकोन ॥ जातोसि आता निर्धारी ॥३७॥किंचित सावध होवोनि ॥ मजशी बोल एक वचन ॥ ऐसे नानाप्रकारे करोन ॥ जगज्जीवन शोककरी ॥३८॥श्रोते पुसती हो कौतुक ॥ जो अनंत ब्रह्मांडांचा नायक ॥ त्यासी कैसा जाहला शोक ॥ हे असंमत दिसतसे ॥३९॥जाणोनि श्रोतियांचे प्रश्न ॥ उत्तर दीधले विचारून ॥ जगन्निवास नारायण ॥ भेदाभेद रहित तो ॥४०॥ज्याचे नाम घेता उत्तम ॥ शोक रहित होती भक्तसत्तम ॥ त्यासी ऐसा शोक दुर्गम ॥ बाधेल कैसा निर्धारी ॥४१॥परी मायावेषधारी मुरहर ॥ लौकिक दावी समयानुसार ॥ जैसा नट सोंग घेवोनि परिकर ॥ संपादणी दावितसे ॥४२॥तैसाचि आता श्रीधर ॥ दावीतसे लौकिकाचार ॥ ऐसे ऐकता उत्तर ॥ श्रोते चतुर आनंदले ॥४३॥असो ऐसा नानाभाव ॥ दाविता जाहला माधव ॥ जो मायानियंता केशव ॥ करुणार्णव भक्तांचा ॥४४॥शोक करिता जगन्नाथ ॥ राये नेत्र उघडिले किंचित ॥ सावध होवोनी मात ॥ काय बोलता हरीप्रती ॥४५॥राजा म्हणे जगन्मोहना ॥ मज समीप आले मरण ॥ आता मी न वाचे व्यथेतून ॥ जगन्नायका श्रीपती ॥४६॥तू जगत्कुटुंबी सर्वेश्वर ॥ तुज काय सांगावे विचार ॥ माझा पुत्र आणि सहोदर ॥ सांभाळी यांसि नारायणा ॥४७॥ऐसे बोलिला नृपती ॥ तो कासावीस जाहला मागुती ॥ ह्रदयी कवळिला रमापती ॥ तेथेचि प्राण सोडिला ॥४८॥जाहला एकचि हाहाकार ॥ ह्रदय पिटिती नारीनर ॥ नगरीचे लोक समग्र ॥ शोकसागरी बुडाले ॥४९॥पद्मावतीच्या शोका

नसे अंत ॥ गडबडा भूमीवर लोळत ॥ म्हणे ताता तुज यथार्थ ॥ कोठे पाहू यावरी ॥५०॥दुःख जाहले अत्यद्भुत ॥ धरणीदेवी पडिली मूर्च्छित ॥ सकळस्त्रिया तिशी सावरित ॥ नाही अंत महाशब्दा ॥५१॥मृत्तिका घेवोनि हस्तकी ॥ धरणीदेवी घाली मुखी ॥ वोढवले पूर्वकर्म की ॥ गहनपातक केले म्या ॥५२॥की अपमानिले ब्राह्मणाते ॥ की भेद मानिला हरिहराते ॥ की विप्र बैसला पंगतीत ॥ उठवोनि बाहेर घातला ॥५३॥की पंक्तिभेद केला पूर्ण ॥ की मातापित्यासि बोलिले कठीण ॥ की सद्गुरूसी अव्हेरून ॥ वचन बोलिले मी पूर्वी ॥५४॥तरी आता पतिवियोग ॥ त्या पापे जाहला सवेग ॥ असो तो भक्तभवभंग ॥ संबोखित सर्वांसी ॥५५॥श्रीहरि म्हणे ऐका ॥ आता वृथा शोक करू नका ॥ जे जे प्राणी दिसती देखा ॥ ते नाश पावती शेवटी ॥५६॥आकारासि आले ते जीव ॥ ते ते लया पावती सर्व ॥ आत्मा शाश्वत स्वयमेव ॥ तो आप्त नव्हे कोणाचा ॥५७॥जातस्यहि ध्रुवो मृत्युः ॥ गीतेचा असे वाक्यार्थ ॥ माता शोक करोनी व्यर्थ ॥ विचारोनी पाहेपा ॥५८॥होणार न चुके कोणासी ॥ ऐसे बोलोनि हृषीकेशी ॥ शांत केले सर्वांसी ॥ शोकापासूनी ते काळी ॥५९॥मग राजदेह उचलोन ॥ केला अग्निमुखी समर्पण ॥ उत्तरकार्य संपूर्ण ॥ करविते जाहले यथाविधि ॥६०॥सोळा दिवस पर्यंत ॥ जवळी राहोनि जगन्नाथ ॥ यथा सांग समस्त ॥ उत्तरक्रिया करविली ॥६१॥द्रव्य वेचोनी बहुत ॥ दाने देवविली अमित ॥ ब्राह्मणभोजन यथायुक्त ॥ दक्षिणा अपार दीधली ॥६२॥असो यावरी क्षीराब्धिजामात ॥ पुसोनिया समस्ताते ॥ गेला पद्मावती समवेत ॥ स्वस्थानासि ते काळी ॥६३॥काही दिवस गेलियावर ॥ तोंडमान आणि राजकुमार ॥ दोघात उद्भवला कलह दुर्धर ॥ राज्यनिमित्त करोनिया ॥६४॥तोंडमान म्हणे सत्वर ॥ मी रायाचा कनिष्ठ सहोदर ॥ रायामागे निर्धार ॥ मी अधिकारी राज्याचा ॥६५॥राजपुत्र वसुदान ॥ म्हणे मी असता राजनंदन ॥ राज्यासी अधिकारी तोंडमान ॥ सर्वथाही न होय ॥६६॥ऐसा होता वादविवाद ॥ वाढले द्वंद्व अति अगाध ॥ उभयता पातले जेथे गोविंद ॥ आनंद कंद जगद्गुरू ॥६७॥उभयता वंदोनिया अनंता ॥ सांगीतली सकळही वार्ता ॥ संकट पडिले जगन्नाथा ॥ कैसे आता करावे ॥६८॥विचार करी नारायण ॥ परमभक्त माझा तोंडमान ॥ शालक आपला वसुदान ॥ दोघांसी समान पहावे ॥६९॥तव एकांती पद्मावती ॥ वेंकटेशासी जाहली प्रार्थिती ॥ म्हणे प्राणेश्वरा वचनोक्ती ॥ ऐका माझी सत्वर ॥७०॥वसुदान माझा सहोदर ॥ आपण तिकडे व्हावे निर्धार ॥ जगदात्मा तू सर्वेश्वर ॥ करी उपकार शालकाते ॥७१॥परम संकट जाणोन ॥ मग काय करी जगज्जीवन ॥ शंख चक्र आयुधे दोन ॥ तोंडमानासि दीधली ॥७२॥वसुदानाकडे मुरहर ॥ आपण साह्य जाहला सत्वर ॥ सज्योनी एक रहंवर ॥ आरूढले तयावरी ॥७३॥उच्चैः श्रवासमान ॥ चारी घोडे जुंपिले पूर्ण ॥ वरी सारथी बैसला निपुण ॥ गरुडध्वज झळकतसे ॥७४॥चैत्रशुद्ध त्रयोदशीस ॥ नेमिला युद्धाचा दिवस ॥ शस्त्रास्त्र सज्योनी बहुवस ॥ उभय पक्षींचे वीर पै ॥७५॥सैन्यसागर करोनी सिद्ध ॥ मांडले हो द्वंद्वयुद्ध ॥ जैसे कौरव पांडवांचे अगाध ॥ पूर्वी युद्ध जाहले ॥७६॥गज अश्व आणि रहंवर ॥ निघाले बहुत पायभार ॥ दोही कडे समान वीर ॥ युद्धासि उभे ठाकले ॥७७॥जाहले शस्त्रास्त्रमंडित ॥ दोही दळी वाद्य अद्भुत ॥ वाजता नाद भरला गगनात ॥ पृथ्वी थरथरा कापतसे ॥७८॥सिंहनादे गर्जती वीर ॥ शंख त्राहाटिती परमघोर ॥ त्यानादे दिशा अंबर ॥ भरोनि गेले एकदाची

॥७९॥पायदळावरी पायदळ ॥ अश्वांसी अश्व झगटती प्रबळ ॥ रथियांवरी रथी ते वेळ ॥ धावताती परस्परे ॥८०॥सारथियांसि सारथी हाणिती ॥ शस्त्रास्त्रे बहुतवर्षती ॥ प्रेते पडियेली निश्चिती ॥ गणना नव्हे तयांची ॥८१॥चहूकडून अशुद्धपूर ॥ लोटला पै अपार ॥ त्यामाजी अश्वकुंजर ॥ वाहोनि जाती निर्धारी ॥८२॥एकासी एक हाणिती ॥ जीवाशा काही न धरिती ॥ स्वामिकार्यालागी निश्चिती ॥ प्राण त्यागिती रणांगणी ॥८३॥तोंडमान स्वये आपण ॥ रथारूढ जाहला न लागता क्षण ॥ चारी घोडे सुपर्णासमान ॥ श्वेतवर्ण जुंपिले ॥८४॥आलात चक्रवत सायकासन ॥ झळके सौदामिनी समान ॥ तूणीर बांधिले परिपूर्ण ॥ आकर्षोनि पाठिसी ॥८५॥सिंहनादे महावीर ॥ गर्जद पुढे आला सत्वर ॥ तो देखोनिया मुरहर ॥ रथारूढ जाहला ॥८६॥सारंग धनुष्य घेऊन ॥ तडित्प्राय नेसला पीतवसन ॥ किरीट कुंडले शोभायमान ॥ तुळसी वनमाळा शोभती ॥८७॥चतुर्भुज श्यामसुंदर ॥ तोंडमानासम्मुख राजीवनेत्र ॥ अकस्मात जगदुद्धार ॥ उभा ठाकला ते काळी ॥८८॥तोंडमानते पाहून ॥ कर जोडोनी करी नमन ॥ म्हणे जगदात्मा तू नारायण ॥ युद्धकरी मज आता ॥८९॥तू जगद्वंद्य जगत्पती ॥ त्रिभुवन तुझे चरणवंदिती ॥ तुजवरी बाण श्रीपती ॥ केवि सोडू सांगपा ॥९०॥यावरी बोले श्रीहरी ॥ क्षात्रधर्म आमुचा निर्धारी ॥ युद्धासी सम्मुख जाहली या वरी ॥ काही चिंता नसे मग ॥९१॥सद्गुरु किंवा आपुला पिता ॥ युद्धासि जरी आला तत्वता ॥ त्यावरी करिता शस्त्रघाता ॥ दोष नाही निर्धारी ॥९२॥याकरिता राजेंद्रा अवधारी ॥ तू शस्त्रे सोडी अनुमान न करी ॥ तोंडमान म्हणे मुरारी ॥ आधी शर सोंडी तू ॥९३॥ऐसे ऐकूनि मधुसूदन ॥ सोडी तोंडमानावरी मार्गण ॥ मग येरी सरसावून ॥ शस्त्रास्त्री युद्ध करीतसे ॥९४॥बाणापाठी बाण ॥ सोडी पद्मावती रमण ॥ जैसे जीमूत वर्षती घन ॥ तैसे मार्गण जाताती ॥९५॥तोंडमानाचे दळभार ॥ बहुत संहारिले श्रीधरे ॥ कोणी न राहती समोर ॥ हरिसमुख युद्धासी ॥९६॥कंदुका ऐसी शिरे उसळती ॥ पक्षी ऐसे गगनी भासती ॥ कित्येकांचे चरण तुटती ॥ संख्या नाही तयांची ॥९७॥अगाध हरीचा मार ॥ पळो लागले सैन्य समग्र ॥ ऐसे देखता तोंडमान नृपवर ॥ क्रोधायमान जाहला ॥९८॥जैसा कल्पांतींचा रुद्र ॥ तैसा दिसे तो महावीर ॥ सोडीत शरांचा पूर ॥ करी संहार सेनेचा ॥९९॥हरीचे बाणजाळ समस्त ॥ तोडोनि टाकिले क्षणांत ॥ आत्मशरे खिळोनि सर्वांते ॥ जर्जर केले ते काळी ॥१००॥ते पाहोनि राजीवनेत्र ॥ सोडिता जाहला अग्निअस्त्र ॥ तोंडमानाचे दळसमग्र ॥ जळो लागले एकदा ॥१॥मग तो वीर तोंडमान ॥ सोडिता जाहला पर्जन्य ॥ तेणे स्वसैन्य शीतळ होवोन ॥ वाहो लागली हरिसेना ॥२॥वातास्त्र प्रेरी रमानाथ ॥ तेणे जळद विदारिला अकस्मात ॥ वात प्रबळ देखोनि बहूत ॥ येरी पर्वत सोडिले ॥३॥वातनिरसोनी सवेग ॥ चमूवरी कोसळो पाहे नग ॥ मग वज्रास्त्र श्रीरंग ॥ सोडोनि पर्वत फोडिले ॥४॥ऐसे शस्त्रास्त्री युद्धबहुत ॥ जाहले चार घटिका पर्यंत ॥ काही केल्या रमानाथ ॥ नाटोपेचि सर्वथा ॥५॥मग आरक्त करोनिया नयन ॥ सरसावला तोंडमान ॥ बाणापाठी बाण ॥ सोडिता जाहला हरीवरी ॥६॥विमानारूढ सुरवर ॥ वरोनि पाहती चमत्कार ॥ तोंडमान सोडोनि चारीशर ॥ रथीचे अश्व मारिले ॥७॥सवेचि सोडोनि एकबाण ॥ सारथी मारी न लागता क्षण ॥ आणिक पंचशर सोडून ॥ रथही छेदोनि पाडिला ॥८॥पुन्हा एक निर्वाणशर ॥ हरीवरी प्रेरिला सत्वर ॥ हृदयी बैसला साचार ॥ वज्रप्राय ते काळी ॥९॥तेणे मुर्च्छाना येऊन ॥ खाली पडिला जगन्मोहन ॥

लोक धावले चहूकडोन ॥ हाहाकार जाहला ॥१०॥वसुदानाचे सेनेत ॥ जाहला एकचि आकांत ॥ पद्मावतीचे कर्णी मात ॥ अकस्मात पडियेली ॥११॥ती ही होवोनी दुःखित ॥ महाआक्रोशे शोक करित ॥ तो आगस्तीऋषि आला धावत ॥ पद्मावतीते बोलतसे ॥१२॥म्हणे आकाशराज नंदिनी ॥ शोक करू नको ये क्षणी ॥ मूर्च्छित पडिला चक्रपाणी ॥ उठेल आता सत्वर ॥१३॥तुमचा क्षात्रधर्म परिपूर्ण ॥ वीरासी रण ते केवळधन ॥ रणी त्यागावे प्राण ॥ हा मुख्य धर्म असे पै ॥१४॥तू क्षत्रियराजकुमारी ॥ आणि महावीराची होय अंतुरी ॥ रणी पडिला याचा निर्धारी ॥ शोक सर्वथाही न करावा ॥१५॥पद्मावती म्हणे महाऋषि ॥ आता काय करावे ऐशियासी ॥ काही युक्ति आम्हांसी ॥ सांगवेगेसि ऋषिवर्या ॥१६॥अगस्ती म्हणे महासती ॥ ऐक माझी वचनोक्ती ॥ तोंडमान वसुदाना प्रती ॥ राज्य वाटोनि देइजे ॥१७॥तो पितृव्य हा बंधुजाण ॥ दोघेही तुजसम समान ॥ दोघांसी दुःख न व्हावे पूर्ण ॥ ऐसी युक्ति करावी ॥१८॥मग ऋषिसहित पद्मावती ॥ आली वेगी रणाप्रती ॥ तो मूर्च्छित पडिला श्रीपती ॥ देखती जाहली ते काळी ॥१९॥नेत्रांसि लावोनिया नीर ॥ केले शीतळ उपचार ॥ विंझणवारा सुवासकर ॥ आत्महस्ते घालितसे ॥१२०॥सावध होवोनी भगवान् ॥ म्हणे कोठे गेला तोंडमान ॥ त्यासि बाणावरी फोडीन ॥ घेईन प्राण आजि त्याचे ॥२१॥अगस्ती म्हणे राजीवनेत्रा ॥ कोप कासया स्मरारीमित्रा ॥ एक भक्त एकशालक खरा ॥ समान तुज दोघेही ॥२२॥कासया पाहिजे युद्धप्रसंग ॥ करोनि देई राज्यविभाग ॥ भक्तकैवारी तू श्रीरंग ॥ समान पाही दोघांसी ॥२३॥मग बोले जगन्मोहन ॥ क्षणात जिंकोन तोंडमान ॥ राज्य शालकासि देईन ॥ अर्धक्षण न लगता ॥२४॥मग पद्मावती धावोन ॥ धरिती जाहली दृढचरण ॥ म्हणे जगदात्मा तू सनातन ॥ भक्तवत्सला श्रीहरी ॥२५॥मनमोहना केशवा ॥ वैकुंठवासिया रमाधवा ॥ प्राणवल्लभा दयार्णवा ॥ विनंति माझी परिसावी ॥२६॥बंधु पितृव्य दोघेजण ॥ उभयतांसि असावे कल्याण ॥ वल्लभा आपण कोप सोडून ॥ राज्य वाटोनि देईजे ॥२७॥अगस्तीचे वचनासी ॥ मान देईजे हृषीकेशी ॥ सर्वांसी समान जैसा शशी ॥ तैसे करी प्राणेश्वरा ॥२८॥मग अवश्य म्हणोनि नारायणे ॥ जवळी बोलावोनि तोंडमान ॥ म्हणे करू नका युद्ध दारुण ॥ माझे वचन ऐका पै ॥२९॥तोंडमान म्हणे जगदीशा ॥ तू करशील ती पूर्वदिशा ॥ तुझी आज्ञा पुराणपुरुषा ॥ शिरी वंदू वेद ऐसी ॥१३०॥हरि म्हणे राज्य वाटून ॥ उभयतांसि देतो सम समान ॥ दोघांसी ते मानले पूर्ण ॥ म्हणती अवश्य करावे ॥३१॥मग देश दुर्ग गड ग्राम ॥ विभाग करी मेघश्याम ॥ कोश गज रथ तुरंग ॥ पशु सेवका समवेत ॥३२॥

सर्वही समान वाटून ॥ तोंडदेशी स्थापिला तोंडमान ॥ नारायणपुरी वसुदान ॥ स्थापिता जाहला जगदात्मा ॥३३॥विभाग करिता उत्तम ॥ उरले होते तीन ग्राम ॥ ते उभयता मिळोनि सप्रेम ॥ श्रीहरी प्रती दीधले ॥३४॥इतुके कार्य करोन स्वस्थानासि गेला नारायण ॥ पद्मावतीसहित जगज्जीवन ॥ आनंदघन वर्ततसे ॥३५॥असो तोंडमान हरिभक्त ॥ नित्य काळदर्शनासि येत ॥ एके दिवसी नृपनाथ ॥ श्रीहरीप्रती बोलतसे ॥३६॥म्हणे अनंतकोटीब्रह्मांडनायका ॥ हे दयार्णव विश्वव्यापका ॥ वैकुंठपते सुखदायका ॥ त्रिभुवनपाळका श्रीपती ॥३७॥निजभक्तहृदय मांदुसरत्ना ॥ मीनकेतना हृदय जीवना ॥ दुष्टदानव निकृंतना ॥ राजीवनयना श्रीहरी ॥३८॥आकाशजामाता विश्वंभरा ॥ पद्मावतीहृत्पद्मभ्रमरा ॥ भक्तपाळका प्रतापरुद्रा ॥ काही आज्ञा करी

मज ॥३९॥ऐसे मनी वाटे माधवा ॥ काही तरी करावी तुझी सेवा ॥ मधुसूदना केशवा ॥ आज्ञा करी सत्वर ॥१४०॥ऐकताचि ऐसे स्तवन ॥ संतोषला पद्मावती रमण ॥ म्हणे भक्तशिरोमणि तुजकारणे ॥ सेवाकरणे असेल जरी ॥४१॥शेषाद्रीवरी आम्हांसी ॥ मंदिर रचावे रहावयासी ॥ तीन दुर्ग सप्त द्वारांशी ॥ गोपुरे दोन निर्मावी ॥४२॥पाकशाळा कोशसदन ॥ धान्यशाळा पशुशाळा गहन ॥ चित्रविचित्र सोपान ॥ पर्वतापरी बांधावे ॥४३॥स्वामितीर्थासि पायऱ्या ॥ बांधाव्या नृपवर्या ॥ विश्वकर्म्यासि बोलवूनिया ॥ आज्ञा त्यासि दीधली ॥४४॥म्हणे नृपतीचे अनुमतीने ॥ मंदिर रचावे शोभायमान ॥ तेणे तात्काळ आज्ञा वंदोन ॥ सिद्ध केले सर्वही ॥४५॥बैसावया सभास्थान ॥ विमान रचिले तालप्रमाण ॥ हरीचे जैसे इच्छित मन ॥ तैसेचि केले तात्काळी ॥४६॥असो सिद्ध जाहलिया मंदिर ॥ कर जोडोनी विनवी नृपवर ॥ म्हणे जगन्निवासा सत्वर ॥ मंदिराप्रती चलावे ॥४७॥गृहप्रवेश करावयास ॥ मुहूर्त नेमिला अतिविशेष ॥ विकृतिसंवत्सर आश्विनमास ॥ शुद्धप्रतिपदा गुरुवार ॥४८॥मध्यान्हासि आला चंडकिरण ॥ उत्तमसमया पाहून ॥ पद्मावतीसहित जनार्दन ॥ मंदिराप्रती चालिले ॥४९॥ब्रह्मादि देव संपूर्ण ॥ पातले उत्साहा कारण ॥ सहित ब्राह्मण तोंडमान ॥ नारायण चालिले ॥१५०॥नानावाद्ये वाजती प्रबळ ॥ मंगळतुरे गर्जती रसाळ ॥ गजरे करोनी तमाळनीळ ॥ मंदिरामाजी प्रवेशले ॥५१॥उच्चासनी बैसवोन ॥ हरीसि पूजी तोंडमान ॥ देवऋषी देती आशीर्वचन ॥ स्थिरो भव म्हणोनिया ॥५२॥मग तेथे कमळासने ॥ स्वहस्ते लाविले दीपदोन ॥ कलियुगाचे होय अवसान ॥ तोवरी स्थिर राहो हे ॥५३॥या विमानाचे होईल पतन ॥ आणि या दीपांचे होय अवसान ॥ तेव्हा अवतार संपवील भगवान् ॥ निश्चय विधीने कथिला असे ॥५४॥नूतनछत्र आणि चामर ॥ नाना वाहने परिकर ॥ स्वये करवोनी तोंडमान नृपवर ॥ देता जाहला तेकाळी ॥५५॥द्वितीयेचे दिवसी ध्वजारोपण ॥ नानापरीचे नैवेद्य निर्मून ॥ श्रीहरीसी करोनि अर्पण ॥ ब्रह्मकल्पोत्सव करीतसे ॥५६॥अष्टमीसी हनुमंत वाहन ॥ नवमीसी रथोत्सवपूर्ण ॥ मग गरुड वाहन काढून ॥ उत्साह केला नानापरी ॥५७॥करोनिया अवभृथस्नान ॥ स्वस्थानासि गेला तोंडमान ॥ नित्यत्रिकाळ हरिदर्शना ॥ लागी नृपवर येत असे ॥५८॥अद्यापि भक्तप्रेमळ ॥ आश्विनमासी यात्रा प्रबळ ॥ पहावयालागी घननीळ ॥ वेंकटाद्रीसि धावती ॥५९॥विश्वकर्म्याने निर्मित ॥ मंदिर असे शोभिवंत ॥ अद्यापि पाहती निजभक्त ॥ श्रीवेंकटाद्रीवरी पै ॥१६०॥आठा दिवशी भृगुवारी ॥ मुकुट घालिती मस्तकावरे ॥ आंदण दीधला निर्धारी ॥ आकाशराये मुकुट तो ॥६१॥अद्यापवरी इतुका उत्सव ॥ प्रतिवर्षी होतसे अपुर्व ॥ तेहतीसकोटी देव ॥ त्रिकाळ दर्शना नित्य येती ॥६२॥जो जगद्गुरु वैकुंठनाथ ॥ निजभक्तांची वाट पाहत ॥ श्रीवेंकटाद्रीवरी यथार्थ ॥ स्वामी माझा तिष्ठतसे ॥६३॥स्वामितार्थी करोनि स्नान ॥ जे घेती वेंकटेशदर्शन ॥ ते वैकुंठपुरीचे पाहुणे ॥ होतील जाण निश्चये ॥६४॥वेंकटेशविजय ग्रंथ ॥ जाहला एकादशाध्यायापर्यंत ॥ आता कळसाध्याय बारावा त्वरित ॥ सप्रेम भक्त ऐका तो ॥६५॥श्रीमद्वेंकटाचलनिवासिया ॥ निर्विकल्प वृक्षा करुणालया ॥ वीरवरदा वैकुंठवासिया ॥ छेदी माया दासाची ॥६६॥वेंकटेशविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत पुराण भविष्योत्तर ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ एकादशाध्या गोडहा ॥६७॥११॥एकंदर ओवीसंख्या ॥१९२२॥

# अध्याय १२ वा

*मागील अकराव्या अध्यायात राजा तोंडमान याने भगवंतांना मंदिर बांधून देऊन तेथे राहविले ही हकीकत येऊन गेली आहे. राजा तोंडमान न्यायनीतीने उत्तम प्रकारे राज्य करीत होता. त्याच्या राज्यात प्रजा सुखी होते. या प्रकारे काही दिवस गेल्यावर एक आश्चर्यकारक घटना त्याच्या राज्यात घडली ती अशी-*

*एके दिवशी एक ब्राह्मण आपली पत्नी एक पुत्र यांना राजाकडे घेऊन आला व म्हणाला राजा मी यात्रेस निघालो आहे. माझा मुलगा लहान असून पत्नी गरोदर पाच महिन्यांची आहे. तिला मजबरोबर चालवणे अशक्य असल्याने तू त्यांना आपल्याकडे ठेवून घे राजाने ब्राह्मणांच्या म्हणण्यास मान्यता देऊन एका व्यवस्थित बंद जागेत चार सहा महिन्यांची शिधा सामग्री देऊन त्यांना ठेवून घेतले. ब्राह्मण यात्रेस गेला. राजास त्याने धन्यवाद दिले.*

*पुढे ती ब्राह्मणपत्नी प्रसूत झाली. तिला मुलगी झाली. राजा आपल्या राज्यकारभाराच्या कामात ही गोष्ट विसरून गेला चार सहा महिन्यांची अन्नधान्य सामग्री संपल्यावर ते ब्राह्मण कुटुंब अन्नपाण्याविना तडफडून मरून गेले त्यांच्या अस्थि शिल्लक राहिल्या.*

*ब्राह्मण यात्रेत रमल्यामुळे त्याला येण्यास २ वर्षे काळ लोटला. परत आल्यावर तो राजास भेटून म्हणाला, "आमचे कुटुंब कोठे आहे? पत्नी प्रसूत झाली काय? तिला काय झाले आहे? कन्या की पुत्र ?" इ. याप्रमाणे राजा भानावर आला. त्याने आपणास सावरून म्हटले. तुम्हास कन्यारत्न झाले. सर्व मंडळी ठीक आहेत. आताच ते देवदर्शनास गेले आहेत. आपण आपले आन्हिक आटोपून यावे. ब्राह्मण गेल्यावर राजाने ब्राह्मण कुटुंबाची सेवकाकडून चौकशी करविताच त्याला तेथे फक्त अस्थि आढळून आल्या. राजा घाबरला. त्याने भगवंताकडे धाव घेतली. घडलेला सर्व इतिहास सांगितला व आपणास यातून वाचवावे अशी प्रार्थना केली.*

*भगवंतांनी त्या अस्थि आणवल्या व आपल्या करुणापूर्ण अमृतमयी दिव्य दृष्टीने त्यांचे अवलोकन करताच ते तिघेही पुर्ववत सजीव झाले. राजास आनंद झाला भगवंतांनी ही गोष्ट कोठेही न सांगावी असे सांगून तेव्हापासून ते गुप्त होऊन राहिले आहेत. हे कलियुग आहे अधर्म फार माजणार असा इशारा भगवंतांनी दिला आहे.*

*पुढे ब्राह्मणास कन्यापुत्र वगैरे भेटले. त्यांनी कोठे गेला होता असे विचारता आपण भगवंताच्या उदरात सर्वविश्व पाहिले असे सांगताच ब्राह्मणास आपल्या विद्वतेबद्दल पश्चात्ताप झाला. त्याने भक्तीची प्रशंसा केली. आपले कन्या पुत्र घेऊन तो राजास भेटून आपल्या गावी गेला.*

*राजा तोंडमान याने आपल्यावर देवांनी अनंत उपकार केले व आपणास मोठ्या संकटातून वाचविले याबद्दल एकदा सोन्याच्या सहस्त्र तुळशी घेऊन भगवंत दर्शनास आला. त्याने भगवंताच्या चरणी मातीच्या तुळशी पाहिल्या. त्याने देवास विचारताच देवांनी आपला एक कुंभार भक्त आहे त्याने वाहिल्याचे व सर्व भक्तांवर आपली सारखी दृष्टी असल्याचे सांगितले. आपला एक भीम नावा कुलाल भक्त आहे तो उत्तरेस राहतो हे ऐकून राजा त्या गावास गेला इतक्यात देवही तेथे आले. त्याने उभयतांचा सत्कार केला.*

*श्रीवेंकटेशांनी कुंभारास सायुज्य मुक्ति दिली व तोंडमानाच्या योग्यतेप्रमाणे त्या सरूपता मुक्ति देवांनी दिली.असा वरदीग्रंथ आहे भक्तांच्या मनकामना पूर्ण करणारा सर्वांनी भक्तीने वाचवा.*

श्रीपादोदरेंद्रगिरीनिलयाय नमः ॥ ॐ नमो जी वेंकटाद्रिवासा ॥ भक्तवत्सला पुराणपुरुषा मायाचक्रचाळका अविनाशा ॥ अनंतवेषा अनंता ॥१॥जय वैकुंठनिलया मधुकैटभारी ॥ दितिजसंहारा मुरारी ॥ मंदस्मित वदना मीनकेतनारी ॥ अहोरात्र ध्यातो तुज ॥२॥जय मुनिजनमानसरंजना ॥ पद्मावतीप्राणजीवना ॥ आकाशजामाता भवभंजना ॥ मानववेषधारका ॥३॥ करुणासागरा कंजनेत्रा ॥ कामजनका कौतुभधरा ॥ कमलनाभा कोमलगात्रा ॥ करुणासागरा श्रीहरी ॥४॥नमो दशावतारवेषधारका ॥ दुर्जनसंहारा त्रिभुवनपाळका ॥ अदितिपुत्रवरदायका ॥ अनंतशयना आदिपुरुषा ॥५॥तुझ्या कृपाबळे जगन्नाथा ॥ एकादशाध्यायापर्यंत ॥ श्रीवेंकटेशविजय ग्रंथ ॥ संपूर्ण जाहला निर्धारी ॥६॥शेवटील अध्याय बारावा ॥ बोलवी आता करुणार्णवा ॥ जगज्जीवना केशवा ॥ तुझे चरित्र तूचि बोले ॥७॥तोंडमान नृपवर ॥ बांधोनिया नूतन मंदिर ॥ स्थापिला तेथे इंदिरावर ॥ गतकथा इतुकी जाहली ॥८॥यावरी तोंडमान नृपवर ॥ जो वेंकटपतीचे प्रियपात्र ॥ जो धार्मिक उदार धीर ॥ स्वधर्माचारे राज्यकरी ॥९॥ज्याच्या राज्यात बहुत नीति ॥ वीर सर्व एक पत्नीव्रती ॥ सत्यवचनी निर्धारी ॥१०॥सर्वही वेंकटेशाचे भक्त ॥ स्त्रिया सर्वस्व धर्मे वर्तत ॥ अवर्षण दरिद्र दुष्काळ तेथे ॥ नाही राज्यात सर्वथा ॥११॥त्रिकाळ वेंकटेशाचे दर्शन ॥ सर्वदा अक्री सच्छास्त्र श्रवण ॥ आल्या अतीतासि अन्नदान ॥ यथाशास्त्रे वर्ततसे ॥१२॥काही दिवस लोटल्यावरी ॥ जाहली एकनवल परी ॥ वसिष्ठगोत्रींचा ब्राह्मण निर्धारी ॥ कुर्म नाम तयाचे ॥१३॥राघव नावाचा एक पुत्र ॥ महालक्ष्मी नामे स्त्री पवित्र ॥ पुत्र स्त्री घेवोनि विप्र ॥ नगरा आला रायाच्या ॥१४॥वेगे येवोनि ब्राह्मण ॥ घेतले रायाचे दर्शन ॥ राये षोडशोपचारे पूजोन ॥ वर्तमान पुसतसे ॥१५॥म्हणे स्वामि कोठील कोण ॥ काय निमित्त जाहले आगमन ॥ स्त्रीपुत्रांसि संगे घेऊन ॥ कोठे जाता या पंथे ॥१६॥यावरी बोले तो द्विजवर गंगास्नानासि जातो निर्धार ॥ संगे घेऊनि स्त्रीपुत्र ॥ जात असता नृपवर्या ॥१७॥स्त्री पंचमासी गर्भीण ॥ पुत्र बालक अज्ञान ॥ पंथ न चालवे याचेन ॥ परम संकट पडियेले ॥१८॥षण्मासात येतो परतोन ॥ तव वरी करी यांचे पालन ॥ धर्मात्मा तू पुण्यपरायण ॥ करी काज एवढे ॥१९॥महायात्रेचे फळ ॥ तुज प्राप्त होईल केवळ ॥ विप्रकाजी तू सुशीळ ॥ जाणोनि पातलो तव दर्शना ॥२०॥अवश्य म्हणोनी तोंडमान ॥ ब्राह्मणासि देवोनि यथेष्टधन ॥ बोलविला यात्रे कारणे ॥ परमादरे करोनिया ॥२१॥विप्रस्त्रीसी एक मंदिर ॥ देवोनिया राजेश्वर ॥ षण्मासा पुरते समग्र ॥ साहित्य आत भरियेले ॥२२॥दृढ कपाट लावोन ॥ करोनि ठेविले द्वारबंधन ॥ आपण राज्यकार्यी गुंतलापूर्ण ॥ नाही स्मरण तयांचे ॥२३॥इकडे ब्राह्मण गेला यात्रेस ॥ तीर्थ हिंडता लागले दिवस ॥ लोटती जाहली दोनवर्षे ॥ विप्र तेथोनि निघाला ॥२४॥इकडे षण्मासा पुरते अन्न ॥ ठेविले होते राजयाने ॥ ते सरोनि गेले संपूर्ण ॥ परम कठीण वोढवले ॥२५॥स्त्री पुत्र अन्न अन्न करिता ॥ मरण पावले मंदिरात ॥ रायासि हे नाही श्रुत ॥ स्मरण तयाकारणे ॥२६॥दोनवर्षे भरता साचार ॥ अकस्मात आला तो द्विजवर ॥ रायासि भेटोनि सत्वर ॥ आशीर्वचन बोलिला

॥२७॥म्हणे राजचक्रचूडामणी ॥ यात्रा घडली त्वत्कृपे करोनी ॥ माझी स्त्री पुत्र दोन्ही ॥ सुखी आहेत की राजेंद्रा ॥२८॥स्त्री जाहली की प्रसूत ॥ पुत्र की कन्या जाहली तीते ॥ शिशुसहित यथार्थ ॥ क्षेम आहे की नरेंद्रा ॥२९॥ऐसे बोलतांचि विप्र ॥ धकधकिले रायाचे अंतर ॥ म्हणे मज स्मरण नाही अनुमात्र ॥ काय गति जाहली कळेना ॥३०॥षण्मासापुरते अन्न ॥ केले द्वारबंधन ॥ दोन वर्षे लोटली त्या कारण ॥ केवि वाचतील स्त्री सुत ॥३१॥राये दूत पाठवून ॥ तात्काळ आणवी वर्तमान ॥ तो उभयता पावली मरण ॥ अस्थि पडिल्या तया स्थळी ॥३२॥आता न देखता तयाते ॥ विप्र कोपेल की मजवरुते ॥ परम संकट पडिले रायाते ॥ घाबरा जाहला अंतरी ॥३३॥जैसे होता वेद हरण ॥ घाबरा जाहला चतुरानन ॥ तैसा राजा तोंडमान ॥ भयभीत जाहला ॥३४॥मनी विचारी राजेंद्र ॥ कैसा करावा आता विचार ॥ ब्राह्मणासी प्रत्युत्तर ॥ काय द्यावे यावरी ॥३५॥अन्याय तो घडला उत्कृष्ट ॥ पुढे काही न सुचे वात ॥ कृपाळू माझा श्रीवेंकट ॥ त्याविणे संकट हरेना ॥३६॥त्यासी शरण ये अवसरी ॥ जो भक्तजनांचा कैवारी ॥ क्षीराब्धिशयन क्षीराब्धिकुमारी ॥ प्राणवल्लभा जगदात्मा ॥३७॥बुद्धिप्रेरक भगवंत ॥ राजा धैर्य धरोनि मनात ॥ ब्राह्मणाप्रती निश्चित ॥ काय बोलता जाहला ॥३८॥राव म्हणे ब्राह्मणा ॥ तुझी स्त्री पतिव्रता सगुणा ॥ प्रसूत जाहली तिजकारण ॥ कन्यारत्न जाहले ॥३९॥पुत्रकन्येस घेऊन ॥ श्रीवेंकटेशदर्शना लागून ॥ आज प्रातःकाळी उठून ॥ वेंकटाद्रीसी गेली असे ॥४०॥आपण स्नान संध्याकरून ॥ करावे सावकाश भोजन ॥ इतक्यात येतील परतोन ॥ हरिदर्शन घेवोनिया ॥४१॥ऐकोनि आनंदला विप्र ॥ स्नानासि गुंतला साचार ॥ इकडे गुहामार्गे राजेशरा ॥ धावत आला हरिपाशी ॥४२॥मुखचंद्र उतरला समस्त ॥ दुःखे नेत्र जाहले आरक्त ॥ नेत्री अश्रुधारा वाहत ॥ चरणधरी श्रीहरीचे ॥४३॥रायासि म्हणे राजीवनयन ॥ अकाळी का जाहले आगमन ॥ काय संकट पडिले म्हणोन ॥ शोकाकुलित जाहला ॥४४॥मग राजा कर जोडून ॥ करिता जाहला अपारस्तवन ॥ म्हणे जगद्गुरुउ जनार्दना ॥ जगन्निवासा श्रीहरी ॥४५॥नागेंद्रशयना नारायणा ॥ नागरिशत्रुजनकमर्दना ॥ नागाननजनक कंठभूषणा ॥ नागारीवाहना सर्वेशा ॥४६॥कमळनाभा कमळलोचना ॥ कमळोद्भवजनका कल्मषमोचना ॥ कमळधरार्चित कमळभूषणा ॥ कमळशयना कमळाप्रिया ॥४७॥अनंतरूपा अनंतनामा ॥ अनंतगुणमंडिता मेघश्यामा ॥ आद्य अनादि आत्मारामा ॥ परात्परा अनंता ॥४८॥विश्वेश्वरा विश्वपाळणा ॥ विश्वंभरा विश्वमतिचाळणा ॥ विश्वनाथा विश्वरक्षणा ॥ विश्वोद्धारा विश्वेशा ॥४९॥दीनबंधो दीननाथा ॥ दितिजसंहारा दिनोद्धर्ता ॥ दिगंबरा अवयवरहिता ॥ दशावताररूपधारका ॥५०॥बाळकासि होता दुःख फार ॥ जननीपाशी धावे सत्वर ॥ तैसा मी अनाथपामर ॥ आलो शरण तुजप्रती ॥५१॥मी अपराधी असे नारायणा ॥ रक्षी रक्षी मजकारणे ॥ जनक जननी बंधु स्वजन ॥ तुजवाचोनी नसे ॥५२॥दोन वर्षामागे अनंता ॥ एक विप्र आला अकस्मात ॥ मजपाशी ठेवोनि स्त्रीसुता ॥ आपण गेला यात्रेसी ॥५३॥ब्राह्मणाचे स्त्रीसुत ॥ ठेवोनि एका गृहात ॥ षण्मासा पुरते साहित्य ॥ दिधले त्यासि नारायणा ॥५४॥दृढ कपाट देऊन ॥ मी प्रवर्तलो राज्यकारणां ॥ दोन वर्षे लोटली जनार्दना ॥ स्मरण नाही मजलागी ॥५५॥आता विप्र येवोनि त्वरित ॥ मज पुशिले कोठे स्त्रीसुत ॥ आजि स्मरण जाहले माते ॥ ब्राह्मणाते पाहोनिया ॥५६॥दूत धाडोनी पाहिले तेथ ॥ निमाली दोघे अन्न अन्न करित ॥ अस्थींची रास

मंदिरात ॥ पडली असे केशवा ॥५७॥विप्रासि न देववे प्रत्युत्तर ॥ मानसी जाहलो भयातुर ॥ मग धैर्य करोनी साचार ॥ विप्राप्रती बोलिलो ॥५८॥तुझी स्त्री जाहली प्रसूत ॥ कन्यारत्न जाहले तीते ॥ पुत्रकन्या घेवोनि त्वरित ॥ वेंकटाद्रीसी गेली असे ॥५९॥श्रीहरीदर्शन घेऊन ॥ येईल आता त्वरे करून ॥ ऐसे ब्राह्मणासी बोलून ॥ धावत आलो तुजपाशी ॥६०॥भक्तपाळक तू परमात्मा ॥ अन्याय माझा करी क्षमा ॥ तुजवाचोनि मेघश्यामा ॥ आश्रय नसे दुसरा ॥६१॥ऐसे ऐकोनिया जनार्दन ॥ सुहास्यवदन बोले वचन ॥ म्हणे शीघ्र दूत पाठवून ॥ अस्थि आणावी आताची ॥६२॥मग तात्काळ नृपवर ॥ अस्थि आणविल्या समग्र ॥ ते पाहोनि श्रीधर ॥ काय करिता जाहला ॥६३॥स्वामीतीर्थाचे पूर्वेसी ॥ सरोवर असे निश्चयेसी ॥ तेथे आपण हृषीकेशी ॥ येते जाहले तात्काळ ॥६४॥सरोवरतीरी ठेविल्या अस्थि ॥ त्यावरी जळ शिंपिले आत्महस्ती ॥ कृपादृष्टीने पाहता श्रीपती ॥ नवल अद्भुत जाहले ॥६५॥स्त्री आणि कुमार कुमारी ॥ निद्रिस्तापरी उठिले झडकरी ॥ तोंडमान आनंदला अंतरी ॥ म्हणे मुरारी पावला मज ॥६६॥धन्य धन्य मी कृतकृत्य ॥ मानूनि श्रीहरीचे चरण धरित ॥ म्हणे हे दीनदयाळा अघटित ॥ घडविले आजि समर्था ॥६७॥तू पूर्ण ब्रह्म सनातन ॥ काय एक न करशी इच्छेकरून ॥ आकारलासि भक्ता कारण ॥ दीनदयाळा श्रीपती ॥६८॥मग वेंकटेश बोले वचन ॥ कोणासी न सांगे हे वर्तमान ॥ आजि पासोनि साक्षात बोलणे ॥ न घडे जाण सर्वथा ॥६९॥कलिमाजेल बहुत ॥ लोक होतील अधर्मरत ॥ यास्तव राहू गुप्त ॥ जाण यथार्थ राजेंद्रा ॥७०॥असो वंदोनि हरीचे चरण ॥ स्त्रीस्तु अर्पी ब्राह्मणालागून ॥ विप्र जाहला आनंदघन ॥ स्त्रियेप्रती पुसतसे ॥७१॥घेवोनिया कुमार कुमारी ॥ कोठे गेली होतीस सुंदरी ॥ येरी वर्तमान श्रुतकरी ॥ पतिप्रती सर्वही ॥७२॥यात्रेसि गेलियावरी आपण ॥ मरण पावलो अन्नेविण ॥ वेंकटेशाचे उदरी जाण ॥ गेलो होतो स्वामिया ॥७३॥अनंत ब्रह्मांड समग्र ॥ देखिले म्या साचार ॥ देवांसहि चतुर्वक्त्र ॥ प्रत्यक्ष म्या पाहिला ॥७४॥पुत्र म्हणे ताता अवधारी ॥ भुतगणांसहित त्रिपुरारी ॥ सप्तही समुद्र नेत्री ॥ पाहिले म्या तत्वता ॥७५॥शिशु म्हणे वन उपवन ॥ पर्वत गुहा कठिण स्थान ॥ देवदानव यक्षगण हरीउदरी पाहिले ॥७६॥स्त्री प्राणेश्वरा ऐका ॥ काय वर्णू तेथीलसुखा ॥ पुन्हा आम्हांसी वैकुंठनायका बोलावोनि आणिले ॥७७॥ऐसे ऐकोनि उत्तम ॥ विप्र म्हणे धिक् माझे जन्म ॥ वेदाध्ययन शास्त्र उत्तम ॥ धिक् पठण माझे असे ॥७८॥तीर्थ यात्रा आलो करून ॥ धिक् ते माझे सर्वसाधन ॥ धिक् जळे ते अनुष्ठान ॥ हरिप्राप्ती विण व्यर्थ पै ॥७९॥हरिप्राप्तिविण कर्म ॥ तेचि जाणावे अकर्म ॥ हरि प्राप्तिविणे दानधर्म ॥ व्यर्थ काय जाळावे ॥८०॥जैसे उदकेविण सरोवर ॥ की नासिके वाचोनि वक्त्र ॥ की दीपाविण मंदिर ॥ शून्य दिसे ज्यापरी ॥८१॥तैसे हरिप्राप्तिविणे ध्यान ॥ व्यर्थचि करणे देहदंडण ॥ असो स्त्रीसि म्हणे ब्राह्मण ॥ धन्य तूचि पै ॥८२॥स्त्री पुत्र पुत्री सहित ॥ विप्र स्वदेशासी जात ॥ हरिगुण मुखी वर्णिता ॥ परमानंदे गेला पै ॥८३॥इकडे तोंडमान भूपती ॥ सर्वभावे भजे हरिप्रती ॥ सहस्त्रतुलसी मंजरी प्रीती ॥ सुवर्णाच्या करविल्या ॥८४॥प्रेम भावे वेंकटेशासी ॥ अर्पिता जाहला सुवर्णतुलसी ॥ पूजन करोनी वेगेसी ॥ राव स्वस्थाना पावला ॥८५॥दुसरे दिवशी तोंडमान म्हणे ॥ पुन्हा आला पूजनालागून ॥ तो मृन्मय तुलसीचे पूजन ॥ नेत्री पाहता जाहला ॥८६॥तोंडमान म्हणे नारायणा ॥ माझी पूजा अव्हेरून ॥ मृन्मय तुलसी केल्या धारण ॥ श्रीनिवासा नवल हे

॥८७॥वेंकटेश म्हणे नृपाते ॥ लक्षवधि आहेत माझे भक्त ॥ दरिद्री आणि श्रीमंत ॥ समसमान मजलागी ॥८८॥उत्तरदिशेसी एकग्राम ॥ एक कोशावरी आहे उत्तम ॥ तेथे भक्त माझा नामे भीम ॥ कुलाल जातीचा वसतसे ॥८९॥मृन्मयतुलसी करून ॥ भावे अर्पिल्या तेणे ॥ त्याची भक्ति पाहून ॥ परमानंद वाटला ॥९०॥ऐसे ऐकता नरेश ॥ जाता जाहला तया ग्रामास ॥ कुलाल पाहोन त्यास ॥ काय बोलता जाहला ॥९१॥मी दरिद्री क्षुद्र याती ॥ काय पातला एथे नृपती ॥ तो इतक्यात खगपती ॥ वैकुंठीहूनि पातला ॥९२॥स्त्रिये सहित कुलाल ॥ दिव्य रूप जाहला तत्काळ ॥ गरुडारूढ उतावेळ ॥ वैकुंठधामा पातला ॥९३॥सायुज्यता मुक्ती ॥ दीधली त्यासी रमापती ॥ तोंडमान आपले चित्ती ॥ ते देखोनि दुःखित ॥९४॥तोंडमान पुसे हरीसी ॥ निजधामा धाडिले कुलालासी ॥ मजवरी कृपा वेगेसी ॥ करी आता नारायणा ॥९५॥मग त्रो त्रिजगज्जीवन ॥ तोंडमानासि होऊन प्रसन्न ॥ सरूपता मुक्ति देऊन ॥ निजपदी नेऊनि स्थापिला ॥९६॥द्वादशाध्याय पर्यंत ॥ जाहला वेंकटेशविजय ग्रंथ ॥ जय पुरुषोत्तमा वैकुंठनाथा ॥ तुजप्रीत्यर्थ हो का सदा ॥९७॥वेंकटेशविजय राजेश्वर ॥ हे द्वादश त्याचे प्रचंडवीर महत्पापाचे संहार ॥ श्रवणमात्रे करती ते ॥९८॥किंवा द्वादशखणांचे दामोदर ॥ की द्वादश खणीवृंदावन सुंदर ॥ किंवा द्वादशाक्षरी मंत्र ॥ आवडे साचार हरीने ॥९९॥की द्वादशधारी चक्र ॥ किंवा प्रकटले द्वादश मित्र ॥ किंवा द्वादशी तिथी थोर ॥ पंचशात आगळी ॥१००॥की वेंकटेशविजय सूर्यनारायणे ॥ एकदाच उघडिले द्वादशनयन ॥ किंवा द्वादश मासपूर्ण ॥ संवत्सरासी ज्यापरी ॥१॥तैसा हा ग्रंथ पवित्र ॥ वाचिता ऐकता पापसंहार ॥ ग्रंथ संग्रह करिता निर्धार ॥ फळ समान सर्वांसी ॥२॥जे हे ग्रंथ ऐकती वाचती ॥ यम काळ त्यांसी वंदिती ॥ वैकुंठभुवन अंती ॥ होय प्राप्ति तयाते ॥३॥ज्याचे गृही असेल ग्रंथ ॥ पिशाच भूत न रिघे तेथ ॥ सर्प व्याघ्र तस्कर न बाधित ॥ काळत्रयी सर्वथा ॥४॥ज्याचा यावरी पूर्ण विश्वास ॥ त्यासी निजांगे रक्षी श्रीनिवास ॥ लक्ष्मीसहित वेंकटेश ॥ वास करी तेथेची ॥५॥त्यासी निजांगाची साउली ॥ करोनि रक्षी सर्वकाळी ॥ नाना संकट दुःखसकळी ॥ निवारी त्यांचे परमात्मा ॥६॥एक आवर्तन करिता ग्रंथासी ॥ भस्म होती पापराशी ॥ अखंड पाहील तयासी ॥ कैवल्यपद प्राप्त होय ॥७॥हा ग्रंथ कल्पतरु समान ॥ जे वाचिती कामना धरून ॥ त्याचे मनोरथ होती पूर्ण ॥ जे जे इच्छित सर्वही ॥८॥भृगुवारी ग्रंथ पूजन ॥ करावे एक आवर्तन ॥ शुचिर्भूत करिता शयन ॥ स्वप्नी नारायण प्रकटेल ॥९॥द्वादशावर्तन करिता साचार ॥ ग्रहबाधा होईल त्याची दूर ॥ जारण मारण तयावर ॥ सर्वथाही न चालती ॥११०॥चोवीस आवर्तन ग्रंथासि होती ॥ महारोगाची होईल शांती ॥ शत्रुनाशाचे पावती ॥ न चले शक्तितयांची ॥११॥करिता अठ्ठेचाळीस आवर्तन ॥ सर्वसंकटे जाती निरसून ॥ आणि प्राप्त होईल विद्याधन ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥१२॥आवर्तने अष्टोत्तरशत ॥ जो भक्ति युक्त वाचेल ग्रंथ ॥ पोटा येईल हरिभक्तसुत ॥ श्रीवेंकटेश प्रसादे ॥१३॥ऐसा हा ग्रंथ फलदायक ॥ वर दीधला वैकुंठनायके ॥ भाविके प्रचीत पहावी देख ॥ नसे कारण अभाविका ॥१४॥पुर्वमुखे ग्रंथपठण ॥ पुत्रार्थी याने करावे पूर्ण ॥ प्राप्त होय विद्याधन ॥ उत्तर मुखे वाचिता ॥१५॥दक्षिणमुखे वाचिता निश्चय ॥ होय शत्रूचा पराजय ॥ इतर काम्यार्थी लवलाहे ॥ पूर्वाभिमुखे वाचावे ॥१६॥जे जे पडेल संकट ॥ ते ते वारील ॥ द्वादशाध्यायाचे फळवरिष्ठ ॥ पृथक् पृथक् लिहिले असे ॥१७॥प्रथमाध्यायी मंगलाचरण ॥ गणेशसरस्वतीचे

केले स्तवन ॥ सद्गुरु संतांसि करोनी नमन ॥ मातापितयांसि वंदिले ॥१८॥जनकरायासी दुःख फार ॥ जाहले जाणोनि अहल्या कुमार ॥ शतानंद सांगे विचित्र ॥ हेचि कथन निर्धारी ॥१९॥वृषभासुरासि मारून ॥ ब्राह्मणासि तोषवी जगज्जीवन ॥ वृषभाद्रि नाम पर्वतालागून ॥ दुसऱ्यामाजी हेचि कथा ॥१२०॥तृतीयाध्यायी कथा दोन ॥ वर्णून हनुमंत जन्म कथन ॥ अंजनाद्रि नाम पर्वतालागून ॥ त्रेतायुगी पाडियेले ॥२१॥पुढे शेषवायूंचा वाद अद्भुत ॥ वायूने उडविला पर्वत ॥ शेषाद्रिनाम द्वापारात ॥ तै पासूनि पडियेले ॥२२॥चौथ्यात माधव विप्र ॥ चांडाळीशी रतला अपवित्र ॥ पर्वतदर्शने पाप संहार ॥ जाहले त्याचे निर्धारी ॥२३॥भृगुऋषीने मारिली लाथ ॥ रमा गेली करवीरात ॥ भुतळी आला जगन्नाथ ॥ वल्मीकामाजी राहिला ॥२४॥गाय जाहला विधाता ॥ गौळण होऊनि जगन्माता ॥ चोलदेशी शोधित ॥ वनामाजी हरीते ॥२५॥हरीसि लागला कुठार प्रहार ॥ चोळरायासि श्रापिले मुरहरे ॥ वास केला वेंकटाद्रिवर ॥ पंचमाध्यायी कथियेले ॥२६॥पद्मावतीचे जन्मकथन ॥ उपवनी आली शुभानन ॥ हरि भाळला तीस देखून ॥ बकुलेसि धाडिले नारायणपुरा ॥२७॥सहावे अध्यायी साचार ॥ हीचि कथा जाहली मनोहर ॥ पुढे पुलिदिनीवेषे मुरहर ॥ नारायण पुराप्रति गेला ॥२८॥राजपत्नीसी बोधून ॥ कन्या द्यावी हरीलागून ॥ हा निश्चय जाहला परिपूर्ण ॥ सप्तमाध्यायी कथा हेचि ॥२९॥तेहतीस कोटी सुरवर ॥ ब्रह्मा इंद्र आणि रुद्र ॥ लग्ना आले साचार ॥ अष्टमाध्यायी हेचि कथा ॥१३०॥करवीराहूनि आली इंदिरा ॥ अष्टवर्ग करोनि सत्वरा ॥ निघोनि गेले नारायणपुरा ॥ नवमाध्यायी वर्णिले ॥३१॥दहाव्या अध्यायामाजी कथन ॥ जाहले पद्मावतीचे लग्न ॥ अगस्तीआश्रमी नारायण ॥ राहता जाहला येऊनिया ॥३२॥आकाशराज पावला मरण ॥ कलह मांडला राज्याकारण ॥ विभाग केले जगज्जीवने ॥ अकराव्यात कथा हेची ॥३३॥बाराव्या अध्यायी वर्णन ॥ विप्रस्त्री पुत्र दोघेजण ॥ अन्नाविणे पावले मरण ॥ हरीने त्यासि जीवविले ॥३४॥ऐसे हे बाराअध्याय ग्रंथ ॥ जय जय वेंकटेशा रमाकांता ॥ लेखक पाठक वाचका समस्ता ॥ कल्याणकरी सर्वदा ॥३५॥कुडची वीर करजोडून ॥ संतांसि करी साष्टांग नमन ॥ मजवरी कृपा करून ॥ ग्रंथावलोकन करावे ॥३६॥श्रीकृष्णवेणीचे दक्षिणतीरी ॥ पट्टण एक पाचयोजनावरी ॥ शहापूर नामे निर्धारी ॥ विख्यात नगरी असे ती ॥३७॥तेथील रहिवासी ब्राह्मण ॥ श्रीनिवासराव नामाभिधान ॥ सावणूरकर उपनाम पूर्ण ॥ भारद्वाज गोत्रज पै ॥३८॥चौघे पुत्र त्यासि उत्तम ॥ कोन्हे राघव भास्कर राम ॥ परम निःसीम हरि भक्त ॥३९॥वडील पुत्र कोन्हेराव ॥ श्रीवेंकटेश त्याचा कुलदेव ॥ प्रतिवर्षी करती उत्सव ॥ नवरात्रामाजी प्रीतीने ॥१४०॥श्रीकृष्णवेणीचे तीरी ॥ कंकणवाडी नाम नगरी ॥ तेथील रहिवासी विप्र निधारी ॥ नृसिंहाचार्य नाम तयाचे ॥४१॥वेदशास्त्रप्रवीण ॥ हरिभक्त सुशील ब्राह्मण ॥ कर्मनिष्ठ क्रियावंत पूर्ण ॥ श्रीहरीसी आवडता ॥४२॥ऐसा तो नृसिंहाचार्य ॥ कोन्हे रायाचा पुरोहित होय ॥ जाणोनिया उत्साह समय ॥ घरा आला अकस्मात ॥४३॥कोन्हे राये आदरकरोन ॥ ठेऊन घेतले उत्साहाकारण ॥ नित्य सायंकाळी पुराण ॥ त्याच्या मुखे श्रवण ॥४४॥भविष्योत्तर पुराणोक्त ॥ श्रीवेंकटेश महात्म्य विख्यात ॥ श्रवण केले साद्यंत ॥ अमृताहूनि गोड जे ॥४५॥कोन्हेरायाच्या मनात ॥ उत्पन्न जाहला हाचि हेत ॥ हा ग्रंथ आहे संस्कृत ॥ अबळा अज्ञान न जाणती ॥४६॥प्राकृतभाषेत करून ॥ करावे ग्रंथ निर्माण ॥ मग सांगीतले मजकारणे ॥ ग्रंथ एवढा करावा ॥४७॥ग्रंथ

करावया लागूनी ॥ आल्हाद वाटला माझेमनी ॥ परी संस्कृत ज्ञान मुळीहुनी ॥ न कळे मजला सर्वथा ॥४८॥घुंगुरुड्या एवढे वदन ॥ म्हणे मी सकळा पर्वत गिळीन ॥ खंद्योत स्वतेजे करून ॥ झाको इच्छित सूर्याते ॥४९॥तैसा मनी धरिला हेत ॥ परे न कळे संस्कृताचा अर्थ ॥ कवित्व कळा किंचित ॥ अंग नसे सर्वथा ॥१५०॥कैसा होईल हा ग्रंथ ॥ चिंता वाटली मानसी बहुत ॥ नृसिंहाचार्यासी मनोगत ॥ कळला माझा सर्वही ॥५१॥मग तो होवोनी कृपावंत ॥ दीधला तेणे वर उचित ॥ म्हणे तू आरंभ करी ग्रंथाते ॥ सिद्धिपावेल निर्धारी ॥५२॥श्रीनिवास शेषाद्रिवासी ॥ कृपाकरील निश्चयेसी ॥ सायास न लागता तुजसी ॥ ग्रंथ करवील जगदात्मा ॥५३॥मग संस्कृतार्थ उकलून ॥ सांगितला मजकारणे ॥ वंदोनीया आर्यचरण ॥ ग्रंथासि आरंभ पै केला ॥५४॥मुख्य आचार्य दयार्णव ॥ आणि निजबंधुसि कोन्हेरराव ॥ साह्यकरोनिया सर्व ॥ ग्रंथ सिद्धीसि नेला पै ॥५५॥ज्याचेनि जाहला ज्ञान बोध ॥ ऐका गुरुमालिका अगाध ॥ सज्जनरंजन घराणे प्रसिद्ध ॥ चैतन्य सांप्रदायिक पै ॥५६॥मूळपुरुष राघवचैतन्य ॥ जो ज्ञानियांमाजी चूडारत्न ॥ इंदापुरी समाधिस्थ होऊन ॥ अखंडवस्ती केली असे ॥५७॥त्यापासोनी रावगिरिधर ॥ केवळ ज्ञानाचे आगर ॥ मुरहरनामे साधु थोर ॥ तयापासूनि जाहले ॥५८॥यशवंतराव तेथून ॥ जाहले अद्भुतज्ञान संपन्न ॥ अमृतराव तयापासून ॥ भक्तराज जाहले ॥५९॥पाहूनि त्याची कवित्व रचना ॥ मान तुकविती विद्वज्जन ॥ गोड केवळ अमृता समान ॥ नामा सारिणी करणी ज्याची ॥१६०॥त्यापासोनी रावगोविंद ॥ जो साक्षात अवतरला मुकुंद ॥ ज्याच्या दृष्टीसि भेदाभेद ॥ नसे काही सर्वथा ॥६१॥तो माझा सद्गुरु साचार ॥ त्याचेनि झाला ग्रंथपरिकर ॥ करोनिया जयजयकार ॥ वंदिले चरण तयाचे ॥६२॥ज्याकुळी उद्भवलो साचार ॥ तेही ऐका सर्वज्ञ चतुर ॥ शहापुराहूनि परिकर ॥ पूर्वदिशेस क्रोशावरी ॥६३॥कुडची नामे लघुग्राम ॥ तेथील कर्णीक वृती उत्तम ॥ शांडिल्य गोत्रज त्याचे नाम ॥ संकरसंपत मूळपुरुष ॥६४॥त्यापासोनि जाहला वीर ॥ रुद्रनामा त्याचा कुमार ॥ संकरनामाचा निर्धार ॥ त्यापासोनि जाहला ॥६५॥पुन्हा त्याचा पुत्रवीर ॥ त्यापासोनि जाहला रुद्र ॥ त्यासि जाहला नाही पुत्र ॥ वंश तेथे खुंटला ॥६६॥मग विश्वामित्र गोत्रापासोन ॥ कन्यापुत्र आणिला पोषणा ॥ त्याचे नाम देव जाणा ॥ वीर तेथोनि जाहला ॥६७॥त्याचा लिंगनामे पुत्र ॥ त्यासि जाहले पंचपुत्र ॥ सिद्ध बसवंत नृसिंह साचार ॥ विरुपाक्ष राम पाचवा ॥६८॥त्यात द्वितीय पुत्र बसवंत ॥ त्यासि जाहले तिघे सुत ॥ यशवंत नारायण कृष्ण यथार्थ ॥ नामे त्यांची अनुक्रमे ॥६९॥त्यात वडील यशवंत ॥ दुसरे नाम बाळाजी पंत ॥ तो माझा पिता यथार्थ ॥ महाज्ञानी भक्तराज ॥१७०॥तो पिता माझा लवलाही ॥ मातेचे नाव कृष्णाबाई ॥ वीर वंदोनी उभयताही ॥ वेंकटेशविजय संपविला ॥७१॥याचा मूळग्रंथ संस्कृत ॥ भविष्योत्तरी बोलिले सत्यवतीसुत ॥ एकसहस्त्र पाचशत ॥ ऐशी श्लोक आगळे ॥७२॥इतक्यांचा मथितार्थ ॥ प्राकृत बोलविला श्रीरमानाथे ॥ त्याची श्लोक संख्या यथार्थ ॥ ऐका चतुर पंडित हो ॥७३॥शके सत्राशे त्रियाण्णव ॥ प्रजापतिसंवत्सर अभिनव ॥ शुद्ध त्रयोदशी भृगुवार अपूर्व ॥ आषाढमास विख्यात पै ॥७४॥शहापूर ग्रामी यथार्थ ॥ कोन्हेरायाचे गृहात ॥ साद्यंत अवघाग्रंथ ॥ तेथेचि जाहला जाणिजे ॥७५॥श्रीमदुरगेंद्रगिरिनिलया ॥ वीरवरदा वैकुंठ राया ॥

करुणासागरा भक्तप्रिया ॥ चिद्घनानंदा जगद्गुरु ॥७६॥इति वेंकटेशविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत पुराण भविष्योत्तर ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ द्वादशाध्याय गोड हा ॥१७७॥एकंदर ओविसंख्या ॥२१००॥ श्रीकृष्णार्पण ॥